इन सब ऐतिहासिक घटनाओं की ओर दृष्टिपात करनेपर हम इसी निश्चय पर पहुँचते हैं कि मीराँ की मृत्यु वि. सं. १६२० और सं. १६२५ के बीच हुई होगी। भारतेन्दु हरिश्चंद्र ने भी उदयपुर दरबार की सम्मति से मीराँबाई का मृत्युकाल सं.१६२० और सं० १६३० के बीच निश्चित किया है[1]। मीराँ की मृत्यु सं० १६३० के लगभग इतिहास पर दृष्टिपात करनेपर ठीक नहीं ज्ञात होती है। चितौड़ पर अकबर ने सं० १६२४ (ई. सन १५६८) में घेरा डाल दिया था। इसी घेरे में वीर जयमल चैत्र बदि १३ बुधवार (ता० २५ फरवरी) को वीरगति को प्राप्त हुआ तथा महाराणा उदयसिंह को चितौड़ छोड़कर भागना पड़ा। ऐतिहासिक क्षेत्र तबसे चितौड़ के बदले उदयपुर हो गया। जहाँ के विषय में हम मीराँ सम्बन्धी कोई समकालीन घटना नहीं पाते हैं। अतः मीराँ जयमल के जीते जी ही राणा उदयसिंह के चितौड़ पर राज्य करते समय ही द्वारका से बुलाई गई। अतः हमारी समझमें उसका मृत्युकाल वि० सं० १६२० से सं० १६२५ तक मानना ज़्यादा उचित है। राजपुताने के प्रसिद्ध इतिहासज्ञ श्री जगदीशसिंह गहलोत मीराँ की मृत्यु वि० सं० १६०५ चैत्र सुदी ३ मानते हैं। यह तिथि उन्हें किसी बही में देखने से ज्ञात हुई। बहुत सम्भव है कि यह तिथि सं० १६२५ के बदले सं० १६०५ लिखी गई हो। यदि यह लिपिकार की त्रुटी हो तो फिर यह कोई सन्देह नहीं रहता कि मीराँ की मृत्यु वि० सं० १६२५ की चैत्र सुदी ३ (ई० सन १५६८ ता० २ मार्च मंगलवार) को हुई। इस प्रकार हम मीराँ का मृत्युसमय सं० १६२० व सं० १६२५ के बीच मानना श्रेयस्कर समझते हैं।

---

६ श्रीशङ्कराचार्यांविषयीं कांहीं नवी माहिती

(प्रो. ह. बा. भिडे, एम्. ए., अहमदाबाद)

*काश्मीर संस्कृत ग्रन्थमालेंत तन्त्रविषयक दोन पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत--**१ श्रीविद्यार्णवतन्त्र**, भाग २; **२ वामकेश्वरीमतम्**। या ग्रन्थांत, श्रीशङ्कराचार्यांविषयीं जी हकीकत दिली आहे ती अगदीं नवीन आहे. तिच्याकडे विद्वान् संशोधकांचें लक्ष जावें तसें गेलेलें दिसत नाहीं. विद्वानांनीं तिचा विचार अवश्य करावा, इतका नवीनपणा त्या माहितींत आहे.

श्रीविद्यार्णव हा ग्रन्थ फारच मोठा आहे. त्याचीं पृष्ठें, मोठ्या आकाराचीं ९०० च्या वर आहेत. त्याचे अध्याय ३६ आहेत. अध्यायाला 'श्वास' म्हटलें आहे.

---

१. गुजराती काव्यदोहन, ग्रंथ ७ पृ. २४.

* वाढदिवस ४० वा, शक १८७२ (१६-६-१९५०).

हा ग्रन्थ तन्त्रविषयक आहे. **शारदातिलक** व **प्रपञ्चसार** हे तन्त्रग्रन्थ ज्या पद्धतीनें रचले आहेत त्याच पद्धतीनें या ग्रन्थाची रचना करण्यांत आली आहे. पण विषय-प्रतिपादन जास्त विस्तृत, आणि साङ्गोपाङ्ग आहे. या ग्रन्थांत तन्त्रोक्त शाक्त उपासनेची जितकी सविस्तर माहिती सांपडते तितकी इतर कोणत्याहि ग्रन्थांत असलेली माझ्या पाहण्यांत नाहीं.

या ग्रन्थाचा कर्ता विद्यारण्य–नामक आहे. स्वकृतग्रन्थाचें नांव श्रीविद्यार्णवतन्त्र ठेवण्यांत त्यानें एक काव्यचमत्कृति साधली आहे. 'विद्या' आणि "श्रीविद्या" हे शब्द, तान्त्रिक परिभाषेंत, पुष्कळदां समानार्थी वापरले जातात. म्हणजे, ग्रन्थाच्या नामकरणांत ग्रन्थकर्त्यांच्या नांवाचेंहि सूचन होऊं शकेल, असें कौशल्य त्यानें दाखविलें आहे; दुसरें स्वतः 'विद्ये'चें अरण्य असून या अरण्यानें 'विद्ये'चा अर्णव म्हणजे समुद्र निर्माण करून ठेवला आहे; म्हणजे, पार्थिव वस्तुपासून जलतत्त्वाचा सांठा उत्पन्न व्हावा, हें कौतुकास्पद नाहीं काय? आमच्या तत्त्वज्ञानांत पञ्च भूतांच्या उत्पत्तीविषयीं सांगतांना, पाण्यापासून पृथ्वीची उत्पत्ति सांगितली आहे; पण, या ग्रन्थकारानें, हा उत्पत्तिक्रम उलटविला आहे! असो.

या ग्रन्थाचा कर्ता विद्यारण्य हा श्रीशङ्कराचार्यांच्या परंपरेंतला आहे. ग्रन्थारंभीं त्यानें आपल्या गुरुपरम्परेची माहिती दिली आहे. श्रीशङ्कराचार्य हे श्रीविद्योपासनेचा पुनरुद्धार करणारे अवतारी पुरुष होते हें आतां विद्वानांना मान्य झालेलें आहे. तन्त्र-मार्गांत ज्या भिन्न भिन्न उपासना आहेत त्या सर्वांना चालना देऊन सर्व भारतवर्षांत शाक्त उपासनेचा प्रसार त्यांनीं केला, असें या '**श्रीविद्यार्णवा**'वरून दिसतें. ग्रन्थाच्या पहिल्याच 'श्वासां'त पूर्वादि आम्नायान्तर्गत भिन्न भिन्न उपासनांचे अनेक क्रम देऊन त्यांच्या त्यांच्या वेगवेगळ्या गुरुपरम्परा दिल्या आहेत. त्यांमध्यें, आपल्यास सध्यां खास नोंदण्यासारखी गोष्ट दिसून येते ती ही कीं, त्या प्रत्येक परम्परेमध्यें गौडपादांपासून श्रीशङ्कराचार्यांपर्यंतचीं नांवें आहेत. त्याचा अर्थ असा कीं, यांना सर्व उपासनांमध्यें गुरुत्वाचा अधिकार होता; ते सर्व दर्शनांचे आचार्य होते; म्हणून कोणत्याहि देवाची उपासना असो, ती प्रचलित करण्याचा त्यांचा अधिकार होता. म्हणूनच ते 'जगद्गुरु' या पदवीला लायक होते. पूर्वादि सहा आम्नाय, तदन्तर्गत अनेक देवता, तसें, शिव, शक्ति, विष्णु, गणपति व सूर्य, या पञ्चायतनांतल्या देवता, या सर्वांचे उपासनाक्रम, या सगळ्यांमध्यें गौडपादादिशङ्करान्त गुरूंना स्थान आहे. त्या सगळ्या परम्परा या ग्रन्थांत दिल्या आहेत.

ही माहिती नवीन तर खरीच; पण याहूनहि विशेष प्रकारें नवीन अशी माहिती, आणखी दोन गोष्टींबाबत, विद्यारण्यांनीं दिली आहे.

आजपर्यंत आपण समजत होतों कीं, श्रीशङ्कराचार्यांचे गुरु गोविन्दभगवत्पाद,

व परमगुरु गौडपाद, आहेत. पण आतां विद्यारण्यांनीं अगदींच वेगळी माहिती दिली आहे.

तसेंच, गौडपादांच्या अगोदरची जी गुरुपरम्परा आहे व जी वसिष्ठांपर्यंत जाऊन पोंचते, तिच्यांत आतांपर्यंतच्या माहितीप्रमाणें, गौडपादांच्या अगोदर पांच नांवें आहेत. पण, “ **श्रीविद्यार्णवां**”त, वेगवेगळ्या उपासनांच्या वेगवेगळ्या परंपरा दिल्या आहेत, त्यांच्यांत गौडपादांपूर्वीं वसिष्ठांपर्यंत, ६०।६५ नांवें दिलेलीं आढळतात. पण याबद्दल सध्यां कांहीं सांगत नाहीं. श्रीशङ्कराचार्यांपुरतीच माहिती देत आहें.

गौडपाद्–गोविन्द–शङ्कर अशी ही आतांपर्यंत मानली गेलेली परंपरा आहे. विद्यारण्यांनीं दिली आहे ती अशीः— गौडः (१) पावकः (२) एव च। पराशर्यः (३) सत्यनिधी (४) रामचन्द्रः (५) ततः परम् ॥५९॥ गोविन्दः (६) शंङ्कराचार्यः (७) ...(प्रथमश्वासः) ही माहिती अगदींच नवीन आहे.

श्रीशङ्कराचार्यांच्या शिष्यांबाबतहि विद्यारण्यांनीं दिलेली माहिती, आतांपर्यन्त अगदीं अज्ञातप्राय, अशीच आहे. विद्यारण्य म्हणतात– “ शङ्कराचार्यशिष्याश्च चतुर्दश दृढव्रताः ॥ ६० ॥ देव्यात्मानो दृढात्मानो निग्रहानुग्रहक्षमाः। शङ्करः (१) पद्मपादाख्यो (२) बोधो (३) गीर्वाण (४) एव च ॥ ६१ ॥ आनन्दतीर्थनामा च (५) पञ्चैते भिक्षवः स्मृताः। सुन्दरो (६) विष्णुशर्मा (७) च लक्ष्मणो (८) मल्लिकार्जुनः (९) ॥ ६२ ॥ त्रिविक्रमः (१०) श्रीधरश्च (११) कपर्दी (१२) केशवस्ततः (१३) दामोदर (१४) इति ख्याता गृहिणो नवसङ्ख्यकाः ॥ ६३ ॥

या यादींतले पहिले पांच संन्यासी होते व बाकीचे ९ गृहस्थाश्रमी होते.

आतांपर्यंतच्या परम्परागत समजुतीप्रमाणें, आचार्यांनीं पुष्कळ शिष्य केले, त्यांच्यांत चार मुख्य होते. ते–सुरेश्वर, पद्मपाद, हस्तामलक व त्रोटक. पूर्वादि चार दिशांना चार पीठें स्थापन करून त्यांवर या चौघांना अधिष्ठित केले, असेंहि समजलें जातें. पण या दुसऱ्या समजुतीला प्राचीन खातरीलायक पुरावा नाहीं. असो. या चौघांपैकीं, फक्त एकाचें, पद्मनाभाचें नांव, विद्यारण्यांनीं दिलेल्या नामावलींत आहे; सुरेश्वर, हस्तामलक, व त्रोटक यांचीं नांवें नाहींत.

ही नामावलि दिल्यानंतर, विद्यारण्यांनीं, या चौदांपैकीं कांहींची शिष्यपरंपरा दिली आहे. ती येणेंप्रमाणें:—

१ शङ्कर– कांहीं माहिती दिली नाहीं.

२ पद्मपाद्– ६ शिष्य; मण्डल, परिपावक, निर्वाण, गीर्धन, चिदानन्द व शिवोत्तम. हे ‘ विविक्ताश्रमिणो धीराः मौनिनस्त्यक्तमत्सराः ॥ ६६ ॥ विचरन्ति तथा लोके तत्तच्छिष्यपरम्पराः।

३ बोल– ‘ बोधस्य बहवः शिष्या विविधा (पाठान्तर, द्विविधाः) भुवि केरले । ॥ ६७ ॥

४ गीर्वाण–यांची शिष्य–प्रशिष्यपरम्परा दिली आहे. ती येणेंप्रमाणें–विद्वद्गीर्वाण, –विबुधेन्द्र,–सुधीन्द्र–मन्त्रगीर्वाण.

५ आनन्दतीर्थ– यांचे पुष्कळ शिष्य होते, ते गृहस्थाश्रमी व 'आराध्यपादुका-पीठसम्प्रदायविदः ।' असे होते.

असे हे पांच संन्यासी शिष्य झाले. नंतर नऊ गृहस्थाश्रमी शिष्य—

६ सुन्दर– कांहीं माहिती दिली नाहीं.

७ विष्णुशर्मन्– शिष्य प्रगल्भाचार्य, (प्रशिष्य) विद्यारण्य (**श्रीविद्यार्णवा**चे कर्ते).

८ लक्ष्मण– यांच्याविषयींची एक आख्यायिका दिली आहे; पण शिष्यादिकांची वगैरे कांहीं माहिती दिली नाहीं. हे स्वतः विद्वान्, तपस्वी होते, व तुरीय अवस्था प्राप्त झाल्यावर महीतलावर विचरण करीत असत, असें म्हटलें आहे.

९ मल्लिकार्जुन– यांचे शिष्य 'विन्ध्य–प्रदेशके' होते.

१० त्रिविक्रम– यांचे शिष्य 'श्रीजगन्नाथ–देशके' होते.

११ श्रीधर– यांचे 'गौडमैथिल–वङ्गाल–देशके' होते.

१२ कपर्दी– 'काश्ययोध्या–प्रदेशेषु शिष्याः ख्याताः कपर्दिनः ॥ १७ ॥

१३ केशव
१४ दामोदर } कांहीं माहिती दिली नाहीं.

येणेंप्रमाणें माहिती देतांना मध्यें ग्रन्थकर्त्यानें आपण " **श्रीविद्यार्णव** ग्रन्थाची निर्मिति कशी व केव्हां केली तें सांगितलें आहे. विद्यारण्यांचे गुरु विष्णुशर्मा, यांचे गुरुबन्धु लक्ष्मण, हे फिरत फिरत राजा प्रौढदेव ह्याच्या राजधानीस गेले; तेथें त्यांचा सन्मान करून राजानें त्यांना उंची वस्त्रांची भेट दिली. आश्रमांत जाऊन लक्ष्मणांनीं आपल्या उपास्य देवतेचें यजन केलें; नंतर तदङ्गभूत हवन करतांना भक्तिभावानें त्या वस्त्रांचा देवीप्रीत्यर्थ होम केला. तें ऐकून प्रौढदेवाला वाईट वाटलें. तीं वस्त्रें परत मागवून पुनः तितक्या किंमतीचीं वस्त्रें लक्ष्मणांना द्यावीत असा विचार करून राजानें वस्त्रें परत मागितलीं. ब्राह्मणाला दिलेलें दान परत मागितलेलें पाहून लक्ष्मणांना राग आला, व 'तुझा निर्वंश होईल' असा त्या ब्रह्मस्वापहारक राजाला त्यांनीं शाप दिला; व ते दक्षिणकडे गेले. राजाला वाईट वाटलें व त्यांचेकडे पुनः जाऊन त्यानें क्षमायाचना केली. लक्ष्मणांनीं सांगितलें कीं तुला पुत्र होईल; पण अपत्यसुख तुझ्या नशिबीं नाहीं. नंतर राजा परतला. पुढें कांहीं काळानें राणी गरोदर राहिली; पण प्रसूतीपूर्वी राजा मरण पावला. तेव्हां प्रजाजनांनीं राज्यकारभाराचें काम विद्यारण्यांकडे सोपविलें. यांनीं " श्रीविद्यानगर " नांवाचें शहर निर्माण केलें; तें श्रीचक्राकार होतें,

कालक्रमानें प्रौढदेवाचा पुत्र अम्चदेव वयांत आल्यावर त्याला गादीवर बसविलें. नन्तर, अम्चदेवानें व विद्वानांनीं विनंती केल्यावरून, अनेक ग्रन्थांचें आलोडन करून, लोकोपकारार्थ, "श्रीविद्यार्णव" ग्रन्थाची रचना विद्यारण्यांनीं केली. ग्रन्थ पूर्ण झाल्यावर जगद्धात्री महामाया त्यांच्या अग्रभागीं आविर्भूत होऊन तिनें वर दिला कीं "तुझ्यावर गुरुत्वाची भावना करून, दीक्षेशिवाय, ग्रन्थांतल्या मन्त्रांचा जप जो करील त्याला 'अतितराम्' सिद्धि प्राप्त होईल.'

ग्रन्थाच्या कालनिर्णयाच्या बाबतींत नक्की कांहीं सांगतां येत नाहीं. मूळग्रन्थांत स्पष्ट असा कांहीं उल्लेख नाहीं. "**क्रियाकाण्डक्रमावलि**" नांवाच्या ग्रन्थांतून अनेक ठिकाणीं उतारे घेतले आहेत; हा ग्रन्थ सोमशम्भूनें विक्रमसंवत् ११३० मध्यें तयार केला असें त्यांत म्हटलें आहे. असें, "श्रीविद्यार्णवाचे सम्पादक, श्री. मधूसूदन-कौलशास्त्री ह्यांनीं प्रस्तावनेंत दिलें आहे. म्हणजे, इ. स. १०७२ च्या नंतर केंव्हां तरी "श्रीविद्यार्णवा"ची रचना झाली असावी. त्या सुमारास प्रौढदेव व अम्चदेव हे राजे होऊन गेल्याचा असंदिग्ध पुरावा मिळतो कीं काय तें पाहिलें पाहिजे.

मला या रचनाकालाबाबत थोडी शङ्का वाटते, एक कारण असें; श्री शङ्कराचार्यांपासूनच्या परम्परेंत, ४ था पिढींत विद्यारण्य झाले असें ते स्वतःच सांगतात. आचार्यांचा निर्याणकाल, सध्यां सामान्यत: सर्व विद्वान् मानतात त्याप्रमाणें इ. स. ८२० आहे. तेथपासून इ. स. १०७२ पर्यंत, २५० च्या वर वर्षें होऊन जातात; आचार्यांनंतरचे तिसरे पुरुष २५० वर्षांनंतर झाले असें मानलें तर दर पिढीला ८०।८५ वर्षें मोजावीं लागतात, हें आयुर्मान बरेंच जास्ती दिसतें. म्हणून मनांत शंका उद्भवते. याचा खुलासा विद्वानांनीं करावा अशी विनंती आहे.

या लेखाच्या आरंभीं "**वामकेश्वरीमतम्**" या दुसऱ्या एका काश्मिर ग्रन्थमालेंतील ग्रन्थाचा उल्लेख मीं केला आहे. "**वामकेश्वरतन्त्र**" नांवाचा एक बृहद्ग्रन्थ तन्त्रशास्त्रांत प्रसिद्ध आहे; त्याचा कांहीं भाग प्रसिद्ध झाला आहे; त्याचे ८ पटल आहेत; त्यांपैकीं ५ पटल, जयरथाच्या टीकेसह, "**वामकेश्वरीमतम्**" या नांवानें सदरहू मालेंत प्रसिद्ध केले आहेत. पटल १, श्लोक ८८।८९ यावरील टीकेंत जयरथ म्हणतो:–"अस्य दर्शनस्य एतदेव आचार्यद्वयं काश्मीरेष्ववतारकम्।" (पृ. ४८) याचा अर्थ "**वामकेश्वरतन्त्र**" हा श्रीविद्योपासनाक्रमाविषयींचा दर्शन ग्रन्थ आहे. जयरथाच्या म्हणण्याचा आशय असा आहे कीं काश्मीरांत या दर्शनाचा, प्रसार या दोन आचार्यांनीं केला. हे दोन आचार्य कोण ? जयरथानें यांचीं नांवें बरेच वेळां सांगितलेलीं आहेत. एक आचार्य, शङ्करराशि व दुसरे, ईश्वरशिव. या दोघांपासून शिष्यप्रशिष्य-क्रमानें इतरांना या दर्शनाची प्राप्ति झाली. हे दोन्ही आचार्य सारख्याच तऱ्हेनें 'आप्त' आहेत व म्हणून, त्यांचें प्रामाण्य 'तुल्य' आहे इ. (...इदमेव अस्मत्पर्यन्तं शिष्य-

प्रशिष्यक्रमेण सर्वेषामपि प्राप्तम्। एवं च तयोराप्तत्वाविशेषात् तन्मतमेव सर्वात्मना प्रमाणम्। ततश्च तुल्यप्रमाणत्वात्० पृ. ४८).

या दोहोंपैकीं एक आचार्य, शङ्करराशि, हे कोण असावेत ? विद्वानांच्या पुढें माझी एक कल्पना मांडतों. श्रीशङ्कराचार्यांनीं १४ मुख्य शिष्य केल्याचें सांगून त्यांचीं नांवें विद्यारण्यांनीं दिलीं आहेत; तीं या लेखांत वर सांगितलीं आहेत, त्यांत पहिलें नांव शङ्कर आहे. विद्यारण्यांचे शङ्कर (आचार्यांचे शिष्य) तेच जयरथाचे शङ्करराशि, असें निगमन केल्यास चूक होईल काय ? हें अनुमान अगदींच अवास्तव नाहीं. याला एक मुख्य कारण म्हणजे हे सर्व विद्योपासनेच्या परम्परेंतले आहेत. आचार्यांच्या एका शिष्यानें केरलदेशांत, एकानें बङ्गालकडे, एकानें विन्ध्यप्रदेशांत, या प्रमाणें भारतवर्षांच्या वेगवेगळ्या भागांत, त्या त्या शिष्यांनीं या उपासनेचा प्रचार केला तसा या आचार्य-शिष्य शङ्करांनीं काश्मीरांत तो सम्प्रदाय वाढविला, असें अनुमान करणें अनुचित होईलसें वाटत नाहीं.

"**वामकेश्वरीमतम्**" चा टीकाकार जयरथ हा श्रृङ्गाररथाचा पुत्र; व श्रृङ्गाररथ हा काश्मीरचा राजा जयसिंह याचा एक मन्त्री होता. जयसिंहाचा समय, इ. स. १२ व्या शतकाचा पूर्वार्ध, हा होय. जयरथानें अभिनवगुप्ताच्या '**तन्त्रालोका**'-वर टीका लिहिली आहे.

गोपाळ कविकृत

७ रुक्मिणी स्वयंवर

(सोळावें शतक, प्रथम चरण)

[कै. **हरि नारायण नेने**, उमरावती]

१ *प्रस्तुत हस्तलिखित पोथी रिधपूरचे महंत गोपिराज यांच्या भांडारांतील आहे. या पोथीला १३८ नंबर दिलेला असून, त्यांत 'रुक्मिणी स्वयंवराचे' पांच प्रसंग (अध्याय) आले असून, ओव्या एकंदर ६४६ आहेत, बाकीचे प्रसंग उपलब्ध नाहींत. तसेंच याच पोथींत कवि 'केमा' याचें 'सीमंतक–हरण' हें काव्य आहे. त्यासंबंधीं पुढें केव्हां तरी पाहूं.

२ उमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक डॉ. म. गो. देशमुख यांनी 'युगवाणी' मासिकांत (एप्रिल, १९४७) 'मराठीच्या साहित्य शास्त्रावर नवा प्रकाश' म्हणून लेख लिहिला आहे. त्यांत त्यांनीं ज्या ग्रंथाचा आधार घेऊन आपलें विवेचन केलें आहे, तो ग्रंथ म्हणजे आजच्या प्रतिपाद्य विषयाची दुसरी प्रत होय.

---

* संमेलन ३६ वें. श. १८७६ (इ. १९४९)

त्यांनीं दिलेल्या वर्णनावरून आम्हाला उपलब्ध झालेली प्रत तीच नसून निराळी आहे, असें स्पष्ट दिसतें. 'क्रमांक १४२ च्या......पोथींतील एका महत्त्वाच्या उताऱ्याचा या छोट्या लेखांत विचार करावयाचा आहे' असें ते लिहितात; त्यांत लेखन शक १६५८ दिला आहे, पण आमच्या आवृत्तींत तो नाहीं. तसेंच 'गोपाळकवि नामक एका अज्ञात कवीनें रचलेले, 'दृष्टांतबोध' व 'रुक्मिणीस्वयंवर' ऊर्फ 'भागवती कथा' हे दोन ग्रंथ या पोथींत लिहिले आहेत.' आमच्या पोथींतील दुसरें प्रकरण हें 'केमा' कवीचें आहे. असो. या ग्रंथांतील दुसऱ्या प्रसंगांत वर्णिलेलीं काव्यमुद्रेचीं **पंचवीस तत्त्वें** घेऊन, केवळ त्याचेच आधारानें डॉ. देशमुख यांनीं आपल्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे. बाकी इतर गोष्टींसंबंधीं त्यांनीं मुळींच उल्लेख केलेला नाहीं. तेव्हां त्यांच्या विषयाचें अतिक्रमण या निबंधांत केलें, असें वाटण्याचें कारण नाहीं. **त्यांनीं न उल्लेखिलेल्या** भागांवर या निबंधांत विवेचन केलें आहे.

३ महानुभाव- काव्यसूचींत (पान ९ पहा.) या ग्रन्थाचें नांव आहे. पण या ग्रंथाचें स्वरूपवर्णन किंवा माहिती कोठेंहि आलेली नाहीं.

४ 'रुक्मिणीस्वयंवर' या प्रकरणावर अनेक कवींनीं आपलीं काव्यें केलीं असतां, पुनः कशाला काव्य केलें, असा आक्षेप घेऊन कवि म्हणतो :

ग्रथन रुक्मिणीस्वयंवराचें । बहुत असती पूर्व कवीचे
तरि मागुतें विस्तारावयाचें । कवण काज ॥ १९ ॥
मागा केलें सिंधुमथन । आतां काइं न करावें(लें!) घुसळण ।
अथवा मशकें न कीजे गमन । गरुडें केलें म्हणौनियां ॥ २० ॥

× × ×

तैसें माहाकविराज : ग्रंथु आईकौनिया प्रबंधराज
मनोर्थ उपजला मज : काव्यकरणीं ॥ २२ ॥
द्वारके पंथें चाले फेंगडें : कृष्ण कृष्ण म्हणे बोबडें
तया वचना मुखें वेडे : म्हणति जाणा ॥ २३ ॥
जन्म जालिया कविकुळीचें : तरि सार्थक होआवया जीवाचें
वर्णन करावें श्रीकृष्णाचें : मतीसारखें ॥ २५ ॥
जीवासि द्यावा भक्ति उपदेशू : देहासि सीकवावा योग अभ्यासू
इंद्रियांसि लावावा अभ्यासू : श्रीकृष्णसेवेचा ॥ २६ ॥
नयनीं लक्षावी श्रीमूर्ति : श्रवणीं आइकावी गुणकीर्ति
घ्राणें आशंसावी वासवृत्ति : श्रीचरणपद्मींची ॥ २७ ॥ इत्यादि.

[कवीचें कुळव्रत श्रीकृष्णसेवा, ती कशी आहे याचें वर्णन कवि करितात]

जो चकोर कुळीचा जाला : तेणें चंद्रचि अभ्यासिला
चातकें एकवर्ति आळविला : एकुचि मेघराजु ॥ ३४

राजहंसाचें कुळव्रत : मानस सरोवरींचि रमत
कोकिळा कुंज न करित : वसंतेविण ॥ ३५ ॥

अशा प्रकारें परिहार देऊन कवि म्हणतो कीं, इतरांनीं ज्या कथा सोडल्या त्याचें वर्णन मी विशेषत: करणार आहे.

'आतां रुक्मीणिसैंवरमीसिं : कथा सांगेन बहुवसीं
ज्या सांगतां राहिल्या कविसि : इतिहासमतें ॥ ७४ ॥

' पूर्वि महाकवि बोलता : इतिहासु राहिलिया कथा ।
तीया **गोपाल** सांगता : आइकतु श्रोतें ॥ ३१५ ॥ '

अशा प्रकारें कवीनें आक्षेपाचें निरसन करून आपलें काव्य केलें आहे.

५ चवकशी केली असतां असें कळलें, कीं या कवीच्या या काव्याचे पहिले पांच प्रसंग (अध्याय) उपलब्ध आहेत. या ग्रंथाचे २५ अध्याय एकंदर असून, ओव्या ३००० आहेत, अशी आख्यायिका आहे. कवि शके १५०६ च्या सुमारास झाला असावा, असें कळतें. मला एकंदर दोनतीन हस्तलिखितें पाहावयास मिळालीं, त्यांत 'पांचच' प्रसंग दिलेले आहेत. कांहीं पोथ्या सांकेतिक लिपींत तर एक सरळ बाळबोध लिपींत आहे. प्रस्तुत पोथी सरळ बाळबोध लिपींत आहे.

६ ग्रंथाच्या पांच अध्यायांवरून कवि मोठा ग्रंथ लिहिण्याच्या योग्यतेचा आहे असें दिसतें. प्रास्ताविक अध्याय अगदीं लहान पण मोठ्या थाटांत लिहिला आहे. 'ॐकार प्रणवा उद्भवो । आदिसृष्टि मूळ प्रभवो । तो वंदिला देवाधिदेवो । श्रीचक्रधरु १ ' अशा प्रकारें श्रीचक्रधराचें स्मरण करून, शारदेचें नमन कवीनें केलें आहे;

' जे सकळधर्मा मूळबीजा । परावर उभय व्रजा ॥
रूपादि गुण सारजा । नाम जियेचें ॥ ७ ॥ "

यानंतर बोधदात्या गुरूचें वंदन कवि पुढीलप्रमाणें करीत आहे—

सांगतां श्रीगुरूचे उपकार : शब्दब्रह्मीं नाहीं उच्चार
जेणें दाविला महापंथु थोर : परमार्थ ऐसा ॥ १२ ॥
जात्यंध वनीं चूकले : जीववन्हीवणवा गवसले
ते जेणें काढुनि लावीले : महाब्रह्मपंथीं ॥ १३ ॥

× × ×

क्षेराक्षेर अतःपर : तत्त्वमसि पासौनि सार
महावाक्याचा उच्चार : करविला जेणें ॥ १६ ॥

× × ×

---

१ महंत गोपिराज यांना माहिती विचारली.
ऐ. सं. नि. खं. ६–५

तया वंदूनि श्रीगुरुगोता : सांगतां रुक्मिणीसैंवरकथा
सावधान देयावें श्रोतां : म्हणे **गोपाळकवि** ॥ १८ ॥

अशा रीतीनें केवळ १८ ओव्यांत पहिला प्रसंग संपला आहे.

७ दुसरा प्रसंग १९ ओवीपासून सुरू होऊन ७२ ओवीला समाप्त झाला आहे. पण या अध्यायांत आलेल्या मजकुराच्या आधारें, 'युगवाणींत' डॉ. देशमुख यांचा लेख आल्यानें, त्याचा थोडक्यांत विचार करून पुढें जाऊं.

यामध्यें कवीनें हा ग्रंथ कां लिहिला, खऱ्या कवीनें काव्यमुद्रिकेचीं पंचवीस तत्त्वें कशीं पाळलीं पाहिजेत, मराठी भाषा सर्वांत श्रेष्ठ कशी, महाराष्ट्राचें महंतपण कसें, याविषयीं लिहून, अशा **प्रकारच्या मराठींत** मी काव्य करीत आहे, असें कवि सांगतो.

काव्यमुद्रिकेचीं पंचवीस तत्त्वें कवीनें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत;

'जे नवरस आणि सोळा आंगें : तें काव्य महापवित्र सांगें
पंचविस तत्त्वें चाले मार्ग : सीद्धांत ठाया ॥ ३७

× × ×

अद्भुत रुद्र श्रृंघरु : भयानक बिभत्स विरु
कारुण्य हास्य शांत हा प्रकारू : नवरसाचा ॥ ३९ ॥
[1]ललीत अर्थ आणि गौरव : साहित्य संगीत श्रृंघार टेव
पदें आणि सीद्धांत भाव : दृष्टांत न्यायादिक ॥ ४० ॥
वर्णक[2] उपमा श्लेशन : समयोचित प्रकरण
ऐसें पंचवीस तत्त्विं बंधन : काव्यमुद्रेचें ॥ ४१ ॥

८ सर्व त्रिभुवनांत श्रीकृष्णाचे पोवाडे गाइले जात आहेत, प्रत्येक देशांत त्या त्या भाषेंत श्रीकृष्णकथा काव्यांत वर्णिली जाते, असें वर्णन करून, महाराष्ट्र देशांत, 'प्रतिष्ठान' च्या महापवित्र भाषेंत मी ग्रंथ लिहीत आहे, असें कवि वर्णन करीत आहे.

'सर्व सिद्धांताची कसवटी : महाअर्थींची रहाटी
म्हणौनि नांव मऱ्हाटी : प्रसीद्ध जगीं ॥ ६२ ॥
संस्कृत शब्द उच्चार : सर्व जगीं न घडे व्यापार
जैसें मार्गीं आडीचें नीर : तृषावंतासि ॥ ६३ ॥
तैसी नव्हे मऱ्हाटीगंगा : ते मुक्तजीवन सर्व जगा
आणि पापक्षाळणिं प्रसंगा : पवित्रपणें ॥ ६४ ॥

---

१ लालित्य.

२ उपमाश्लेशवर्णक : इहीं रंजऊं सकळैक लोक
पोवाडे संसार मोचक : वानूं मुकुंदाचें ॥ (वत्सहरण, पान १) पाहा.

अव्ये'वा (अवयवा !) रूप नासिक : श्रृंघारासि शोभा तिलक
तैसी मऱ्हाटी अधिक : सर्वभाषांवरि ॥ ६५ ॥

ते मऱ्हाटी बोल माहा गोड : वरि सीद्धांता करि निवाड
म्हणौनि वेदार्थि चाड : मऱ्हाटियेसी ॥ ६६ ॥

× × ×

त्या मऱ्हाटिया परिकर : सांघैन रुक्मिणीसैंवर
तें आइकावें श्रोते नर : म्हणे गोपिनाथु ॥ ७२ ॥

९ अशा प्रकारें पहिल्या ७२ ओव्यांत दोन अध्याय संपवून ६४६ ओव्यांपर्यंत बाकीचे तीन अध्याय आले आहेत. अध्याय संपला तरी, नवीन ओवीचा क्रम, मागील अध्यायाच्या शेवटची ओवी घेऊन संख्यागणना करावयाची अशी या पोथींत विशेष पद्धत आहे. तसेंच अध्यायाला नांव 'प्रसंग' असें आहे.

'बाकीच्या कवींनीं ज्या कथा गाळल्या, त्या मी सांगेन' असें म्हणून कवि आपल्या ग्रंथाचा विशेष दाखवितो.

ही कथा 'भागवती' असल्यानें, भागवत ग्रंथ कोणाला कोणी सांगितला याचीच 'पूर्वपीठिका' कवीनें या 'प्रसंगांत' सांगितली आहे. 'मीच भागवतकर्ता' असा व्यासांना एकदां अहंकार झाला, तेव्हां त्यांचें तोंड वाकडें झालें, हें शुकांनीं ओळखून, त्यांना निरनिराळ्या ऋषींकडून हिंडऊन आणले, व मार्कंडेय, रोमहर्षण, हंस, बकदाल्भ्य, असे अनेक कल्पापासून भागवत कसें आलें, याची ओळख व्यासांना देऊन त्यांचा अहंकार नष्ट करून, व्यासांचें तोंड पुनः नीट व्यवस्थित केलें. ही कथा सांगितल्यावर शुकांना परीक्षितीला हें पुराण सांगण्याचें कारण काय झालें, याची माहिती कवीनें दिली आहे. पुराण सांगणारा वक्ता कसा असावा, याचें वर्णन देऊन कवि म्हणतो :

रावो म्हणे योगिराया : संदेहेआवर्ति पडलेयां
जोडलासि आम्हां तारावया : संसारसागरिं ॥ १२५ ॥

गुरु–उपदेश भांडवलें : सिष्यासि भक्ति–उद्यमबळें
जोडे पवित्र सुख आगळें : सर्व आनंदाचें ॥ १२६ ॥

उपजालिया संशयो–रोगा : श्रीगुरु अमृतघट चांगा
संसार नाशावया अभंगा : थोर श्रीकृष्णनाम ॥ १२७ ॥

तया श्रीकृष्णाचे पवाडे : समूळ सांग पां निवाडें
जेणें उघडाति कवाडें : मुक्तिद्वारिचीं ॥ १२८ ॥

ऐसा **परिक्षिती** प्रेस्णू करी : **सूक** उलासला अंतरीं
जैसा पिता संतोषें शरीरिं : आळि[1] बाळकांचा ॥ १२९ ॥

शिष्यवत्स प्रश्न[2] हुद्कणा : गुरुधेनु अधीकपान्हा
प्रसन्नता चाटी मोहद्रुणा : वोरसें पै ॥ १३० ॥

अशा प्रकारें शुकमुनि प्रसन्न होऊन, परीक्षिती राजाचे संदेह फेडूं लागला. त्यानंतर परीक्षितीनें चार प्रश्न विचारले. 'कृष्ण योगशास्त्राचें महत्त्व सांगतात व गृहस्थाश्रम कसें पत्करतात ?, देव सांगतात उपदेश अहिंसेचा, आणि इकडे 'दैत्यहनन' हिंसा करतात; अष्टविध ब्रह्मचर्यांचा नियम उपदेशितात व आपण सर्व उपभोग घेतात; स्त्रियांनीं असें कोणतें विशेष पुण्य केलें कीं ज्यामुळें त्यांचा श्रीकृष्णाशीं संबंध विशेष आला. त्यांचीं उत्तरें कवीनें पुढें दिलीं आहेत. त्यांतील एक उत्तर नमुना म्हणून देतों. दैत्याशीं युद्ध करावयाचें कारण म्हणजे त्यांचा राक्षसी स्वभाव बदलून त्यांना 'दैवी प्रकृतीचे' बनविण्याची परमेश्वराची धडपड होय:

'जैसिया टांकिया अयोग्य धोंडी : कर्ता फोडी धडींविधडीं
गर्भस्तासि मूर्त घडी : ते करि पूज्येमान ॥ १४१ ॥

अमंगळ कठिण हीण : त्यासि आणि पवित्र देवपण
मग कल्पिले मनोर्थ गहण : पूर्वि सेवितयाचें ॥ १४२ ॥

तैसा श्रीकृष्ण बाण झोडी : तीहिं प्रकृतीचीं देहें फोडी
पवित्र सगुण देह घडी : दैवी प्रकृतीचे ॥ १४३ ॥

ज्यांच्या पोटीं पुढें श्रीकृष्ण अवतारधारी झाले, त्या वसुदेव-देवकीची पूर्वपीठिका सांगतांना, ते पूर्वी 'सुतप व सुतपा' होते व त्यांनीं अत्यंत कडक तपश्चर्या करून वरदान कसें मिळविलें, याचीहि कथा कवीनें सांगितली आहे. तें सांगत असतां, चक्रधरांनीं जो महानुभावांना 'आचारधर्म' सांगितला, त्या धर्तीवर त्यांच्या तपाचें वर्णन केलें आहे.

'नित्य करीति भिक्षाटणें : निरसें विरसें सेविती अन्नें
आहार चतुर्भाग उणें : स्वभावो तोडिलें ॥ १६३ ॥

घरोघरिचिया चिंधिया : परावर्ण करिती धांदिया
ज्या सर्वजना देखिलिया : विकृति वाटे ॥ १६४ ॥

विविक्त आहार उणेंपणें : पाठी पोट एक वाटणें
तेणें चौदा इंद्रियां ठावो सांडणें : सहजचि जालें ॥ १६६ ॥

---

१ मुलांच्या आग्रहामुळें. २ वत्साचें आपल्या माथ्यानें गाईला हुंदडणें.

त्या तपाचा परिणाम, त्या तपोवनावर झाला.

आधि स्थान रम्य सात्त्विक : वरि आले तप यौगिक :
सामर्थ्य वर्तलें आणिक : तें आईक राया ॥ १७० ॥

अवकळा फुलले तरुवर : पुष्पघोषिं आले महुर
रितुविण फुलले अंकुर : वनस्पतिसिं ॥ १७१ ॥

पर्वता पाझर फूटले : पक्षजात निर्वैर जाले
सात्वीक भाव प्रकटले : भूतजातांसि ॥ १७२ ॥

ती बातमी ऐकून मथुरेच्या राजानें वनांत येऊन विनंती केली.

तुम्ही मथुरा नगरा येईजे : जन कृपादृष्टि अवलोकिजे
आम्हां सुकृता मेळवीजे : आपुलेंनि संगें ॥ १७७ ॥

दुर्भाग्यासि निधान जोडे : साधनेंवीण मोक्ष सांपडे
तरि संताचें दर्शन घडे : ग्रहस्थांसि पै ॥ १७८ ॥

राजानें ‘ सुतप– सुतपां यांच्यासाठीं जी ‘ पटिशाळा ’ बांधली, तीच पुढें अनेक वर्षांनीं ‘ बंदिशाळा ’ झाली.

राज्यभ्रष्ट वसुदेव पुढें मथुरेस कसा आला, गुप्तरूपानें कसा राहिला; कंसाची कृपा त्यानें कोणत्या प्रसंगानुळें संपादन केली, अशा प्रकारें देवकीविवाहापर्यंत हकीकत कवीनें आणली.

एकदां उत्तर देशच्या राजानें मथुरेवर स्वारी केली, त्यावेळीं वसुदेवानें पुढाकार घेतल्यानें, उग्रसेन बंदींतून सोडविला गेला. त्यावेळीं वसुदेवानें नागरिकांना कसें प्रोत्साहित केलें, याचें कवि वर्णन करितो :

“ वसुदेवो दैत्यांसि म्हणे : ज्यांचीं खाइजती खानपाणें
त्यासि प्राण वंचिजे निर्वाणें : हें नवल चोज ॥ २५८ ॥

ज्याचेनि महिमानें लाहिजे : त्यासि निर्वाणीं चुकिजे
तया परिस संग्रामीं मरिजे : तें महानिकें ॥ २५९ ॥ ”

त्याचा परिणाम असा झाला कीं वसुदेवाला मुख्य सेनापतिपद दिलें.

‘ रुधिरें नदि वाहात : चातुरंग जालें समाप्त
रणि धरिला त्वरित : राजा सैन्यसिंधु ॥ २६८ ॥

रावो उग्रसेन सोडविला : वसुदेवो यशवंतु जाला
सैन्य सींधु मथुरे आणिला : थोरें सन्मानेसीं ॥ २६९ ॥

अशा प्रकारें तिसरा प्रसंग, देवकी विवाह सांगून ३१५ व्या ओवीच्या शेवटीं समाप्त झाला आहे.

१० चौथा प्रसंग ओवी ३१६ ते ४९२ असून, पांचवा ४९३ ते ६३६ आहे. चौथ्या प्रसंगांत, कंसांनीं मारलेलीं सात बाळें म्हणजे पूर्वीचीं कोण होतीं ? देवकीच्या विवाहकालीं आकाशवाणी कशी झाली, वसुदेव-देवकींना बंदिशाळेंत कसें ठेवलें, इत्यादि गोष्टी सायंत श्रीकृष्णजन्मकथा सांगून त्यांना गोकुळांत नंदाच्या घरीं कसें ठेवण्यांत आलें याचें वर्णन आहे.

वसुदेवानें श्रीकृष्णाला गोकुळांत येशोदेजवळ ठेवतांना त्याच्या मनांतील विचार कवीनें पुढीलप्रमाणें दिले आहेत:—

" प्राणासि प्राण क्रमीतां : किं आत्मा देहावेगळा करितां
तैसें बाळ यशोदेपुढें ठेवितां : वाटे वसुदेवासि ॥ ४३६ ॥
किं बंदिखानीं जोडलें निधान : हें झाणि कंसराया होईल श्रवण
तें गोकुळांत ठेविलें चोरुण : ठाईं यशोदेचां ॥ ४३७ ॥
किं ते सर्व जोडी सर्वजणाची. : मज परदैवे जोडिली साची :
आस धरूणि जतन होआवयाची : ठेविली यशोदेघरीं ॥ ४३८ ॥
किं तें **दैत्यकंसाचें मरणबीज** : पर दैव थोर जोडलें मज
तें वाढवावया ठेविलें सहज : एशोदे पुढां ॥ ४३९ ॥
किं ते आपुली परम संपत्ति : झाणि वेदादिक देखती
ते गोकुळीं ठेविली गुप्ति : घरिं येशोदेचां ॥ ४४० ॥

अशा प्रकारें कथा सांगत, गोकुळांतील आनंदाचें वर्णन करून, चौथा प्रसंग कवीनें संपविला आहे.

(११) यानंतर पांचव्या प्रसंगांत यादवांची पूर्वपीठिका कवीनें दिली आहे. तसेंच कंसाची कुलकथा सांगितली आहे आणि द्वारका कशी निर्माण झाली याच्या कथा सांगितल्या आहेत.

मागधाशीं लढतांना कृष्ण, बळिराम यांना देवांनीं रथ पाठविला त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे :

देविं केलें समुद्रमंथन : चौदा रत्नें जाली उत्पन्न
तेथ रथ जाला निर्मान : षडुमुखाचा ॥ ६३९ ॥
अनुष्टें अभोज्य अमळें : अमृतसागरींचीं दीव्यकमळें
लाखौलि गुंफौनि वैजयंती माळे : नाना दिव्य परिमळीं ॥ ६४० ॥
ते माळ ध्वजीं विलंबत : दीव्यशस्त्रें सर्वयुक्त
रथ ठेविला काळ बहुत : माहाविष्णू क्षीराब्धिरायें ॥ ६४१ ॥
तया दीसे सुमन गुढरू : पाहोनि समयो अवसरु
पाठविला उचित प्रकारु : श्रीकृष्णांलागि ॥ ६४२ ॥

अशा प्रकारें द्वारकामाहात्म्य, मागधाशीं युद्ध, इत्यादि कथा सांगून कवीनें पांचवा प्रसंग पुढीलप्रमाणें समाप्त केला :

शूकाची अनुहात वाणी : अनुवादे कथावचाणिं
ते आइकावि श्रोतां श्रवणिं : म्हणे **गोपिनाथु** ॥ ६४६ ॥

(१२) प्रस्तुत कवि सोळाव्या शतकाच्या अगदी आरंभींचा कां वाटतो, याचीं कारणें आतां पाहूं :—

(अ) यांत यावनी शब्द नाहींत.

(आ) चतुर्थी व द्वितीया यांचा **ला** प्रत्यय कोठेंहि ६४६ ओव्यांत आढळत नाहीं.

(इ) 'विनविलें पाहिजे' ही वाक्यरचना, जी एकनाथांच्या काव्यांत अनेकवेळां आढळते, ती एकदां देखील आढळत नाहीं.

(ई) तो म्हणाला 'कीं' या प्रकारचें 'कीं' यांत नाहीं; त्या जागीं 'जे' येतें.

(उ) पूर्वींच्या विभक्ति व त्यांचे प्रत्यय यांत विशेष बदल नाहीं. **याचेनि हातें** (याच्या हातानें); '**आमचेनि दैवें** जोडला ऐसा' (आमच्या सुदैवानें हा आम्हांला लाभला); ऐसा विवेक करावा : **तुम्हीं सकळीं जनीं** (तुम्हीं सर्वांनीं); त्याहिं—त्यांनीं (तृतीया एकवचन); (विचित्रां भेदीं (निरनिराळ्या प्रकारें);

(ऊ) 'झणि' नकारात्मक; प्रकट जालि जरि याची वाणी : तरि हा **झणि** जाईल येथौनि : (तर हा येथून जाईल बरें !);

(क) 'झाला' असें रुप न येतां 'जाला' असें रूप येतें.
'ऐकतु' च्या जागीं 'आईकतु' असें रूप येतें.

१३ प्रस्तुत कवीचे इतर अध्याय आज उपलब्ध नसले, तरी तो बहुश्रुत असून, त्यानें अनेक कथा वाचल्या होत्या असें दिसतें. उदाहरणार्थ, 'द्वारका' समुद्रांत कां निर्माण केली, यासंबंधीं ४–५ कथा त्यांनीं दिल्या आहेत. तेव्हां त्यानें पुराणें, स्थलवर्णनें स्थलमाहात्म्य, असे ग्रंथ वाचले असावे. तसेंच कोणाचीहि 'पूर्वपीठिका' सांगण्याची त्याला हौस दिसते. तसेंच 'मऱ्हाटी', 'द्वारका', 'प्रतिष्ठान' यावरील त्याची उपपत्ति वाचून, नांवावर कोटी करण्याची त्याला हौस होती, किंवा कोणी तसें केलें असल्यास, तें लक्षांत ठेवून योग्य स्थळीं उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति होती. मराठी, महाराष्ट्र, प्रतिष्ठान यांचा त्याला अभिमान होता. तो मराठीभाषाप्रभु होता व कोणताहि विचार उचित शब्दांत व्यक्त करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे. कांहीं कांहीं नवीन पण व्यवहारांत नित्य आढळून येणाऱ्या उपमा तो मधून मधून देतो. 'रचना–कौशल्य' या दृष्टीनें विचार करूं लागल्यास, या पांच अध्यायांवरूनच ठरवणें जरा कठिण आहे. पंचवीस

अध्याय असतील, तर सावकाशपणें एक एक पूर्वपीठिका सांगितली तरी चालेल; पण पांच अध्याय होऊन रुक्मिणीस्वयंवराच्या कोणत्याहि भागाला प्रारंभ झाला नाहीं. जणु काय तो **भागवतच** सांगत आहे, असा ग्रंथांचा विषय वाटतो. तेव्हां कोणती कथा, किती द्यावी, त्या कथेचा बादरायण संबंध आहे कीं जवळचा संबंध आहे, याचा विचार न करितां, 'पूर्वीं कवींनीं सांगितल्या नाहींत,' म्हणून कथा सांगीत सुटणें, हें उचित वाटत नाहीं. प्रसंगाला अनुरूप अशी गोष्ट असून ती सांगितल्यामुळें कथेचा रंग वाढेल, शोभा येईल व अनुचित असें न वाटेल, तर त्या कथा सांगण्याचा उपयोग. या दृष्टीनें सारासार विचार कवीला जरा कमीच, असें या पांच अध्यायांवरून वाटतें. तथापि तो बहुश्रुत असल्यानें, कांहींतरी अज्ञात अशी गोष्ट तो सहज ओघांत सांगून जातो. जसें, 'काव्यमुद्रेचीं पंचवीस तत्त्वें'; या दृष्टीनें इतर अध्याय उपलब्ध झाल्यास, कलाविषयक, विद्याविषयक, इतिहासविषयक कांहीं उल्लेख सांपडण्याचा संभव आहे. हे अध्याय जरी सांपडले नाहींत, तरी या पांच अध्यायांत कवीनें आपला प्रभाव, आपला भाषाभिमान, आपली बहुश्रुतता दर्शविली आहे. निदान मऱ्हाठी म्हणजे ज्या भाषेंतून सर्वांना '**राहाटी**', व्यवहार, अर्थप्रकाश-कौशल्य सहज दाखवितां येतें, ती 'मऱ्हाठी' भाषा ही कल्पना अजूनहि मननीय आहे. ग्रंथकारांनीं आपले ग्रंथ सामान्य जनतेला जितके अधिक प्रमाणांत समजतील अशा लोकभाषेंत लिहावें, व आपला ग्रंथ कांहीं व्यक्तींच्या साठीं एखादी विहीर म्हणून न राहतां, सर्वांना स्नान करितां येईल, अशी ती लोकगंगा असावी, ही कवीनें वर्णिलेली कल्पना व ध्येय नेहमीं डोळ्यांसमोर ठेवण्याजोगें आहे.

---

८ प्रष्णार्णव

(कै. पं. ह. ना. नेने, उमरावती)

१ *कवीश्वर आम्नायांतील 'प्रमेय'कार 'मुरारीमल विद्वांस महानुभाव' यांचे, नगर येथील शिष्य, **गोपीभास्कर** यांच्या 'प्रष्णार्णव' ग्रंथासंबंधीं परिचय करून देण्याचें आज योजिलें आहे.

२ मुरारीमल्ल शके १५२७ मध्यें 'ईश्वर दर्शनास गेले. अहमदनगरचे पेशवे' मुधोपंत देशपांडे यांचा पुत्र गोपीभास्कर, यांनीं मुरारीमल्लांच्या कडून दीक्षा घेतली होती. गोपीभास्करांचा काळ, शके १५१५ ते १६००, असा दिलेला आहे (श्रीयुत य. खु. देशपांडे, महानुभाव वाङ्मय, पान ७०). कै. भावे यांच्या महानुभावग्रंथ–

* संमेलन ३६. शक १८७१ इ. ०९४९.

सूचीत ' प्रस्तुत ग्रंथाचा नामनिर्देश आहे. गोपीभास्कर यांच्या ' राजभद्र ' व ' श्रीमद्भगवद्गीता टीका ' यांची माहिती कै. भावे व श्रीयुत य. खु. देशपांडे यांनीं आपल्या ग्रंथांतून दिली आहे. प्रस्तुत ग्रंथाविषयीं, नांवाशिवाय, परिचय कोठेंहि अजून आला नाहीं. म्हणून ही माहिती नवीन आहे असें म्हटलें तरी चालेल.

३ श्रीसर्वज्ञ चक्रधर यांचें निरूपणाची पद्धति कशी असे, याविषयीं वर्णन करणाऱ्या महानुभाव वाङ्मयांत अनेक हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यांपैकीं ' बत्तीस लक्षणांची टीप ' (द्वात्रिंशल्लक्षण) हा ग्रंथ ' यशोदाचिंतामणी ट्रस्ट ' यांच्या रूपेनें पूर्वीं प्रकाशित झाला आहे, तो वाचकांच्या परिचयाचा आहे. त्यापेक्षां थोडा निराळ्या प्रकारचा आजचा ग्रंथ आहे, पण विषय मात्र, श्रीचक्रधरांच्या निरूपणपद्धती-विषयींच आहे.

४ पट्टाधिनिष्ठित महदाचार्य श्रीनागराज महानुभाव पंजाबी यांचे शिष्य रामचंद्र बाबा महंत, यांच्या संग्रहांतून उपलब्ध झालेली ही पोथी रिधपूरचे महंत गोपिराज यांचेकडून मिळाली. तसेंच, दुसरी एक पोथी महंत गोपिराज यांनीं दिली. अशाप्रकारें दोन हस्तलिखित प्रती पाहावयास मिळाल्या. त्यांपैकीं एक नीट असल्यानें तिच्या-वरून माहिती देत आहे. दुसऱ्या प्रतीचा आधार संदिग्ध अक्षरें स्पष्ट करण्यासाठीं घेतला आहे. प्रस्तुत ग्रंथ ' सकळा ' नांवाच्या सांकेतिक लिपींत लिहिला आहे. या ग्रंथाचीं पानें पाठपोठ २५० च्या वर आहेत. प्रत्येक पानावर १३ ओळी असून अक्षर स्पष्ट आहे. प्रकरणाचा शेवट असेल तेथें तांबड्या शाईचा उपयोग केला; व शेवटीं समाप्ति-दर्शक शक लिहिला आहे. ' सके १६८५ : शुभना नाम संवत्सरी : वद श्रावणा भीतरी : तीथ तेरसे सोमवारी : पुस्तक संपूर्ण हस्ताक्षेरी : सारंगधराचे हस्ताक्षेर : ॥ : सारांश शारंगधर लेखकानें या ग्रंथाची प्रत शके १६८५ मध्यें श्रावण वद्य त्रयोदशी, सोमवार, या दिवशीं केलेली आहे; म्हणजेच ग्रंथकर्त्याच्या हयातीनंतर ८५ वर्षांनीं लिहिलेली ही प्रत आहे.

५ **ग्रंथाचा आरंभ** : ' श्रीप्रेशायन्मा (श्रीपरेशाय नमः ।) :।: ईश्वरीची[1] नीरोपणी[2] दोन परी : एक बंधरूप : तयाचें पांच[3] भेद : वचन : १ : वाक्य : २ : प्रकरण (प्रकरण) : ३ : महावाक्य : ४ : भर : ५ : एक नीरोपणाची मोकळीक : एकदोन लीळेमध्यें जन्मली : तीए लीळेचे भेद दोन : एक ज्ञानरूप लीळा ते निर्वच : एक नसुधी लीळाः तीएचा नीर्वच नव्हे : तीए लीळे आंत आवच्छेदरूप तें वचन : एक लीळेचे शब्द :।: तया वचनाचे भेद पांच : आर्थ : यांत **प्रष्ण** : तयाचे भेद तीन : आक्षेप :

---

* मोडक जंत्री–सुभानु संवत्सर बाकी बरोबर म्ह. सप्टेंबर ५ इ. स. १७६३.

१ श्री चक्रधर; २ निरूपणपद्धति ३ पंचवार्तिक (श्री. मो. स. मोने–संग्राहक पान २७–२९ पहा.)

आडणी : वीरोध :।: अनुक्रमें असत : एक मोकळीं असत : ते ज्ञानवंती जेथील नेथ लावीजेती : **या स्थळाचें नांव प्रष्णार्णव :......** इत्यादि.

वरील आरंभावरून श्रीसर्वज्ञ चक्रधरांच्या निरूपणाची पद्धति व त्यांत निरनिराळे प्रश्न, संदेह, यांचा परिहार कसा केला जातो याचें वर्णन, आलें आहे, असें दिसतें. **स्थळ** म्हणजे जेथें साधक–बाधक चर्चा केली जाते, असा ग्रंथ. यांत प्रश्नाचे तीन प्रकार सांगितले आहेत. 'आक्षेप : आडणी : वीरोध' याचें स्पष्टीकरण पुढील चर्चेत आहे. [आक्षेप म्हणजे अन्य अर्थाशीं बाधा; आडणी–अर्थ मांडणें; विरोध म्हणजे एक दोनी अर्थ.]

'ईश्वरें निरूपिलें[1] शास्त्र : तयाचीं ३२ लक्षणें[2] : तयांत प्रस्नें म्हणीजे पुसि[3] : तयाचे भेद तीन : आशंका : आक्षेप : वीरोध : याचा परीहार ज्ञान दृष्टी :।: तया ज्ञानाचें मूळ लीळा[4] : तीये आंत आवच्छेदरूप ते वचन : वाक्य : प्रकरण : तयाचीं बारा[5] प्रकरणें : तयाचे उपन्यास : आडणी : पाठी आर्थी : तयाचें उपलवण[6] : एथार्थाचा ज्ञात निर्वचीं : म्हणीतलें : ज्ञान : भक्ति : जीवीं भावली असे : पा : शब्दाचें ज्ञान करी कां ते चातुष्टयरूप : बोध : भक्ति : पदार्थाचें ज्ञान करी : जीवीं ज्ञान भक्ति वैराग्य बींबली असे : म्हणौनि प्रश्नार्थ होए : वीरोधार्थी विषयो दे : वचन भाषा जाणे : आर्थाचे गर्भ जाणे : कां पाठा आर्थाची वीत्पत्ती जाणे : ज्ञानीया शास्त्र चाली जाणे : तीया कैसीया : **संदेह** म्हणीजे पदार्थाचें अज्ञान : १ : **संशय** म्हणीजे होए कीं नव्हे : २ : **आशंका** म्हणीजे यथार्थेसी बाधा : ३ **आक्षेप** म्हणीजे आन्येथार्थीसी बाधा : ४ : **प्रश्न** म्हणीजे पुसि : ५ : **वीरोध** म्हणीजे एकी दोनी अर्थ : ६ : **आडणी** म्हणीजे अर्थ मांडणें : ७ : **चर्चा** म्हणीजे नेणौनि बाधा : ८ : **जीज्ञासा** म्हणीजे जाणौनि बाधा : ९ : **मथन** म्हणीजे अर्थ दृढकरण : १० : **उपन्यास** म्हणीजे अर्थ उडवणें : ११ : **उद्‌घाटन** म्हणीजे अर्थ निरधार : १२ : **संकेत** म्हणीजे सीधांत : १३ : **पक्ष** म्हणीजे एथार्थ दीसे : पर सीधांत नव्हे : यथा दीवली : १ : **वीपक्ष** म्हणीजे दुसरेया स्थळ कीजे : २ : **पूर्वपक्ष** म्हणीजे एक अर्थ होए : यथा मंजिष्ट : ३ : **सीधांत** म्हणीजे जया पुरता अर्थ होए : पदार्थ पीत : सीधांत सुवर्ण : **आतां प्रश्नान्वयोकार गोपीभास्कराचा** तथा **प्रश्नार्थ उपवलणें** : तेहीं तयाचें चि अन्वयकारा चें' : इत्यादि :

वरील उताऱ्यावरून गोपीभास्करांच्या मनांत कोणते प्रश्न उपस्थित होऊन त्यांनीं ग्रंथ केला असावा याची कल्पना येईल. 'प्रश्न करावया चार प्रकरणें : **परपक्ष-**

१. सूत्रपाठ. २. 'बत्तीस लक्षणांची टीप' (पंडित आनेराज यांची). ३. विचारणें, पृच्छा. ४. लीळाचरित्र (श्रीचक्रधरांचें जीवनचरित्र). ५. अन्यथावृत्ति, संसरण, इत्यादि; सूत्रपाठ पाहा. ६. अधिक स्पष्टीकरण, उलगडा.

दुषावया : १ : स्वपक्ष साधावया : २ : वीरोध धर्म धाडावया : ३ : महंतत्व उमटावया : ४ : ”

६ **ग्रंथाचा शेवट** : ग्रंथ संपवितांना पुढील ओव्या समाप्तिदर्शक आढळतातः–

मोकळी मोतीए पसरली । तैसीया प्रश्नाचीया चाली
ते एथास्थीती वोवीली : पाहीजे ज्ञानांतरी ॥ १ ॥

आशंका आक्षेप वरीोध : ऐसा प्रश्न **त्रीवीध** :
पाठीं असे वीवीध : ज्ञानदृष्टी ॥ २ ॥

परावर प्रश्न माळीका : आन्वयेकारवछ जननी बाळका
भास्कर उपनाम संज्ञीका : आसे तया ॥ ३ ॥
बत्तीस लक्षणें शास्त्राची : आशंका आक्षेपं संशयाचीं
लक्षुनयिा अर्थ गर्भीची : आनुवर्तवीली ॥ ४ ॥
पाहुनि शास्त्रसर्वेळा : हे बोलिली प्रश्नमाळा
सोपान सखोला लीळा : उपन्यास ॥ ५ ॥
उभए राहाटीचा ज्ञानमार्ग : तयांत दींसे आर्थभंग
परीहार दिसे अभंग : आर्थ साधकाचा ॥ ६ ॥
देखीलिया आक्षेप आडणी : तयाची आर्थ घडवणी
आर्थाची उदाहरणी : करुनिया ॥ ७ ॥
परावर ज्ञात : असे **प्रश्नहेतु**
तयाचा करी अर्थ : विशेष ज्ञानीया ॥ ८ ॥
जालीया संजात बोध : शास्त्र परीसीले वीवीध
तो प्रश्न परिहार संबंध : लाऊं जाणे ॥ ९ ॥
प्रकरणें पर अनंत : पाठीं आर्थ वीचीत्रापरी आर्थ
नींर्वचीता जाले चकीत : संदेहाचा ॥ १० ॥
एकाचें आसे आज्ञान : एकाचे आसे संशयात्मक मन
एका अर्थाचें आनुवर्तत : करूं न लभे ॥ ११ ॥
संदेहीं पडला चौथा ज्ञानीया : संदेह असती तया
मी काए जाणे मूढमतीया : ज्ञानसीध परमाण (प्रमाण) ॥ १२ ॥
सर्वत्र लाधले अज्ञानबुधी : तैसीची जाली देहलब्धी
आभ्यास रहीत कुबुधी : संग न करीची ज्ञानाचा ॥ १३ ॥
इति प्रश्नार्णव आपार । आन्वयेकार **गोपीभास्कर**
लेखिक बल्लाळ पाळेकर । ज्ञाने सूध करीती ॥ १४ ॥

वरुणाळव आवर्त वळसे । तैसे सवीध कळेचे उपन्यास
ईश्वर ज्ञानी वीद्वांस । रीग नीग जाणती ॥ १५ ॥

वरील ओव्यांवरून अन्वयकार गोपीभास्कर यांचा 'प्रश्नार्णव' ग्रंथ, लेखक 'पाळेकर' यांनीं उतरला असून, त्यामुळें प्रश्नाच्या अर्णवाच्या लाटांतुन, 'आवर्त-वळसे', यांना टाळून आंत शिरून, बाहेर कसें निघावें, यांचें ज्ञान वाचकांना होईल, असें दिसतें. शास्त्राभ्यास म्हणजे काय, तो कसा करावा, ज्ञानदृष्टी म्हणजे काय, कसोट्या कोणत्या आहेत, स्पष्टीकरण किती प्रकारें होतें; संशय–आशंकादिकांचें परिहरण कसें करावें, इत्यादि गोष्टींचें ज्ञान, या ग्रंथाने व्हावा, असा ग्रंथकाराचा उद्देश आहे.

७ ग्रंथांतील विषयाचें स्वरूप :— लीळा चरित्रांतील लीळा ही मुख्य आधाराची जागा; मोकळें व स्फुट निरूपण निराळें, पण वचन, वाक्य, प्रकरण, महावाक्य, भर, या पांचांनीं निबद्ध तें निरूपण निराळें; नंतर लीळा किती प्रकारच्या, याचें उत्तर, १ आचारपर, २ विचारपर, ३ औदास्यपर, ४ प्रसन्नपर, ५ सहेतुक, ६ निर्हेतुक, ७ खंतीची, ८ कणवेची, असे **आठ** प्रकार ग्रंथकारांनीं दिले आहेत. जिचा 'निर्वच' नाहीं ती नुसती लीळा, व जिचे 'निर्वचन होते, ती ज्ञानरूप लीळा; त्या लीळेंत अवच्छेदरूप तें वचन; मग **वचनाचे भेद** वर्णिले आहेत; १ प्रकरणपरत्वें निरूपिलें तें, २ अर्थ म्हणजे स्थळापुढील वचन; ३ उपसंहार म्हणजे प्रकरणाच्या अंतीचें, ४ वचनभाषा व 'काक्वादि चतुष्टय (काकु–कक्षा–भावार्थ–प्रकरण); त्यानंतर वचनसमूह कसा असतो, तें सांगतात; १ 'एक दो विश्रांतींचें वचन'; २ वाक्य दो चौ शब्दाचे; ३ प्रकरणः सातापांचा विश्रांतींचें; ४ महावाक्य म्हणीजे बारा प्रकरणांचा समुच्चय; ५ भर म्हणीजे अठरा **विश्रांति** पर्यंत सकळ शास्त्राचा **आवाका** ६ वचनाचें व्याकरण दृष्टीनें प्रकार पहा; दो ती **पदाचे** तें **वचन,** चौ वरुते बारापर्यंत **वाक्य;** बारा पदांचा समुच्चय तें प्रकरण; बारा वरुतें चोवीस पर्यंत पदाचें **महावाक्य;** बारा प्रकरणाचा समूहो ती **पेंढी;** सकळ शास्त्राचा आवाका, तें **भर** (पंचवार्तिक, श्री. मोने, पान २८ पहा).

आतां **अर्थभेद** सांगतात: १ **लक्षणार्थ** म्ह० ईश्वर–हेतु; व वचन–हेतु; २ **उपलवण** म्ह० कांहीं वचनार्थ; ३ **वीत्पत्ती** म्ह० बहुत अर्थकरण; ४ **प्रमय** म्ह० आर्थ जाती सांघीतलीया वचनें; ५ **पक्ष** म्ह० एक अर्थ होए; ६ पूर्वपक्ष म्ह० सीधांत अर्थ नव्हे; ७ **विपक्ष** म्ह० विपर्याये अर्थ; ८ **उपराळा** म्ह० मागील प्रकरणाचा; ९ **व्याप्ती** म्ह० सर्व स्थल मीडवणें; १० **अतिव्याप्ति**– आणीक अर्थ तयांत मोडणें; ११ **सर्वव्याप्ती** म्ह० आचारीं विचार सांगणें, विचारीं आचार सांगणें; १२ **तात्पर्यार्थ** म्ह० तोकडा अर्थ; १३ **मतीतार्थ** म्ह० घडावणी करूनि अर्थ; १४ **तत्वार्थ** म्ह०

सारार्थ; १५ **सूचिकार्थ** म्ह० भविष्यार्थ; १६ **सीधार्थ** म्ह० सीधांतार्थ; १७ **नीर्णयार्थ**– नीर्धारिला अर्थ; १८ **वीनयोगार्थ** म्ह० यथा, प्रयत्नीं देवाचें साहाय्य; १९ **कल्पीतार्थ** म्ह० न घडता **अर्थ**, एथा आकाशा फुल; २० **सीधा अर्थ** म्ह० मागीलासी सांदा; २१ **आन्वयो** म्ह० पुढीलासी सांदा; २२ **सांखळी** म्ह० वचनाची, प्रकरणाची, अर्थाची, पक्षाची लापणीक २४ **साहीत्यार्थ** म्ह० वेव्हारें परमार्थ; वित्पत्ति म्हणीजे आणीक अर्थ योजणें; **वीत्पन्नता** म्हणजे सकळ स्थळ अनुवर्तवीजे अशा प्रकारें निरनिराळ्या अर्थाचें ' निर्वचन ' ग्रंथकारानें केलें आहे.

यानंतर **जीव, देवता, परमेश्वर व प्रपंच** या चतुष्ट्याच्या बाबतींत वरील प्रकारें अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न करून त्याचीं उत्तरें ग्रंथकारानें दिलीं आहेत. त्यांतील कांहीं नमुने पाहूं.

(अ) लीळाचरित्रांत, ' वसति, अवस्थान,' असे शब्द येतात, त्याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें; संबंधमात्र म्हणजे ' जेथे चरणचारी : उभे ' म्हणजे एखाद्या गांवाला पोंचलें, तर क्षणमात्र, न बसतां उभें राहाणें; त्या गांवांत राहिलें, असा अर्थ नाहीं; **'वसति'** म्हणजे एक रात्र राहाणें; **कुडीवसति** म्हणजे दोन दिवस राहाणें; **अवस्थान** म्हणजे तीन दिवसांवर बारा वर्षेंपर्यंत; **माहाअवस्थान** म्हणजे शतसहस्र वर्षें.

(आ) दोन वचनांतील भेद कोणता ? सूत्रपाठांत दोन प्रसंगीं दोन वचनें आहेत. ' खोटें बोलूं नये, सत्य बोलावें ' असा त्याचा साधारण अर्थ आहे ' एथ हासतांही लटीकें न बोलीजे '; ' भटो, ऐसा सत्यार्थही न बोलीजे ' या दोन वाक्यांवरून खरें बोलावें कीं नाहीं, असा संदेह उत्पन्न झाला; त्याचें उत्तर पुढीलप्रमाणें आहे.

" हासतां लटीकें : एथ प्रसवाची चाल (कार्यांची वाढ) नीराकरीली; आणि भटो, ऐसा सत्यार्थ–... " एथ पुढीलाचा मरणीं प्रवेशे : तर : सत्यही न बोलावें : मागीलें वचनी ' लटके : राभस्य : नीराकरिलें : पुढीलें वचनीं : ' ऐसें लटीकें बोलौनि पुढीलाचें पाप चुकवीलें : मागील वचन : सत्याची हे पूर्वावस्था : सांगितली : पुढीलें वचनीं सत्याची उत्तरावस्था सांगीतली : मागीले वचनीं असत्याची पूर्वावस्था सांगितली दुसरे वचनीं प्रसवाची उत्तरावस्था सांगितली.

वरील निरूपण वाचीत असतां, संस्कृतमधील ' सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् , न ब्रूयात् सत्यमप्रियं ! ' या वचनाची आठवण होते.

(इ) श्रीचक्रधरांनीं आपल्या शिष्यांना, वचनें घोकण्यासंबंधी पुढील उपदेश दिला आहे. १ ' काळें करूनि उपयोगा जाये; ' २ ' पाठीं अनुभवें जाणाल; ' तर यांत भेद कोणता, असा प्रश्न केल्यास, पुढील उत्तर आहे. ' मागीले वचनींचा काळांतरीं **आपणयासि उमटे** : म्हणीजे : मनन करितां : शास्त्र आवर्तितां : उमटे : आणि पुढीलें वचनीं **संयोगें उमटे** : म्हणीजे : दुसरीया बोलता : चर्चा मथन करितां : उमटे :'

८ 'प्रष्णार्णव' ग्रंथांत वरीलप्रमाणें १५०० पेक्षां अधिक प्रश्न आहेत. महानुभाव तत्त्वज्ञानाचा ज्यांना दृढ परिचय आहे, त्यांना शंका, संदेह, विसंगतिभास, वचनांतील भेद, विशेष शब्द वापरल्याबद्दल समर्थन, अशा अनेक गोष्टी कळतील; पण इतरांना निदानपक्षीं इतकें दिसून येईल कीं **सतराव्या शतकांत मराठी भाषेंत** 'शब्दाचा व्यापकपणा, सूक्ष्मपणा, वेचकपणा, सयुक्तिकता,' इत्यादि गुणांची वाढ महानुभावांनीं किती कळकळीनें व आस्थेनें केली होती; आणि 'प्रश्न व त्याचें समाधान' याला शास्त्रीय स्वरूप दिलें होतें.

९ शेवटीं, '**वादः प्रवदतामहम्**' या वचनावर श्रीज्ञानेशांनीं आपल्या ज्ञानदेवींत केलेली टीका या दृष्टीनें आपल्या नजरेसमोर आणून हें प्रकरण संपवितों.

'अगा बोलतयाचिया ठायीं : वादु तो मी पाहीं :
जो सकलशास्त्रसंमतें कहीं : सरोचि ना ॥ ९-६७
जो **निर्वचुं** जातां वाढे। आइकतया उत्प्रेक्षे सळु चढे ॥
जयावरी बोलतयांची **गोडे। बोलणीं** होतीं ॥ ९-६८

शब्दाचें 'निर्वच' करणें म्हणजे काय, शंका-आक्षेप, निरसन-परिहार यांच्या लहरींवर लहरी उसळून, वाद रंगांत कसा येतो, यादरूपी हिऱ्याचे निरनिराळे पैलु पाडून रसिक व मार्मिक प्रेक्षक विविध रंगाच्या खोल छटा पाहून, समाधानानें मान कसें डोलवतात, इत्यादि गोष्टींचें प्रतिपादन कोणत्या शास्त्रीय पद्धतीच्या आधारानें हे महानुभाव करीत होते, याची सामान्य रूपरेषा आपणांला असली म्हणजे या लेखाचें काम संपलें.

---

९ घटरामायणाची नवलकथा

(म. म. प्रा. **द. वा. पोतदार**)

*नवलकथा हा आपल्यासारख्या शोधसभेपुढें मांडण्यासारखा गंभीर विषय नसतांनाहि त्याकडे लक्ष्य वेधणें अपरिहार्य झाल्यावरून तिकडे वळावें लागत आहे.

सुमारें वीसपंचवीस वर्षांपूर्वी मजकडे कोणीतरी एक पत्र लिहून सोबत घटरामायण भाग १ ला या छापील हिंदी पुस्तकाची एक प्रत पाठविली. कोणा तरी एका पेशव्यानें ही रचना केली असा दावा या प्रकरणीं सांगून त्याबाबत शोध करण्याविषयीं सूचना पत्रांत केलेली होती. पुस्तक चाळतांच सदरील प्रवाद थोतांडी असल्याचें वाटल्यान त्याची साहजिकच उपेक्षा केली.

परंतु अलीकडे भारतीय स्वातंत्र्याचे इतिहासासंबंधीं सर्वत्र जागृति होत असल्यावेळीं युक्त प्रांतांतून

* संमेलन ४२ वें. श. १८७७ ज्येष्ठ शु. १४ (दि. ४-६-५५)

सूरजप्रसाद ऊर्फ बाजीराव या नांवाचे गृहस्थ आपण १८५७ सालांतील नानासाहेब पेशव्यांचे नातू असल्याचा दावा सांगण्यास पुढें सरसावले आहेत.

या दाव्याचें निराकरण करण्याचे निमित्तानें 'केसरी' पत्रांत श्री. बाबासाहेब थत्ते यांनीं आपली हकीकत सादर केली.

सूरजप्रसाद यांनीं नानासाहेब १९२६ सालीं कसे वारले इत्यादि आणखी हि कथा प्रसिद्ध केल्या आहेत. तेव्हां मला या घटरामायणाचें पुनः स्मरण झालें.

आपल्या इकडे घटरामायणाची विशेष माहिती नाहीं. परंतु हा ग्रंथ अजमासें इतिहाससंशोधक विद्वान् कै. मुन्शी देवीप्रसाद यांनीं प्रसिद्ध केल्याची माहिती आढळते. पण तो ग्रंथ अद्यापि मला पाहण्यास मिळाला नाही. देवीप्रसाद आवृत्तीची किंमत १०॥ रुपये ही भारी असल्यामुळें प्रथम इ. स. १९११ मध्यें आणि नंतर दुसरी आवृत्ति इ. स. १९१६ मध्यें अलाहाबाद येथील बेल्व्हेडियर प्रेस या छापखान्यानें प्रत्येक भागाची एक रुपया किंमत ठेवून घटरामायणाची स्वस्त आवृत्ति प्रसिद्ध केली. या छापखान्यामार्फत '**संतबानी**' नांवाची ग्रंथमाला प्रसिद्ध होत असे आणि तिची विद्वानांनीं फार प्रशंसा केल्याचें प्रकाशक नमूद करितात. हस्तलिखितें नीट तपासून ग्रंथ प्रकाशित करण्याची आपली प्रथा प्रकाशकांनीं वर्णिली आहे.

घटरामायणाची आवृत्ति प्रसिद्ध करतांनाहि दोन ठिकाणांहून हस्तलिखितें मिळवून त्यांचा उपयोग शुद्ध पाठांसाठीं केल्याचें प्रकाशकांनीं नमूद केलें आहे. पहिल्या इ. स. १९११ च्या आवृत्तीचे संपादक म्हणून प्रथम यांचें नांव आहे.

ग्रंथाचें नांव असें

घटरामा**यन**—भाग १ ला

सतगुरु तुलसीसाहिब (हाथरसवाले) की रची हुई

यह ग्रंथ दो प्रमानिक लिपियों का मिलान करके बडी युद्धतासे दो भागोंमें पूरा छापा गया है,

मय उन महात्माके जीवनचरित्रके—,

अर्थात् या घटरामायन कर्त्यांचें सांप्रदायिक नांव 'तुलसीसाहिब' हाथरसवाले हें होय. यांना साहिबजी असेंहि म्हणत असत. यांची समाधि हाथरस येथें आहे आणि तेथें मोठा मेळाहि प्रतिवर्षं भरतो. 'उत्तरभारतकी संतपरंपरा' या आपल्या ग्रंथांत (संवत् २००८) श्री. परशुराम चतुर्वेदी यांनीं या साहिबजी पंथाची थोडी माहिती दिली आहे. तिलाहि घटरामायणाचाच प्रायः आधार आहे.

हा पंथ, त्याचे संस्थापक साहिबजी, त्यांचें काव्य, आणि त्यांचें गूढ तत्त्वज्ञान यांचा विचार येथें करावयाचा नाहीं. या तुलसीसाहेबांचें जें जीवनचरित्र या ग्रंथांत प्रकाशकांनीं दिलें आहे तेंच आपलें लक्ष्य करावयाचें आहे. प्रकाशकांनीं हें चरित्र

' सुरत–विलास ' नामक ग्रंथाचे आधारें दिलें आहे. हा ग्रंथ अद्यापि पाहण्यास मिळाला नाहीं. घटरामायन, शब्दावलि आणि रत्नसागर हे तुलसीसाहेब यांनीं रचिलेले तीन ग्रंथ होत. पूर्वजन्मी सुप्रसिद्ध गुसाँई तुलसीदास आपणच होतो असें या हाथरसवाल्यांचें एक म्हणणेंहि नमूद आहे.

पण आपणांस सांगावयाची नवलकथा ती पुढेंच आहे, ती अशीः—

पुण्याचा राजा एक दक्षिणी ब्राह्मण होता. त्याच्या वडील मुलाचें नांव शामराव. शामराव बारा वर्षांचा झाला तेव्हां त्याचा विवाह करावा असें पित्यानें योजिलें. शामरावास विवाह कर्तव्य नव्हता. पित्यानें बळजबरीनें लावून दिला. शामरावाच्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई. पण शामरावानें ब्रह्मचर्य पाळलें तरी लक्ष्मीबाई मनोभावें त्याची सेवा करीत असे. या सेवेवर प्रसन्न होऊन शामरावानें पत्नीस वर मागण्यास सांगितलें. तिनें पुत्र मागितला तेव्हां तीस पुत्र झाला. या पुत्राचें नांव दिलेलें नाहीं.

नंतर पित्यानें शामरावास गादीवर बसवावें असा मनसुबा योजिला तोहि शामरावाच्या मनास आला नाहीं आणि शामराव बागेंत जातो म्हणून गादीवर बसण्याच्या मुहूर्ताचे आदले दिवशीं पळून गेला तो पुढें अलीगढजवळ **हाथरस** येथें येऊन राहिला. तों परमार्थमार्गांत रमला आणि ' सतसंग ' करूं लागला हाथरस जवळ एक मैलावर जोगिया गांवींहि ' सतसंग ' त्यानें केला.

त्याचा परमभक्त हिरदे अहीर म्हणून होता. हा शामराव **तुलसीसाहिब** हें नांव धारण करून आपला सतसंगी पंथ चालवीत असे. तो एकदां काशीस येऊन एका कुटींत राहिला. वेद, कुरान यांचें खरें मर्म कोणास कळत नाहीं वगैरे गोष्टी तो बोले तेव्हां त्याच्याशीं वाद करण्यासाठीं नैनू, माना आणि स्यामा असे पंडित आले; सेख तकीमियाँ हा मुसलमान आला, धर्मा, करमचंद पल्लीवाल आणि करिया (स्त्री) अशी जैनमंडळी आली आणि मानगिरी आणि कबीरपंथी फुलदास आले. या सार्‍यांचा त्याच्यापुढें टिकाव लागला नाहीं. तीं प्रश्नोत्तरें घटरामायणांत आहेत. घटरामायणांत तसें रामायण नाहीं; गूढरामायण आहे जसें दशरथ (दहा इंद्रियांचा रथ इत्यादि).

शामराव पळून गेल्यामुळें निराश झालेल्या पित्यानें शामरावाचे धाकटे बंधु बाजीराव यास गादीवर बसविलें.

पळून गेल्यानंतर बेचाळीस वर्षांनीं शामराव ऊर्फ तुलसीसाहिब हाथरसवाले यांस आपले धाकटे बंधु बाजीराव यांस भेटण्याची इच्छा झाली. परंतु त्यावेळीं बाजीराव राज्यभ्रष्ट होऊन बिठूर–ब्रह्मावर्त–येथें येऊन राहिला होता. तेथें उभयतांची भेट झाली.

तुलसीसाहिबांची मृत्युतिथि ज्येष्ठ वद्य २ शंवत् १८९९ किंवा १९०० दिलेली आहे. शांतिनिकेतनचे श्री. क्षितिमोहनसेन यांनीं साधारणपणें हाच काल (म्हणजे जन्म इ. स. १७६०; मृत्यु इ. स. १८४२ इ. श्री. परशराम चतुर्वेदी पृ. ६५०) मानला आहे. अशी ही नवलकथा आहे.

आतां आमच्या सूरजप्रसादांकडे वळूं. हे युक्तप्रांतांतील प्रतापगढ जिल्ह्यांत असतात. त्यांचें म्हणणें नानासाहेब नेपाळांत न जातां युक्तप्रांतांतील सितापूर जिल्ह्यांत नीम–सर–मिस्तिख या नैमिष्यारण्यांतील गांवांत राहिले व तेथें वारले.

सांप्रत आपणाला रघुनाथराव यांचीं लग्नें, दत्तक अमृतराव, पुढें बाजीराव व चिमाजी हे औरसपुत्र वगैरे सर्व तपशील उत्तम व सप्रमाण उपलब्ध असल्यानें यांत कोणा शामरावाला वा सूरजप्रसादाला काडीचाहि वाव राहिला नाहीं. तेव्हां त्या दृष्टीनें हीं सारीं शुद्ध थोतांडें ठरणार यांत शंका नाहीं आणि त्या दृष्टीनें त्यांचा क्षणभरहि विचार करण्याचें कारण नाहीं. तो टिकणारच नाहीं. आश्चर्य एवढेंच कीं १९११।१९१६ अशा काळीं अशीं थोतांडें खुशाल प्रसिद्ध व्हावीं !

मात्र एक तर्क मला सुचला आहे. शुद्ध तर्क आहे. कल्पनेचा वारू आहे. भीतभीतच पुढें मांडतों. तर्क असा कीं, रघुनाथ बाजीराव यांस उपस्त्रियांचा फार छंद, इतका कीं इंग्रजाचा फटका या राजेश्रींना सुरतेंत असतां खावा लागला ! स्वारी–शिकारी निमित्तें उत्तरेकडे त्यांचें राहणेंहि बराच काळ घडलें. तेव्हां उपस्त्रियाप्रवण स्वभाव व वर्तन सफळ झाल्याचें मानल्यास उत्तरेकडे पेशवेवंशीय म्हणविणारे किंवा समजले जाणारे यांची व्यवस्था लावतां येईल. सितापूर, हाथरस, प्रतापगढ, वगैरे सर्व युक्तप्रांतीय स्थळीं ही कल्पना मनांत ठेवून कोणी शोध केला तर न जाणों कांहीं धागा सुगावा लागावा, हा तर्क अप्रतिष्ठित न ठरावा असें वाटतें.

---

१० सोरटी सोमनाथ आणि शिखरशिंगणापूर

(म. म. प्रा. **दत्तो वामन पोतदार**)

*'सत्कार्योत्तेजक सभा धुळे' या संस्थेच्या द्वारां प्रसिद्ध झालेल्या 'श्रीरामदासांची कविता' या ग्रंथांत पृ. ३०६ क्र. ३२१ चें जें कवन छापलें आहे त्याचा प्रारंभच येणें-प्रमाणें आहे:—

'सोरठीचा देव माणदेसा' आला ॥

यांत सोरठ म्हणजे सौराष्ट्र होय यांत शंकाच नाहीं. माणदेसा = माणदेशाला – माणदेशांत हाहि अर्थ सरळ आहे.

या चरणावर संपादकांच्या दोन टीपा आहेत. देव[२]= सोरटी सोमनाथ; माणदेसा[३] = पंढरपुरास याप्रमाणें या टीपा आहेत. ह्यांवरून सोरटी सोमनाथ पंढरपुरास आला असा

---

* वाढदिवस १८७७ दि. २०–६–५५
ऐ. सं. सा. खं. ६–७

अभिप्राय निष्पन्न होतो. पण तो किती विपरीत वाटतो ! सोरटीसोमनाथ हा महादेव आणि पंढरपुरास तर विठ्ठल विष्णु आहे–महादेव नाहीं. पंढरपूरच्या विठ्ठलमूर्तीच्या डोक्यावर शिवलिंग आहे किंवा दिसतें या कथेचा पगडा संपादकांच्या मनावर बसला असल्यास न कळे !

आणि ‘ माणदेश ’ असे शब्द मूळांत आहेत. पंढरपूर माणदेशांत मोडत असेलहि. परंतु ‘ माण ’ तालुका असा आज सातारा विभागांत पडतो. माणच्या सीमा सातारा-ग्याझीटीअरमध्यें पुढीलप्रमाणें दिल्या आहेत.

उत्तरेस––फलटण आणि माळशिरस, दक्षिणेस––आटपाडी आणि खटाव

पूर्वेस––माळशिरस आणि आटपाडी, पश्चिमेस––खटाव

म्हणजे फलटण, माळशिरस, आटपाडी व खटाव यांनीं माण वेढलेला आहे.

माण नदी पुढें पंढरपुराच्या दक्षिणेसहि वाहात आलेली आहे. माणदेशांत पंढरपुराचा समावेश पूर्वी होतहि असेल.

पण सोरटीचा कोणता देव समर्थांच्या मनांत असावा ? संपादकांनाहि तो सोमनाथच वाटला. कोणालाहि तसेंच वाटेल. पण पंढरपूर कांहीं महादेवाचें स्थान नाहीं.

म्हणून माणदेशांत महादेवाचें प्रसिद्ध स्थान असलें तर सांगड उत्तम बसेल. सुदैवानें अखिल महाराष्ट्राला वंद्य असलेला शिंगणापुरचा महादेव माणदेशांतच मोडतो. तेव्हां समर्थांच्या वचनाचा अर्थ–सोरठीचा महादेव म्हणजे सोरटी सोमनाथ हा शिंगणापुरीं येऊन राहिला असाच असावा हेंच अनुमान योग्य वाटतें.

सोरटी सोमनाथावर आपत्ति आल्या तेव्हां त्यानें तेथून स्थलांतर केल्याच्या दंतकथा प्रचलित आहेत. उरणाचें नांवहि यासंबंधांत घेतात. शिंगणापूर महात्म्याची एक हस्तलिखित मराठी पोथी माझे संग्रहीं आहे. ती यावेळीं हाताशीं नाहीं. एखादी अशी दंतकथा किंवा परंपरा जर आढळेल कीं सोमनाथ सौराष्ट्रांतुन शिखरशिंगणापूरला आला तर आमच्या अनुमानाला अधिक बळकटी येईल.

येथें आणखी असें ध्यानांत घेणें आवश्यक आहे कीं शिंगणापूर महादेवाची कृपा मालोजी भोसल्यावर झाली तेव्हांपासून भोसले कुळाचें तो दैवत बनला. शहाजी, संभाजी यांच्या प्रतीक समाधीहि शिंगणापुरीं स्थापन करण्यांत आलेल्या आहेत. छत्रपती शिंगणापूर–महादेवाला भक्तिभावानें भजत असत.

छत्रपती घराण्याचा आणि श्रीसमर्थांचा घनिष्ठ संबंध सर्वश्रुतच आहे. शिवाय रामदास हे तीर्थक्षेत्रांचा संचार करून आलेले, कृष्णातीरीं वास करून राहिलेले शिखर-शिंगणापुराचा त्यांना ओढा असणें साहजिक आहे.

प्रस्तुत ग्रंथांतच पृ. २१२ वरील कवन क्रमांक १३ पहा. यांत भारतांतील अनेक प्रसिद्ध देवस्थानांचा उल्लेख आहे. त्यांतील तिसरा चरण असा--

' उमामहेश्वर शंभूचें शिखर ।
येती निरंतर विश्वजन ॥ ' ३

पांडुरंग आणि द्वारकाधीश श्रीकृष्ण यांचे निराळे उल्लेख चरण ७ आणि ११ यांत अनुक्रमें आढळतात.

विश्वजन शंभुशिखरावर येतात असा या शिंगणापूरचा स्वकालीन महिमा राम० दासांनीं येथें वर्णिला आहे. 'सावकास जाती देवाचे **यात्रेसी**' असें सोरठीहून मायदेशाला आलेल्या देवाबद्दल क्र. ३२१ च्या प्रथम उल्लेखिलेल्या चरणांत समर्थांनीं म्हटलें आहे तें शिंगणारपूच्या यात्रेसच अनुलक्षून अधिक शोभेल.

पंढरपुराचा देव क्र. ३२१ च्या कवनांत समर्थांना अभिप्रेत नसावा याला आणखी एक कारण असें सांगतां येतें, कीं पंढरपूरचा कानडा विठ्ठल **दक्षिणेंतून** आल्याच्याच कथा प्रचलित आहेत. सौराष्ट्रांतून उत्तरेंतून पंढरीचा देव आल्याचें कोणीच बोलत नाहीं. यावरून हा माणदेशाला सोरठीहून आलेला समर्थांचा देव म्हणजे सोमनाथच असला पाहिजे असें अनुमानच दृढ होऊं पाहतें.

---

११ जबलपूर येथील गोंडनृपति दलपतशहाचा शिलालेख [विक्रम] संवत् १६०६

[**म. म. प्रा. वा. वि. मिराशी**, एम्. ए. नागपूर]

गोंडांचे कोरीव लेख क्वचितच आढळतात. कै. डॉ. हिरालाल यांच्या '**मध्यप्रदेश** व वऱ्हाड यांतील कोरीव लेखांच्या सूचीं'त गोंडांच्या फक्त सात लेखांचा निर्देश आहे. त्यांपैकीं तीन सतीस्मारकांवरचे आहेत. एक ताम्रपटावरील लेख गोंड राजाचा नसून यादवांचा असावा असें त्याविषयीं त्या पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून दिसतें. शिवाय रामनगरचा लेख सोडल्यास हे सर्व लेख अद्यापि अप्रकाशित आहेत. रामनगरचा शिलालेख बराच नंतरचा, विक्रम संवत् १७२४ (सन १६६७) चा आहे. त्यांत गढा-मंडला येथील गोंड राजांच्या ५२ पिढ्यांचें वर्णन असलें तरी त्याचा आरंभींचा भाग ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय नाहीं हें आतां सिद्ध झालें आहे. हा लेखहि डॉ. फिट्झ एडवर्ड हॉल या साहेबानें अमेरिकन ओरिएंटल सोसायटीच्या जर्नलमध्यें (व्हॉ. ७, पृ. १--२३) प्रसिद्ध केल्यावर आज जवळ जवळ शंभर वर्षें झालीं. त्या

---

१ द्वितीयावृत्ति, पृ. १५७

लेखाचेंहि चिकित्सक पद्धतीनें पुनः संपादन होणें जरूर आहे. गोंड राजांनीं गढा—मंडला, देवगड व चांदा येथें दीर्घ काल राज्य केलें. पण त्यांच्या इतिहासाचीं साधनें अत्यल्प आहेत. त्याविषयीं संशोधन करण्यास पुष्कळ वाव आहे. प्रस्तुत लेख गढा येथील गोंड राजवटीच्या आरंभींच्या काळांतील असल्यामुळें त्याचें महत्त्व विशेष आहे.

हा शिलालेख जबलपूर येथील फकीरचंद उस्तादाच्या आखाड्याजवळ सांपडला. हा लेख मूळचा कोठला हें निश्चितपणें माहीत नाहीं. कित्येक वर्षांपूर्वी जबलपूरच्या आसपास सांपडलेले शिलालेख या आखाड्याजवळ जमा केले होते असें दिसतें. असे आणखी तीन शिलालेख तेथें सांपडले आहेत ते कलचुरि नृपतींच्या काळचे आहेत. दोन वर्षांपूर्वी जबलपूरचे इतिहासप्रेमी डॉ. एम्. सी. चौबे यांस हे शिलालेख आढळले. त्यांनीं त्याचा छाप घेऊन मजकडे पाठविला. त्यांच्या संमतीनें प्रस्तुत लेख येथें प्रसिद्ध करीत आहे.

प्रस्तुत शिलालेख भग्नावस्थेंत आहे. त्याचा वरचा आणि डाव्या बाजूचा कांहीं भाग फुटून नष्ट झाला आहे. अवशिष्ट भागहि वांकडा तिकडा फुटला आहे. त्याची जास्तींत जास्त लांबी २ फूट ९½ इंच व रुंदी १ फूट २ इंच आहे. अवशिष्ट भागांत दहा ओळी आहेत.

अक्षर—वटिका नागरी आहे. कांहीं ठिकाणीं पृष्ठमात्रांचा उपयोग केला आहे. 'साम्राज्यगुणैः' (ओळ २) पहा. इतरत्र बहुतेक ठिकाणीं मात्रा अक्षरांच्या डोक्यावर काढल्या आहेत. या लेखाचा अवशिष्ट बहुतेक भाग संस्कृत पद्यांत आहे. शेवटच्या दोन ओळी मात्र तत्कालीन हिंदीच्या 'अवधी' बोलींत गद्यांत लिहिल्या आहेत. त्या येणेप्रमाणें—सम्वत् १६०६ वर्षे पौषी पौर्णमासीकंह दलपतिसाहिराज्ये चन्द्रपातिठाकुर [पुत्रम*] देशठाकुरकंह पद्मावती माय विष्णुपुरग्राम दीन्ह [। *] तहां महेश ठाकुर बासुदेवकी मूर्त्तिकै स्थापना कीन्ही" (संवत् १६०६ या वर्षी पौषी पौर्णमासीला दलपतिसाहि राज्य करीत असत चन्द्रपति ठाकुराचा पुत्र महेश ठाकुर यास पद्मावती मातेनें विष्णुपूर गांव दान दिला. तेथें महेश ठाकूरनें वासुदेवाच्या मूर्तीची स्थापना केली.)

हा लेख गोंड राजा दलपतिसाहि याच्या काळचा आहे. या राजाचें नांव दलपत असें दुसऱ्या ओळींत व दलपतिसाहि असें नवव्या ओळींत आलें आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश पद्मावती मातेनें दलपतिसाहि राज्य करीत असतां महेश ठाकुर नामक विद्वान ब्राह्मणास संवत् १६०६ मध्यें पौष महिन्याच्या पौर्णिमेस विष्णुपूर नांवाचें गांव दान दिलें व तेथें त्या ब्राह्मणानें वासुदेवाच्या म्हणजे कृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली हें नमूद करण्याचा होता.

प्रस्तुत लेखाच्या आरंभींच्या भागांत दलपतिसाहीच्या पूर्वजांचा नामोल्लेख व वर्णन आलें असावें, पण हा भाग आतां भग्न झाल्यामुळें ही ऐतिहासिक माहिती नष्ट

झाली आहे. विष्णुपूर गांव दान देणाऱ्या पद्मावती स्त्रीचा उल्लेख दोन ठिकाणीं–तिसऱ्या व दहाव्या ओळींत आला आहे. तिसऱ्या ओळींत ती पद्मेसारखी म्हणजे लक्ष्मीप्रमाणें आहे असें म्हटलें आहे. शेवटच्या ओळींत तिला माय (माता) असें उपपद लावलें आहे. त्यावरून ती दलपतिसाहीची माता व त्याचा पिता संग्रामसिंह याची राणी असावी. तिसऱ्या ओळींत तिचें वर्णन आलें आहे. त्यापूर्वींच्या म्हणजे दुसऱ्या ओळींत दलपतराजाचा उल्लेख आला आहे त्यावरूनहि वरील अनुमानास पुष्टि मिळते. रामनगरच्या शिलालेखावरून व ऐनी अकबरींतील वर्णनावरून दलपतसाहीचा पिता संग्रामसाहि याचें नांव आपणांस माहीत आहे. पण त्याच्या मातेचें नांव मात्र कोठेहि आलें नाहीं. त्याची माता पद्मावती नामक होती ही माहिती प्रस्तुत लेखावरून प्रथमच उपलब्ध होत आहे.

महेश ब्राह्मण हा दलपतिसाहीचा आश्रित होता. नवव्या ओळीच्या शेवटीं चन्द्रपति ठाकुराचें नांव आलें आहे. त्याच्या पुढील दहाव्या ओळीच्या आरंभींचा भाग नष्ट झाला आहे. पण अवशिष्ट भागाच्या आरंभीं महेश ठाकुराचें नांव दिसतें. त्यावरून चन्द्रपति ठाकूर हा महेश ठाकुराचा पिता असावा. महेश हा कृष्णभक्त होता. आठव्या ओळींत 'महेश विदुषः श्रीवासुदेवो गतिः' असें त्याचें वर्णन आलें आहे. आपल्याला दान मिळालेल्या विष्णुपुरग्रामांत त्यानें वासुदेवाचें मंदिर उभारलें व त्यांत भगवान् वासुदेवाची स्थापना केली. 'या मंदिरांत हरि आनन्दमग्न होऊन काळ घालवो' अशी आशा चौथ्या ओळींत व्यक्त केली आहे.

प्रस्तुत लेखांतील कालनिर्देशहि महत्त्वाचा आहे. त्यावरून संवत् १६०६ च्या पौष महिन्यांत दलपतिसाहि राज्य करीत होता असें स्पष्ट दिसतें. दलपतिसाहीच्या कारकीर्दीचीं वर्षें अद्यापि अनिश्चित आहेत. सुमारें तीस वर्षांपूर्वीं मध्यप्रदेशांतील इंग्रज अधिकारी श्री. सी. यू. विल्स् यांनीं लिहिलेल्या 'सातपुडा पर्वतांतील राजगोंड महाराज' या इंग्रजी पुस्तकांत (पृ. ४६) उपलब्ध पुराव्याची छाननी करून 'संग्रामसाहि हा इ. स. १५०० ते १५१३ या दरम्यानच्या काळांत गादीवर आला. त्यानें सन १५४१ पर्यंत राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा दलपतसाहि यानें सात वर्षें राज्य केलें असें म्हटलें आहे. त्यानंतर उपलब्ध झालेल्या कांहीं नाण्यांवरून व प्रस्तुत शिलालेखावरून या कारकीर्दीच्या वर्षांत कांहीं फरक करावा लागेल असें दिसतें. संग्रामसाहीच्या काळचे दोन सतीस्मारकावरचे लेख दमो जिल्ह्यांत दमोपासून पंधरा मैलांवरच्या ठरका नांवाच्या गांवांत सांपडले आहेत. त्यांतील वर्षें संवत् १५७० व १५७१ अशीं कै. डॉ. हिरालाल यांनीं वाचलीं आहेत. संग्रामशाहाचीं दोन सोन्याचीं नाणींहि सांपडलीं आहेत. त्यांपैकीं एक चौकोनी आहे. त्यावरील संवताच्या वाचनांत मतभेद आहेत. डॉ. हिरालाल यांचे मतें त्यावरील संवत् १५७० आहे.[२] कलकत्त्याचे

२ 'सातपुड्यांतील राजगोंड महाराज,' पृ. ४२

विद्याविनोद तो संवत् १५६६ असा वाचतात.[३] हें नाणें पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या सन १९१३-१४ च्या वार्षिक अहवालांत छापलें आहे. तेथील ब्लॉकवरून त्यावरील वर्ष १५८८ असावें असें दिसतें. दुसरें नाणें वर्तुळाकार आहे. तें श्री. ॲलन् यांनीं न्यूमिस्मॅटिक् क्रॉनिकलमध्यें कांहीं वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केलें होतें. त्यावरील वर्ष ते संवत् १६०० असें वाचतात.[४] हीं सर्व वर्षें विक्रम संवताचीं आहेत यांत संशय नाहीं. तेव्हां संग्रामसाहीनें निदान विक्रम संवत् १५७० ते १६०० किंवा इ० स. १५१३ ते १५४३ पर्यंत राज्य केलें यांत संशय नाहीं. प्रस्तुत लेखांतील संवत् १६०६ हें वर्षहि विक्रम संवताचेंच आहे यांत संशय नाहीं. तेव्हा श्री. विल्सू म्हणतात त्याप्रमाणें दलपतिसाहीची कारकीर्द इ. स. १५४८ मध्यें समाप्त झाली नसून तो निदान विक्रम संवत् १६०६ किंवा इ. स. १५४९ पर्यंत राज्य करीत होता यांत संशय नाहीं.

पद्मावती राणीनें महेश ठाकुरास दान दिलेलें विष्णुपुरगांव जबलपूरजवळच असलें पाहिजे. जबलपूर तहसिलींतील गांवांच्या यादींत बिसनपूर नामक गांव मला आढळलें व जबलपूर जिल्ह्याच्या विस्तृत नकाशांत तें जबलपूरच्या पूर्वेस २५ मैलांवर सांपडलें. या नांवाचें गांव जबलपूर जिल्ह्याच्या दुसऱ्या कोणत्याहि तहसिलींत आढळत नाहीं. तेव्हा जबलपूरच्या पूर्वेस २५ मैलांवरचें बिसनपूर हेंच प्राचीन 'विष्णुपूर' होय याविषयीं संशय राहत नाहीं.

ओळ	वाचन
१	भूत[ले] क पु (?) प्रा[थं]नं भगीर[थ*]
२	पकण्ठे मठे साम्राज्यगुणैः ... [स्तु] दलपतस्तस्या-
३	[प] त्नेव पद्मावती ग्रामं विष्णुपुरं महेशविदुष प्रादत्ते स[त्क-]
४	ती सौभाग्यसीमा च तत्वि [द्वि] द्वि न्यस्तमना दिनानि गमयत्वानन्दमम्रो हरिः ॥
५	ह शङ्के क्षितिरमणमताव्दे (ब्दे) पूर्णिमायां सहस्ये व्यधित जनकदेशं ख्यातखण्डाम-
६	[रे] वं वासुदेवं महेशः ॥ भ्रान्तं भूवलयं न कोपि मिलितस्तादृग्जनः सात्वि(त्वि)को यो वि-

३ विद्याविनोद-इंडियन म्युझियम मधील नाण्यांच्या कॅटलॉगची पुरवणी, पृ.१००

४ या तऱ्हेचेंच दुसरें एक नाणें श्री. नेव्हिल् यांनीं बंगाल एशियाटिक सोसायटीच्या (न्यू सीरिज् व्हा. २१) मध्यें प्रसिद्ध केलें होतें. त्यावरीलहि संवत् १६०० च आहे.

ओळ	वाचन
७	[र] न्त मधुना धन्यो धनं यच्छति । इत्यालोच्य कुटुम्बिनः कलयतो भूपालसेवामघन्या–
८	महेशविदुषः श्रीवासुदेवो गतिः ॥ इदं पुण्यं महेशेन यन्निदेशेन साधितं चराचरे–
९	[श्वरे तेन वा] सुदेवे समर्प्पितं (तम्) ॥ सम्व– (संवे) त् १६०६ वर्षे पौषीपौर्णमासीकंह दलपतिसाहिराज्ये चन्द्रपतिठाकुर—
१०	[पुत्रम] हेश ठाकुरकंह पद्मावतीमाय विष्णुपुरग्राम दीन्ह [।*] [त] हां महेश ठाकुर वासुदेपको मूर्तिकै स्थापना कीन्ही ॥ शुभम् [॥*]

---

१२ श्री मृत्युंजयस्वामीविषयीं कांहीं नवीन व उद्बोधक माहिती

(*श्री. विश्वेश्वर अंबादास कानोले, नांदेड)

मृत्युंजय या कवीचें नांव त्याच्या कांहीं ग्रंथांमुळें प्राचीन मराठी संतकवींच्या मालिकेत परिचित आहे. मृत्युंजय स्वामीच्या चरित्रासंबंधीं जी गूढ व आश्चर्यकारक माहिती ऐकिवांत आहे त्यावरून तर या कवीच्या माहितीचें विशेष संशोधन होऊन खरी माहिती प्रकाशांत यावयास पाहिजे अशी जिज्ञासा निर्माण होते. महिपती महाराजांनीं भक्तविजयाच्या ४१ व्या अध्यायांत मृत्युंजय कवीसंबंधीं माहिती देतांना, हा मूळचा बेदरचा मुसलमान बादशहा शांत ब्रह्मणि नांवाचा असून यास कांहीं कारणामुळें अनुताप होऊन तो सर्व सुखोपभोगाचा व ऐश्वर्याचा त्याग करून पंढरपूर क्षेत्रास गेला व तेथें विवेकसिंधूचें निरूपण चाललें होतें तें त्यानें एकाग्रमनानें श्रवण केलें व त्याच्या अनुतप्तचित्तांत आत्मज्ञानाचा प्रकाश पडून तो ती पोथी घेऊन फिरत फिरत कल्याणीस आला व तेथील सहजानंद स्वामीनें त्याचें नांव मृत्युंजय ठेवलें इत्यादि बरीच माहिती दिली आहे. साधारणतः शके १४४० ते १४८० हा या कवीचा काळ अनुमानानें गृहीत धरण्यांत आला आहे महिपतींनीं भक्तविजयांत दिलेल्या माहितीपेक्षां आपणांस

---

* वाढदिवस ४४ वा. श. १८७६ इ. १.७. १९५४.

आज अधिक माहिती या कवीसंबंधीं उपलब्ध नाहीं. या कवीचे प्रकाशदीप, स्वरूपसमाधान, अनुभवसार, गुरुलीला, अमृतसार, सीताबोध, पंचीकरण, सिद्धसंकेत इत्यादि जे पांचसहा ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांतूनहि नांवाव्यतिरिक्त इतर माहितीचा कांहीं बोध होऊं शकत नाहीं. या कवीनें आपल्या ग्रंथांत 'मुंतोजि ब्रह्मणि' किंवा कोठें कोठें 'मृत्युंजय' एवढाच आपला उल्लेख केलेला आढळतो. या कवीची रचना मराठी भाषेच्या दृष्टीनें इतकी शुद्ध व सुसंस्कृत आहे व त्याचे हिंदुधर्मग्रंथांचें व वेदांतविषयांचें ज्ञान इतकें गहन व माहितीपूर्ण आहे कीं हा कवि मूळचा मुसलमान असावा अशी चुकूनहि मनांत कल्पना येत नाहीं. उदाहरणार्थ सिद्धसंकेत या पद्मपुराणाधारें रचलेल्या ओवीबद्ध ग्रंथांची भाषा इतकी डौलदार, प्रासादिक व भरघोस आहे आणि वेदांतविवरण इतकें अधिकारपूर्ण आहे कीं त्यावरून मृत्युंजय हे मूळचे मुसलमान असावेत असें सहसा वाटत नाहीं. महिपतीच्या माहितीचा आधार सोडला तर मृत्युंजय किंवा मुंतोजी ब्रह्मणि हा यवन होता असें कोणीहि कोठें उल्लेखिलेलें आढळत नाहीं. कांहीं संतमालिकेंत तर त्यास 'मृत्युंजययोगी' किंवा स्वामी असेंहि आदरानें नमन केलेलें आढळून येतें. पण त्याच्या मूळ जातपातीची रहस्यमय घटना महिपतिव्यतिरिक्त कोणीहि नमूद केलेली आढळून येत नाहीं, तेव्हां महिपतींच्या सर्वच माहितीवर कितपत विश्वास ठेवावा याची शंका वाटते.

मृत्युंजय स्वामी व बहमनी राजपुरुष निराळे

मृत्युंजय स्वामी व ज्या बहमनी मुसलमान राजपुरुषांसी त्यांचा संबंध आला त्या, दोन भिन्न व्यक्ति असाव्यात असें माझें साधार मत आहे. महिपति महाराजांनीं या दोन्ही नांवांची गल्लत करून मृत्युंजय व मुंतोजि ब्रह्मणि यास एकच पुरुष गणलें आहे तें बरोबर वाटत नाहीं. हा बहमनी राजपुरुष मृत्युंजय स्वामीचा शिष्य असावा व त्यास वैराग्य प्राप्त होऊन जेव्हां तो पंढरपूर क्षेत्रास गेला तेव्हां मृत्युंजयस्वामींनीं केलेल्या विवेक–सिंधूच्या निरुपणानें त्याची वृत्ति परमार्थ–प्रवण झाली असावी. मृत्युंजयस्वामी हे श्रीमुकुंदमहाराजांच्या खास परंपरेंतील एक प्रसिद्ध सत्पुरुष असून मुकुंदराजाचें एक मोठे भक्त व उपासक होते. मुकुंदराजांची परंपरा चालू ठेवण्यांत व त्यांचा विवेकसिंधु ग्रंथ महाराष्ट्रभर लोकप्रिय करण्यांत मृत्युंजय स्वामीनें विशेष कामगिरी केली असावी असें वाटतें. ज्ञानेश्वरीचा विशेष प्रसार होण्यापूर्वीं एकेकाळीं महाराष्ट्रांत किंवा पंढरपूरसारख्या वारकरीपंथाच्या क्षेत्रांत भागवतधर्मानुयायांचा एक आवडता ग्रंथ म्हणून विवेकसिंधु चांगलाच लोकप्रिय असला पाहिजे. मृत्युंजयस्वामींस मुकुंदराजानें पंढरपुरास सगुण दर्शन देऊन विवेकसिंधूची पोथी दिली व वरदहस्त ठेवला, अशी जी कथा महिपतीनें दिली आहे ती खरी असल्याबद्दल आणखीहि पुरावा उपलब्ध होत आहे. मृत्युंजय म्हणजेच मुंतोजि, ब्रह्मणि किंवा बहमुनी राजपुरुष हे महिपतीचे एकत्व मात्र बरोबर वाटत नाहीं. मुंतोजि ब्रह्मणि किंवा मृत्युंजय या नांवानें जे ग्रंथ उपलब्ध आहेत

ते बहुधा मृत्युंजय स्वामीनेंच रचले असावे; बहमनी राजपुरुषाचे नसावेत. मृत्युंजयाच्या या सर्व ग्रंथावर विवेकसिंधूच्या भाषेची व विचारांची सर्वत्र विलक्षण छाप आहे. मृत्युंजय स्वामींच्या उपदेशानें व अनुग्रहानें हा बहमनी राजपुरुष पारमार्थिकदृष्ट्या पुढें मोठ्या योग्यतेस चढला असावा व मराठींत उत्तम ग्रंथरचना करण्याइतकें त्याचें मराठी भाषेचें ज्ञानहि वाढलें असावें. हें एकापरीनें शक्य असलें तरी मृत्युंजय किंवा मुंतोजि ब्रह्मणि या नांवानें रचलेले ग्रंथ एका बहमनी राजपुरुषाचे वाटत नाहींत. मृत्युंजयस्वामींनेंच आपल्या ग्रंथांत बहमनी राजपुरुषाचा परमार्थ अधिकार पाहून त्याचें नांव आपल्या नांवाशीं शिष्य म्हणून निगडीत केलें असावें. चांदोरकरांनींहि आपल्या संतकविसूचींत मृत्युंजयानें बेदरचे शहास (महमद) विवेकसिंधूची पोथी दिली असें म्हटलें आहे. तेव्हां मृत्युंजय म्हणजेच बेदरचे शहा असें जें महिपतीनें म्हटलें आहे तें बरोबर दिसत नाहीं. मृत्युंजय व बहमनी शहा या दोन भिन्न व्यक्ति असाव्या व उभयतांचें गुरुशिष्य नातें असावें. मृत्युंजयाचा शिष्य असलेला हा ब्रह्मणि शहा कोण असावा याचा तपास व्हावयास पाहिजे.

बेदरच्या शहाचा एक पुरावा

शहा मुतबजी ब्रह्मणि असा स्पष्ट उल्लेख असलेल्या एका शाहाचा पंचीकरण या नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध झाला आहे. हा मुतबजी ब्रह्मणि ज्या अर्थी आपणास शहा म्हणवितो त्याअर्थी बेदरच्या बहमनी राजकुलांतील हा पुरुष असावा असें वाटतें. बेदरच्या बहमनी बादशहामध्यें कांहीं बादशहा हिंदुधर्मप्रेमी होऊन गेले व त्यांचा कांहीं हिंदु संतसत्पुरुषाशीं संबंध आला इत्यादि कथा गुरुचरित्रादि ग्रंथांतुन नमूद आहेत. दामाजीपंताच्या कथेंतहि बेदरच्या बादशहाचें असेंच एक नांव आढळतें. या बहमनी राजांच्या नांवाचा व माहितीचा नक्की तपास व्हावयास पाहिजे. शहा मुतबजी ब्रह्मणीचें हें पंचीकरण त्रुटित उपलब्ध झालें आहे. हिंदु व मुसलमानी धर्मग्रंथांतील तत्त्वें व विचार एकच आहेत असें या लहान ग्रंथांत प्रतिपादलें आहे व हिंदुधर्माशीं जुळतील अशीं सुफीपंथांतील तत्त्वें व साम्यस्थळें यांत विशद केलीं आहेत. आपण या पंचीकरणद्वारें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला असें या बहमनी शहानें ग्रंथारंभीं म्हटलें आहे. व " शाह मुतबजी ब्रह्मणि जिननें नहि मनामनि पंचीकरणका खोज किये हिंदु-मुसलमान येक कर दिये " असा खुलासा केला आहे. हा शहा मुतबजी ब्रह्मणि बहमनी राजवंशांतील कोणता पुरुष असावा यासंबंधींच्या संशोधनाकडे लक्ष देणें जरूर आहे. कल्याणी जवळील नारायणपुराहून दीडदोन कोसांच्या अंतरावर मुसलमान सत्पुरुषाची एक दरगाहा आहे, तेथें मोठा उरूस भरतो व हिंदु-मुसलमान या दरगाहास पूज्य मानतात असें ऐकण्यांत आलें आहे. ही दरगाहा या शहा मुतबजी ब्रह्मणीची तर नसेलना ? शहा मुतबजी ब्रह्मणीच्या या पंचीकरणानें पुढेंमागें महत्त्वाची माहिती प्रकाशांत येण्याचा संभव आहे.

ऐ. सं. सा. खं. ६—८

मृत्युंजय स्वामींचें मूळ नांव रामस्वामी असावें काय ?

मृत्युंजय स्वामीचा काळ शक १४४० ते १४७० हा गृहित धरण्यांत आला आहे. मुकुंद राजांच्या पश्चात् दोन शतकांनीं हे पुढें होऊन गेले असले तरी मुकुंद-राजाच्या खास परंपरेंतील हे मृत्युंजय स्वामी होते असें दिसतें. मृत्युंजयाच्या कोणा अनंत नामक शिष्यानें लिहिलेली पंचीकरणाची एक पोथी उपलब्ध झाली आहे. तिच्या शेवटीं मृत्युंजयस्वामीच्या गुरुपरंपरेसंबंधीं महत्त्वाचा मजकूर दिला आहे. या पंचीकरणाचा कर्ता अनंत हा मृत्युंजय स्वामींचा साक्षात् शिष्यच दिसतो. या अनंतानें मृत्युंजयस्वामींचें मूळ नांव रामस्वामी दिलें आहे हें विशेष होय. ही माहिती नवीनच प्रकाशांत येत आहे. हें पंचीकरण जुनें मराठी गद्य आहे. या अनंतकृत पंचीकरणाच्या शेवटीं मृत्यंजयस्वामींच्या गुरुपरंपरेविषयीं खालीलप्रमाणें निर्देश केला आहे. पंचीकरणांतील उतारा:—

॥ श्रवण मनन निजध्यास करिता साक्ष साक्षात्कार होय ॥ प्रारब्धभोग जोवरि राहे देह दग्धपटन्याये । आपण दृष्टा अन्वय पाहता पुढे दृष्टीस आढळे तें ब्रह्मरूप ॥ सांगतल्यासारखे स्वरूप वोळखी । म्हणे **अनंत** ॥ मागे श्रीमृत्युंजया कृपा करून मुक्ति दिजे । हे ब्रीद तुझे तुं सांभाळी ॥ "

हा अनंत श्री मृत्युंजयास मागणें मागतो कीं कृपा करून तूं मला मुक्ति दे. गुरु या नात्यानें मुक्ति देण्याचें हें तुझें ब्रीद तूं सांभाळ, अशी अनंतानें करुणा भाकली आहे.

यानंतर मृत्युंजयस्वामींची परंपरा पुढीलप्रमाणें ग्रंथाचे शेवटीं दिली आहे. पोथी अलिकडे शेंपन्नास वर्षांखालीं नकललेली आढळते. तीस जुनी म्हणतां येणार नाहीं. " आदि श्रीआदीनाथु ईश्वर श्रीहरिनाथे होम केला त्यापासाव प्रगटला ॥ त्याचा उपदेश श्रीहरिस्वामीस ॥ त्याचा उपदेश श्रीरामचंद्रस्वामीस ॥ त्याचा उपदेश श्रीमुकुंदराज-स्वामीस ॥ त्याचा उपदेश श्रीगुरुमृत्युंजयरामस्वामीस ॥ पंढरपुरी सगुण दर्शन भिमातिरी देऊन विवेकसिंधूचें पुस्तक आत्मउपासना ब्रह्मबोध ज्ञानोदय वरद प्रसन्न कर मस्तकि इति श्रीपंचकर्ण माहवाक्यः समाप्ता ॥ ६ ॥ मुकुंदराजांनीं विवेकसिंधूंत जी आपली परंपरा दिली आहे तींच नांवें येथें उद्धृत आहेत. आदिनाथ परमेश्वर हा हरिनाथानें होम केला तेव्हां प्रगट झाला आणि हरिनाथ किंवा हरिस्वामीला आदिनाथानें उपदेश केला. हरिस्वामींचा उपदेश रामचंद्रस्वामींस व रामचंद्राचा मुकुंदराजस्वामींस आणि मुकुंद-राजांचा उपदेश गुरुमृत्युंजयरामस्वामींस; भीमातीरीं पंढरपुरीं मुकुंदराजांनीं मृत्युंजय-स्वामींस सगुणरूप दर्शन देऊन विवेकसिंधु हा ग्रंथ दिला व आत्मउपासना व ब्रह्मबोध करून वरदहस्त ठेवला इत्यादि महत्त्वाची माहिती दिली आहे. ग्रंथाच्या शेवटचा गुरु-परंपरेचा उतारा मृत्युंजय–शिष्य अनंताच्या खास पंचीकरणांतील आहे किंवा नंतर जोडलेला आहे याचा बोध होऊं शकत नाहीं. ज्याअर्थीं " गुरुमृत्युंजयरामस्वामी " असा खास निर्देश आहे, त्याअर्थीं या पोथींतलाच तो शेवटचा उतारा असावा. यांत मृत्युंजयांचा रामस्वामी असा एक नवा नामनिर्देश केलेला आढळतो हें विशेष होय.

मृत्युंजयांच्या चरित्राचें अधिक संशोधन झालें पाहिजे असें या उपलब्ध होत असलेल्या माहितीवरून वाटतें. मृत्युंजयस्वामींच्या चरित्रासंबंधीं कांहीं सुचलेले नवीन मुद्दे येथें अनुमान म्हणून मांडले आहेत त्याचा सत्यशोधनाच्या दृष्टीनें उपयोग होईल अशी आशा आहे.

---

१३ गीतेंतील एक कोडें

(कै. **गो. कृ. मोडक**, पुणें)

किरीटिनं गदिनं चक्रहस्त-
मिच्छामि त्वां द्रष्टुमहं **तथैव** ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ **११, ४६,**

१ *हें पद्य गीतेमध्यें विश्वरूप-दर्शनांत आलें आहे. याचा सरळ अर्थ करूं जातां, तो पुढीलप्रमाणें होतो. **अर्थ**- हे सहस्रकरधारी विश्वरूपा (कृष्णा), तुला **नेहमीं-प्रमाणेंच** मुकूट घातलेला व हातांत गदा आणि चक्र धारण केलेला असा मी पाहूं इच्छितों. तेव्हां **नेहमींचेंच चार हातांनीं युक्त** असें रूप तूं धारण कर.

२ यावर शंका पुढील प्रमाणें येते. विष्णूला चार हात आहेत. त्याचाच पूर्णावतार कृष्ण, यालाहि चार हात सम्भवतात. परंतु भागवतादि पुराणांत, शिशुपालवधादि काव्यांत, हरिविजयादि अनेक मराठी ग्रंथांत आणि आपल्या परंपरागत समजुतींत कृष्ण नेहमीं द्विभुजच असतो. अर्थात् **तेनैव रूपेण** या शब्दांवरून **द्विभुजरूप** असाच अर्थ आपल्या मनांत येतो. परंतु येथें ' चतुर्भुजेन ' असा प्रयोग प्रत्यक्षांत आहे. म्हणजे येथें नेहमींची वहिवाट, परंपरा, कविप्रयोग, इत्यादि **द्विभुज**-चा पुरस्कार करितात, तर गीता **चतुर्भुज** असा प्रयोग करिते. हा विसंवाद येथें होतो.

३ **दोन अर्थांची तुलना**-- हा **विचारोत्तर** अर्थ व आरंभीं दिलेला सामान्यतः करण्यांत येणारा दर्शनी अर्थ यांतील भेद आपण पाहूं. (१) **दर्शनी** अर्थात **चतुर्भुजेन** हें तृतीयान्त विशेषण असून त्याचें विशेष्य **रूपेण** हें आहे. आणि त्याचेपुढें **विशिष्टः** किंवा **युक्तः** असें पद अध्याहृत आहे, व ' चतुर्भुजेन रूपेण युक्तः भव ' तेंच माझ्या नित्य परिचयाचें चार हात धारण करणारें रूप तूं घे. (२) **विचारोत्तर** अर्थात-चतुर्भुजेन हा **चतुर्भुज + इन** असा दोन संबोधनांचा संधि आहे. यांत चतुर्भुज म्हणजे कृष्ण आणि **इन** म्हणजे धनी, राजा. दोहोंचा मिळून अर्थ ' कृष्ण महाराज ' ' सहस्रबाहो विश्वरूप चतुर्भुजेन, तेनैव रूपेण भव ' = सहस्रभुजधारी विश्वरूप कृष्ण महाराज, तेंच (मला नित्य परिचित असलेलें) रूप धारण करा.

* मंडळ पाडदिवस ३९, शा. १८७१, दि. २८-६-१९४९.

४ या दोन अर्थांतील तारतम्य—(१) **दर्शनी** अर्थात 'चतुर्भुज' या विशेषणानें वस्तुस्थितीशीं विरोध येतो. गोकुळांत काय किंवा पांडवांच्या सहवासांत काय, कृष्ण द्विभुजच होता. तेव्हां 'चतुर्भुज रूप' हा अर्थ वरील पद्यांत असणें शक्य नाहीं. उलट **विचारोत्तर** अर्थामध्यें भुज-संख्या मुळींच उक्त नाहीं. यामुळें लोकांत दोन हातांनीं वावरणाऱ्या कृष्णमूर्तीशीं 'तेनैव रूपेण'–चा विरोध कोणत्याहि प्रकारें येत नाहीं. तेव्हां हाच अर्थ उत्पन्न होतो. व तोच सर्वथा कवीस विवक्षित असावा, हें उघड होतें.

५ भारतांत कांहीं पद्यें (व्यास–गणेश संवाद) क्लिष्टार्थक आहेत. त्यांतील कांहींचा अर्थ कोणास बऱ्याच प्रयत्नानें लागेल, कांहींचा लागणार नाहीं, कांहींच्या अर्थाविषयीं मतभेद होईल, इत्यादि प्रकार संभवतील. अशा रीतीनें भारतांत संभवणाऱ्या कोड्यांतील एक कोडें उदाहरणासाठीं येथें घेतों.

६ **कोड्याचा नमुना—** नदीज लंकेशवनारिकेतुः
नगाह्वयो नाम नगारिसूनुः ।
एषोऽगनावेषधरः प्रमाथी
जित्वावयन्नेष्यति चाद्य गावः ॥

अन्वय—(द्रोण भीष्मास म्हणतो) हे नदीज, लङ्केशवनारिकेतुः, अद्य अङ्गनावेषधरः, प्रमाथी एषः नगाह्वयो नाम नगारिसूनुः अवयन् वः जित्वा गाः नेष्यति ।

अर्थ— हे भीष्मा, रावणाच्या बागेचा विध्वंस करणारा मारुती ज्याच्या ध्वजावर आहे असा, आज स्त्री-वेष धारण करणारा, हा दांडगा, अर्जुन वृक्षाशीं तुल्य नांव धारण करणारा, इंद्राचा मुलगा तुम्हास हल्ला करून जिंकून गाई नेईल. हा विचारोत्तर अर्थ होय. याच पद्याचा **दर्शनी** अर्थ वाचकांस घोटाळ्यांत पाडणारा आहे. शेवटल्या चरणांत पदच्छेद कसा ? विभक्ती कोणती ? शब्दार्थ काय ? याविषयीं कोडेंच पडतें: (१) दर्शनी अर्थांतील पदच्छेद–जित्वा, वयं (= आम्ही), नेष्यति, च अद्य गावः ('गो'–चें प्रथमा बहुवचन) यांत 'वयं' आणि गावः' या प्रथमांची सङ्गती लागत नाहीं. (२) **विचारोत्तर** अर्थांत पुढील पदच्छेद आहे. –'जित्वा अवयन् नेष्यतिः च अद्य गाःवः'–येथें–**अवयन्**–हें 'अव–इ' 'जवळ जाणें, हल्ला करणें' चें वर्तमान विशेषण पुं. प्र. एकवचन, अर्थ 'हल्ला करणारा' गाः (द्वि. ब. व.), वः ('युष्मत्'चें द्वि. ब. व) येथील पदें (१) वरवर पाहूं जातां जित्वा, वयं, नेष्यति, च अद्य गाव अशीं वाटतात. पण (२) विचारान्तीं तीं जित्वा, अवयन्, नेष्यति च अद्य गाः व अशीं ठरतात. या द्विविध पदसङ्घाचें श्रवण संधि केल्यावर सारखेंच होतें. वयं + नेष्यति = वयंनेष्यति, किंवा **वयन्नेष्यति**–यांतील उत्तरोक्त संधिरूप दोन्ही अर्थांस सामान्य आहे. यामुळें हें संधिरूप (वयन्नेष्यति) वरवर पाहिल्यास, सामान्य वाचकांस घोटाळ्यांत पाडितें; पण बारकाईनें पाहिल्यास पण्डितास सुसंगत अर्थ सांगतें. याप्रमाणें वरवर अर्थ एक व विवक्षित अर्थ दुसरा अशी व्यवस्था भारतांत मधूनमधून आढळते.

हाच प्रकार आपल्या प्रस्तुत पद्यांत आहे. त्यांतील विचारोत्तरार्थानुरूप पाहतां, येथें कृष्णानें चार हात धारण केले नाहींत, हें उघड होतें.

७ **संबंधित विविध शब्दप्रयोग**—पद्य ४६ मध्यें-**तथैव तेनैव रूपेण,** पद्य ४९ मध्यें-(कृष्ण म्हणतो), " **तदेव** (मे रूपमिदं प्रपश्य), ' ५० मध्यें **स्वकं रूपं** ५१ मध्यें (दृष्टेदं) **मानुषं रूपं** (तव सौम्यं जनार्दन) या सर्व ठिकाणीं **तथैव** = नेहमींप्रमाणें, **तेनैव, तदेव** = नेहमींचें **स्वकं रूपं** = आपलें रूप; **इदं मानुषं रूपं** = माणसाप्रमाणें (दोन हातांचें) हें रूप. या सर्व उल्लेखांवरून दिसतें कीं—अर्जुनानें नेहमींचें रूप मागितलें. तदनुरूप कृष्णानें **आपलें रूप** दाखविलें. आणि हें **मनुष्या-सारखें रूप** म्हणून, अर्थात् दोन हातांचें असें, अर्जुनानें वर्णिलें. यावरून कृष्णानें सहस्रभुज रूप टाकून द्विभुज रूप धारण केलें, मध्यंतरीं चतुर्भुज रूप दाखविलें नाहीं, हें उघड होतें. आतां या अर्थावर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करूं.

८ **यौगिक व रूढ अर्थ**—एतत्संबंधित पद्यांत कृष्णाचा उल्लेख ' चतुर्भुज ' या शब्दानें केलेला आहे. यावरून कोणी अशी शंका घेईल कीं या ' चतुर्भुज ' पदा-नुसार कृष्णानें हजार भुज टाकून ' चार भुज ' धारण केले असावे. तरच **चतुर्भुज** ही संज्ञा **चरितार्थ** होईल. **यावर उत्तर**-' उपेन्द्र इंद्रावरजः चक्रपाणिः चतुर्भुजः ' या कोशावरून चतुर्भुज ही विष्णूची म्हणजे कृष्णाची **संज्ञा** ठरते. विष्णुरूपामध्यें ती चरितार्थहि होते. विष्णूला भुज चार असल्यानेंच चतुर्भुज हें नांव त्यांस मिळालें आहे. येथें लक्षणीय कीं, कांहीं कारणांवरून एकदां पडलेलें नांव, तें कारण विद्यमान नसतांहि, योजण्यांत येतें. लहानपणीं व्रात्यपणामुळें कृष्णास यशोदेनें, त्याच्या **उदरास दामन्** म्हणजे दावें बांधून, त्यानें उखळीशीं जखडून टाकिलें. या घटनेवरून त्यास '**दामोदर**' नांव पडलें; व हें नांव पुढेंहि त्याचें नित्याचें ठरलें. विष्णूस **चक्रपाणि** कां म्हणतात ? **उत्तर**—तो **पाणि**—मध्यें म्हणजे हातामध्यें चक्र धरितो म्हणून. पण ही चक्रपाणि संज्ञा आपण त्यास नेहमींच लावितो, मग त्याच्या हातांत चक्र असो वा नसो. **गोडबोले** नांवाचा गृहस्थ सामान्यतः गोड बोलत असल्यानें, त्यास हें नांव पडलें. तरी पण एकदां पडलेलें हें नांव, तो कडू बोलला, त्यानें शिव्या दिल्या, किंवा तो कांहींच बोलला नाहीं तरी, आपण त्यास नेहमीं लावितो. यावरून दिसतें कीं एखादी संज्ञा किंवा नाम कोणास पडलें तेव्हां तें **चरितार्थ** असतें. पण पुढें तें प्रायः अर्थ – निरपेक्ष त्यास योजण्यांत येतें. म्हणजे संज्ञा प्रवृत्तिकालीं चरितार्थ असतें; तिचा अर्थ अवयवार्थास अनुसरून असतो; तर पुढें तो अर्थ सुटून, ती केवळ रूढ अर्थानें वापरण्यांत येते.

९ अशाच प्रकारें येथें चतुर्भुज ही **केवळ संज्ञा** आहे. अर्थात् हा शब्द येथें साभिप्राय घ्यावयाचा नाहीं. तेव्हां त्याचा अर्थ केवळ कृष्ण एवढाच आहे. त्यावरून हस्तसंख्येविषयीं अनुमान काढावयाचें कारण नाहीं, तेव्हां चतुर्भुजेन = कृष्णमहाराज.

अर्जुनानें कृष्णास नेहमींचें रूप धरण्यास सांगितलें आणि त्यानें तदनुरूप द्विभुजरूप धारण केलें.

१० हें अर्थ-साधन कांहीं पण्डित मान्य करीत नाहींत. त्यांच्या मतें सहस्रभुज रूपानंतर कृष्णानें प्रथम चतुर्भुजरूप धारण केलें व नंतर द्विभुजरूप घेतलें. या मताच्या सिद्धीसाठीं ते पुढील प्रमाणें देतात. या प्रमाणांचा आतां आपण विचार करूं.

प्रमाण १ अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय **देव रूपं**
प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ११, ४५,

येथें **देवरूपं** म्हणजे देवाचें रूप, अवतारकालीन चतुर्भुजरूप, असा अर्थ होतो. देवस्य रूपं = देवरूपं असा समास येथें विवक्षित आहे. **या प्रमाणास उत्तर**-याच पद्यांतील '**तदेव**'चा अर्थ उघडउघड तेंच म्हणजे **नित्य परिचित** (द्विभुजरूप) असा आहे. तेव्हां देवरूपं यानें चतुर्भुज रूप असा अर्थ घेतां येत नाहीं, आणि अशा अर्थाचे अभावीं **देव** हें समासपद न करतां संबोधन घेणें प्राप्त होतें. **प्रमाण २**-देव रूप अशीं व्यस्त पदें घेतल्यास, **देव** हें संबोधन घ्यावें लागेल; व याच पद्यांत **देवेश** हे तुल्यप्रायार्थक संबोधन असल्यानें, पुनरुक्तता दोष उत्पन्न होईल. तो टाळण्यासाठीं **देवरूप** असा समास-शब्दच घेणें येथें योग्य आहे व त्यानें चतुर्भुजरूपच सूचित होतें. यास उत्तर—देव-पासून रूपं पृथक् केल्यास देव हें संबोधन घ्यावें लागतें व तें देवेश याचे अर्थास प्रायः **पुनरुक्त** अत एव निरर्थक करितें. हें सत्य असलें तरी पुढील विचारानें येथील देव ह्या संबोधनानें होणारी तेथील एक प्रकारची द्विरुक्ति इष्टच ठरते. या पद्यांत अर्जुन काकुळतीस येऊन कृष्णाजवळ सौम्यरूपाची याचना करीत आहे. तींत त्यास प्रथम **देव** असें संबोधून, पण तत्क्षणीं तेवढ्यानें समाधान न मानून, पुढें लगेच **देवेश** असें संबोधित आहे· देव-हून देवेश-मध्यें गौरव अधिक आहे; व हें वाढतें गौरव 'प्रसीद' इत्यादि शब्दांनीं गयावया करणाऱ्या अर्जुनाच्या भाषेस साजेसेंच आहे. तेव्हां 'देव' हें रूप व्यस्त करून संबोधन घेणें अनिष्ट नसून, उलट प्रकृत संदर्भास पोषकच असल्यानें, सर्वथा ग्राह्य ठरतें.

प्रमाण ३

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ११, ५०.

अन्वय—'तथा' इति महात्मा वासुदेवः अर्जुनं उक्त्वा, भीतं एनं स्वकं रूपं

भूयः दर्शयामास । पुनः च सौम्यवपुः भूत्वा आश्वासयामास. **अर्थ**– ' बरें ' असें अर्जुनास बोलून महात्मा कृष्ण यानें भ्यालेल्या अर्जुनाला आपलें रूप पुन्हां दाखविलें. आणि फिरून शांत रूप धारण करून अर्जुनाची भीति त्यानें नाहींशीं केली.

या अर्थांत **आपलें रूप** (स्वकं रूपं) यानें चतुर्भुज रूप सूचित होतें; आणि पुढील **सौम्यवपुः** या शब्दानें द्विभुजरूप सूचित होतें. तेव्हां अर्जुनाच्या ' चतुर्भुजेन रूपेण ' इत्यादि विनंतीनुसार कृष्णानें कांहीं काल चतुर्भुजरूप धारण केलें, ही गोष्ट सिद्ध होते.

यास उत्तर--स्वकं रूपं याचा अर्थ गोकुळांतील बालपणापासूनचें रूप म्हणजे द्विभुजरूप असाच होतो. विष्णूशीं अभेद मानून विष्णूप्रमाणें चतुर्भुजरूप **स्वकं रूपं** या पदांनीं घेण्याचें कारण नाहीं. एतदनुकूल निर्दोष अन्वय पुढीलप्रमाणें सहज प्राप्त होतो. **अन्वय**– ' तथा ' इति महात्मा वासुदेवः अर्जुनं उक्त्वा, पुनः सौम्यवपुः भूत्वा, भीतं एनं स्वकं रूपं भूयः दर्शयामास, आश्वासयामास च, **अर्थ**– ' बरें ' असें महात्मा कृष्ण यानें अर्जुनास म्हटलें व फिरून शांत रूप धारण करून, भ्यालेल्या त्याला आपलें (नेहमींचें) रूप पुनरपि दाखविलें व त्यास धीर दिला.

या अर्थांत विश्वरूप–विसर्जनानंतर एकाच रूपाची, अर्थात् **द्विभुज** रूपाचीच प्राप्ति संभवते.

प्रमाण ४-- सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ १०, ५२

अर्थ— (विश्वरूप टाकल्यावर कृष्ण अर्जुनास म्हणतात–) त्वां पाहिलेलें हें माझें रूप भक्तांच्या दृष्टीस पडणें फार **विरळा** संभवते, देवसुद्धां हें रूप पाहण्याची नित्य इच्छा करितात. अर्थात् हें देवांचें इष्ट रूप भयंकर सहस्रभुज असें नसून, तें अल्प-कालीन **चतुर्भुज** असलें पाहिजे.

यास उत्तर— देव नेहमीं पाहूं इच्छितात, एवढ्यावरून तें नियमानें घोर **नसलेंच पाहिजे**, असें म्हणतां येत नाहीं. घोर, भयानक असेंहि रूप पाहण्यास आपलें मन कधींकधीं सिद्ध होतें. याच मनःप्रवृत्तीमुळें काव्यांत **भयानक रस** साधण्यांत येतो व तो आपणांस तेथें मनोहरहि वाटतो. वाघ पाहिला असतां आपलें मन कंपित होतें; तरीपण तो पाहण्यास आपण उत्सुक असतों. त्याच्या दर्शनापासून होणाऱ्या आनंदांत भयाचें मिश्रण असतें. प्रस्तुतांत अशा आनंदाचे जोडीस, पूज्यत्व व पावनत्व हेहि धर्म आहेत. सारांश– भयमिश्र असाहि आनंद आपणांस आवडतो. एतदनुसार या उग्र विश्वरूपा-संबंधानें देवांनीं दर्शनकांक्षी असणें यांत विपरित असें कांहींच नाहीं. तेव्हां या पद्यांतील रूप मनोहर चतुर्भुज न घेतां, उग्र विश्वरूप घेणें मुळींच तर्क-विरोधी नाहीं.

प्रस्तुतांतील **घटना-सांखळीचे दुवे**-- कृष्णाचें उग्र असें विश्वरूप पाहून

अर्जुन **घाबरला,** व त्याला हें रूप नाहींसें होऊन शांत असें कृष्णाचें रूप मी केव्हां पाहीन असें झालें. ही गोष्ट--

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे । ११, ४५.

यावरून दिसून येतें. हें साधण्यासाठीं त्यानें कृष्णास नित्यपरिचित असें सौम्यरूप दाखविण्याची विनंती केली. ही गोष्ट—

तदेव मे दर्शय देव रूपं (४५) या चरणांत सांगितली आहे. ही अर्जुनाची **प्रार्थना** ऐकून कृष्णानें तिचा **स्वीकार** केला. हें आपण—

व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ११, ४९

या उत्तरार्धांतील कृष्णोक्तीवरून पाहतो. याप्रमाणें बोलून कृष्णानें अर्जुनाच्या प्रार्थनेची **पूर्तता** केली. ही गोष्ट—

स्वकं रूपं दर्शयामास भूयः । ११, ५०

अशी चरण २ मध्यें वर्णिली आहे. आपली प्रार्थना कृष्णानें पूर्ण केली, व त्यामुळें आपली भीति उडून गेली व आपल्या जिवांत जीव आला, असें पुढील पद्य ५१ मध्यें बोलून, अर्जुन कृष्णरूपेचें **स्वागत** करीत आहे.

दृष्टेदं मानुषं रूपं......
......सचेताः प्रकृतिं गतः ॥

यानंतर मानुषरूपापूर्वी असलेल्या **उग्ररूपा**विषयीं कृष्ण पुढीलप्रमाणें बोलत आहेत.

तूं आत्तांच पाहिलेलें हें रूप पाहण्यास फार दुर्मिळ आहे, हें देवांनासुद्धां वारंवार दिसत नाहीं. हें पाहण्याविषयीं ते नेहमीं उत्सुक असतात. हें रूप वेदाभ्यास, तपश्चरण इत्यादि साधनांनींसुद्धां पाहवयास सांपडणें कठीण (पद्यें ५२, ५३).

वर सांगितलेलें सांखळींतील दुवे म्हणजे मूळ अर्जुनाची घबराट, तदनुसार त्यानें केलेली कृष्णाची प्रार्थना, कृष्णानें केलेला तिचा स्वीकार, नंतर आपलें रूप दाखवून प्रार्थनेची केलेली पूर्तता, ती पाहून ' माझें समाधान झालें ' इत्यादि अर्जुनाची मान्यता, या सर्व दुव्यांची एकवाक्यता असली पाहिजे. पैकीं अर्जुनाच्या मान्यतेंत ' इदं मानुषं रूपं ' असा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून अर्जुनानें पाहिलेलें रूप (मनुष्योचित म्हणजे) **द्विभुज** होतें, ही गोष्ट संशयातीत आहे. अर्थात् या गोष्टीस अनुसरूनच पद्य ४६ मधील ' चतुर्भुजेन ' चा अर्थ केला पाहिजे. असा संवादी अर्थ ' चतुर्भुज ' हें कृष्णाचें संबोधन घेतल्यानेंच साधतो.

शिवाय, अर्जुनानें समाधान व्यक्त केल्यानंतर कृष्ण म्हणतात, " हें माझें रूप

कोणासहि पाहण्यास फार दुर्मिळ आहे." इ. हें रूपाचें वर्णन (पद्य ५३) पद्य ४८ तील वर्णनाची केवळ नक्कल आहे. पैकीं पद्य ४८ त वर्णिलेलें रूप विश्वरूपत्यागाच्या पूर्वीचें असल्यानें निःसंदिग्ध विश्वरूप आहे. अर्थात् तुल्य वर्णिलेलें पद्य ५२, ५३ मधील रूपहि तेंच असलें पाहिजे. यावरून अर्जुनाच्या मान्यतेनंतर कृष्ण म्हणतात, "तूं पाहिलेलें हें माझें रूप दृष्टीस पडणें फार कठीण आहे." इत्यादि वर्णन विश्वरूपासच लागूं होतें. तेव्हां मानुषरूप धरण्यापूर्वीं कृष्णानें सोडलेलें रूप विश्वरूपच होय, त्यानें विश्वरूप टाकिलें व तत्क्षणीं मनुष्यासारखें द्विभुजरूप धारण केलें. ही वरील घटनांची संगति पाहतां, विश्वरूप व तदनंतरचें द्विभुजरूप हींच दोन रूपें आपण या व्यवहारांत पाहतो. यांत चतुर्भुजरूपाचा कोठें मागमूसहि नाहीं. हेंच म्हणणें सरळ सांगणें तर असें सांगतां येईल.

विश्वरूप पाहून घाबरलेल्या अर्जुनानें कृष्णास उग्र विश्वरूप टाकून नेहमींचें शांत रूप धरण्यास सांगितलें. 'हें रूप पहा' असें म्हणून कृष्णानें आपलें रूप दाखविलें. या दाखविलेल्या रूपाचें स्वागत 'हें तुझें मनुष्य सदृशरूप पाहून' इत्यादि शब्दांनीं अर्जुनानें केलें. यावर कृष्ण म्हणाले, "मनुष्यरूपापूर्वीं त्वां पाहिलेलें माझें विश्वरूप हें मोठ्या भाग्यानें व पुण्याईनेंच दृष्टीस पडावयाचें." या सर्व व्यवहारांत विश्वरूपाच्या विसर्जनानंतर कृष्णानें पाठोपाठ द्विभुजरूपच धारण केलें, हें उघड होतें.

११ मतांतर विचार (१) कोणी म्हणतात कुरूक्षेत्रावरील व इतर ठिकाणच्या पांडवांशीं घडलेल्या, कृष्णाच्या व्यवहारांत तो चतुर्भुजच होता. तेव्हां चतुर्भुजेन रूपेण यानें चतुर्भुजरूपाचेंच ग्रहण होतें. या मतासंबंधीं एवढेंच म्हणणें पुरें आहे कीं (क) कृष्ण चतुर्भुजरूपानें पांडवांशीं वागत होता, याला भारतादि ग्रंथांत मुळींच आधार नाहीं, शिवाय (ख) व्यवहारांत कृष्ण चतुर्भुज असतां तर त्याचें ईश्वरत्व कौरवांसहि सर्वथा पटून त्याचें आश्रित असलेल्या पांडवांविरुद्ध ते युद्धास उभेच राहिले नसते. तेव्हां हें मत सर्वस्वीं निराधार व तर्कदुष्ट म्हणून त्याज्य. (२) कोणी म्हणतात- अर्जुनानें कृष्णास विश्वरूप टाकून जें रूप धारण करावयास सांगितलें तें **ध्यानरूप** होय. देवाचें ध्यान करतांना अर्जुन, भक्त या नात्यानें, विष्णूची चतुर्भुज मूर्ति मनश्चक्षूपुढें ठेवीत असे. हीच **चतुर्भुज मूर्ति** धारण करण्यास यावेळीं अर्जुनानें कृष्णास प्रार्थिलें. **या मतास उत्तर--** विश्वरूप पाहून अर्जुन घाबरला. यांतून मुक्त होण्यासाठीं त्यानें **सौम्य रूपाची** मागणी केली. हें रूप समरभूमीवर पहावयाचें आहे. अर्थात् या रूपाशीं ध्यानमूर्तीचा संबंध असण्याचें कांहींच कारण नाहीं. तेव्हां विश्वरूपोत्तर **द्विभुज** असेंच रूप कृष्णानें धारण केलें, हें उघड होतें.

(३) तिसरें आणखी मत असें आहे, कीं अर्जुनाच्या विनंतीनुसार कृष्णानें विश्वरूप टाकून कांहीं काळ चतुर्भुजरूप धारण केलें, व नंतर द्विभुजरूप धरिलें. हें

म्हणणेंहि सुसंगत नाहीं. अर्जुनाच्या शांतरूपाच्या मागणीनुसार कृष्णास रूप धारण करणें प्राप्त होतें. तें त्यानें धारण केल्यावर, त्याच रूपाचें अर्जुन स्वागत करणार. अर्जुनाच्या स्वागतांत 'मानुषं रूपं' असे शब्द स्पष्ट आहेत. अर्थात् विश्वरूपानंतर अर्जुनाच्या प्रार्थनेनुसार **मानुषरूप** म्हणजे द्विभुज असेंच रूप कृष्णानें धरिलें असलें पाहिजे. यांत मध्यंतरीं चतुर्भुजरूप धारण केलें जाण्याचें कांहींच प्रयोजन उपलब्ध होत नाहीं. करितां अर्जुनाची विनंती द्विभुजरूपाबद्दल होती, तिची पूर्तता द्विभुजरूप घेऊन कृष्णानें केली व याच द्विभुज रूपाचेंच स्वागत अर्जुनानें केलें हें उघड होतें.

१२ निगमन–– याप्रमाणें (१) 'तेनैवरूपेण चतुर्भुजेन' हा चरण धारण करणारें पद्य व्यासकृत एक कूट–पद्य आहे, अशीं कूट–पद्यें महाभारतांत व म्हणून तदंगभूत गीतेंतहि आहेत. (२) सहस्रभुजरूप टाकून द्विभुजाचे पूर्वीं कृष्णानें चतुर्भुजरूप धारण केलें नाहीं. (३) 'चतुर्भुज' या शब्दाचा यौगिक अर्थ येथें येण्याचें कारण नाहीं. हा शब्द येथें केवळ रूढ अर्थानेंच घ्यावयाचा आहे. (४) तथैव, तेनैव, तदेव, स्वकं रूपं, मानुषं रूपं इत्यादि पदांनीं कृष्णाच्या सर्व सहवासी लोकांस नित्यपरिचित असें द्विभुज-रूपच विवक्षित आहे. (५) ४५ च्या पद्यांतील **देव** व नंतर आलेले **देवेश** हीं दोन संबोधनें अर्जुनाच्या वाढत्या करुण अवस्थेस पोषकच असल्यानें यथास्थान योग्य ठरतात.

तेव्हां वरवर विरोधी भासणाऱ्या 'चतुर्भुजेन' या रूपाचा अर्थ द्विभुजरूपास विरोधी होणार नाहीं अशा रीतीनेंच केला पाहिजे. तेव्हां येथें चतुर्भुजेन = चतुर्भुज इन (कृष्णमहाराज) असेंच घटक घेणें प्राप्त आहे.

(७) चतुर्भुजेन–चा पदच्छेद–चतुर्भुज इन असा होतो. 'इनः सूर्ये प्रभौ' (राजा) या अमर कोशानुसार **इन** हा **प्रभु**–वाचक शब्द आहे, तृतीया एकवचनी प्रत्यय नाहीं. 'चतुर्भुजेन, तैनेव रूपेण भव' = कृष्णमहाराज, आपलें नेहमींचेंच (द्विभुज) रूप धारण करा' असाच अर्थ येथें घेणें सर्वथा उपपन्न होतें. यावरून **इत्यर्थ** हाच कीं (क) विश्वरूप टाकल्यावर कृष्णानें पाठोपाठ नेहमींचें द्विभुज रूपच धरिलें. (ख) चतु-र्भुजेन हें संबोधन असून, त्याचा अर्थ कृष्णमहाराज असा आहे. (ग) कृष्णाजवळ अर्जुनानें चतुर्भुजरूपाची मागणी केली नाहीं व त्यानेंहि विश्वरूपानंतर चतुर्भुजरूप घेतलें नाहीं. तो नेहमींप्रमाणें द्विभुज झाला अशा प्रकारें. **चतुर्भुजेन रूपेण** या कोड्याचा उलगडा मी केला आहे. हा विद्वानांस रुचेल अशी अपेक्षा करितों.

---

१४ उपाध्ये यांनीं घड्याळ वाजवावें

(श्री. भी. ल. परतूडकर, परभणी)

*हैद्राबाद राज्यांतील परभणी जिल्ह्यांतील तालुक्याचें ठिकाण परतुड येथील श्री. वामन अनंत पाठक यांच्या संग्रहीं प्रस्तुतचें निवाडापत्र मिळालें. कागद जाड असून पत्र काळ्याभोर शाईनें वळणदार मोडी अक्षरांत लिहिलेलें आहे. पत्राचा काल ११७५ फसली हा आहे.

प्रस्तुत पत्रांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाहद्दर दुलुल्ला या नव्या दिवाणानें काढलेला एक अजब हुकूम ही होय. 'गांवांत चार उपाधे असतां घड्याळचीची दरकार काय—प्रत्येकानें एकेक प्रहर घटका वाजवाव्या' हा तो हुकूम.

प्रारंभीं एक वर्तुळाकृति फारसी व दुसरी पिंपळपानाच्या आकाराची मराठी अशा दोन मुद्रा आहेत.

प्रस्तुतचें निवाडापत्र 'सुरते मजालिस'च्या प्रकाराचें असून यावेळचें 'शरीयत पन्हा' काजी महमद हसन' हे असून 'हुकमत—पन्हा' जागीरदार श्रीमंत राजश्री राव अभीमनजी खंडागळे हे होते. जोशीपणाच्या भांडणाची शहानिशा करण्यासाठीं अदालत भरली. त्यांत पाठक व रुग्वेदी उपाधे (म्हणजे सध्यांचे 'वरसाले') यांनीं गाऱ्हाणें मांडलें कीं बाबू जोशी आमचें जोशीपण खातो. बाबू जोशीनें त्यांना सनदा दाखविण्यास सांगितलें. त्यांत त्याच्या वडिलाचें नांव होतें. तसेंच मागें झालेलें घटका-प्रकरणहि होतें, तें असें:—

चौघा उपाध्यायांनीं चार प्रहर घटका वाजवाव्यात ह्या दुलुल्ला दिवाणच्या हुकमा-वरून त्या चौघांना, पाठक, जोशी, रुगवेदी उपाध्ये (= वरसाले) व सेंडगे यांना, चावडीवर बोलावून आणिलें. जोशी व सेंडगे यांनीं घटिका वाजविण्याचें कबूल केलें. पाठक व वरसाले यांनीं नाकबूल केलें, यावरून त्या दोघांना कैदेंत टाकलें. सात दिवस झाल्यावर लोकांनीं मध्यस्थी केली व २२ होन दंडावर दोघांची सुटका झाली. परंतु पाठक व रुग्वेदी उपाध्ये (वरसाले) यांच्याजवळ नगदी होन नव्हते. म्हणून पाठक यांनीं आपल्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा व रुग्वेदी उपाध्ये (वरसाले) यांनीं आपल्या उत्पन्नाचा निम्मा हिस्सा जोशी यांजकडे गहाण टाकला. जोशी यानें आपणांस दोघांचें उपाध्येपण दिल्यास आपण तीनहि प्रहर वाजवितों असें कबूल केल्याबद्दलचाहि एक पुराव्याचा दुसरा कागद परतुड येथील श्री. देशपांडे यांच्या संग्रहांत सांपडला असून त्याची नकलहि सोबत जोडली आहे.

* पा. स. १७७. सभेपुढें मूळ कागद मांडण्यांत आला नव्हता. निबंध लेखकां-कडून नकल आली तशीच येथें दिली आहे. —सं.

बरेच दिवस वरील गहाणांतील उपाध्येगिरीचें उत्पन्न खाल्ल्यावर पुढें भरलेल्या अदालतीचें वरील प्रमुख निवडापत्र आहे. बावीस होनांची भरपाई झाली असून आतां यापुढें सर्वांनीं आपापलें जोशीपण करावें असा यांत निवाडा आहे.

(श. १६८७ मार्ग. शु. ७ = इ. १७६५ नोवें. १९)

شريف - شرع - خادم قاضی عبدالحسن (आकार वर्तुली).

سبت عندي هذا

॰ श्री ‿। परम पावन। प राजत्र। धा गजपतराज। जीव हिण।

(आकार पिंपळपानाचा ओळी ५)

खुरते मजालिस बहुजूरे अरबाब अदालत बतारीक छ ५ रो माहे जमादिलाखर

शरीयत पन्हा काजी महमद हसन

हुकूमत पन्हा जागीरदार श्रीमंत राजश्री राव अभीमनजी खंडागले

देशमुख व देशपांडिये

माहजन व मोकदम व पटवारी व शेटे माहजन व खुमदार लोक व बलुते

बो आबदूल रसूल देशमुख पा मजकूर बो देसपाडीये पा मजकूर

(कागदाच्या डाव्या बाजूवर आडव्या सह्या)

पा पडतुर सरकार जालहनापूर सुबे खुजस्ते बुनीयाद स्रा सन ११७५ अकरासे पच्याहतर मुतबिक सन (मो.जा.) जलूसवाला कारने सूरत मजालस यैसा जे बो भवानी वलद सोयरावा व सदासीव वलद माहदेव व गोवींद वलद धोंडावा व चींतामन वलद नरसावा वगैरे पाठक येजुरवेदी व यज्ञेश्वर वलद माहदेव व रामभट वलद शामभट व भीकू वलद आपा व शामभट वलद आनंतभट वगैरे उपाधे रुगवेदी यानी येऊन आदालतीमधे फीरयाद केली की आपले जोसेपनाचे वतन कदीमलआयाम कसबे मजकूरी आसता बाबू वलद रामभट आपले वतन जोसेपन खातो त्याजवरून बाबुभट मजकुरास हजूर बोलावून पुरसीस केली की याचे वतन जोसेपन आसता तुजला वतन खायास दरकार काय त्यास बाबु मजकूर यानी जाहीर केले की पाठक यजुरवेदी व उपाधे रुगवेदी वतनाचा दावा आपनासी कोने सनदेवर करीतात हर दो जनाची मुनसफी मजालसीमधे करावी आपन राजी आसो त्याजवरून पाठक येजुरवेदी व उपाधे रुगवेदी याजला पुरसीस केली त्यानी जोबसाल केला जे आपनापासी बाबु मजकूर याचे वडीलाचे नावे लिहिले आहे मग आदालतीमधें हुकुम केला की तुम्हां जवल लिहिले कैसे आहे ते आनून दाखवने त्याजवरून मुनसफी केली जाईल मग पाठक यजुरवेदी व उपाधे रुगवेदी याजपासी बाबूभट याचा वडील येबा जोसी बीरादर कोंडजोसी याचे नावाचे लिहीले बमोहर राजेश्री ठुलाजी राजे जाधवराव व्होते ते आनून आदालतीमधे गुजरानले त्याजवरून सभा करोन हली मवाली बैसोन सदरहू लीहीली याची मुनसफी केली त्यास कसबे मजकूरचे जोशपन सुदामत कदीमलंयाम कालीवर पाढरीं वसली त्या

दीवसापासोन कसबे मजकूरचे जोसेपन चव तरफा च्यार घटका असे व मेडी सात चालत आल्या दरमीयान नवा दीवान बाहद्दर दलुला आला त्यानें नवी कानु केला की ज्या गावात चवघे जन जोसी घटका घालीत आहेत सरकारात घडाळची याची दरकार कासीयास पाहीजे चवघे जोसी च्यार प्रहर वाजवतील म्हनऊन हुकूम केला मग पाठक येजुरवेदी व उपाधे रुगवेदी व येबा जोसी बीरादर कोडजोसी व सेडगे या चवघास नेऊन बैसवीले की चवघेजन जोसी च्यार प्रहर वाजवन थैसीयास येबा जोसी व सेडगे या दोघांनी दोन प्रहर कबूल केले येजुरवेदी पाठक व रुगवेदी उपाधे हे दोघे जन कबूल करीनात म्हनऊन दोघास कैद केले पाच सात दीवस कैदेमधे व्होते नीदामे लोक मधेस्त व्होऊन बावीस व्होन हकमाची गुन्हेगारी ठरवीली या देयास मवसर नाही मग आपले वतन जोशेपन पैकी येबा जोसी याजपासी गाहन ठेविले दोघाही व्होन घेऊन सरकारात दीधले बीतपसील कसबा बमये पेठा पुरे

पाठक येजुरवेदी व्होन बारा

१२

सदरहू यास यैवज गाहन जोशेपन पैकी ठेवीले याचा तपशील

१ येजुरवेदी व कानव याचे घरचे हक

१ लग्नपत्रीका

१ लग्नघटका

१ वागनीश्रे व खंड दरोबस्तपैकी हीसा तीसरा गाहन ठेवीला बाकी दोन हीसे पाठक यानी घ्यावे

३

१ सोनार व वैश याचे घरचे उत्पन पाढरीचे गाहन ठेवीले

३ मेडी ३ तीन याचा तपसील

१ माली व उचाले व काले काली-पाढरीचे हक घेने

१ आसनदास याचे मेडीचे कुनभी काली पाढरीचे हक घेने

१ लोढे मेडी येक याचे कुनभीयाचे हक घेने

३

१ तेलीयाचे खुम याचे घरचे हक

उपाधे रुगवेदी व्होन दाह

१०

सदरहू यास यैवज गाहन जोशेपन पैकी ठेवीले याचा तपशील

१ रुगवेदी व आपस्तंभ यांचे घरचे हक

१ लग्नपत्रीका

१ लग्नघटका

१ वागनीश्रे व खंड दरोबस्तपैकी नीमे गाहन ठेवीले बाकी नीमे उपाधे यानी घ्यावे

३

१ सेळके मेडी येक याचे कुनभीयाचे घरचे हक काली व पाढरी गाहन ठेवीले आसे

सदरहू वतन जोशेपनपैकी येबा जोसी याजपासी गाहन ठेवीले त्या दीवसापासोन जोसी मजकूर वतनाची कमावीस गाहना बा तकसीमा दोन व जोसी मजकूर तकसीम येक येकून तकसीमा तीन कमावीस करु लागला सेडगे बोरवल याची खुम चालऊ लागले सदरहू लिहिलेपासून आदालतीमधे मुनसफी केली तो येजुरवेदी पाठक व रुगवेदी उपाधे याचे वतन जोशपन करारवाकइ आसे बाबूजी व कोनेरी व भीकु व केशव वलद राम जोसी याजला सागीतले की तुम्ही याचे वतनाचा भोगवटा बहूत दीवस खाला आता याचे वतन जोशपन याचे हवाले करने मग जोशी मजकूर यानीही कबूल केले की आमचे व्होन आम्हास आदा जाले गाहना बा जोशपनाचा भोगवटा बहुत दीवस आपन घेतला आजी सबब आमचे व्होन आपन भरून पावलो त्याचे वतन त्याजला दीधले आसे जोशेपन वतन परंपरा आहे वतनाचा बीतपसील च्यार तरफा घटका च्यार याचा तपसील कसबा बमये पेठा पुरे

बाो भवानी वलद सोयेरावा व सदासीव वलद माहदेव गोविद वलद धोंडीबा व चीतामन वलद नरसावा वगैरे पाठक येजुरवेदी याचे जोसेपन

१ येजुरवेदी व कानव याचे घरचे हक आवघे

१ सोनार व वैशे याचे उत्पन पाढरीचे आवघे

मेडी ३ तीन

१ माली व उबाळे व काले काली-पाढरीचे हक आवघे बमये बलुते

१ आसनदास याचे मेडीचे कुनभी काली व पाढरीचे हक आवघे बमये व बलुते

१ लोढे मेडी येक याचे कुनभीयाचे हक आवघे काली व पाढरी बमये बलुते

३

१ तेलीयाचे खुम याचे हक आवघे

१

येश्वर वलद माहदेव व रामभट वलद शामभट व भीकभट वलद आपा भट व शामभट वलद आनंतभट वगैरे उपाधे रुगवेदी याचे जोशेपन

१ रुगवेदी व आपस्तंभ याचे घरचे हक अवघे

१ सेळके मेडी येक याचे कुनभी हक काली व पाढरीचे आवघें बमये बलुत

२

बाबू व कोनेरी व भीकु व केशो वलद रामजोशी याचे जोशेपन

१ पोवार मेडी काली व पाढरीचे कुनभी हक आवघे बमये बलुते

१ धनगर मेडी येक काली व पाढरीचे कुनभी हक आवधे बमये बलुते

१ जीगे कालीच पाढरीचे कुनभी हक आवघे बमये बलुते

१ साली	१ रंगारी	१ जीनगर	१ हटगर कोस्टी
१ भोई	१ सुतार	१ लोहर	१ कुभार
१ बरढी	१ वारीक	१ चाभार	१ डोहर

बौ बहीरव वलद हरभट व रघुनाथ वलद बालम भट वगैरे सेडगे याचे जोसेपन

खुम बोरवळ हक आवघे

१

सदरहू प्रमानें जोशेपन आपले आपले हिस्से प्रमान कमावीस करून लेकराचे लेंकरी आवलाद ष आफलाद जोशपनाचे वतन खात जाने कोन्हाचे तालुकीयामधे कोन्हाचा तालुका राहिला नाही आपलाले जोशेपनाचे तालुकीयाचा कमावीस करून खात जाने गाहना बाा व्होन याचा तागादा काही राहीला नाहीं सानीन हल जोसी मजकूर याचा वारीसदार कोन्ही तगादा करील तर बातल आसे जो कोन्ही हिला-हरकत करील तो हकमाचा गुन्हेगार व गोताचा खोटा ब सूरत मजालस लिहिला सही बकलम कमळाजी जनार्धन गुमास्ते देशपाडीये पा मजकूर

सहि बापु वलद राम जोसि कसबे मचुर (बाळबोध)

गौही

बगाजी माहाजन कजबे मजकूर
अत्माजी माहाजन
भोवन देवराखे (बाळबोध)

मायाजि दिक्षित (बाळबोध)
प्रयाग दाजी (बाळबोध)
सीवबा कोनार्डे (बाळबोध)
रामचंद्र आकोत (बाळबोध)

१५ फिट् सूत्रें

(ले.– **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणें**)

*** बहिरङ्गः**– फिट् म्हणजे प्रातिपदिक. प्रातिपदिकांचे स्वाभाविक असणारे उदात्त, अनुदात्त व स्वरित हे स्वर सांगण्याकरितां हीं सूत्रें लिहिलेलीं आहेत. या सूत्रांची एकूण संख्या सत्यांयशी असून तीं चार पादांत बिभागलेलीं आहेत. अन्तोदात्त, आद्युदात्त द्वितीयोदात्त आणि पर्यायोदात्त असे चार पादांचे क्रमानें विषय आहेत.

कालः– या सूत्रांचे आधार म्हणून उतारे पतञ्जलीनें आपल्या महाभाष्यांत घेतलेले आढळतात[1]. यावरून याचा काल ख्रि. पू. दुसऱ्या शतकाहून प्राचीन ठरतो. त्यानंतर काशिका, कैय्यट प्रक्रियाकौमुदीकार रामचंद्र, भट्टोजी दीक्षित, [2]नागेशभट्ट वगैरे मान्य ग्रंथकारांनीं या सूत्रांचा नामनिर्देश करून उल्लेख केला आहे. उतारे घेतले आहेत व स्पष्टीकरणहि केलेलें आहे. यावरून यांचा काल, महत्त्व व मान्यता लक्षांत येते.

कर्ताः– या सूत्राच्या कर्त्याचें नांव शन्तनु असें आहे. हरदत्त व नागेशभट्ट यांनीं याचें नांव शन्तनु असल्याचेंच मान्य केलें आहे. शान्तनवाचार्यप्रणीत असें शेवटीं येतें. त्याचाहि अर्थ शन्तनु आचार्यप्रणीत असा नागोजीभट्टानें शेखरांत केला आहे. शान्तनवाचार्य प्रणीत या शब्दावरून कात्यायनाप्रमाणें जरूर नसतांना तद्धित प्रयोग करणारा हा दाक्षिणात्य असावा असा भैरवमिश्रानें आपल्या चन्द्रकला नांवाच्या टीकेंत अभिप्राय व्यक्त केला आहे.

पाणिनिकृत नाहींतः– हीं सूत्रें पाणिनिकृत असावीत असें म्हणणाऱ्या लोकांचा निर्देश नागोजीभट्टानें आपल्या लघुशब्देन्दुशेखरांत केला आहे. पण तें मत त्याला स्वतःला मान्य नाहीं. वृषादीनां च (पा. सू. ६-१-२०३) व उञ्छादीनां च (पा. सू. ६-१-१६०) या दोन आकृतिगणानें अनुक्रमें आद्युदात्तत्व व अन्तोदात्तत्व सिद्ध असतां ग्रामादीनां च (फि. सू. ३८) व घृतादीनां च (फि. सू. २१) हीं सूत्रें स्वतंत्र त्याच कार्यांकरितां करण्याची जरूरी नव्हती. तसेंच कर्मधारयवदुत्तरेषु (पा. सू. ८-१-११) या सूत्रानें परस्य अन्तोदात्त सिद्ध असतां प्रकारादिद्विरुक्तौ (फि. सू.

---

१ प्रातिपदिकस्य चान्त इति प्रकृतेरन्तोदात्तत्वं शास्ति + + यत्रानुदात्ता प्रकृतिः । समत्वम् । सिमत्वम् (महाभाष्य ३·१·३· पान ९; ओळ १७; फिट्सूत्र ७८; शिवाय पाहा महाभाष्य ६·१·९१; १२३ व यावरील कैयटप्रदीप).

२ परत्वात्प्रकृतिस्वर एव स्यादित्यर्थः । फिट्स्वरोऽपि षाष्ठ एवेति तैत्तिरीयेऽपि दोषः । यद्वा फिट्सूत्राणि पाणिन्यपेक्षया आधुनिककर्तृकाणि इति परत्वं बोध्यम्–इति नागेशभट्टकृत उद्योतः

८६) यानें पटपटु या ठिकाणीं परस्य अन्तोदात्त सांगितलेला आढळतो. त्यावरून हा पाणिनीहून भिन्न होता असें दिसतें.

पाणिनिपूर्वः– पाणिनि हा अव्युत्पत्ति–पक्षवादी असल्यानें त्याला 'सव धातुजं ' हा पक्ष मान्य नाहीं. अशा स्थितींत प्रत्येक शब्दप्रकृतीचे स्वर नमूद करणें पाणिनीला आवश्यक होते. पाणिनीनें प्रकृतिस्वर गृहीत धरलेले असून [1]कात्यायनानें त्यांचा उल्लेख केलेला आहे. तें काम पूर्वींच शन्तनूनें फिटसूत्राच्या रूपानें केलेलें असल्यानें पाणिनीनें तें काम केलें नसावें. असें असेल तर हीं सूत्रें पाणिनीपूर्वकालीन मानावयास पाहिजेत. सिद्धान्तकौमुदींतील वैदिक प्रकरणावर सुबोधिनी टीका लिहिणारानें हें मत नमूद केलें आहे (८६).

परिभाषा नवीः– यांनीं पारिभाषिक शब्द बरेच वापरलेले आहेत. त्यांत वृद्ध (४६), अच् (५१), लघु (४४), गुरु (४२) सारखे कांहीं शब्द पाणिनीचे वापरलेले असले तरी पुष्कळच शब्द अगदीं निराळे आणि नवे आढळतात. ते माहिती-करितां वर्णक्रमानें पुढें देत आहे.

अनुच्च = अनुदात्त (७८)
अष् = अच् (द्यष् ४९, बह्वष् ४२)
नप् = नपुंसक (६१)
फिष् = प्रातिपादिक (१)
यमन्वन् = वृद्ध (४१)
शिट् = सर्वनाम (२८)
स्फिग् = लुप् (३९)
हय् = हल् (४८)

या परिभाषेचा पाणिनीच्या ग्रंथांत निर्देश आढळत नाहीं. अष् (अच्) व हय् (हल्) या प्रत्याहारावरून याचीं अक्षरसमाम्नाय सांगणारीं सूत्रेंहि वेगळीं असावींत हें स्पष्ट होतें. या पारिभाषिक शब्दावरून हा पाणिनीहून वेगळ्या परंपरेंतील होता याबद्दल शंका राहत नाहीं. पाणिनीच्या सूत्रांनीं गतार्थ असणाऱ्या गोष्टीहि हा सांगतो त्यावरून याची परंपरा स्वतंत्र दिसते (पहा. फि. सू. ७, ८६). हा पाणिनीच्या पूर्वींचा असावा आणि याचा पाणिनीनें अनुवाद केलेला असावा. ही गोष्ट जयकृष्ण मौनींनें केलेल्या वैदिक प्रकरणावरील सुबोधिनी व्याख्येंत नमूद आहे (८६).

स्वर सर्वत्रः–उदात्तादि स्वर वेदांत असतात, भाषेंत नसतात अशी आपली समजूत आहे. पण ही गोष्ट फिट् सूत्रकाराला मान्य नाहीं.तो वेदाप्रमाणें भाषेंतहि प्रत्येक शब्दाला

---

१ प्रकृतिस्वरे प्रत्ययस्वराभावः (कात्यायनवार्तिक–महाभाष्य ६-१. १५८.७. पान ९९ ओळ १७)

ऐ. सं. सा. खं. ६–१०

स्वर आहे असें मानतों. वेद आणि भाषा यांतील शब्दांचे स्वर सांगण्याचा त्याचा हेतु दिसतो. जेथें वेद व भाषा यांत सरळ भेदच आढळतो तेथेंच फक्त छन्दसि शब्द घालून वेदांतील फरक व्यक्त केला आहे. जर हें सर्वच प्रकरण वेदविषयक असतें तर छन्दसि असें अधिकारसूत्र करूनच सूत्रें रचिलीं असतीं. एकंदर सूत्रांत फक्त पांच ठिकाणीं छन्दसि पद घालून त्यांनीं भाषेहून फरक दाखविला आहे.[1] आणि फक्त एका ठिकाणीं अथर्ववेदांतील भेद व्यक्त केला आहे.[2] यावरून हीं सूत्रें लोकवेद साधारण असून सध्यां वेदोपयुक्त म्हणून भट्टोजीवगैरेंनीं वैदिक प्रकरणांत त्यांचा समावेश केला आहे.

स्वरभेदानें अर्थभेदः– अर्थभेदानें स्वरभेद असणारे कांहीं शब्द यांत मुद्दाम दिलेले आढळतात. उदाहरणार्थ अक्ष शब्द पाहा. त्याचे फासा आणि इतर कांहीं अर्थ आहेत. ३५ व्या सूत्रांत फासे अर्थ नसलेला अक्ष आदि उदात्त होतो असें सांगितलें आहे. आणि त्याचें तस्य नाक्षः असें उदाहरण दिलें आहे. फासे अशा अर्थांचा अक्ष शब्द अक्षैर्मा दीव्यः (ऋ. १०. ३४) या सुप्रसिद्ध द्यूतसूक्तांत आला आहे. तेथें तो आद्युदात्त नाहीं.

अङ्गुष्ठ शब्द भार्षेत मध्योदात्त पण वेदांत अन्तोदात्त होतो असें मुद्दाम सांगितलें आहे (१४)

अर्जुन शब्दाचा गवत असा अर्थ असतां स्वर वेगळा आणि वृक्ष वगैरे अर्थ असता स्वर वेगळा असें स्पष्ट नमूद आहे. गवत असा अर्थ असतां अर्जुन शब्द अन्तोदात्त असतो (१६) आणि वृक्ष वगैरे अर्थ असतां आद्युदात्त होतो.

कृष्ण शब्दाच्या स्वराबद्दल तर यापेक्षां अधिक चिकित्सा केलेली दिसते (११, १२). कृष्ण हा शब्द मृगवाचक नसेल तेव्हां तो अन्तोदात्त होतो. कृष्णानां व्रीहीणाम्; कृष्णो नोनाव वृषभः हीं त्याचीं उदाहरणें होत. कृष्णो रात्र्यै येथें तो मृगवाचक असल्यानें आद्युदात्त होतो. पण कृष्ण शब्द विशेषनाम असेल तर त्याला विकल्पानें अन्तोदात्त स्वर होतो. म्हणजे एकदां आद्युदात्तहि होतो. याचीं उदाहरणें अयं वां कृष्णो अश्विना व कृष्ण ऋषि अशीं देतात.

ज्येष्ठ शब्दाचे दोन अर्थ प्रसिद्ध आहेत. वयानें अधिक असणाऱ्या माणसाला ज्येष्ठ म्हणतात आणि पूज्य अशा अर्थानेंहि ज्येष्ठ शब्दाचा उपयोग करतात. वयोवाचक ज्येष्ठ वृद्ध शब्दापासून आणि केवळ पूज्यता दर्शविणारा ज्येष्ठ शब्द प्रशस्य शब्दापासून तयार होतो. त्यांच्या स्वरांत फरक आहे (२२). ही गोष्ट नमूद केलेली आढळते हें आश्चर्य आहे. वास्तविक मराठींत सुद्धां ज्येष्ठ बंधु आणि गांवांतील ज्येष्ठ अशा स्थळीं

टीप– १ १०, १४, ५८, ७३, ७७.
२ सिमस्याथर्वणेऽन्त उदात्तः ७९

आपण स्वर बदलतोच. पण बोलण्यांतील ही लकब आपण नमूद न करितां शिष्टांच्या अनुकरणानें परंपरेंत रक्षण करतो.

तशीच पृष्ठ शब्दाची स्थिति आहे. वेदांत हा शब्द अन्तोदात्त असतो आणि भाषेंत आद्युदात्त असतो हें नमूद केलेलें आढळतें (१५).

याशिवाय आणखी पुष्कळ शब्दांची चर्चा करतां येण्यासारखी आहे. वेदांतील उदाहरणें पाहून त्यांचे स्वर तपासतां येण्यासारखे आहेत व त्यावरून अनुमानें काढण्या-सारखीं आहेत. पण तें रुक्ष आणि क्लिष्ट काम उद्बोधक असल्यानें पुढें एखाद्या प्रसंगीं करूं.

व्याकरणाचीं अङ्गं:- व्याकरण म्हटलें कीं त्यांत प्रक्रियेकरितां अष्टाध्यायी, धातुकरितां धातुपाठ, गणाकरितां गणपाठ, धातुपासून शब्द करण्याकरितां उणादि, उच्चाराकरितां शिक्षा, लिङ्गज्ञानाकरितां लिङ्गानुशासन; तसें शब्दांना उदात्तादि स्वर असतात तें सांगण्याकरितां हीं फिट्सूत्रें आहेत. वैदिक किंवा लौकिक, कोणतीहि भाषा असो तिला स्वर असतात असा सिद्धान्त आहे आणि त्याला अनुसरून हें पाणिनीचें व्याकरणशास्त्र आहे.

---

१६ श्रीशिवराज-राज्याभिषेक-कल्पतरु

(श्री. य. ग. फफे मनोहर, पुणें)

*श्रीशिवराज-राज्याभिषेक-कल्पतरु या नांवाचा एक लहानसा संस्कृत पद्यात्मक ग्रंथ भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १० अंक १ मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. मागें शिव-भारत, परमानंदकाव्यम् इत्यादि ग्रंथांवर मंडळांत चर्चा करण्यांत आली होती, त्या स्वरूपाची चर्चा या कल्पतरूसंबंधानें माझ्या मतें होऊं शकणार नाहीं. कारण ते ग्रंथ भाषाप्रौढीच्या दृष्टीनें व काव्यदृष्टीनेंहि उच्च प्रतीचे आहेत, तसा हा ग्रंथ नाहीं. केवळ वृत्तान्तकथनात्मक असा हा ग्रंथ आहे. शिवाय शिवभारतादि ग्रंथांच्या चर्चेच्या वेळीं छापील प्रतीशिवाय हस्तलिखित पोथी किंवा पोथींच्या पानांचे फोटो उपलब्ध असल्यानें पाठभेदादि चर्चेंत त्यांचें बहुमोल साहाय्य झालें होतें. तसें प्रस्तुत ग्रंथास उपलब्ध नाहीं. त्रैमासिकांत छापलेली एक प्रत तेवढीच आपणापाशीं आहे. म्हणून पाठभेदादिचर्चेंत न शिरतां केवळ ग्रंथांतील विषयापुरतीच मर्यादित चर्चा करावी लागणार आहे, हें प्रथमच स्पष्ट करणें अवश्य वाटतें.

प्रस्तुत कल्पतरूची एकमेव हस्तलिखित पोथी उपलब्ध आहे. ती कलकत्ता येथील

---

* मंडळ वाढदिवस ४५, श. १८७७, दि. २१-६-५५

बंगाल एशियाटिक-सोसैटीच्या ग्रंथालयांत आहे. तिची प्रत कै. का. ना. दीक्षित यांनीं मिळवून कै. द. वि. आपटे यांच्या सहकार्यानें भा. इ. सं. मं. त्रैमासिकांत प्रसिद्ध केली आहे. या पोथीची माहिती संपादकांनीं पुढीलप्रमाणें दिली आहे:—"या पोथीचीं तेरा पानें आहेत. त्यांतील पहिलीं सात एका हस्ताक्षरांत व पुढील सहा दुसऱ्या हस्ताक्षरांत आहेत. अनेक पानांच्या समासांवर अधिक श्लोक लिहिलेले आहेत, ते तिसऱ्याच हस्ताक्षरांत आहेत. तथापि हीं तिन्ही हस्ताक्षरें शिवकालीनच आहेत. या कल्पतरूच्या आठ शाखा आहेत. त्यांमिळून एकंदर श्लोक २३६॥ आहेत. पोथींत गोविंद उवाच, निश्चलउवाच इ० वाक्यें, कांहीं महत्त्वाचे शब्द आणि शाखासमाप्तिदर्शक संकल्प तांबड्या शाईनें लिहिलेले आहेत. ग्रंथाच्या नांवावरून हा ग्रंथ गागाभट्टकृत-शिव-राज-राज्याभिषेक-वर्णनपर असेल असें वाटण्याचा संभव आहे. पण हा समज चुकीचा आहे. गागाभट्टकृत राज्याभिषेकांतील कांहीं दोष दाखवून ललितापंचमीस निश्चलपुरीनें तांत्रिकविधीनें केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाचें वर्णन करणारा हा ग्रंथ आहे" इतकी त्रोटक माहिती संपादकांनीं उपोद्घातांत दिली आहे. आणि ग्रंथांतील इतर माहितीचें विवेचन सवडीनुसार इतरत्र करण्यांत येईल असें आश्वासन दिलेलें आहे. पण त्याप्रमाणें त्यांचें विवेचन प्रसिद्ध झालेलें नाहीं.

आतां या कल्पतरूच्या आठ शाखांत कोणता विषय आला आहे तें संक्षेपानें प्रथम पाहूं.

निश्चलपुरी नामक योगी रायगडास राज्याभिषेकाचे वेळीं उपस्थित होता. तो राज्याभिषेकसमारंभानंतर कोकणांतील तीर्थक्षेत्रें पहात दाभोळ, पंचनद, परशुराम, संगमेश्वर, निवेंकाजवळील (पुळ्याचा) गणपति, धूतपापेश्वर, राजापूरची गंगा, सप्तकोटीश्वर व पंचगंगा यांवरून कुडाळेश्वरास आला. तेथें गोविंद नामक विद्वान् ब्राह्मणाची व त्याची गांठ पडली. या दोघांचा पूर्वीं काशीस परिचय झालेला असल्यानें गोविंदद्विजानें निश्चलपुरीस प्रश्न केला. 'योगिराज, तुम्ही इकडे कोणीकडे?' इतका विषय प्रथम शाखेंत आला आहे.

निश्चलपुरी म्हणाला, शिवराज हा साक्षात् शिवाचा पूर्णावतार आहे. त्याजपाशीं मी असतों. तो छत्रपति आहे म्हणजे त्यास राज्याभिषेक झाला आहे. यावर राज्याभिषेक-समारंभ कसकसा झाला तें गोविंदानें विचारल्यावरून निश्चलपुरीनें सांगितलें. तो म्हणाला गागाभट्ट नाशकास आला होता त्यास बोलावून शिवरायानें राज्याभिषेक करण्याचें योजिलें. पण गागाभट्टाच्या आगमनापासूनच अनिष्ट गोष्टी व उत्पात घडण्यास प्रारंभ झाला. राजपत्नी काशी निवर्तली. लहानशा चकमकींत सेनापति प्रतापराव मारला गेला. शिवरायास गायत्र्युपदेश झाला त्याच्या आदल्या दिवशीं उल्कावृष्टि होऊं लागली. पण निश्चलपुरी म्हणतो, मी हनुमन्मंत्राच्या योगें तिचें निवारण केलें. गायत्र्युपदेश कुमुहूर्तावर झाला. येथें द्वितीय शाखा समाप्त झाली.

शिवाजीचीं पूर्वींच्याच स्त्रियांशीं पुन्हां लग्नें लावण्यांत आलीं. शिवाजीनें सुवर्णतुला करून मोठा दानधर्म केला. गागाभट्टानें आपल्याच वशिल्याच्या ब्राह्मणांची वर्णी लाविली. निश्चलपुरीनें पाठविलेल्या ब्राह्मणांचा अव्हेर केला व निश्चलपुरी नमस्काराई नाहीं असें शिवाजीस सांगितलें. सुवर्णतुलेनंतर मोठा अपघात होऊन गागाभट्टाच्या नाकास लाकूड लागलें आणि बाळंभट्ट गुरुजींच्या मस्तकावर स्तंभावरील लाकडी कमळ पडलें. मग शिवरायास अभिषेक झाला. इतका विषय तृतीय शाखेंत आला आहे.

कुमुहूर्तावर अभिषेक केल्यामुळें आणि स्थानिक देवांचें पूजन व त्यांस बलिदान न केल्यामुळें कशीं विघ्नें उपस्थित झालीं व कशा अनिष्ट गोष्टी घडल्या तें चौथ्या शाखेंत वर्णिलें आहे.

झालेल्या विधींत कसे दोष घडले आहेत व त्यांमुळें पुढेंहि कशा अनिष्ट गोष्टी घडणार आहेत हें निश्चलपुरीनें शिवाजीस सांगितलें. त्याप्रमाणें तेराव्या दिवशीं राजमाता निवर्तली. व प्रतापगडावरील पागा जळली. मग शिवाजीच्या विनंतीवरून निश्चलपुरीनें तांत्रिकविधीनें पुन्हां राज्याभिषेक करण्याचें मान्य केलें व जपास ब्राह्मण बसविले आणि पंधराव्या दिवशीं शत्रु हस्तगत होईल म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें प्रत्यय आला व तुकोराम हस्तगत झाला. निश्चलपुरीकडून नुसता अभिषेक करून घ्यावा पण मंत्रोपदेश घेऊं नये असें मत मंत्र्यांनीं दिलें, पण तें शिवाजीनें तिरस्कारलें. येथें पांचवी शाखा समाप्त झाली.

ललितापंचमीस अभिषेकमहोत्सव झाला. सिंहासनाचे सिंह, तें सिंहासन, महाद्वार इत्यादिकांस व अनेक देवतांस बलिदानें केलीं. हा विषय सहाव्या शाखेंत आला आहे.

निराळ्या रौप्यआसनावर अभिषेक केल्याचें आणि शिवरायांनीं त्र्यक्षररूप सिद्ध मंत्र घेतल्याचें वर्णन सातव्या शाखेंत आहे. आणि आठव्या शाखेंत राजसभा-वर्णन व भविष्यकथन आहे.

सारांश, पहिल्या शाखेंत निश्चलपुरीचें तीर्थाटन, त्यापुढील ३ शाखांत गागाभट्ट-कृत राज्याभिषेकाचें व त्यांतील दोषांचें वर्णन, त्यापुढील तीन शाखांत या दोषांच्या परिणामाचें व निश्चलपुरीकृत तांत्रिक विधीच्या राज्याभिषेकाचें वर्णन आणि शेवटल्या शाखेंत राजसभावर्णन व भविष्यकथन आहे. म्हणजे दोन्ही राज्याभिषेकांचें थोडक्यांत वर्णन या ग्रंथांत आलें आहे असें दिसून येईल.

कल्पतरूच्या पोथींत समासावर लिहिलेले श्लोक ४३ असून मूळचे श्लोक १९३॥ आहेत. म्हणजे मागाहून कोणीतरी घातलेली भर मूळच्या ½ पेक्षां अधिक आहे. प्रक्षेपांनीं ग्रंथविस्तार कसा होत जातो याचें हें उदाहरणच होय. ही भर म्हणजे मूळांत जे

थोडक्यांत सांगितलें होतें त्याचाच विस्तार आहे. उदा०–मूळांत 'यवनान् धर्मनाशनान्' असे शब्द आहेत. येथें यवन हिंदूधर्मांचा नाश कसकसा करीत होते तें विस्तारानें समासावर लिहिलें आहे. न कृतं बलिदानं न द्वारपालप्रपूजनम् असे गागाभट्टकृत विधींतले दोष मूळांत सांगितले आहेत. येथें समासावर घातलेल्या भरींत कोणकोणत्या देवतांचें पूजन व बलिदान करावयाचें राहिलें त्यांची मोठी यादीच दिली आहे. क्वचित् समासावर घातलेली भर अप्रयोजकहि आहे. निश्चलपुरीनें शिवाजीला त्र्यक्षरमंत्राचा उपदेश केला तेथें त्या मंत्राला मूळांत विद्या असें म्हटलें असून तिला लोकविश्रुता, त्रैलोक्यवशकारिणी इ० विशेषणें योजिलीं आहेत. या विशेषणांवरून जणूं काय हें एकाद्या देवीच्या मूर्तीचेंच वर्णन चाललें आहे असा प्रक्षेपकास भ्रम होऊन त्यानें समासावर लसत्सीमंतसिंदूरां भ्रमन्नयनपंकजां। चंचत्कपोलफलकां चलत्श्रवणकुंडलां इत्यादि सात श्लोक लिहिले आहेत !

याचप्रमाणें पोथींत कांहीं ठिकाणीं व्यर्थ खोडलेलें आहे असें आढळतें. उदा०– पृ. ३६ ओळ ४ वरील तद्वाक्यमकरोत् तिरः हा चरण चुकीनें खोडला आहे. कारण तद्वाक्यम् म्हणजे मंत्र्यांनीं दिलेला, मंत्रोपदेश घेऊं नये हा सल्ला तिरस्कारून शिवाजीनें मंत्रग्रहण केल्याचें वर्णन पुढें आलें आहे. शाखासमाप्तिदर्शक चार संकल्पांतील कवीच्या उल्लेखाच्या ओळी खोडल्या आहेत. त्यांसंबंधीं विवेचन पुढें करण्यांत येणारच आहे.

प्रस्तुत कल्पतरूनें कळणारी नवीन ऐतिहासिक माहिती अशी:—

१ शिवाजीची स्त्री ता १८।३।१६७४ रोजीं वारल्याचें शकावलींत आहे पण तेथें त्या स्त्रीचें नांव दिलेलें नाहीं. तें काशी असें होतें हें या कल्पतरूवरून कळतें.

२ शिवाजीचा विवाह ३०।५।१६७४ रोजीं झाल्याचें शकावलीवरून कळतें, पण हा विवाह नूतन स्त्रीशीं झाला नसून पूर्वींच्याच स्त्रियांशीं विधिपूर्वक विवाह या दिवशीं झाले असें या कल्पतरूवरून कळतें. कल्पतरूंतील ही माहिती जमेस न धरल्यामुळेंच डॉ. बाळकृष्ण यांनीं शिवाजीच्या स्त्रियांची संख्या आठाऐवजीं नऊ सांगितली आहे. (शिवाजी दि ग्रेट भाग २ पृ. ५६३).

३ गागाभट्टानें केलेला राज्याभिषेक वेदोक्त कीं पुराणोक्त याविषयीं वाद असल्याचें बखरींवरून दिसतें. तो वैदिक विधीनें झाला असा स्पष्ट निर्देश कल्पतरूंत आहे.

४ गागाभट्टास पैठणाहून बोलावून आणलें असें चिटणीस बखरींत म्हटलें आहे. तो स्वतःच शिवाजीच्या भेटीस रायगडास आला होता असें सभासद व चित्रगुप्त म्हणतात. तो नाशकास आला होता, तेथून शिवाजीनें त्यास बोलावून आणलें असें प्रस्तुत कल्पतरु म्हणतो. गागाभट्ट १६६४ त राजापूर येथील विद्वत्परिषदेस उपस्थित होता त्यावेळींहि शिवाजीची व त्याची भेट झाली असल्याचा संभव आहे. निदान परस्परांस परस्परांची माहिती खास होती. तेव्हां गागाभट्ट हा शिवाजीचे भेटीस येत

असावा व तो नाशिकापर्यंत आल्याचें कळतांच शिवाजीनें त्यास आणावयास कोणी ब्राह्मण सामोरे पाठविले असावे हेंच अधिक संभवनीय वाटतें.

५ तुकोराम हा शिवाजीचा शत्रु हस्तगत झाला असा उल्लेख आला आहे. असा शत्रु म्हणून उल्लेख केला जाण्यास तो निदान शत्रुपक्षाकडील मातबर सरदार तरी असावयास हवा. तुकोराम म्हणून शिवाजीचा एक सुभेदार कोकणांत होता तो येथें घेतां येत नाहीं. तेव्हां शत्रु म्हणून उल्लेखिलेल्या या तुकोरामाचा शोध इतिहासज्ञांनीं लावावा अशी सूचना करणें प्राप्त आहे.

६ शिवाजीनें ज्याचा जीर्णोद्धार केला तें सप्तकोटीश्वराचें देवालय कोठें आहे याविषयींहि मला कांहीं माहिती नाहीं इतिहासज्ञान्यांनीं ही माहिती द्यावी; अशी विनंती आहे.

आतां कांहीं विवेचनीय प्रश्न उत्पन्न होतात त्यांविषयीं चर्चा करावयाची—

पहिला प्रश्न असा मनांत येतो कीं, शिवाजीनें तीनचार महिन्यांच्या अंतरानें दोनदां राज्याभिषेक खरोखरच करून घेतला कीं काय? दोनदां राज्याभिषेक करून घेणें ही कल्पना चमत्कारिक वाटते यांत शंका नाहीं. शिवाजी आणि गागाभट्ट या आपल्या निबंधांत म. म. काणे यांनीं असें मत दिलें आहे कीं, निश्चलपुरीनें केलेला विधि हा राज्याभिषेक नसून ती एकादी शांति केलेली असावी. अनिष्ट, अशुभ गोष्टी घडल्यास शांति करण्याची पद्धतिच आहे. तशीच एकादी शांति निश्चलपुरीच्या नेतृत्वाखालीं करण्यांत आली असावी. महामहोपाध्यायांचें हें अनुमान मान्य करावयाचें तर प्रस्तुत ग्रंथ ही केवळ कल्पितकथाच म्हणावी लागेल. राज्याभिषेक-कल्पतरु हें ग्रंथनाम निराधार होईल आणि त्यांत तांत्रिकरीत्या केलेल्या सिंहासनारोहणाचें व राज्याभिषेकाचें जें सविस्तर वर्णन आहे तें सारें काल्पनिक म्हणावें लागेल. शिवाय तसें म्हणण्यास एक मोठी अडचण आहे. ती म्हणजे निधनशकावलींत ललितापंचमीस पुन्हां सिंहासनारोहण अशी नोंद केलेली आढळते ही होय. ही शकावली शिवापूरकर देशपांड्यांकडील आहे. तींतील ही नोंद कलकत्ता येथील या पोथीच्या आधारें केली असणें संभवनीय वाटत नाहीं. ही पोथी आणि निधनशकावली हे दोन स्वतंत्र पुरावे आहेत. दोहोंतहि ललितापंचमी ही समान मिति आहे. व दोहोंतहि पुन्हां सिंहासनारोहण केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हां परस्पर-निरपेक्ष अशा या दोन पुराव्यांवरून पुन्हां राज्याभिषेक-विधि झाला असें म्हणणें प्राप्त होतें.

येथें हें ध्यानीं ठेविलें पाहिजे कीं शिवाजीनें केलेले हे दोन्ही विधि राज्याभिषेकाचेच होते. त्यांतील एक मंचकारोहण व दुसरा राज्याभिषेक असा त्यांत भेद नव्हता. एका राजानंतर दुसरा राजा गादीवर येतो तेव्हां तो कारभार हातीं घेतांना प्रथम तात्पुरता समारंभ करितो, त्यास मंचकारोहेण म्हणतात. पुढें सर्व सिद्धता करून सुमुहूर्तावर मोठ्या प्रमाणावर जो विधिपूर्वक समारंभ होतो त्यास राज्याभिषेक म्हणतात.

संभाजीनें असे दोन समारंभ केल्याचें इतिहासज्ञांस माहीत आहेच. त्यानें राज्यकारभार हातीं घेतांच जुलै १६८० मध्यें जो समारंभ केला तें मंचकारोहण होय. सर यदुनाथ सरकार यांनीं यास The Coronation of Shambhaji at Raigarh in July 1680 असें परमानंदकाव्याचा पुरस्कार पृ. १ वर म्हटलें आहे तें चिन्त्य होय. संभाजीचा राज्याभिषेक म्हणजे कारोनेशन पुढें सुमारें सहा महिन्यांनीं सन १६८१ त (शके १६०२ रौद्र माघ शुा ७ रविवार–झालेलें आहे. जेधेश० व परमानंदका० पृ. ९ श्लो. ६३) शिवाजी महाराजांनीं स्वतःच राज्य संपादिलें होतें म्हणून त्यांस मंचकारोहण –समारंभ करण्याचें प्रयोजनच नव्हतें. सन १६७२ त किंवा तत्पूर्वींहि ते सिंहासनाधीश होतेच. त्यांच्या सिंहासनासाठीं १६०० हून अधिक रुपये किमतीचें किनखाप इ० कापड १६७२ त खर्ची पडलेलें आढळतें. अर्थात् शिवाजी आधींपासून सिंहासनाधीश होताच. राज्याभिषेकविधि मात्र १६७४ त झाला इतकेंच.

एकदां राज्याभिषेक केल्यानंतर शिवाजीस पुन्हां राज्याभिषेक–समारंभ करण्यास काय कारण घडलें असेल हा यापुढील प्रश्न होय. यासंबंधानें सर यदुनाथ असें म्हणतातः— The first success of the new cult was gained when The Tantric high priest Nischalputi by creating demonic disturbances indused Shivaji to hold a second coronation of himself (परमानंदकाव्यम् याचा पुरस्कार पृ. ५ क. ३ पहा.) निश्चलपुरीनें (आपल्या योगसामर्थ्यानें) आसुरी उत्पात उत्पन्न केले व तेणेंकरून शिवाजीस पुनः राज्याभिषेक करून घेणें भाग पाडलें असें सर यदुनाथ सरकार येथें स्पष्ट म्हणत आहेत! मंत्रतंत्राच्या सामर्थ्यानें आसुरी उत्पात उत्पन्न करितां येतात असें भाविकांनीं म्हणावें. पण त्यास इतिहास म्हणतां येणार नाहीं असें मला वाटतें. शिवाय निश्चलपुरीनें उत्पात उत्पन्न केले यास आधार काय? असें या कल्पतरु ग्रंथांत तरी कोठेंहि म्हटलेलें नाहीं. उलट गागाभट्टानें केलेल्या अविधीमुळें उत्पात झाले असें म्हटलें आहे आणि निश्चलपुरीनें मंत्रसामर्थ्यानें ते निवारिले असें अगदीं उलट त्या ग्रंथांत वर्णिलेलें आहे. खरा प्रकार असा दिसतो कीं ज्येष्ठ शुा १३ स वैदिकपद्धतीनें राज्याभिषेक झाल्यानंतर लवकरच म्हणजे ज्येष्ठ वा ९ स राजमाता जिजाबाई निवर्तली. तसेंच उल्कापात वगैरे कांहीं उत्पातहि तेव्हां घडलें असतील. कालानुरोधानें घडलेल्या या अनिष्ट गोष्टींचा संबंध सामान्य जनांनीं वैदिक पद्धतीनें केलेल्या राज्याभिषेकाशीं जोडला असणें अगदीं साहजिक आहे. अनेक विवाह व संतति झाल्यानंतर ४४ व्या वर्षीं मुंज करणें आणि पूर्वींच्या विवाहित स्त्रियांशींच पुन्हा लग्नें लावणें यासारख्या गोष्टी सामान्य जनांस सहज पचण्याजोग्या नव्हत. या कृत्यांनीं त्या गतानुगतिक लोकांचे मनांत मोठा विकल्प उत्पन्न झाला असणें अगदीं साहजिक आहे. हा विकल्प कोणत्यातरी उपायानें दूर करणें अवश्य होय हें महाधोरणी शिवाजीनें ध्यानीं घेऊन दुसऱ्या राज्याभिषेकाची युक्ति

योजिली असावी. लोकानुरंजनासाठीं चतुर राज्यकर्त्यांस अशा कांहीं गोष्टी कराव्या लागतात. पहिल्या वैदिक राज्याभिषेकांत पशुबलिदान मुळींच झालें नव्हतें. तत्कालीन सामान्य जनसमजुतीप्रमाणें तें तर अवश्यच होतें. म्हणून पुनः अभिषेक करवून व त्यांत भरपूर पशुबलिदान करून शिवाजीनें सामान्य जनांचे मनांतील विकल्प दूर केला असावा असें मला वाटतें.

'राज्याभिषेक-कल्पतरु' या ग्रंथाचा कर्ता कोण हा यापुढील प्रश्न होय. सर यदुनाथ सरकार यांनीं हा ग्रंथ निश्चलपुरीनें रचला असें म्हटलें आहे. परमानंदकाव्यम् याचा पुरस्कार पृ. ४ ओळी १२, १३ पहा. Sanskrit poem the Sivaraja Rajyabhisheka–Kalpataru or description of Shivaji's second Coronation written by Nischalpuri the Tantric priest. इ०. सर यदुनाथ यांनीं हें कसें लिहिलें कांहीं समजत नाहीं. या कल्पतरु–ग्रंथांत तरी तो निश्चलपुरीनें लिहिला असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. तांत्रिक पद्धतीनें राज्याभिषेक-विधि करणें निराळें आणि ग्रंथ लिहिणें निराळें. अभिषेक निश्चलपुरीनें केला पण ग्रंथ–रचना कांहीं त्यानें केलेली नाहीं. म. म. काणे यांनीं शिवाजी व गागाभट्ट या निबंधांत म्हटलें आहे कीं गोविंद याच्या मुखकमलांत वास करणारा अनिरुद्धसरस्वती हा या ग्रंथाचा कर्ता आहे. नृसिंहसरस्वतीप्रमाणें अनिरुद्धसरस्वती नामक कोणी पुरुष असावा अशी भ्रांति येथें झालेली दिसते. कल्पतरूच्या आठ शाखांच्या अंतीं शाखासमाप्तिदर्शक जे संकल्प आहेत त्यांपैकीं चारांमध्यें "इति श्रीमद् बर्वोपनामक नारायणभट्टसूरिसूनु गोविंदमुखपद्मवासिन्यनिरुद्धसरस्वतीकृतौ" असा उल्लेख आहे. यांतील अनिरुद्ध-सरस्वती हा शब्द पुंल्लिंगी मानला गेला असें दिसतें. पण तो स्त्रीलिंगी आहे. त्याचे मागें मुखपद्मवासी असें पुल्लिंगी विशेषण नसून मुखपद्मवासिनी असें स्त्रीलिंगी विशेषण आहे यावरून हें स्पष्ट आहे. येथें सरस्वती म्हणजे वाणी. अनिरुद्ध–सरस्वती म्हणजे अकुंठित अस्खलित वाणी. ही वाणी गोविंदद्विजाच्या मुखपद्मांत वसणारी. अर्थात् बर्वे कुलोत्पन्न नारायणसुत गोविंद हा या कल्पतरूचा कर्ता असें प्रस्तुत चार उल्लेखांवरून दिसून येतें.

तथापि याविषयीं क्वचित् कोणास संशय वाटेल असें कारण येथें घडलेलें आहे. तें म्हणजे या ग्रंथांतील कविनामाचा उल्लेख करणाऱ्या या चारी ठिकाणच्या ओळींवर पोथींत काळी रेघ ओढून त्या खोडल्या आहेत असें संपादकांनीं टीपेंत सांगितलें आहे. पोथींत तांबड्या शाईनें लिहिलेल्या या चार ठिकाणांच्या ओळी कोणी खोडल्या हें समजण्यास मार्ग नाहीं. पण या खोडणारास ग्रंथकार गोविंद बर्वे हा नसून दुसरा अमुक ग्रंथकार आहे असें निश्चित माहीत असतें तर त्यानें येथें तें दुसरें नांव अवश्य

ऐ. सं. नि. खं. ६–६

लिहिलें असतें. तसें त्यानें लिहिलें नाहीं त्यापक्षीं दुसरा अमका ग्रंथकार असें त्यास कांहीं माहीत नव्हतें हें उघड आहे. तथापि या खाडाखोडीमुळें संशयास जागा राहते म्हणून खोडलेल्या या चार ओळी वगळून ग्रंथकार कोण याचा निश्चय अन्य प्रकारें होतो काय तें पाहूं.

ग्रंथाच्या उपसंहारांतील एक श्लोक खोडलेला नाहीं, तो पुढीलप्रमाणें आहे.

इति योगींद्रगोविंदसंवादेनानुवर्णितं । अनिरुद्धसरस्वत्या शिवराजाभिषेचनम् ॥

या श्लोकावरून 'राज्याभिषेक-कल्पतरु' अनिरुद्ध सरस्वतीनें म्हणजे अकुंठित वाणीनें रचला असें होतें. ही अकुंठित वाणी कोणाची हा प्रश्न उरतो. त्याचें उत्तर उपक्रमांतील एका श्लोकावरून मिळतें. तो श्लोक असाः—

कथं छत्रपतिः सोभूत् इति मे वद पृच्छतः ।
वाग्वादिनी वक्तुकामा छत्रधारणवर्णनम् ॥

गोविंद ब्राह्मण निश्चलपुरीस म्हणतो–शिवाजीचा राज्याभिषेक–समारंभ कसा कसा झाला तें मला सांगा. त्या समारंभाचें पद्यात्मक वर्णन करावें असें माझी वादिनी वाक् म्हणजे बोलकी वाणी इच्छीत आहे. गोविंदद्विजाची हि वादिनी वाक् म्हणजेच उपसंहाराच्या श्लोकांतील अनिरुद्ध–सरस्वती होय. अर्थात् उपक्रमोपसंहारांतील ह्या उल्लेखांवरून या शिवराजराज्याभिषेककल्पतरूचा कर्ता बर्वे कुलोत्पन्न नारायणसूनु गोविंद होय हें निर्विवाद ठरतें.

आतां निश्चलपुरीनें केलेल्या राज्याभिषेकाशीं शाक्तपंथाचा कांहीं संबंध होता काय तें पहावयाचें. शिवाजीनें तांत्रिकपद्धतीनें पुन्हां राज्याभिषेक करून घेतला यांत शाक्तपंथाचा महाराष्ट्रांतील पहिला विजय झाला व पुढें लवकरच संभाजीच्या वेळीं त्या पंथाचा महाराष्ट्रांत फार प्रसार झाला असें सर यदुनाथ यांनीं प्रतिपादिलें आहे. आणि उदाहरणार्थ म्हटलें आहे कीं, Parāmananda was a Bhagawat or worshipper of Vishnu; His grandson (Govind) was a Tantric priest an adorer of Shiva's female half called Sakti or Kali. (पर० का० पुरस्कार पृ. ३) महाराष्ट्रांतील शाक्तपंथाच्या प्रसाराचा हा पुरावा म्हणून दिलेला आहे. पण तो सत्य नाहीं. कारण परमानंदाचा नातू गोविंद हा शाक्तपंथी होता असें म्हणण्यास लवमात्र आधार नाहीं. परमानंदाप्रमाणेंच त्याचा नातू गोविंदहि भागवतच होता. परमानंदकाव्यम् या ग्रंथांत पृ. १०३ ते १८३ वर या गोविंदकवीचें जें काव्य समाविष्ट करण्यांत आलें आहे त्याचे प्रारंभीं " श्री

गोविंदो विजयतेतराम् " असें त्यानें लिहिलें आहे. त्यानें शाहूराजकीर्तिप्रभामंजरी या मराठी काव्याचे प्रारंभींहि " श्रीगोविंद प्रसन्न " असे शब्द लिहिले आहेत आणि या गोविंदानें नारायण दीक्षित बापट यांस लिहिलेलें २३।३।१७८२ चें पत्र पे. द. ४३-१६ मध्यें छापलें आहे. त्यांत तो लिहितो, " आमचा वृद्धापकाल झाला. पोटीं संतान नाहीं. बहुत जीर्ण झालों. यास्तव चतुर्थाश्रम संपादून माहुलीसंगमीं जलसमाधिस्थ होणार. जवळ रामचंद्राच्या मूर्ति आहेत त्या आपण सांभाळाव्या. नेवासें येथें आमचें वर्षासन तीनशें रुपये आहे, तें आपण घेऊन रामनवमीचा उत्सव चालवावा. " सारांश, परमानंदाचा नातू गोविंद कवि हा रामोपासक-भागवतधर्मी होता; शाक्त-पंथी नव्हता.

स्वतः निश्चलपुरीदेखील योगीन्द्र व तंत्रविद्यापारंगत असला तरी तो शाक्तपंथी होता असें दिसत नाहीं. त्यानें कोंकणांतील परशुराम, संगमेश्वर, पुळ्याचा गणपति, राजापूरची गंगा, सप्तकोटीश्वर इ० तीर्थक्षेत्रांची यात्रा भाविकपणें केल्याचें वर्णन कल्पतरूच्या प्रथम शाखेंत केलें आहे. त्यावरून तोहि इतर सर्वसामान्य भारतीयांप्रमाणें सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति अशा मताचा होता असें दिसतें. कवीनें त्यास अद्वैतानंदपूर्णार्थः असें म्हटलें आहे.

निश्चलपुरीनें शिवाजीस तांत्रिकविधीनें राज्याभिषेक केला असें म्हटलें असलें तरी या कल्पतरु ग्रंथांत त्या विधीचें जें वर्णन केलें आहे त्यांत कालीमातेचा किंवा शाक्तपंथाचा संबंध लवमात्रहि आलेला आढळत नाहीं. जप, मंत्रग्रहण, अभिषेक व निरनिराळ्या देवतांस बलिदान एवढाच विधि वर्णिला आहे. कालीचें पूजन, तिला उद्धेशून हवन किंवा बलिदान यांचा लवलेशहि या विधींत आढळत नाहीं. तांत्रिकविधि म्हणजे पुराणोक्त विधि असेंहि असूं शकेल. शिवाजी म्हणतो, वैदिकं कर्म संपाद्य कर्तव्यमथ तांत्रिकं । संपादितं वैदिकं तु तांत्रिके वर्तते स्पृहा ॥ इत्यादि वचनांवरून वेदोक्त-पुराणोक्त हीच जोडी वैदिक-तांत्रिक या शब्दांनीं येथें दर्शविली जाते असें वाटतें.

आतां हा ग्रंथ केव्हां रचला गेला तें पाहूं. ग्रंथरचनेचा काल कवीनें दिलेला नाहीं तथापि आठव्या शाखेंतील पुढील श्लोकावरून तो अनुमानितां येतो. " एनस्यातिरथः पुत्रो राजारामेति यं विदुः । उत्साद्य यवनान् सर्वान् सार्वभौमो भविष्याति ॥ " शिवाजीचा पुत्र राजाराम सर्व यवनांचा उच्छेद करून सार्वभौम होईल असें भविष्य या कल्पतरूंत वर्तविलें आहे. हीं भविष्यें प्रायः ' पहायचें आणि सांगायचें ' अशा स्वरूपाचीं असतात. म्हणून राजाराम कर्नाटकांतून परत आल्यानंतर पण त्याच्या

मृत्यूपूर्वी हा ग्रंथ रचला गेला असें म्हणावयास प्रत्यवाय दिसत नाहीं. पोथींतील हस्ताक्षरें शिवकालीन आहेत असें संपादकांनीं म्हटलें आहे त्याचा अर्थ तीं शिवाजीच्या ह्यातींतील आहेत असा समजावयाचा नाहीं; तीं शिवकालासन्निधचीं आहेत असा जरासा व्यापक अर्थ समजावयाचा.

शिवाजी विद्यमान असतां झालेल्या शिवभारतादि ग्रंथांत शिवाजी हा विष्णूचा अवतार असें वर्णन आढळतें. उत्तरकालीन बखरींतुन तो शिवाचा अवतार सांगितलेला आहे. प्रस्तुत कल्पतरूमध्येंहि तो शिवाचा अवतार सांगितला आहे. हा उल्लेख कालदृष्ट्या प्रथमचा दिसतो. याचेंच अनुकरण यापुढील बखरकारांनीं केलें असावें.

येथवर शिवराज–राज्याभिषेक–कल्पतरु या ग्रंथास अनुसरून कित्येक प्रश्नांची चर्चा केली. या ग्रंथांत प्रथमा, द्वितीया, तृतीया यांप्रमाणें 'चतुर्था षष्ठा, सप्तमा' अशी आकारान्त स्त्रीलिंगी शब्दांची योजना, 'तसेंच स क्षणेनावनीं सर्वा **जयते सागरांबराम्**' यांसारखे कांहीं अशुद्ध प्रयोग आढळतात; तथापि भाषा प्राय: शुद्ध आहे. ती सरळ, सोपी व केवळ वर्णनात्मक असून हा ग्रंथ काव्यदृष्ट्या अगदीं सामान्य प्रतीचा असल्यामुळें त्या दृष्टीनें चर्चा करण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. म्हणून ही चर्चा येथेंच पुरी करितों.

५६४

मंडळ-वृत्त

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.

एकेचाळिसावें वार्षिक संमेलन

शक १८७६ वैशाख वद्य १२, १३, १४

इ. १९५४ मे २९, ३०, ३१ शनिवार, रविवार व सोमवार

दिवस पहिला : शनिवार दि. २९।५।५४, वैशाख वद्य १२ शक १८७६

सकाळ ८॥ ते १०॥

प्रास्ताविक--चिटणीस, प्रा. रा. वि. ओतुरकर, निवेदन, संदेशकथन इ.

स्वागतपर भाषण--कार्याध्यक्ष, म. म. प्रा. द. वा. पोतदार.

निबंधवाचन

म. म. प्रा. **वा. वि. मिराशी**— (१) गोंड नृपती दलपतशहाचा जबलपूर शिलालेख श. १४७१

श्री. **मो. रा. जोशी**— (२) अंताजी माणकेश्वराची बखर

श्री. **म. रा. इनामदार**— (३) इंग्लंडमधील जिंजी इतिहासाचें मोडी हस्तलिखित.

श्री. **शां. वि. आवळसकर**— (४) रायगडकडील जाळपोळ

म. म. प्रा. **द. वा पोतदार**— (५) आम्रापूर-मलिकंबर कबरीसंबंधी कागद.

प्रदर्शन—तासगांव-पटवर्धन संग्रह चित्रें ६—प्रा. रा. वि. ओतुरकर.

सायंकाळ ५॥ ते ७॥

निबंधवाचन

श्री. **वि. अं. कानोले**- (६) मृत्युंजयस्वामीस पंढरपुरीं मुकुंदराजाचें सगुणदर्शन.

श्री. **कृ. वा. पुरंदरे**— (७) अव्वल इंग्रजींतील अज्ञात शाहीर.

— (८) उमाजीनायकाच्या इतिहासावर नवा प्रकाश.

श्री. **र. कृ. पाटणकर**— (९) श्रीकृष्णाच्या स्त्रिया—(महाराष्ट्रीय)

(१०) नानासाो पेशवे यांचें राजापुरीं आगमन, आख्यायिका इ.

श्री. **भी. ल. परतूडकर**- (११) परतुड देशपांडे दप्तर-हप्ता १ ला.

व्याख्यान-- श्री. **वा. रा. तळवलकर**--महाराष्ट्रांतील-हेमाडपंती-बांधणीचें वैशिष्ट्य-सदीप व्याख्यान.

दिवस दुसरा : रविवार वैशाख वद्य १३ शक १८७६ दि. ३०।५।५४

सकाळ ८॥ ते १०॥

डॉ. **एच्. व्ही. त्रिवेदी**--(१२) New light on the early Rashtrakuta House.

श्री. य. ग. फके— (१३) सोयराबाई ही शिर्क्यांची कन्या की मोहित्यांची ?
डॉ. रा. ग. हर्षे— (१४) असुरांचें सौरसूक्त.
श्री. सि. वि. चित्रावशास्त्री—(१५) देश व गांवें यांचे प्रकार आणि व्याख्या.
(१६) गणपाठाचा कर्ता कोण ?
प्रा. प. कृ. गोडे— (१७) History of sling (Gophana) in India and outside between B. C. 3000–1900
(१८) Date of Vasudeva's Commentary on the Karpuramanjari between A. D. 1550–1750.
श्री. वें. ल. जोशी— (१९) भारतीय ग्रामसंस्था-उद्भवकाल.

सायंकाळ ५॥ ते ७॥

श्री. र. कृ. पाटणकर— (२०) पंडितप्रकांड पितापुत्र पायगुंडे, अष्टपुत्रे, इ.
श्री. य. वि. परांजपे (२१) संस्कृत योगवासिष्ठावरील मराठी टीका व टीकाकार.
श्री. वि. म. कुलकर्णी— (२२) मराठी शिलालेखांतील छंदोरचना.
श्री. पु. द. नवाथे— (२३) निविद् मंत्र.

<u>दिवस तिसरा</u> : सोमवार वैशाख वद्य १४ शक १८७६ दि. ३१।५।५३

सकाळ ८॥ ते १०॥

निबंधवाचन

श्री. द. बा. डिसकळकर— (२४) महाभारतांतील वीरांशीं संबंध जोडणारे राजवंश.
डॉ. शं. गो. तुळपुळे— (२५) पैठणचा अप्रकाशित शिलालेख-भाषण
श्री. बा. मा. खुपेरकरशास्त्री—(२६) नागेंद्रकृत विवेक-भास्कर.
प्रा. ह. बा. भिडे— (२७) शाक्त पंथाचें तत्त्वज्ञान.
श्री. भी. ल. परतूडकर— (२८) लोणी येथील राष्ट्रकूट ताम्रपट.
श्री. ग. ह. खरे— (२९) मराठ्यांविषयीं कांहीं मोगली वाके
—(३०) कांहीं मराठी व्युत्पत्ति.

सायंकाळ ५॥ ते ७॥

श्री. कृ. टो. जैतली— (३१) पैशाची--प्राकृतस्योद्भवस्थानम् ।
श्री. ब. मो. पुरंदरे— (३२) औरंगजेबकालीन कागद-पंढरपूर देशपांडे-दप्तर.
श्री. शं. ना. जोशी— (३३) रायरीकर दप्तर-थो. माधवरावकालीन अप्रसिद्ध कागद.
श्री. ग. ह. खरे— (३४) कांहीं फार्सी पत्रें.
प्रा. रा. वि. ओतुरकर— (३५) इंग्रजी राज्यस्थापनेकडे मराठ्यांचें लक्ष ?
श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर— (३६) तिथिवारतारीख-निश्चिति गणित.

बेचाळिसावें वार्षिक संमेलन–शक १८७७

पहिला दिवस : ज्येष्ठ शुद्ध १४ शनिवार ता. ४।६।१९५५

सकाळ ८॥ ते १०॥

प्रास्ताविक—चिटणीस

स्वागतपर भाषण—कार्याध्यक्ष

निबंधवाचन

म. म. वा. वि. मिराशी—(१) कृष्णदेवरायाचें एक ताम्र नाणें

(२) चंदेल्ल वीरवर्मन यांचें सोन्याचें नाणें.

म. म. द. वा. पोतदार—(३) रामशास्त्री यांचा एक निवाडा.

(४) घट रामायणांतील एक नवलकथा.

श्री. दि. के. देशपांडे -- (५) अमृतरावाचा तोतया. (पुनः एकदां)

सायंकाळ

पंतप्रधान पंडित नेहरूंच्या व्याख्यानामुळें कार्यक्रम बंद.

दुसरा दिवस : ज्येष्ठ शुद्ध १५ रविवार ता. ५।६।१९५५.

सकाळ ८॥ ते १०॥

निबंधवाचन

श्री. वा. अ. खलप— (६) गोव्याकडील कुंवी जमात.

प्रो. प. कृ. गोडे— (७) References to Persian pearls in sanskrit literature

विद्यानिधि सि. वि. चिंत्रावशास्त्री—(८) कीर्तनसंस्थेची प्राचीनता.

प्रो. प. कृ. गोडे— (९) History of Idali & Doshe

विद्यानिधि सि. वि. चित्रावशास्त्री—(१०) जलस्थलांचीं नांवें (कथन)

प्रो. प. कृ. गोडे— (११) History of Capping verses

सायंकाळ ५॥ ते ८॥

श्री. वा. सि. बेंद्रे— (१२) तुकाराम चरित्र व त्याचें साहित्य (भाषण).

डॉ. एस्. बी. देव— नेवासें येथील उत्खनन (सदीप व सप्रदर्शन) भाषण

तिसरा दिवस : ज्येष्ठ वद्य १ सोमवार ता. ६।६।१९५५

सकाळ ८॥ ते १०॥

श्री. ग. ह. खरे (१३) तीन प्राचीन ताम्रपट.

श्री. य. ग. फफे— (१४) राज्याभिषेक कल्पतरु-कांहीं विचार
श्री. वि. वि भिडे— (१५) मातृकांचें परिगणन.
श्री. शं. ना. जोशी— (१६) कांहीं तारखांची चर्चा.
श्री. रा. म. आठवले— (१७) शिवजन्म इ. १६३० च (नवा पुरावा कथन).
श्री. कृ. टो. जैतली— (१८) अपि मघवा (इंद्रः) मगः ?
श्री. त्र्यं. ब. अभ्यंकर— (१९) वाजपेय यज्ञ-भाषण.

सायंकाळ ५॥ ते ८॥

डॉ. मो. गं. दीक्षित— (२०) सिरपूर येथील उत्खनन (सदीप व सप्रदर्शन) भाषण.

पंचेचाळिसावा वाढदिवस-कार्यक्रम

श. १८७७ आषाढ शुद्ध १ सोमवार ता. २० जून १९५५

सोमवारीं सकाळीं सूर्यग्रहण असल्यानें कार्यक्रम थोडा उशिरां घेतला होता.

सकाळीं ६—७ मंगलवादन

सायंकाळ ४ ते ८

निबंधवाचन

श्री. चिं. ग. कर्वे— (१) सारिकाशतक
श्री. दि. के. देशपांडे— (२) हिंदु कायद्यावरील पहिलें इंग्रजी पुस्तक
म. म. द. वा. पोतदार— (३) सोरटी सोमनाथ आणि शिंगणापूर
श्री. म. श्री. माटे— (४) Toke and its architectural remains
श्री. र. कृ. पाटणकर— (५) ग्रंथकार-रावण
श्री. का. रा. कापरे— (६) पुण्याच्या आसपासचे प्राचीन अवशेष
श्री. म. दा. साठे— (७) संस्कृत व्याकरणांतील परिभाषा, त्याचें कार्य, व्याप्ति इ. व्याख्यान

शक १८७५ पा. स. वृत्त

शक १८७५ मध्यें पा. स. एकंदर १० झाल्या. त्यांतील पांच सभांतून वाचलेले निबंध त्रै. व. ३४ अं. ३, ४ मधील मंडळ वृत्तांत दिले आहेत. त्यापुढील पांच सभांतील निबंध पुढें दिले आहेत. एकूण ३३ निबंध वाचले. कर्वे ४, खरे ९, जोशी ६, परतुडकर व पाटणकर ३, ३, खलप व पिंगळे २, २ आणि कामत, भिडे, अवस्थी व जोशी एकेक.

पा. स.	निबंधलेखक	निबंध
६	शं. ना. जोशी	(२२) चिमणाजी नारायण सचीव यांचें पत्र
,,	ग. ह. खरे	(२३) तीन फार्सी कागद
,,	,,	(२४) मितिशुद्धि
७	भी. ल. परतूडकर	(२५) ताडकळस येथील गधागाढध
,,	,,	(२६) इ. स. १८८५ मधील बाजारभाव
,,	र. प्र. अवस्ती	(२७) इंग्लिशांविषयीं कांहीं ऐ. समजुती हिंदी
८	शं. ना. जोशी	(२८) तांचोळी–अहमदनगर ह्यांजकडील मिरासपत्र
,,	वा. अ. खलप	(२९) म्हापसे (गोवा) – खलप घराण्याची पूर्वपीठिका
,,	ग. ह. खरे	(३०) सोलापूर देशमुखांकडील कागद
९	,,	(३१) प्रतापराव गुजराचें एक पत्र
१०	,,	(३२) कोल्हापूरच्या महालक्ष्मीविषयीं कागद
,,	र. रु. पाटणकर	(३३) गीतेवरील पंचाननी टीका

शक १८७६ पा. स. वृत्त

ह्या म्हणजे श. १८७६ वर्षी १४ पाक्षिक सभा झाल्या व त्यांत पुढीलप्रमाणें १५ लेखकांचे २८ निबंध वाचले गेले. त्यांची लेखकवार लेखसंख्या अशीः—

शं. ना. जोशी ८, ग. ह. खरे ६, म. रा. इनामदार २ आणि वा. रु. भावे २, रा. ना. केळकर, य. रा. गुप्ते, शं. वा. कटप, प्रो. फडके, कामत, तिवारी, भी. ल. परतुडकर, य. ग. फके, रा. वि. ओतुरकर, श्री. गोरे ह्यांचे प्रत्येकीं एकेक. व्याख्यानसभा २ झाल्या. सभासद उपस्थिति सरासरी (१३५) १०. अध्यक्ष प्रा. शं. गो. साठे (८) श्री. ज. स. करंदीकर (३) श्री. रु. स. अभ्यंकर व श्री. य. ग. फके.

पा. स.	निबंधलेखक	निबंध
१	रा. ना. केळकर	(१) कायसू–गोंवा–येथील सिद्धशिला
,,	ग. ह. खरे	(२) जेजुरीचा जमाखर्च
२	य. रा. गुप्ते	(३) राघोबादादा व गुप्तेघराणें.
,,	शं. वा. कटप	(४) मन्मथस्वामीविषयीं कांहीं माहिती
,,	म. रा. इनामदार	(५) शिवाजीनें जावळी केव्हां घेतली.
३	शं. ना. जोशी	(६) रायरीकर यांजकडील थो. माधवराव का. पत्रें

पा. स.	निबंधलेखक	निबंध
३	प्रो. फडके	(७) कल्हणाची कालगणना
,,	ग. ह. खरे	(८) दोन मूर्तिलेख
४	वा. कृ. भावे	(९) शिवाजीचा राज्यविस्तार
,,	दि. का. कामत	(१०) वाकाटकसंशोधनसार
,,	प्रि. तिवारी	(११) उदयसिंहाच्या यौद्धिक हालचालींचा विशेष
,,	ग. ह. खरे	(१२) जयपूरकडील कांहीं पत्रें
५	म. रा. इनामदार	(१३) शिवाजी जयसिंह योजना
,,	भी. ल. परतुडकर	(१४) दीडशें वर्षांपूर्वीचे पांच दुष्काळ व अधिकाऱ्यांचे हक्क, बाजारभाव इ.
,,	शं. ना. जोशी	(१५) उगार-बखर
,,	य. ग. फफे	(१६) पंडितराव आणि दानाध्यक्ष भिन्न कीं एक ?
,,	वा. कृ. भावे	(१७) मोरया गोसावी.
६	रा. वि. ओतुरकर	(१८) पानिपतोत्तर कालांतील मराठे व इंग्रज संबंध
,,	ग. ह. खरे	(१९) विजापूरची सफर व तींत झालेली प्राप्ति
७	,,	(२०) नारायण माधव परशुरामी यांजकडील फारसी पत्रें
८	शं. ना. जोशी	(२१) दाभोळकर संग्रह (नौगाव)
,,	ग. ह. खरे	(२२) नळदुर्ग देशमुखांकडील फारसी मराठी कागद
९	श्री. रा. पोतदार, शं. ना. जोशी	(२३) सोनगीर देशमूख
१०	श्री. दे. गो. लांडगे बी. ए., एलएल्. बी., चिटणीस मध्यप्रांत संशोधनमंडळ--नागपूर-- 'नागपूरदर्शन' ह्या विषयावर व्याख्यान	
११	ग. ह. खरे	(२४) कासेगांव देशमूख देशपांडे यांजकडील कागद
१२	शं. ना. जोशी	(२५) वाकडे (वाई) यांस शिरढोण गांव इनाम
		(२६) शिंद्यांची मारवाड जोधपूरकडील स्वारी
१३	अहमदाबाद येथील इतिहास परिषद-- श्री. ग. ह. खरे, प्रा. जी. एस्. दीक्षित, श्री. पां. रं. गोखले, श्री. प्र. ल. सासवडकर इ. भाषणें.	
१४	श्री. गो. श्री. गोरे	(२७) शिंदे सैन्याचा पळ-कालपट
१५	शं. ना. जोशी	(२८) शिंदे-पळवर्णनांतील कांहीं पाठभेद

शक १८७७ पाक्षिक सभा वृत्त

ह्या वर्षी एकूण सभा ७ झाल्या. व निबंध एकंदर १४ वाचले गेले. त्यांची एकत्रित यादी अशी :-

इनामदार म. रा.	१	कुलकर्णी रा. गो	१
खरे ग. ह.	३	जोशी शं. ना.	६
दिघे भा. वि.	१	परतूडकर भी. ल.	१
पाटणकर र. कृ.	१		
			१४

सभासद उपस्थिति सरासरी ९. अध्यक्ष प्रि. प. म. लिमये, शं. गो. साठे' य. रा. गुप्ते, म. म. प्रा. पोतदार, डॉ. पु. वि. बापट, श्री. गोखले हे होते.

पा. स.	निबंधलेखक	निबंध
१	श्री. य. रा. गुप्ते	बाजीप्रभु देशपांडे स्मृतिदिनानिमित्त भाषण
,,	र. कृ. पाटणकर	(१) कृष्णंभट मौनीकृत तर्कचंद्रिका
,,	भी. ल. परतूडकर	(२) उपाध्ये यांनीं घड्याळ वाजवावें.
,,	ग. ह. खरे	(३) कागल घाटगे यांजकडील फारसी फर्मानें
२	शं. ना. जोशी	(४) गानू यांजकडील मोरोपंतांची सयमक गीतासमार्या
		(५) पतके देशमूख यांजकडील कागद
,,	,,	(६) भारत-कलाभवनांतील १० मराठी चित्रें
,,	ग. ह. खरे	(७) राज्य घटनातज्ज्ञ शहाजी भोसले व निजामशाही
३	म. रा. इनामदार	(८) कुंभेरीच्या वेढ्याचा व मारवाड जोधपूर स्वारीचा कालपट
,,	शं. ना. जोशी	(९) नळदुर्ग देशमुखांकडील कांहीं फार्सी पत्रें
,,	ग. ह. खरे	(१०) चार्वाक
४	राघवेंद्रराव कुलकर्णी	(११) फर्रुखसियर पादशहाचीं दोन पत्रें (वरुडकर इनामदारमास्तर)
५	शं. ना. जोशी	धारवाड सावनूरकडील संशोधन सफर
,,	ग. ह. खरे	(१२) सचीव-उपाध्ये पारखी यांजकडील शक १६८८ मधील कागद
६	शं. ना. जोशी	
७	भा. वि. दिघे	(१३) सोमनाथ गायकवाड सरकार व त्यांचे दोन दिवाण

पा. स.	निबंधलेखक	निबंध
७	शं. ना. जोशी	(१४) सुवर्णदुर्गाचे खोत-मोडक इ. १७८७ व १८२२
,,	ग. ह. खरे	जिंजी प्रवास—वार्ताकथन

नगर-संशोधन पाक्षिक सभा श. १८७५ व १८७६

श. १८७५ च्या सभा एकूण ७. पैकीं ३ सभांचें वृत्त त्रै. व. ३४ अं. ३, ४ मधील मंडळ वृत्तांत आलें आहे. बाकी ४ सभांचें पुढीलप्रमाणें--

पा. स.	निबंधलेखक	निबंध
४	शं. ना. जोशी	(११) पुणें येथील शनवार पेठेंतील मेणबाजार
५	,,	(१२) नारायण पेठेंतील परीट
६	,,	(१३) उरळी कांचन संबंधीं कागद
	,,	(१४) गुरुवार पेठेंतील खर्च यादी
	रु. वा. पुरंदरे	(१५) अव्वल इंग्रजींतील दोन पुस्तकें
७	पाताळेश्वर पाहणी फिरती सभा.	

ह्या शक वर्षी एकूण सभा ७ झाल्या. एकूण १५ निबंधांचें वाचन झालें. त्याची लेखकवार संख्या अशी–श्री. शं. ना. जोशी १०, श्री. चिं. ग. कर्वे ४, श्री. रु. वा. पुरंदरे १. सभांची सरासरी उपस्थिति १३. अध्यक्ष प्रा. शं. गो. साठे ३, श्री. भिडे, चितळे व काळे एकेक सभा.

शक १८७६ मध्यें पा. स. १– (१) श्री. गो. रा. राजोपाध्ये–पुनः एकदां रघुनाथपंडित प्रधान; पा. स. २– (२) श्री. शं. ना. जोशी थो. बाजीरावांचें सासवडच्या राहूजी पाटलास पत्र; (३) नारायणरावांच्या पक्षास १॥ ह. पत्रावली, पा. स. ३– श्री. दे. गो. लांडगे बी. ए., एलूएल्. बी. नागपूर मध्यप्रांत सं. मं. चे चिटणीस ह्यांचें 'नागपूरकर भोसले ह्यांची राजवट' ह्या विषयावर व्याख्यान. पा. स. ४– (४) शिवापूरकर देशपांडे यांचा मेहुणपुऱ्यांतील वाडा. अशा चार निबंधांचें वाचन व एक माहितीपूर्ण व्याख्यान झालें. सभांना अध्यक्ष प्रो. शं. गो. साठे (३) व श्री. रु. स. अभ्यंकर (१) असून सभासद उपस्थिति सरासरी १२ असे. श्री. लांडगे ह्यांच्या भाषणाचे वेळीं अर्थात् उपस्थिति पुष्कळ होती.

नगर–संशोधन पाक्षिक सभा श. १८७७

ह्या वर्षी ह्या सभा आठ झाल्या. स्वतंत्र फिरती झाली नाहीं पण पुणें कार्पोरेशनकडील अधिकारी मंडळींच्या समवेत श्री. चिं. ग. कर्वे व श्री. शं. ना. जोशी हे त्यांस माहिती देण्यासाठीं व चर्चा करण्यासाठीं दोन वेळां नगरफिरतींत गेले होते. प्रो. मंगूडकर, प्रो. देशपांडे, श्री. जाधव अशी १६ मंडळी बरोबर होती. पाताळेश्वर, जुने पुणें, यादवकालीन पुणें, मुसलमानकालीन पुणें व त्याच्या खुणा (अवशेष) ह्या दृष्टीनें ही फिरती झाली.

निबंध–सभा आठ झाल्या. त्यांतून **वाचलेले निबंध** पुढीलप्रमाणें– (अकारानुक्रमानें व आडनांवानुसार)

अभ्यंकर रु. स.	१	बहुळकर मा. ब.	२
कापरे का. रा.	३	माटे म. श्री.	२
जोशी शं. ना.	७		
			१५

सभांना **अध्यक्ष**—श्री. अभ्यंकर रु.स. (३) श्री. गोखले वा. रु. (१) म. म. प्रा. द. वा. पोतदार (१) पोतदार श्री. रा. (१) श्री. बहुळकर मा. ब. (१) श्री. सासवडकर प्र. ल. सभासदांची उपस्थिति सरासरी ९,१०. निबंध येणेंप्रमाणें–

पा. स.	**निबंधलेखक**	**लेखनाम**
१	शं. ना. जोशी	(१) नारायण पेठेंतील परांजपे वाडा.
	”	(२) गणेशपेठेंतील छप्परबंद
	”	(३) आदितवार पेठेंतील चौकशी यादी
२	”	(४) भिमाशंकर
	का. रा. कापरे	(५) भवरापूर, उरळी, कोरेगांव
३	म. श्री. माटे	(६) वाघोली व दिवेवाडी.
४	रु. स- अभ्यंकर	(७) कवठे यमाई
	का. रा. कापरे	(८) चोराची आळंदी
	म. श्री. माटे	(९) आंबळे–राजेवाडी
५	मा. ब. बहुळकर	(१०) बहुल येथील वाडेयादी
	शं. ना. जोशी	(११) चऱ्होली दप्तर (श्री. पां. ज्ञा. कुलकर्णी)
६	का. रा. कापरे	(१२) बाणेरे येथील गुहा
	ब. मो. पुरंदरे	भाषण–खंडेराव दरेकर
७	मा. ब. बहुळकर	(१३) दिवे येथील पाटीलकी
	शं. ना. जोशी	(१४) चऱ्होली कागद
८	”	(१५) ”

नवीन सभासद यादी

१८७५ कार्तिक ते शक १८७७ फाल्गुन अखेर

क्रमांक	सभासदाचें नांव	गांव	वर्ग
२६२८	श्री. नारायण वासुदेव अत्रे	पुणें २	वार्षिक ४
२६२९	श्री. मोहनीराज शंकर सोमाणी	पुणें २	,, ४
२६३०	श्री. लंबोदर वामन मांडके	पुणें २	,, ४
२६३१	श्री. विठ्ठल शिवराम भिडे	पुणें ४	,, २
२६३२	श्री. श्रीधर भिकाजी चोंडाळे	पुणें २	आजीव ३
२६३३	श्री. नारायण गोपाळ तवकर	मुंबई २८	,, ४
२६३४	श्री. विठल रामचंद्र फडके	पुणें ४	वार्षिक २
२६३५	श्री. हेडमास्तर, अ. ए. सो. हायस्कूल	अहमदनगर	,, ४
२६३६	श्री. अनंत विष्णु माटोडकर	सिरसिल्ला.	,, ४
२६३७	डॉ. नारायण कृष्णाजी भिडे	पुणें २	,, ४
२६३८	श्री. भालचंद्र दामोदर बेंद्रे	पुणें २	आजीव ४
२६३९*	श्रीमती लिलावतीबाई भ्र. शंकरराव पटवर्धन	पुणें १	वार्षिक १
२६४०	श्री. गंगाधर महादेव साठे	पुणें २	,, ४
२६४१	श्री. नारायण गणेश धडफळे	पुणें २	,, ४
२६४२	श्री मुरलीधर बाळकृष्ण देवपुजारी	नाशिक	,, ३
२६४३	श्री. विद्याधर गणेश महामुनी	पुणें २	वार्षिक ४
२६४४	सौ. शिवप्रभा अरविंद घुगरे	गोरेगांव	,, ४
२६४५	श्री. मधुकर शंकर फडके	पुणें २	,, ४
२६४६	श्री. अनंत रामचंद्र दातार	पुणें २	,, ४
२६४७	श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले	कऱ्हाड	आजीव ४
२६४८	श्री. कृष्ण नंद	दिल्ली	वार्षिक ४
२६४९	मेजर हेरंब विठल दीक्षित	पुणें २	,, ३
२६५०	श्री. मधुसूदन वासुदेव फडके	रत्नागिरी	,, ४
२६५१	श्री. विष्णु विश्वनाथ नातु	हुबळी	,, २
२६५२	श्री. डॉ. राजाराम वासुदेव आजगांवकर	मालवण	,, ३
२६५३	प्रा शंकर गोविंद राजवाडे	पुणें २	,, ४
२६५४	श्री. लक्ष्मण रामचंद्र पेंढारकर	जयपूर	आजीव ४
२६५५	श्री. विठ्ठलराव विष्णूजी सातव	पुणें २	,, ४
२६५६	श्री. श्रीरंग रामचंद्र पोतदार	पुणें २	वार्षिक २
२६५७	श्री. ललितकुमारी वामन भट	बेळगांव	,, २
२६५८	सौ. सुलोचना राम देशमुख	पुणें २	वार्षिक ३
२६५९	श्री. दामोदर नारायण गांडेकर	पुणें ५	आजीव ४

* श. १८७५ अखेर.

क्रमांक	सभासदाचें नांव	गांव	वर्ग
२६६०	श्री. वामन रंगनाथ मोहळकर	पुणें ५	आजीव ४
२६६१	श्री. दत्तात्रय हरी ओक	इंदूर शहर	वार्षिक ४
२६६२	श्री. हेडमास्तर, गव्हर्मेंट हायस्कूल	वैजापूर	आजीव ४
२६६३	**श्रीमंत राजे रायरायान शामराज राजवंत** बहाद्दर	हैद्राबाद	,, १
२६६४	श्री. पांडूरंग रामचंद्र ढमढेरे	पुणें २	,, ४
२६६५	सौ. शोभना लक्ष्मण गोखले	पुणें २	वार्षिक ४
२६६६	श्री. मधुकर श्रीपाद माटे	पुणें २	,, ४
२६६७	सौ. मंगला गजानन गोखले	पुणें ४	,, ४
२६६८	श्री. कृष्णाजी दत्तात्रय वेदरकर	नाशिक	,, ४
२६६९	श्री. देवीदास गजानन जोशी	पुणें २	,, ४
२६७०	श्री. सौ. लिला गोखले	पुणें २	,, ४
२६७१	श्री. दत्तात्रय जगन्नाथ भोपटकर	आकलूज	,, ४
२६७२	श्री. काशिनाथ रामचंद्र कापरे	पुणें २	,, ४
२६७३*	श्री. विनायक गोविंद गोडसे	पुणें २	वार्षिक ४
२६७४	श्री. वासुदेव रावजी जोगळेकर	पुणें २	,, ४
२६७५	श्री. दामोदर मोरेश्वर पेठे	पुणें २	,, ४
२६७६	कॅ. एस. जी. चाफेकर	पुणें २	,, ३
२६७७	डॉ. नारायण कृष्णाजी भिडे	पुणें २	आजीव २
२६७८	श्री. युसुफखान मुहमदखान पठाण	सोलापूर	वार्षिक ४
२६७९	प्रा. अनंत रामचंद्र कुलकर्णी	सोलापूर	,, ४
२६८०	श्री. रविंद्रनाथ वामनराव रामदास	मुंबई १९	,, ४
२६८१	सौ. रोझा विद्याधर देशपांडे	पुणें ५	,, ४
२६८२	श्रीमती रमाबाई वामन गद्रे	पुणें २	,, ४
२६८३	श्री. नारायण केशव करंदीकर	पुणें २	,, ४
२६८४	श्री. विद्याधर विश्वनाथ भिडे	पुणें २	,, ४
२६८५	कुमारी सुशिला वैद्य	जबलपूर	,, ४
२६८६	श्री. लायब्ररियन, युनिव्हर्सिटी लायब्ररी युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा	बडोदा	,, ४
२६८७	श्री. जयंत गणेश फाटक	पुणें २	,, ४
२६८८	श्री. दामोदर लक्ष्मण अडोणी	सागर	वार्षिक वर्ग ४
२६८९	श्री. गुंडु फट्टु आजगांवकर	मुंबई २	,, ४
२६९०	श्री. किशोरी लक्ष्मण सोमण	पुणें २	,, ४

* श. १८७६ अखेर

क्रमांक	सभासदाचें नांव	गांव	वर्ग
२६९१	**श्रीमंत राजे सदाशिवराव रघुनाथराव ऊर्फ भाऊसाहेब पंतसचिव**	पुणें १	उपकर्ते
२६९२	श्री भास्कर रामचंद्र भालेराव	ग्वाल्हेर	वार्षिक ४
२६९३	श्री. हरी रामचंद्र दंडवते	पुणें २	,, ४
२६९४	सौ. उषा गणपतराव इथापे	पुणें २	,, ४
२६९५	श्री. वामन त्र्यंबक आपटे	जमखंडी	,, ३
२६९६	श्री. दलपत संपत देवरे	पुणें २	,, ४
२६९७	सौ. कमल श्रीकृष्ण गोखले	पुणें २	,, ४
२६९८	श्री. अनंतदास रामदासी	पुणें २	,, ४
२६९९*	श्री. सिद्धराज माधव केळकर	पुणें २	,, ४

* श. १८७७ अखेर

शिक्षणसंस्थांतील विद्यार्थी—सुरत, राजूर-सर्वोदय केंद्र, वाळवें, कोपरगांव, सातपाटी-पालघर, टिळक कॉलेज, ग्रामसेविका-सासवड, पारगांव-मेमाणे, दादर, विद्यामंदिर-कोल्हापूर, वसई, शिवाजी मिलिटरी स्कूल, जीवन-शिक्षण-केंद्र-लोणी, हिंगणें-बुद्रुक, नू. म. विद्यालय, नारायणगांव, कल्याण, मिशन हाऊस-अग्निहोत्री शाळा देऊर, सेवासदन, लक्ष्मीपथक, कँप ए. सो., न्यू इं. स्कूल, जोतीराव फुले हाय०, जनता विद्यालय, म. ए. सो., अत्रे-शाळा, गांधी विद्यालय-खेड, बारामती, इंदोरी, शहादें, हिंगणगांव, मुलींची शाळा म्यु. क., मुरुड, मुलुंड, जामनेर, औंध, कोडोली, इ. इ.

शिक्षणसंस्थांतील बाल व प्रौढ विद्यार्थी मंडळ प्रदर्शन पाहून गेले. ह्या विद्यार्थ्यांस श्री. शं. ना. जोशी, श्री. ग. ह. खरे व श्री. ब. मो. पुरंदरे व श्री. गोखले ह्यांनीं मंडळकार्य परिचय करून दिला.

संतोषोद्गार व भेटी

मंडळास ज्या थोर मंडळींनीं भेटी दिल्या व आपले संतोषोद्गार लिहून ठेवले त्यांतील कांहीं पुढें दिले आहेत. स्थलाभावीं एस्. के. हार्जी; मे. जी. डोरोन; श्री. निर्मला जोशी–सेक्रेटरी संगीत नाटक ॲकेडमी दिल्ली; प्रा. हिदेसो हृदयकुमार किमुरा, युकोकू बौद्ध महापीठ–क्योतो जपान, मे. जा. कीडो, एन्. ताकासाकी जपान, महापौर उरसळ पुणें म. नगरपालिका, श्री. व्ही. डी. कृष्णस्वामी सुपरिंटेंडंट डिपार्टमेंट ऑफ आर्किआलॉजी–साऊथ वेस्टर्न सर्कल पुणें; डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. व. गि. घाटे–सिकंदराबाद, मा. आर. सी. गुप्ता असि. डाय. ऑफ अर्काइव्हज् दिल्ली ह्यांचे उद्गार–लेखन तूर्त येथें उद्धृत करतां आलें नाहीं.

I was taken round this institution by Mahamahopadhyaya Potdar who showed to me so many very interesting exhibits. The institution has a very valuable collection of paintings as also manuscripts. The very important material with the institution deserves to be properly kept and investigated. I have every hope that the institution will not starve for funds and will be able to put before the public the valuable material it has collected.

Council Hall, Poona
29th September 1954

(Sd.) D. N. DESAI
Minister of Law and Education

I am very thankful to Mahamahopadhyaya Datto Vaman Potdar for taking me round the Mandala to-day and showing me the different sections and exhibits. The Mandala has an extremely valuable collection of books, manuscripts and mediaeval Indian paintings. The Mandala is also doing extremely valuable research work in Maratha history and has acted as an inspiration to similar other institutions in the State. I might make a suggestion that suitable labels may be affixed to the paintings giving the subject matter as well as the school of painting to which it belongs. This will enable a layman to appreciate the art of different schools represented in the collection. I hope the public will give very generous support to this Mandala and enable it to construct a suitable

building on the vacant plot which has been acquired by the Mandala. I wish the Mandala a still brighter future.

Poona }
13th May 1955 } (Sd.) P. J. CHINMULGUND
Collector and District Magistrate, Poona

Professor - Potdar's excellent institution requires to be financially helped by the state Government. Such help it deserves very greatly.

Ootacmund }
28-6-55 } (Sd.) D. C. SIRKAR
Govt. Epigraphist for India

I visited the Bharata Itihasa Samshodhaka Mandala. I have enjoyed the visit. The Mandala has made some valuable collections of paintings and manuscripts. They help us in understanding past history. The Mandala needs encouragement.

8-7-55

(Sd.) K. L. SHRIMALI
Deputy Minister of Education Govt. of India

Visited the Bharata Itihasa Samshodhaka Mandala this morning. Mahamahopadhyaya Datto Vaman Potdar took me round and showed the collection of rare old books, manuscripts,paintings, coins and other valuable historical materials. No doubt, by itself the Mandala is a good museum. But I would like it to be the central museum in western India. Poona, being a great intellectual centre where there is the unbroken tradition of a number of eminent scholars, should have a central museum. I would draw the attention of the enlightened public to this need of Maharashtra.

2-8-1955

(Sd.) H. MAHTAB
Governor-Bombay State

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

घटना

[मंडळाच्या श. १८७७ च्या साधारण सभेच्या आषाढ शु. २ व १४ आणि व. १३ (ता. २१ जून आणि ३ व १७ जुलै १९५५) च्या बैठकांत संमत झालेली घटना.]

[१] संस्थेचें नांवः– या संस्थेचें नांव "भारत इतिहास संशोधक मंडळ" असें आहे.

[२] उद्देशः– या संस्थेचे उद्देश येणेंप्रमाणें आहेत :—

(१) भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक साहित्य वा साधनें—म्हणजे पत्रें, कागद, बखरी, कैफियती, उत्कीर्ण लेख, जुनीं हस्तलिखितें, सर्व प्रकारचे साहित्यिक ग्रंथ, कलाकृति, नाणीं, ताम्रपत्रें, मूर्ति, शिल्पकृति, चित्रें आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या इतर सर्व वस्तु–मिळविणें आणि त्यांचा संग्रह व संरक्षण करणें.

(२) अशा प्रकारचें सर्व साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठीं आणि त्याचें प्रदर्शन करण्यासाठीं व मंडळाच्या इतर कार्यासाठीं सोइस्कर इमारती उभारणें.

(३) अशा प्रकारच्या साहित्याचें, आणि ज्या योगें ऐतिहासिक संशोधनाचे कार्यास आणि भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक प्रबंध आणि पुस्तकें लिहिण्यास चालना मिळेल अशा इतर ग्रंथांचें, प्रकाशन करणें.

(४) मंडळाला इष्ट अथवा आवश्यक वाटतील अशा सर्व उपायांनीं भारतवर्षीय इतिहासाचें संशोधन करणें आणि चिकित्सक अध्ययन व अध्यापन यांस उत्तेजन व पुष्टि देणें.

[३] सभासद :—

(१) मंडळाचे पुढीलप्रमाणें सभासद असतील :—

वर्ग	वर्गणी तहाहयात	वर्गणी वार्षिक
अ) आश्रयदाता	रु. ३०००	रु. १५०
(आ) हितकर्ता	रु. १५००	रु. ७५
(ई) उपकर्ता	रु. ५००	रु. २५
(ऊ) साधारण वर्ग १	रु. २५०	रु. १२
(ऋ) साधारण वर्ग २	रु. १२५	रु. ६
(ऌ) साधारण वर्ग ३	रु. ५०	रु. ३

(२) कोणत्याही वयांत आलेल्या व्यक्तीस मंडळाचे कोणत्याही वर्गाचे सभासद होतां येईल. परंतु मंडळाचे उद्देश मान्य केल्याशिवाय, मंडळाची

घटना, नियम व पोटनियम यांस अनुसरण्याचें संमत केल्याशिवाय, त्या त्या वर्गाची वर्गणी आगाऊ दिल्याशिवाय, पूर्वींच सभासद् म्हणून प्रविष्ट झालेल्या दोन सभासदांकडून सूचित व अनुमोदित असल्याशिवाय आणि मंडळाच्या कारभारी मंडळाच्या सभेंत संमत झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस मंडळाचे सभासद् म्हणून रीतसर प्रविष्ट करून घेण्यांत येणार नाहीं.

(३) कोणत्याही संस्थेस मंडळाचे कोणत्याही वर्गाचे तहाहयात वा वार्षिक सभासद होतां येईल. परंतु अशा संस्थेस मंडळाचे तहाहयात सभासद् व्हावयाचें असल्यास तिच्या तहाहयात सभासदत्वाची मुदत फक्त वीस वर्षांची असेल व तीस साधारण वर्ग ३ चे तहाहयात सभासद् होतां येणार नाहीं. संस्थेस सभासद् म्हणून रीतसर प्रविष्ट करून घ्यावयाची पद्धति व निर्बंध, वरील पोटकलम (२) मध्यें निर्देशिलेल्या व्यक्तीस सभासद् म्हणून रीतसर प्रविष्ट करून घ्यावयाच्या पद्धति व निर्बंध याप्रमाणेंच असतील.

[४] सभासदांचे हक्क व अधिकार :—

मंडळाच्या सभासदांस पुढीलप्रमाणें हक्क व अधिकार राहतील:—

(१) **मताधिकार** :—मंडळाच्या सर्व सभासदांस मंडळाच्या सर्व वार्षिक वा विशेष साधारण सभांतुन मताधिकार असेल. मात्र हा मताधिकार पुढील नियम २२, २८, २९ व ३३ यांनीं मर्यादित राहील.

(२) **निवडणुकीस उमेदवारी** :—मंडळाच्या सर्व सभासदांस या घटनेंत नमूद् केल्याप्रमाणें त्या त्या प्रकारच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून उभें राहण्याचा अधिकार असेल.

(३) **वाचनालय** :—मंडळाच्या सर्व सभासदांस मंडळाच्या वाचनालयांत येऊन वाचन करण्याचा हक्क राहील.

(४) **ग्रंथालय** :—मंडळाच्या सर्व सभासदांस मंडळाच्या ग्रंथालयाचा कारभारी मंडळ ठरवील त्या नियमांन्वयें, उपयोग करण्याचा हक्क राहील.

(५) **प्रकाशनें** :- (अ), (आ) व (ई) या वर्गांच्या सभासदांस मंडळाचीं सर्वं प्रकाशनें विनामूल्य मिळतील. (ऊ) वर्गाच्या सभासदांस मंडळाचें एक प्रकाशन विनामूल्य मिळेल व इतर प्रकाशनें निम्या किंमतीस मिळतील. (ऋ) वर्गाच्या सभासदांस मंडळाचें एक प्रकाशन विनामूल्य मिळेल व इतर प्रकाशनें दोन-तृतीयांश किंमतीस मिळतील. (ऌ) वर्गाच्या सभासदांस मंडळाचें एक प्रकाशन विनामूल्य व इतर प्रकाशनें तीन-चतुर्थांश किंमतीस मिळतील. प्रकाशनाबाबतचे हे सभासदांचे हक्क, व्यक्तीस वा संस्थेस, रीतसर सभासद् झाल्याच्या

दफ्तरी वर्षापासूनच प्राप्त होतील. कोणतें प्रकाशन कोणत्या वर्षासाठीं धरावयाचें हें ठरविण्याचा अधिकार कारभारी मंडळाकडे राहील.

[५] **अध्यक्ष व उपाध्यक्ष :**–मंडळाचे एक अध्यक्ष व तीन उपाध्यक्ष असतील. या अध्यक्षांची व उपाध्यक्षांची निवडणूक वर्ग (अ) पासून (ई) पर्यंतच्या सभासदांमधून मंडळाच्या साधारण सभेंत सर्व वर्गातील सभासदांकडून केली जाईल.

[६] कारभारी मंडळ :–मंडळाच्या कारभाराची व्यवस्था पाहण्यासाठीं मंडळाचें एक कारभारी मंडळ राहील.

[७] कारभारी मंडळाचे सभासद :–मंडळाच्या कारभारी मंडळाचे सभासद पुढीलप्रमाणें राहतील :–

(अ) एक कार्याध्यक्ष,

(आ) एक खजिनदार,

(ई) नऊ साधारण सभासद,

(ऊ) (पुढील नियम ८ (३) च्या अनुसंधानानें) दोन पदसिद्ध सभासद, व

(ए) दोन स्वीकृत सभासद.

[८] कारभारी मंडळाची निवडणूक :–

(१) कारभारी मंडळाचे कार्याध्यक्ष व खजिनदार हे सभासद वर्ग (अ) पासून (ऊ) पर्यंतच्या सभासदांतून मंडळाच्या सर्व वर्गातील सभासदांकडून निवडण्यांत येतील. हे निवडावयाचे सभासद पुण्याचे रहिवासी असले पाहिजेत.

(२) कारभारी मंडळाच्या नऊ साधारण सभासदांपैकीं दोन सभासद वर्ग (अ) पासून (ई) पर्यंतच्या सभासदांतून, तीन सभासद वर्ग (ऊ) सभासदांतून व चार सभासद वर्ग (ऋ) व (ऌ) सभासदांतून, मंडळाच्या सर्व वर्गातील सभासदांकडून निवडले जातील.

(३) कारभारी मंडळानें या नियमासाठीं विशेष ठराव करून ' कायम संशोधक सेवक ' म्हणून नेमलेले मंडळाचे दोन सेवक हे कारभारी मंडळाचे पदसिद्ध सभासद राहतील.

(खुलासा : मंडळाचे असे सेवक हल्लीं दोनच आहेत. त्यांची संख्या पुढें वाढल्यास त्यांनीं आपणांमधून दोन प्रतिनिधि कारभारी मंडळाचे पदसिद्ध सभासद म्हणून निवडावे.)

(४) कार्याध्यक्ष, खजिनदार व नऊ साधारण सभासद मिळून अकरा सभासदांकडून मंडळाच्या कोणत्याहि वर्गातील सभासदांतून दोन सभासदांची

कारभारी मंडळाचे स्वीकृत सभासद म्हणून निवडणूक केली जाईल. ही निवड नव्या कारभारी मंडळाच्या पहिल्याच सभेंत होईल.

(५) राजीनामा, मृत्यु किंवा इतर कारणांमुळें कारभारी मंडळांत जागा रिकामी झाल्यास ती जागा मूळ ज्या प्रकारच्या सभासदांतून भरली गेली होती त्याच प्रकारच्या सभासदांतून कारभारी मंडळाकडून नेमणुकीनें भरली जाईल.

[९] चिटणिसांची नेमणूक :—वरील नियम ८ (४) मधील दोन सभासदांच्या स्वीकृतीनंतर कारभारी मंडळाकडून स्वतःच्या सभासदांतुन कोणाहि दोन आणि जरूर तर तीन सभासदांची कारभारी मंडळाच्या कारभारी मुदतीसाठीं संयुक्त चिटणीस म्हणून नेमणूक करण्यांत येईल. हे चिटणीस पुण्याचे रहिवासी असले पाहिजेत. नवीन चिटणिसांची नेमणूक होईपर्यंत जुने चिटणीस कामें करीत राहतील.

[१०] कारभारी मंडळाची मुदत :—कारभारी मंडळाच्या कारभाराची मुदत तीन वर्षांची राहील.

[११] कारभारी मंडळाच्या कारभारासाठीं नियम :—

(१) कारभारी मंडळाच्या सभेसाठीं पांच सभासदांचा गण राहील.

(२) एका वर्षांत कारभारी मंडळाच्या कमींत कमी सहा सभा भरतील.

(३) कारभारी मंडळास स्वतःच्या कारभारासाठीं या घटनेंतील साधारण नियमांस अविरोधी असे पोटनियम करण्याचा, स्वतःच्या कोणत्याहि विशिष्ट कार्यासाठीं पोटसमित्या नेमण्याचा व अशा समित्यांत स्वतःबाहेरील मंडळाचे सभासद सुद्धां नेमण्याचा अधिकार राहील.

[१२] कारभारी मंडळाचीं कामें व अधिकार :— कारभारी मंडळाचीं कामें व अधिकार येणेंप्रमाणें असतील :—

(१) सभासदास रीतसर प्रविष्ट करून घेणें किंवा तसें करण्याचें नाकारणें, सभासदांची त्यांच्या वर्गणीच्या आद्याप्रमाणें एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत बदली करणें, सभासदांचे राजीनामे मंजूर करणें, दोन किंवा अधिक वर्षांची वर्गणी बाकी असलेल्या सभासदांचीं नांवें पटावरून कमी करणें, देणग्या मिळविणें व स्वीकारणें, वस्तुरूपानें वर्गणी मिळविल्यास वा मिळाल्यास ती स्वीकारून व अशा वर्गणीची योग्य किंमत ठरवून त्याअन्वयें ती देणाऱ्यास योग्य त्या वर्गाच्या वार्षिक वा तहाहयात सभासदांत नोंदून घेणें.

[खुलासा—कारभारी मंडळास एकाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस सभासद करण्याचें नाकारणें झाल्यास तीं कारणें देण्याची जबाबदारी कारभारी मंडळावर राहणार नाहीं.]

(२) कोणत्याहि कारणामुळें रिकाम्या झालेल्या कारभारी मंडळांतील जागा त्या त्या वर्गातील सभासदांमधून नेमणुकीनें भरणें.

(३) मंडळाच्या वार्षिक साधारण सभेंत संमत झालेल्या आयव्ययाच्या अंदाजपत्रकाच्या मर्यादेंत मंडळाच्या उद्देशांच्या सफलतेसाठीं खर्च करणें.

(४) मंडळाच्या सभासदांच्या सभा भरविणें.

(५) मंडळाच्या शाखा उघडणें व समानहेतुक संस्था जोडून घेणें.

(६) भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठीं या घटनेंतील नियम २ (१) मध्यें उल्लेखिलेलीं साधनें गोळा करणें आणि त्यांचा संग्रह व संरक्षण करणें.

(७) मंडळाचे आयव्ययाचे हिशेब, जिंदगी व देणें-घेणें वा साहित्य यांची वेळोवेळीं तपासणी करण्यासाठीं योग्य त्या प्रकारचे तपासनीस नेमण्याबाबत मंडळाच्या साधारण सभांस शिफारस करणें.

(८) मंडळाच्या कारभाराचा वार्षिक अहवाल, मंडळाच्या वार्षिक आयव्ययाच्या हिशेबाचें व एकूण जिंदगीसंबंधाचें निवेदन (हिशेबतपासनीसांच्या अहवालासह), मंडळाच्या पुढील वर्षाच्या आयव्ययाचें अंदाजपत्रक हीं तयार करून साधारण सभेपुढें पसंतीसाठीं सादर करणें, मंडळाच्या एकूण मालमत्तेची व देण्याघेण्याची यथावत् स्थिति दर्शविणारीं निवेदनें (तपासनीसांच्या अहवालासह) तयार करून निदान तीन वर्षांतून एकदां साधारण सभांस त्यांच्या माहितीकरितां व सूचनांकरितां सादर करणें, मंडळाच्या ऐतिहासिक साधनसंभारासंबंधींचीं निवेदनें तयार करून त्रैवार्षिक साधारण सभांस त्यांच्या माहितीकरितां व सूचनांकरितां सादर करणें, मंडळाच्या सामानाची जंत्री (stock register) ठेवणें व ती वेळोवेळीं यथावत् स्वरूपांत राखणें.

(९) पाक्षिक व इतर सभांत वाचण्यासाठीं मंडळाकडे आलेल्या निबंधांचीं वाचण्यासाठीं व प्रसिद्धीसाठीं निवड करण्याकरितां व मंडळाच्या संग्रहांतील ऐतिहासिक कागदपत्रांचीं वा प्राचीन साहित्याची प्रसिद्धीसाठीं निवड करण्याकरितां तज्ज्ञांची एक खास समिति नेमणें.

(१०) या समितीनें पसंत केलेले निबंध स्वतःच्या प्रकाशनांतून किंवा इतरत्र प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणें, तसेंच या समितीच्या मंजुरीनें ऐतिहासिक कागदपत्रांचीं वा प्राचीन साहित्याचीं स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध करणें.

(११) मंडळाच्या उद्देशांच्या अभिवृद्धीस पोषक होतील असे ठराव तयार करणें व ते मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभांस सादर करणें.

(१२) मंडळासाठीं ऐतिहासिक कागदपत्रें व इतर साहित्य व निधि गोळा करणें, ऐतिहासिक कागदपत्रें व इतर साहित्य यांचा संग्रह व संरक्षण करण्यासाठीं आणि मंडळाच्या इतर कार्यासाठीं योग्य अशा इमारती उभारणें.

(१३) मंडळासारख्या इतर संशोधनसंस्थांशीं पत्रव्यवहार व सहकार्य करणें.

(१४) मंडळाचें कार्य चालविण्यासाठीं कार्यक्षम असा पगारी नोकरवर्ग ठेवणें व त्यांच्या योगक्षेमाची शक्य व योग्य ती तरतुद करणें, त्यांच्या नोकरीच्या अटी व त्यांचे हक्क व कर्तव्यें ठरविणें, त्यांच्या किरकोळ व इतर प्रकारच्या रजेचे नियम करणें व त्यांची अंमलबजावणी करणें, गैरवर्तनी नोकरांस तात्पुरते दूर करणें किंवा योग्य ती चौकशी करून इष्ट वाटल्यास काढून टाकणें.

(१५) मंडळाच्या साधारण सभेनें स्पष्ट शब्दांत जे अधिकार आपणांकडे राखून ठेवले नसतील असे सर्व अधिकार साधारण सभेतर्फे चालविणें.

विशेष तरतूद :—प्रत्येक वर्षी मागील वर्षाच्या आयव्ययाचे हिशेब व अहवाल आणि पुढील वर्षाच्या आयव्ययाचें अंदाजपत्रक यांस साधारण सभेची मंजुरी मिळाली पाहिजे. नव्या अंदाजपत्रकास साधारणसभेची मंजुरी मिळेपर्यंत आणि वर्ष संपून तीन महिनेपर्यंत नित्याचा खर्च शिरस्त्याप्रमाणें चालविण्याचा अधिकार कारभारी मंडळास राहील.

[१३] मंडळाच्या ऐतिहासिक सामग्रीसंबंधीं विशेष निर्बंध :— मंडळाचीं लिखितें, ग्रंथ, वस्तु, चित्रें, इत्यादि ऐतिहासिक सामग्री गहाण ठेवण्याचा, किंवा तिचे तारणावर कर्ज काढण्याचा, किंवा ती विकण्याचा अगर दान देण्याचा अधिकार कोणासहि रहाणार नाहीं. मात्र मंडळाजवळ दुबार असलेलीं चित्रें, वस्तु, ग्रंथ किंवा लिखितें, इत्यादिसारखी सामग्री बदलींत देऊन तिच्याबद्दल मंडळाजवळ पूर्वी नसलेली दुर्मिळ सामग्री मंडळासाठीं घेण्याचा अधिकार कारभारी मंडळास राहील. असा व्यवहार संपूर्ण तपशिलासह लिखित स्वरूपांतच झाला पाहिजे व त्याची स्वतंत्र नोंद कारभारी मंडळाच्या सभावृत्तांत कारभारी मंडळाच्या मंजुरीसह झाली पाहिजे.

[१४] कारभारी मंडळाच्या कामांत परिपत्राचा उपयोग :– जरूर पडेल तेव्हां कारभारी मंडळाचें काम परिपत्रानें करतां येईल.

[१५] कारभारी मंडळाची मागणी-सभा :–कारभारी मंडळाच्या निदान चार सभासदांकडून लेखी विनंति आल्यास दोन आठवड्यांचे आंत चिटणिसांनीं कारभारी मंडळाची विशेष सभा बोलाविली पाहिजे. मात्र अशा सभेची तारीख, वेळ, स्थळ व कार्यपत्रिका यांविषयीं सभासदांस निदान तीन पूर्ण दिवसांची स्पष्ट सूचना दिली पाहिजे.

[१६] चिटणिसांचीं कर्तव्यें :–चिटणिसांनीं मंडळाचा कारभार कारभारी

मंडळाच्या नियंत्रणाखालीं व देखरेखीखालीं चालविला पाहिजे. त्यांचीं कर्तव्यें पुढीलप्रमाणें असतील:—

(१) मंडळाच्या आयव्ययाचे हिशेब ठेवणें.

(२) मंडळाचा पत्रव्यवहार चालविणें.

(३) मंडळाच्या व कारभारी मंडळाच्या साधारण वा विशेष सभा भरविण्याची तजवीज करणें, त्या सभांपुढें योग्य तीं तीं कामें ठेवणें व अशा सभांचीं प्रतिवृत्तें ठेवणें.

(४) मंडळाच्या दैनंदिन कारभाराची व्यवस्था लावणें, मंडळाच्या नोकर-वर्गाच्या कामावर देखरेख करणें, त्यांस नेमून दिलेलीं कामें त्यांजकडून करवून घेणें, त्यांस किरकोळ रजा देणें व इतर प्रकारच्या रजांसंबंधीं कारभारी मंडळास शिफारस करणें, त्यांजकडून गैरवर्तन घडल्यास त्याबद्दल कारभारी मंडळाकडे निवेदन व योग्य ती शिफारस करणें.

(५) कारभारी मंडळानें करावयाच्या कामांबद्दल कारभारी मंडळाच्या आदेशाप्रमाणें वा जरूरीप्रमाणें कारभारी मंडळाचा आदेश अंदाजून कारभारी मंडळाच्या वतीनें योग्य ती व्यवस्था करणें व तीं कामें योग्य त्या स्वरूपांत कारभारी मंडळापुढें ठेवून त्यांस त्याची संमति मिळविणें.

(६) सर्वसाधारण रीत्या कारभारी मंडळ आज्ञापील त्याप्रमाणें इतर कामें करणें.

[१७] वार्षिक साधारण सभेचीं कामें :—मंडळाच्या सर्व वर्गाच्या सभासदांच्या वार्षिक साधारण सभेंत पुढीलप्रमाणें कामकाज केलें जाईल:—

(१) ऐतिहासिक आणि इतर संबद्ध विषयांवरील निबंध व व्याख्यानें यांची व्यवस्था करणें.

(२) ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तूंचें प्रदर्शन करणें.

(३) मंडळाच्या कारभाराचा वार्षिक अहवाल, मंडळाच्या वार्षिक आय-व्ययाच्या हिशेबाचें व एकूण जिंदगीसंबंधींचें निवेदन (हिशेबतपासनिसांच्या अहवालासह) व पुढील वर्षाचें आयव्ययाचें अंदाजपत्रक या, कारभारी मंडळानें पुढें ठेवलेल्या, कामांचा विचार करून त्यांसंबंधीं योग्य ते ठराव करणें.

(४) मंडळाच्या एकूण मालमत्तेचीं व देण्याघेण्याचीं यथावत् निवेदनें व मंडळाच्या ऐतिहासिक साधनसंभारासंबंधींचीं निवेदनें या, कारभारी मंडळानें पुढें ठेवलेल्या, त्रैवार्षिक कामांची दखल घेऊन त्यांसंबंधीं कारभारी मंडळास योग्य त्या सूचना करणें.

(५) मंडळाच्या वार्षिक आयव्ययाच्या हिशेबांचीं व जिंदगी आणि देणें-घेणें यासंबंधींचीं कारभारी मंडळानें तयार केलेलीं निवेदनें तपासून त्यासंबंधीं अहवाल तयार करण्यासाठीं कारभारी मंडळाच्या शिफारसींचा विचार करून हिशेबतपासनीस नेमणें व मंडळाच्या साहित्याची तपासणी करून त्याबाबत अहवाल तयार करण्यासाठीं कारभारी मंडळाच्या शिफारसींचा विचार करून योग्य ते तपासनीस नेमणें.

(६) मंडळाच्या उद्देशास पोषक व अभिवृद्धिकारक असें इतर कामकाज करणें.

[१८] मंडळाच्या सभेची सूचना व कार्यपत्रिका :- मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभेची लेखी सूचना मंडळाच्या प्रत्येक सभासदास सभेच्या पूर्वी निदान एक पूर्ण पंधरवडा पोंचेल अशी पाठविली पाहिजे. या सूचनेंत सभेची वेळ, स्थळ व कार्यपत्रिका स्पष्टपणें दाखल केली पाहिजे. सभेच्या कार्यपत्रिकेंत अंतर्भूत न केलेलें कोणतेंहि कामकाज सभेच्या अध्यक्षांचे परवानगीवांचून त्या सभेंत करतां येणार नाहीं.

[१९] मंडळाच्या सभेचा गण :- मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभेस मतदानास पात्र अशा कमींत कमी वीस हजर सभासदांचा गण समजला जाईल.

[२०] मंडळाच्या सभांचें नियमन :-मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभांत मंडळाचे अध्यक्ष हे अध्यक्षस्थानीं राहतील. त्यांचे गैरहजेरींत मंडळाच्या हजर उपाध्यक्षां-पैकीं ज्येष्ठ सभासद अध्यक्ष होतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरींत मंडळाच्या (अ) पासून (ऊ) पर्यंतच्या वर्गातील हजर सभासदांतून सभेनें निवडलेला कोणीहि सभासद अध्यक्ष होईल.

[२१] अध्यक्षांचें निर्णायक मत :-मंडळाच्या किंवा कारभारी मंडळाच्या सभांत मतांची समसमान वांटणी होईल. त्या प्रसंगीं अध्यक्षांस स्वतःच्या वैयक्तिक मताशिवाय आणखी एक निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

[२२] मताधिकार :-मतदानास पात्र असलेल्या मंडळाच्या सर्व वर्गांच्या सभासदांस मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभांत विचारासाठीं पुढें आलेल्या सर्व कामकाजावर मत देण्याचा अधिकार राहील. मात्र सभासदांस त्यांस मंडळांत ज्या तारखेस रीतसर प्रविष्ट करून घेतलें असेल त्या तारखेपासून एक पूर्ण वर्षपर्यंत मत देण्याचा अधिकार असणार नाहीं. तसेंच हा नियम पुढील नियम २८, २९ व ३३ यांनीं मर्यादित राहलि.

[२३] मंडळाची विशेष सभा :-कारभारी मंडळाच्या दिग्दर्शनानुसार मंडळाच्या विशेष साधारण सभा जरूर तेव्हां चिटणिसांनीं बोलवाव्या.

[२४] मंडळाची मागणी-सभा :-कमींत कमी पंचवीस सभासदांनीं मंडळाच्या

विशेष साधारण सभेची लेखी मागणी केल्यास अशा मागणीच्या पोंचेच्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत मंडळाची विशेष साधारण सभा चिटणिसांनीं बोलाविली पाहिजे. याहि सभेच्या बाबतींत या घटनेंतील नियम १८ मधील निर्बंधांचें पालन केलें जाईल.

[२५] मंडळाची तहकूब सभा :–गणाभावीं तहकूब झालेल्या मंडळाच्या वार्षिक वा विशेष साधारण सभांस किंवा कारभारी मंडळाच्या सभांस गणपूर्तीची गरज असणार नाहीं. गणाभावीं तहकूब झालेली मंडळाची वार्षिक वा विशेष साधारण सभा त्याच दिवशीं व स्थळीं मूळ नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासानें घेतां येईल. परंतु तसा स्पष्ट उल्लेख मूळ सभेच्या सूचनापत्रकांतच केलेला असला पाहिजे. कार्यपत्रिकेंत दाखल नसलेलें कोणतेंहि कामकाज तहकूब सभांत करतां येणार नाहीं.

[२६] मंडळाच्या जिंदगीसंबंधीं निर्बंध :–कारभारी मंडळाच्या विशेष परवानगी-शिवाय मंडळाचीं साधनें व दुर्मिळ पुस्तकें मंडळाच्या वास्तूंतून बाहेर नेतां येणार नाहींत.

[२७] मंडळाचें दफ्तर पाहण्यास परवानगी :–मंडळाच्या कोणाहि सभासदास कारभारी मंडळाकडे अर्ज करून मंडळाचें कचेरी दफ्तर कचेरीच्या वेळांत चिटणिसांच्या सोयी सांभाळून पाहतां येईल.

[२८] आगाऊ वर्गणी :–मंडळाच्या नियत कारभारी वर्षाच्या आरंभींच्या तीन महिन्यांच्या आंत सभासदांनीं आपापल्या वर्गण्या नियमाप्रमाणें रीतसर भरल्या पाहिजेत. त्या तशा न भरल्यास अशा सभासदांस बाकीदार सभासद समजण्यांत येईल.

[२९] बाकीदारांस हक्क नाहींत :–कोणतीहि वर्गणी बाकी असलेल्या कोणाहि सभासदास सभासदत्वाचे कोणतेहि हक्क व अधिकार राहाणार नाहींत. मात्र बाकी भरल्या-बरोबर पुनश्च सभासदत्वाचे सर्व हक्क व अधिकार त्यास प्राप्त होतील.

[३०] मंडळाचे कायदेशीर प्रतिनिधि :–कारभारी मंडळानें या नियमासाठीं मुद्दाम नेमलेले मंडळाचे एक संयुक्त चिटणीस मंडळाच्या सर्व कायदेशीर व्यवहारांत मंडळाचे प्रतिनिधि समजण्यांत येतील. मंडळाचे सर्व कायदेशीर व्यवहारांतहि मंडळाच्या इतर व्यवहारांप्रमाणेंच हे चिटणीस कारभारी मंडळाच्या दिग्दर्शनान्वयेंच मंडळाचें कामकाज करतील.

[३१] मंडळाचें कारभारी वर्ष :–मंडळाचें कारभारी (दफ्तरी) वर्ष चैत्र शुद्ध प्रतिपदेस सुरू होईल आणि फाल्गुन वद्य अमावास्येस समाप्त होईल.

[३२] मंडळाच्या कारभाराची भाषा :– मंडळाचें कामकाज साधारणपणें मराठींतून चालेल.

[३३] घटनेंत बदल :–इ. स. १८६० च्या २१ व्या कायद्यांतील कलमांच्या कक्षेंत राहून प्रस्तुत घटनेंत मंडळाच्या (अ), (आ), (ई), (ऊ), व (ऋ) वर्गांच्या

कोणत्याहि, व (ल) वर्गाच्या तहाह्यात, सभासदांपैकीं हजर व मतदानास पात्र असलेल्या सभासदांच्या तीनपंचमांश बहुमतानें बदल करतां येईल व तींत तो घालतां येईल. घटनेंत बदल करावयाचा झाल्यास त्यासाठीं वर निर्दिष्ट केलेल्या वर्गाच्या सभासदांची विशेष सभा बोलावली पाहिजे.

[३४] तहाहयात सभासदांचे हक्क:–पूर्वीच्या घटनेप्रमाणें नोंदलेल्या कोणत्याहि वर्गाच्या तहाह्यात सभासदांस त्या घटनेप्रमाणें जे हक्क प्राप्त झाले होते ते त्यांचे हक्क ही दुरुस्त घटना अमलांत आल्यानंतरहि चालू राहतील. परंतु पूर्वीच्या वार्षिक व नवीन तहाहयात व वार्षिक सभासदांचे हक्क मात्र ही दुरुस्त घटना अमलांत आल्यानंतर तींतील तरतुदींप्रमाणेंच नियमित होतील.

मुद्रक : **केशव गणेश शारंगपाणी**, आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

प्रकाशक : **शं. ना. जोशी व ग. ह. खरे**, चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ, ३१३ अ सदाशिव, पुणें २.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.

—मंडळ प्रकाशन सूची—

स्वीय ग्रंथमाला

१ अहवाल (शक १८३२) रु. ३
२ ,, (शक १८३३) ५
३ सुबंतविचार (वि.का.राजवाडे) संपलें १०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (वि. का. राजवाडे) १ऽ८
६ प्रथम संमेलनवृत्त (शक १८३५) ऽ१२
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६
८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ऽ८
१४ ग्रंथराज (दासोपंत) ऽ८
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ऽ१२
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ऽ१२
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३
१८ चतुर्थ-संमेलनवृत्त (शक १८३८) ४
१९ राजवाडे-खंड स्थलसूची ४
२० पंचम संमेलन-वृत्त (शक १८३९) ३
२१ संशोधनसंग्रह (छापत आहे)
२२ चंद्रचूड-दप्तर, कलम १ (द. वि. आपटे) ३
२३ महाराष्ट्र–सारस्वत, आ. १ ली (वि. ल. भावे) संपली १०
२४ षष्ठ संमेलन-वृत्त (शक १८४०) ४
२५ सप्तम संमेलन-वृत्त (शक १८४१) ३
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ऽ४
२७ मंडळ प्रदर्शनपरिचय ऽ४
२८ फारसी पत्रव्यवहार (गं. ना. मुजुमदार) ५
२९ फारसी–मराठी कोश (मा. त्र्यं. पटवर्धन) ४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला (रु. वा. पुरंदरे) १॥
३१ Historical Miscellany १
३२ पुरंदरे-दप्तर, भाग १ (रु. वा. पुरंदरे) ४
३३ शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४
३४ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २
३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ संपला
३६ राजारामचरितम् मूळ संस्कृत (वा. सि. बेंद्रे) १॥
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १
३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ संपला १॥
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही (वा. सि. बेंद्रे) ४
४० ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ (ग. ह. खरे) १॥
४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २
४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १॥
४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ऽ८
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ (शं. ना. जोशी) २॥
४५ विजयनगर स्मारक ग्रंथ (करमरकर व ओतुरकर) ४
४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ (ग. ह. खरे) १॥
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग.ह.खरे) १॥
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (शं. पु. जोशी) ऽ१२

४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी), भा. १ (पां. भी. देसाई) १॥
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७ (रु. वा. पुरंदरे व ब. द. आपटे) १॥
५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (ग. ह. खरे) १॥
५२ } शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३ (१)
५३ } फार्सी विभाग,(ग. ह. खरे), प्रत्येकीं १।
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं. ग. कर्वे) १
५४ अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खं. ३ संपला
५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १॥
५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ संपला
५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ४ २
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य, खंड १ १॥
५८ शिवकालीन दंडनीति (वा. सि. बेंद्रे) ३
५९ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड, २ (चिं. ग. कर्वे) १॥
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १ १॥
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ५ १॥
६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९ १॥
६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ६ १॥
६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ३ २
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ (चिं. ग. कर्वे) १॥
६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खं. ७ २
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खं. २ ३
७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार (शां. वि. अवळसकर) ३
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ४ २॥
७३ पेठे दप्तर, भाग १ (वि. सि. चितळे) ३
७४ Explorations at Karad 5
७५ संभाजीकालीन पत्र-सारसंग्रह व शकावली (शं. ना. जोशी) ३
७६ दाक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४ (ग. ह. खरे) ३
७८ पेठे दप्तर, भाग २ (वि. सि. चितळे) ३
७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (इ. १८२२-१८५४) (प्रा. रा. वि ओतुरकर) ३
८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २
८१ दाभाडे दप्तर, खं. १ (शं. ना. जोशी) ३
८२ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ (मो. गं. दीक्षित) ३
८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ २
८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५
८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८ ३
८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १० ३
८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ९ ३
८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध खं. ६ ५

मंडळ-त्रैमासिक पुस्तकें १ ते ३४ प्रत्येकीं ५ रु.

शिवचरित्रग्रंथमाला (स्वीय)

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १	३॥	५ शिवचरित्रनिबंधावली	३॥
२ " " खंड २	३॥	६ चित्रमय शिवाजी	१
३ शिवाजी निबंधावली, खंड १	३॥	७ इंग्लिश रेकॉर्ड्स् ऑन शिवाजी	१२
४ शिवाजी निबंधावली, खंड २	३॥		

सूचना: स्वीयमालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल.
२५-५० रु. = १० टक्के; ५१-१०० = १२॥ टक्के १०१ व पुढें = १५ टक्के.

भारत–इतिहास–संशोधक मंडळ

वर्ष ३७] त्रैमासिक [अंक १–४

(१४५–१४८)

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
१० वा खंड

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA

Vol. XXXVII } QUARTERLY { Nos. 1–4

(145–148)

Miscellaneous Sources of Indian History, Vol. X

शक १८७८] किंमत ५ रु. Price Rs. 5 [A. D. 1956–57

निवेदन

मंडळाचें छत्तिसाव्या वर्षाचें त्रैमासिक गेल्या वैशाखांत म्हणजे फार उशिरां प्रकाशित झालें. हें सद्तिसाव्या वर्षाचें त्रैमासिक आहे. यासहि उशीर झाला. अडतिसाव्या वर्षाचें त्रैमासिक येत्या आषाढापूर्वी प्रकाशित करावें असा हेतु आहे. प्रस्तुत त्रैमासिकाच्या जोड अंकांत पेशवेकालीन साधनें प्रकाशित झालीं असल्यानें यास 'ऐतिहासिक संकीर्ण साहित्य १० वा खंड' असें नांव दिलें आहे. यांत दुसऱ्या बाजीरावाच्या काळांतलीं आणि कोंकणांत मिळालेलीं साधनें प्रकाशित केलीं आहेत. श्री. शां. वि. आवळसकर मराठी इतिहासाचे एक साक्षेपी संशोधक, संग्राहक व संकलक आहेत हें मंडळसभासदांना तरी नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्यांचा कोंकणांतील मराठी इतिहासाचीं साधनें जमविण्याचा उद्योग आज कित्येक वर्षें अव्याहत चालू आहे. त्यांनीं जमविलेल्या सामग्रीचीं तीन पुस्तकें मंडळानें आजवर प्रकाशित केलीं असून हें चवथें आहे. या पुस्तकाच्या, प्रुफें तपासण्यासुद्धां, संपादनाचें सर्व काम त्यांनींच केलें आहे. याबद्दल मंडळास अतिशय संतोष वाटतो. येवढेंच नव्हे तर या प्रकाशनाचा आर्थिक भारहि अंशतः त्यांनीं उचलला असल्यानें त्या संतोषांत अधिकच भर पडते.

दुसऱ्या बाजीरावकालीन इंग्रजी साधनें इतकीं व अशा प्रकारचीं उपलब्ध तसेंच प्रकाशित झालीं आहेत कीं, त्यापुढें आमचीं मराठी साधनें फिकीं पडतात. पण याच मुद्यावर कोणी केवळ इंग्रजी साधनांवरून या काळाचा इतिहास लिहूं पाहील तर तो निःसंशय एकांगी होईल. घटनांचे इंग्रजी साधनांतील अर्थ वेगळे आणि मराठी साधनांतील त्याच घटनांचे अर्थ वेगळे असें अनेक ठिकाणीं असण्याचा संभव आहे. तसेंच कित्येक लहानमोठ्या घटना व त्यांचे अर्थ केवळ मराठी साधनांमुळेंच माहीत होतात. म्हणून मराठी साधनेंहि उपलब्ध करून देणें आवश्यक आहे. या दृष्टीनें अशा प्रकारच्या प्रकाशनांकडे पहावयाचें आहे.

मंडळानें योजनापंचकाचें एक मोठें काम हातीं घेतलें आहे हें छत्तिसाव्या वर्षाच्या निवेदनांत सांगितलें आहेच. शक्य त्या त्वरेनें तें काम संपवावें असा प्रयत्न चालू आहे.

मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक बरीच लांबली. तीहि त्वरेनें संपवून श. १८७९ पासून मंडळकारभार नव्या कारभारी मंडळाकडे सोपवावा असा प्रयत्न चालू आहे. एतद्विषयक पत्रक सोबत आहे. त्याकडे सभासद अवश्य लक्ष देतील अशी आशा आहे.

श. १८७८ माघ शु.१०, ता.१०।२।५७

चिटणीस

प्रकाशक : **श्री. शं. ना. जोशी** व **श्री. ग. ह. खरे**, चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ, ३१३अ, सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : **केशव गणेश शारंगपाणी**, आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

प्रस्तावना

कोंकणच्या इतिहासाच्या साधनांचा हा ' दुसरा बाजीराव खंड ' वाचकांस सादर करण्यांत मला आनंद होत आहे. कोंकणांतील ऐतिहासिक साधनें नकलून घेत असतांना दुसऱ्या बाजीरावाचे कारकिर्दीबद्दल माहिती सांगणारीं सुमारें दोनशें तत्कालीन पत्रें हातीं आलीं; त्यांतील एक्यायशीं येथें प्रसिद्ध होत आहेत. उरलेलीं साधनेंहि केव्हां तरी वाचकांच्या पुढें ठेवण्याची आशा मी बाळगून आहे. याशिवाय, इ. स. १६९५ ते १७९५ पर्यंतच्या इतिहासाचीं शेंकडों साधनें मजजवळ पडून आहेत; त्यांचेंही प्रकाशन होईल अशी आशा करावयास हरकत नाहीं. भारत इतिहास संशोधक मंडळानें हीं साधनें प्रसिद्ध करण्यास मम म्हटलें, याबद्दल मी मंडळाचा ऋणी आहे. भारताच्या इतिहासाचीं साधनें अमूप आहेत; पण तीं प्रकाशांत आणणाऱ्या संस्थांची उणीव आहे. हीं साधनें प्रकाशित कशीं होतील व राष्ट्राच्या इतिहासांचें सत्य स्वरूप कसें उघड होईल, याबद्दलचीच काळजी संशोधकांस वाटत असते. सरकारनेंच याबाबत कांहीं तरी निश्चित योजना आखून हें काम तातडीनें उरकावयास पाहिजे, अशी वस्तुस्थिति आहे. पण सरकारला वेळ नाहीं व याबद्दल फारशी आस्था नाहीं.

येथें प्रसिद्ध होत असलेल्या साधनांची उपलब्धि अनेक ठिकाणच्या सद्गृहस्थांच्या दप्तरांतून झाली आहे; त्यांचा तक्ता पुढें देतों:—

(१) **तळें**– श्री० रामचंद्र विठ्ठल भट– ले. १. (२) **पोलादपूर**– कै० रावजी गोविंद चित्रे– ले. २, ९, १२, १६, २२, २३, २७ ते २९, ४९, ६४, ७५, ७७, ७८ व श्री० विष्णुपंत चित्रे– ५९, ७२, ८१. (३) **चौल**– कै० वासुदेवराव अधिकारी–ले. ४, ६, ६३. (४) हुजूर **रेकॉर्ड्स् जंजिरा**–ले. ३, ७, ८, १०, १३ ते १५, १९, २०, २४ ते २६, ४७, ४८, ७१, ७३, ७४. (५) **वाळण बुद्रुक**– श्री. तुकाराम झुरू कालगुडे– ले. ५ (६) **अलीबाग**– श्री. केशवलाल मोदी– ले. ११. (७) **विन्हेरें**– श्री० शिवाजीराव व बाबूराव दळवी– ले. १७, १८, २१, ३० ते ३९; ४१ ते ४६, ५० ते ५४, ५६, ५७, ६० ते ६२, ६५ ते ७०, ७९, ८०. (८) **वरंध**– श्री. विष्णु रामचंद्र देशमुख– ले. ४०, ७६. (९) **नांदवी**– श्री० सुभेदार आबा सावंत– ले. ५५. (१०) **महाड**– श्री० यशवंतराव टिपणीस–ले. ५८.

वर उल्लेख केलेल्या व्यक्तींच्या साह्याबद्दल मी त्यांचा सादर आभारी आहे. जंजिरा संस्थान भारतांत विलीन झाल्यावर तेथील ' हुजूर रेकॉर्ड्स्' ही मुंबई सरकारची मालमत्ता झाली. या दप्तरांतील साधनें पहाण्यास व नकलून घेण्यास मला मुंबई सरकारचे डायरेक्टर ऑफ आर्काइव्ज व हिस्टॉरिकल मॉन्युमेंट्स् डॉ. पी. एम्. जोशी व अन्य अधिकारी मंडळी यांनीं संमति दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

दुसऱ्या बाजीरावाची कारकिर्द तपशीलवार सांगणारीं साधनें इंग्रजींतुन फार मोठ्या प्रमाणावर प्रकाशित झालीं आहेत. त्यांच्या अभ्यासानें आपणांस इ. स. १७९६ ते १८१८ या तेवीस वर्षांच्या काळांतील इतिहासाची कल्पना येते. पण या साधनांतुन आपल्याला जो दृष्टिकोन समजतो, तो इंग्रजांचा म्हणजे तत्कालीन शत्रु किंवा मराठ्यांच्या

प्रतिस्पर्धी सत्तेचा आहे. शत्रुराष्ट्राचा दृष्टिकोन नेहमींच दूषित असतो व त्या दृष्टिकोनांत पराभूत होणाऱ्या राष्ट्रांतील दोषांचें चित्र अतिरंजित केलेलें असतें, ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. अशा साधनांवरून कळणाऱ्या इतिहासाची मातबरी कोणी मानीत नाहीं. इंग्रजींतून प्रसिद्ध झालेलीं साधनें ही भारताच्या इतिहासाची, फार तर, एक बाजू होऊं शकेल. त्यामुळें मराठी साधनें प्रसिद्ध होण्याची जरूरी वाढते. थोडें अतिरिक्त विधान असें करतां येईल कीं इंग्रजी साधनें साक्षेपानें प्रसिद्ध झालीं, म्हणूनच मराठी साधनें प्रसिद्ध करण्याची जरूरी तीव्रतर झाली आहे.

म्हणूनच कै० खरेशास्त्री यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या मराठ्यांचा दृष्टिकोन सांगणाऱ्या पत्रांचें वाचकांस महत्त्व वाटतें. पण खरेशास्त्र्यांच्या ग्रंथांत कोंकणविषयक साधनें थोडींच प्रसिद्ध झालीं आहेत; म्हणून, ज्यांतून कोंकणविषयक इतिहास समजेल अशीं साधनें वाचकांपुढें ठेवण्याची जरूरी निश्चितच आहे; या विचारप्रणालींतून हें पुस्तक निर्माण झालें आहे. गायकवाड, शिंदे, होळकर, यांच्या दप्तरांतील साधनें प्रसिद्ध झालीं आहेत; पण त्यांतही कोंकणविषयक मजकुराचा अभाव ठळकपणें जाणवतो हें ध्यानीं घेतलें म्हणजे कोंकणच्या इतिहासाचीं साधनें शोधण्याच्या खटाटोपाची जरूरी उघड होते. कोंकणांत संस्थानें नाहींत, म्हणून दप्तरें एकत्र मिळण्याची सोय नाहीं. ठिकठिकाणीं हिंडून, गळ घालून, विश्वास उत्पन्न करून, पदरमोड करूनच हें कार्य करावें लागतें व तसें करण्यांत अनेक वर्षें मीं घालविलीं आहेत. खाजगी व्यक्तींचीं दप्तरें तपासण्याची परवानगी मिळविणें हें एक दिव्य असतें. कांहीं दप्तरें किलकिलीं होण्यास अक्षरशः तपश्चर्या करावी लागली. येथें प्रसिद्ध होत असलेले कांहीं कागद नकलण्याची परवानगी मिळण्यासाठीं मला सात वर्षें खटपट करावी लागली; पण हें काम मीं इतिहासावरील प्रेमानें प्रेरित होऊन केलें आहे. त्याबाबत माझी तक्रार नाहीं; फक्त वस्तुस्थिति दिग्दर्शित केली आहे.

आपल्या इतिहासाचीं साधनें सर्वत्र विखुरलीं असून कोणत्या प्रदेशांतील साधनें कोठें गवसतील याबद्दल धरबंध उरलेला नाहीं. चौल हा आंगऱ्यांचा गांव; पण तेथें गायकवाडींतील गंगाधरशास्त्री पटवर्धनांबद्दल पत्रें पहावयास मिळालीं! विन्हेरें हा गांव रायगडापासून वीस मैलांवर कुलाबा जिल्ह्यांत आहे; तेथें व्यारें, सोनगड, धरमपूरकडील इतिहासाचीं साधनें उपलब्ध झालीं!! पोलादपूर हें गांव महाडपासून केवळ अकरा मैलांवर आहे. तेथें कोंकणच्या इतिहाससाधनांबरोबर गुजराथच्या इतिहासाचीं साधनें व तींही अस्सल स्वरूपांत आढळून आलीं. इतिहाससंशोधन करीत असतांना या साधनांस डावलून पुढें जाणें शक्य नाहीं; कारण प्रादेशिक इतिहास शोधावयाचा, तो तरी राष्ट्रीय इतिहास परिपूर्ण करण्यासाठींच ना! मग तीं साधनें बाजूस टाकून कसें चालेल? यामुळें, या लहानशा पुस्तकांत गुजराथ, पुण्याकडील महाराष्ट्र व प्रत्यक्ष कोंकण या तीन प्रदेशांचीं साधनें एकत्र आलीं आहेत हें वाचकानीं ध्यानीं आणावें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूबद्दल प्रभाकर शाहिरानें जो दीर्घ पोवाडा लिहिला आहे,

त्यांत बाजीरावाबद्दल एका वाक्यांत निर्देश केला आहे. ‘इथुन अतां प्रारंभ दिसंदिस अद्भुत प्रलयाला !’ या वाक्यांत मराठ्यांच्या शेवटच्या तेवीस वर्षांच्या इतिहासाचें सार आलें आहे, असें मानावयास हरकत नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत त्या अपेशी कारकिर्दीबद्दलचीं साधनें प्रसिद्ध होत आहेत. इसवी १८०० ते १८०५ या कालांत सुरत अठ्ठाविशींत आणि तींत असलेल्या संस्थानांवर असलेली मराठी सत्ता उत्तरोत्तर कशी दुबळी होत गेली, याचें दिग्दर्शन करणारीं कॅप्टन हॉर्टन व हणमंतराव दळवी हवालदार किल्ले पारनेरा यांचीं अनेक पत्रें येथें दिलीं आहेत. वसईच्या कुप्रसिद्ध तहानंतर लवकरच मराठे किल्लेदार, कमाविसदार व सुभेदार यांना या प्रदेशांतुन आपलें चंबूगबाळें आटपून मराठी प्रदेशांत यावें लागलें. या प्रदेशांत केवढी दैना उडाली याचें चित्र सोनगडच्या एका पत्रांत नमूद करण्यांत आलें आहे. सोनगडचा किल्ला मोडकळीस आला, तेथें धान्य नाहीं, दारूगोळा नाहीं व अधिकाऱ्यांना त्याची फिकीर नाहीं, असा स्पष्ट मजकूर सांगणारीं पत्रें या पुस्तकांत आलीं आहेत. गुजराथच्या इतिहासाचें एतत्कालिन भयानक चित्र मुळांतून वाचकांनीं पहावें. ले. ५९ हें प्रदीर्घ पत्र गायकवाडींतील सैन्याची हलाखी सांगतें. सैन्यास अनेक महिन्यांचे रोजमुरे नाहींत, पगार थकला आहे, बेदिली माजली आहे व संस्थानिक कर्जबाजारी झाल्यामुळें पुढील वर्षाचे शेतसारे व ऐवज वसूल केल्याचे स्पष्ट निर्देश या पत्रांत आहेत. फणसे मंडळी ही गायकवाडांची कारभारी मंडळी. त्यांना इंग्रजांच्या कच्छपी कां लागावें लागलें, याची उपपत्ति वरील पत्राच्या वाचनानें लागते. गायकवाडांतील सयाजीराव, गोविंदराव इत्यादिकांचे चुरशीचे संबंध या पत्रांतुन आले आहेत; भिल्ल आणि मुने यांच्या उपद्रवाचे उल्लेख आले आहेत; जकातीच्या भानगडी–भांडणें आहेत.

चित्रे दप्तरामधील मजकूर प्रामुख्यानें कोंकणच्या व पुण्याकडील महाराष्ट्राच्या इतिहासाशीं निगडित आहे. पुण्याजवळील शिंदेहोळकरांची लढाई, शिंद्यांचा पराभव, बाजीराव आणि चिमाजीआप्पा यांचें पलायन, त्यांचे बीरवाडी, महाड, नळें येथील मुक्काम, त्यांचें वसईस जाणें, त्यांचेबरोबर वसईस इंग्रजांकडे गेलेली मंडळी, मातुश्री यशोदाबाईचें रायगडावर रहाणें, होळकराच्या सैन्याचें रायगडच्या परिसरांत आगमन, बाळण येथें तीन सैन्यांचे युद्धाच्या तयारीनें मुक्काम, यांबद्दलचा मजकूर क्रमवार समजण्यास चित्रेदप्तरांतील कागदांचा उपयोग होईल. कै. खरेशास्त्री यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतुन या प्रकरणीं कांहीं मजकूर आला आहे. इतिहासलेखन न्यायाधिशाच्या निःपक्षपाती दृष्टींतुन व्हावें, यासाठीं अनेक साक्षीदारांच्या साक्षी–कैफियती इतिहासकारापुढें असल्या पाहिजेत. अनेक ठिकाणच्या लेखकांनीं एक गोष्ट निश्चित झाल्याचें सांगितलें, म्हणजे ती गोष्ट झाली, असें मानण्याची पद्धति आहे. प्रत्यंतर पुराव्याचें महत्त्व इतिहासांत फार आहे व हा प्रत्यंतर पुरावा सादर करणारा लेखक स्वतंत्र असला पाहिजे असा सिद्धांत आहे. येथें प्रसिद्ध होणारा मजकूर प्रत्यंतराचा स्वतंत्र पुरावा म्हणून मान्य करण्यास प्रत्यवाय नाहीं, इतक्या तोलाचा आहे. शिवाय हा पुरावा त्या

त्या वेळींच नोंद्ला गेलेला असल्यानें त्यास महत्त्व आहे. बाजीरावाच्या पलायनाचा मुक्कामांसह मार्ग, बीरवाडीच्या रयतेची त्रेधा या पत्रांतून स्पष्ट दिग्दर्शित झाली आहे.

हुजूर रेकॉर्डस्‌मधील साधनांचें महत्त्व तर फार मोठें आहे. पेशवेकालांत पुण्यास निरनिराळ्या सत्तांचे वकील आपल्या विवाद्य मुद्यांचा फडशा करून घेण्यासाठीं रहात असत. जंजिऱ्याच्या शिद्दीचे असे मुद्दे असत आणि नसल्यास उत्पन्न करण्याचा नाठाळपणा शिद्दीमध्यें भरपूर होता. शिद्दीच्या प्रदेशास लागून तीन बाजूंनीं मराठी प्रदेश असल्यानें शिद्दीचा वकील पुण्यास असावयाचाच! ज्या काळांतील साधनें येथें प्रसिद्ध होत आहेत, त्या काळांत राघो बहिरव, भिकाजी नाईक व वामनराव जनार्दन हीं तीन माणसें शिद्दीच्या वतीनें पुण्यास वावरतांना दिसतात. यांपैकीं वामनराव जनार्दन हा वकील आहे. या तिघांचीं पत्रें मोठीं मासलेवाईक आहेत. बाजीरावाच्या कारकिर्दींत शिद्दीनें पोलादपूर, रायगड, नातें, देवळें इ. अनेक जागीं जाळपोळ केली; त्याबद्दलचे कागदपत्र येथें प्रसिद्ध झाले आहेत. शिद्दीनें धर्मांतराचें कार्य चालवावें म्हणून वामनराव जनार्दन त्यास प्रोत्साहन देत असल्याचा प्रकार तर मति गुंग करून सोडणारा आहे! रेवदंड्याच्या किल्ल्यास शिड्या लावून तो घेण्याच्या प्रयत्नांबाबत, कैदी सोडण्यासाठीं ऐवज व ऐनजिनसी खंड मिळण्याबाबत, शिद्दीनें केलेल्या प्रयत्नांचीं टिपणें या लेखांत अंतर्भूत झालीं आहेत. बापू गोखल्याची वासोट्यावरील स्वारी या पत्रांत आली आहे.

या लहानशा पुस्तकांत ऐतिहासिक गोष्टींची विविधता आढळून येईल. अमृतराव पेशवे, बळवंतराव नागनाथ, दौलतराव शिंद्याच्या हालचाली, यांबद्दलही उल्लेख आढळतील. आलीबागच्या मोदी घराण्यांतील एकच लेख येथें प्रसिद्ध केला आहे. आंगऱ्यांना लागणाऱ्या वस्तु मोदी यांनीं कोणत्या अटींवर पुरवावयाच्या याबद्दलचा हा लेख महत्त्वाचा आहे. तसेंच, अगदीं आरंभींची तळें शकावली स्थानिक इतिहासाचे दृष्टीनें महत्त्वाची आहे. इतिहासांत राजकारणाइतकेंच समाजकारणास महत्त्व असल्यानें ही शकावली धार्मिक परिस्थितीबाबत उद्‌बोधक म्हणून अभ्यसनीय आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील सर्व मजकूर वाचकांपुढें ठेवण्याचें श्रेय जरी माझें एकट्याचें असलें, तरी या साधनांच्या अभ्यासांत मला श्री. ग. ह खरे यांची बहुमोल मदत झाली आहे. जंजिऱ्याच्या शिद्दीच्या वकिलांनीं पुण्याहून लिहिलेलीं पत्रें स्वरूपानें थोडीं वेगळीं आहेत; त्यांतून फार्सी शब्दांचा भरणा बराच आढळतो व त्यांचें वाचन दुरुस्त करण्यांत त्यांचें साह्य मीं घेतलें. लेखांची निवड करतांनाही त्यांची मदत झाली आहे. इतिहास-संशोधनांत, संशोधित मजकुरावर चर्चा होणें जरूर असतें. अशी चर्चा करण्यास मला, मी सध्या पुण्यासच असल्यानें संधि मिळाली ही समाधानाची गोष्ट आहे.

इतिहासप्रेमी रसिक वाचक या पुस्तकाचें सहर्ष स्वागत करतील, अशी मला आशा आहे.

शक १८७८, मकरसंक्रमण
ता. १०-१-१९५७, पुणें.

शां. वि. आवळसकर.

भारत इतिहास संशोधक मंडळ

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य–१० वा खंड

ले. १ } तळें–शकावली {

[ही शकावली मला कसबे तळें तालुके माणगांव जिल्हा कुलाबा येथें रा. रामचंद्र विठ्ठल भट यांजकडे मिळाली. शकावलींतील मजकूर सर्व शाबूत आहे. शिवराज्याभिषेक आणि शिवछत्रपति व शाहूराजे यांचा मृत्यु यांबद्दलच्या तीन नोंदी वगळून बाकीची संपूर्ण शकावली येथें क्रमानें दिली आहे. स्थानिक इतिहासाचे दृष्टीनें शकावली महत्त्वाची आहे. ज्या घराण्यांत ही उपलब्ध झाली, तें भट घराणें श्रीवर्धनकर भटांपैकीं, म्हणजे पेशव्यांचीच एक शाखा होय. जुने कागद वाचण्याचे कामीं, या घराण्यांतील कर्ती माणसें चांगलीं तरबेज आहेत. जरूर तेथें त्यांची मदत घेऊन ही नक्कल केली आहे. शकावलीचें मूळ सध्या त्यांचेकडेच आहे. या शकावलीचे संदर्भानें भा. इ. सं. मं. च्या ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ पृ. ७५ ते ९४ मधील ' सुभेदारांच्या कारकिर्दी सुभा तळें ' हें प्रकरण अभ्यासकांनीं पहावें.]

१ कसबे तळे येथे श्रीहरिहरेश्वर याचें देवालय आहे याचें जोते व जिवरखि प्राचीन बहुकाली आहे वडिलांचे मुखें कसबे मजकूरचा कुळकर्णि ब्राह्मण होता त्याणि हे काम केले आहे ॥ याप्रमाणे अैकण्यात आहे ॥

२ कसबे मजकुरी श्रीगणपतीचे जीवरखीचे काळे चिऱ्याचें काम प्राचीन आहे ते कसबे मजकूरचे जोशी याणि केले आहे म्हणोन वडिलावडिली बोलण्यांत आहे अलिकडे महादेव जोशी बिन बाळ जोशि प्रमुख सर्व जोशि यांही वर्गणी करून जांबेत्री चिऱ्यांचे जोते मोठे बाधून त्यावर लाकडी देवालय बांधिलें श्रीची मूर्ति कांहीं विच्छिन्न जाहली होती तिहि लुकण शेंदुर लाउन सावयव नीट केली आणि श्रीची महाअर्चाशुधि सर्व मिळोन केली

३ [इ. १७७३] ॥ श्री ॥ हकीकत परशुराम जोशी तळेकर — आपले आजे चिंतामण जोशि हे शामलाचे दंग्यात शके १६९५ हे शकीं शामलानी काही आकसामुळें कसबे मजकुरी मारलें नंतर त्याची स्त्री लाहान पुत्र दोन एक अडीच वर्षांचा व एक आगावरचा असे होते ते घेऊन आपले माहेरी नाशिक क्षेत्र येथे गेली त्या काळापासून आपले वतन वगैरे सर्वस्वाची वाताहत जाहली नाशिक येथे दोन मूल होते त्यातील मोठा मूल वारला पुढे त्याची मातोश्री मृत्यु पावली पुढे काही दिवस लहान मुलगा होता त्याचे प्रतिपाळण मातुळानी करून मुंजीही केली नंतर तो मातुळ निधन पावला पुढे तो मुल श्रीभद्रकाळीचे मठात राहुन क्षेत्री माधुक्री मागुन विद्या संपादन

करून होता तो काही दिवशि कुलाबा येथे आंगरेयाकडे मोठे लग्न जाहालें त्यास समारंभास आला होता तेथे घोसाळकर जोशि याची गांठ पडली त्याणि त्या मुलास विचारिले कीं तु कोण्हाचा कोण त्याणि पुर्ववृत्त सर्व सागीतल्यावरून हा मूल चिंतामण जोशि यांचा असे जाणून येथे तळ्यास आणून मोठा भगिरथ प्रयत्न करून आपले वतन वृतिस्छळ वगैरे ठिकाणावर आपले वडिल आनंत जोशि यांची संस्छापना केली पुढे येथे सर्व प्रकार नूतन केले विवाहही च्यार येथे तळ्यास आल्यावर केलें ॥

[येथवरचा मजकूर देवनागरींत आहे. पुढें सर्व मोडी मजकूर]

४ [इ. १७२८] श्री **शके १६५०** हे शकीं श्री चंडिकेचे ओहोळामध्यें गायमुख काळे दगडाचें आहे त्याचे दक्षणेस पिंपळाचे झाड आहे त्याची मुंजी आपाजीपंत पोफले वा तळें यांहीं केली ते दत्तात्रयजयंतीचा महोछाह करीत असेत.

५ [इ. १७७३] सदरेस जाताना उजवा हाताकडे सातविनाचे झाड आहे त्याजवळ पिंपळाचे झाड आहे त्यास जांबे दगडाचा पार बाधून जयराम त्र्यंबक मजमदार याहीं मुज्य केली **१६९५** [शके.]

६ [इ. १७७४] **शके १६९६** हे शकी बहिरोपंत जोगळेकर वास्तव्य कसबें तळे यांची बहीण बगुबाई जोसी हिणे कसबे मजकुरी पुसाटी आळीत जोगळेकर यांचे घराजवळ देवालय बांधून त्या देवालयात श्रीविठल रुखुमाईच्या मूर्तींची प्रतिष्ठा केली ते समई आचार्यवर्ण रामभट उपाधे यास व सापस्थवर्ण तान जोसी तलेकर यास होते दुसरीही सिष्ट ब्राह्मण होते बहिरोपंत जोगलेकर हे आपले मुखांत वरची टाळ्यांत निरंतर शाळग्राम बाळगीत असत जोगलेकर हे तीन बंधु येथून निज्यांपुरास राहावयास गेल्यानंतर त्या जाग्यावर बाळाजीपंत पिंगळे याही घर बांधिले हाली पिगळे तेथे आहेत.

७ [इ. १७७६ आगस्ट १५ ते सप्टें. १२] **शके १६९८** हे शकीं तोतया रत्नागिरीस उत्पन्न होऊन अधिक भाद्रपद मासीं तळागडावर आला पेठ लुटून किला घेतला पुढे **अश्विन**मासी राजमाचीस त्याचा पराभव होऊन पुन्हा श्रीमंत सवाई माधवराव याहीं किले घेऊन तोतयाचे पारिपत्य करून बदोबस्त केला तोतया सदाशिव चिमणाजी भाऊबाहेब यांचे नाव सांगत होता.

८ [इ. १७७८] **शके १७००** हे शकीं शामल याणी तळ्याची पेठ [जा]ळिली ते समई सिवराम सूर्याजी चिटणीस यांचे घर आपले पिसवड्यास पूरवेकडे होते ते जळले पुढे त्याहीं जोगवडीस घर बाधिले त्यापासून त्यांचे आगण्याची जागा आपले वहिवाटीस आहे ती जागा पूरवपश्चिम रुंदी हात आठनऊ लांबी दक्षिणोतर हात वीस चिटणिसाचे ओटींचे जोत्याबरोबर

९ [इ. १७७८] **शके १७००** हे शकीं हबसी तल्याचे पेठेवर येऊन पेठ लुटून जालून किल्यास महसरा देऊन दोन दिवस बसला होता तिसरे दिवसी माणकर याही उठऊन लाविला नंतर मौजे कुडें येथे डोगरावर मेढा घालून काही

दगडी कोट करून तीन वर्षे राहिला नंतर माणकर याहीं **शके १७०४** हे शकी [इ. १७८२] तेथून उठऊन लाविला

१० [इ. १७८७ जाने. २० ते फेब्रु. १८] श्री गणपतीचे देवलापुढे पिंपळ वृक्ष बहुकाली जुना होता त्या पिंपळास गोपाळ हरि वर्तक श्रीवर्धनकर याही जांबे चिरेबंदी पार **शके १६८०** [इ. स. १७५८] हे शकी बाधिला होता तो पिंपळ शके १६९७ [इ. १७७५] **मन्मथ** संवसरी मोडला व पारही काही कोसळला होता तो परशराम जोसी तळकर यानी गोपाळपंत वर्तक यांस पुसोन तो पार बांधून नवा पिंपळ लाऊन त्यांची बहीण उमाबाई वेलंची कोतवाल इजपासून त्या पिंपळाची व्रतबंध करविला यजमान आबा कोतवाल तिचा दीर जाला होता त्या अनुष्टानास वो रा तान जोसी आबा व बाजी जोसी पालवणकर व दुसरेही थोर थोर ब्राह्मण होते शके **१७०८ माघ** मासी

११ [इ. १८०२ जून.] **शके १७२४ दुंदुभि** सवछरे **ज्येष्ठ** मासी चावडी पुढील झेंड्याचे पश्चिमेस रा आबाजी लक्ष्मण कोतवाल उपनाम वलबे याणी श्रीविठल-रखुमाबाईचे देवालय बांधून स्थापना केली

१२ [इ. १८०२ जून ११] हकीकत परशराम अनंत जोसी तलेकर आमची पुरातनी घराची जागा आहे त्याची पश्चिमेस कुलकर्णी व पालवणकर या उभयताची घरे त्यांचे व आमचे जाग्यामधे सुभ्याचे कोठीस बाईल जाण्याचा रस्ता होता त्यातून ओहोळ जात असे तो मोडून [र]स्त्याचे जाग्यांत कुलकर्णी व पालवणकर या उभयतानी वहिरी खटल्या आणि ओहोळाचे पाणी आमचे जाग्यांत येऊ लागलें ते समई वो रा बाजी जोसी पालवणकर यासी सांगितले कीं रस्ताची जागा आरधी आमची आसता सालीम जागा तुम्ही विहिरीकडेस घेऊन माझे जाग्यांत ओहोळाचे पाणी येऊन पराड्याचा नाश होतो येविसी मी सरकारांत फिर्याद होतो त्यावरून तीा राजश्री तान जोसी आबांचे विद्यमाने पालवणकर बोलावयास लागले की आमची विहीर आरधे रस्तांत आहे राहिला जागा तुमचा व विहीर खेरीजकरून बाकी जागा पूर्वपश्चिम आरधे रस्ताचे आमची तीही तुम्हास देतो परंतु श्रीगणपतीस जाण्याविसी तुम्ही आपले पुढील आंगण्यातून जुजवी वाट द्यावी म्हणजे त्या वाटेने पाणी जाईल आणि तुमचे परडें धुपणार नाहीं तुम्हास मागील रस्ताची जागा सालीम उपयोगी पडेल याप्रमाणे पालवणकर बोलिले आणि तीा तान जोसी आबा याही मजला सांगितलें कीं पालवणकर यासी व विद्यार्थी यासी बाजारचे वाटेने श्रीगणपतीस जाण्यास बहुत दूर पडतें आणि या करण्यांत उभयताचे बरे आहे त्यापक्षी तुं हे कर त्यावरून वडिलांचे समक्ष राजश्री भवानी नारायण यांचे यांचे हातून यादी लिहिली आणि पालवणकर व आबा यांचे समक्ष आपले पुढील आंगण्यातून कुपणीस आंवर घालून वाट केली पश्चमेकडे पालवणकर याही विहिरीबरोबर कुपण घातली त्या कुपणीचे आंत

आपण बहुत दिवस वहिवाट केली पुढे मी पुण्यास गेल्यानंतर काही दिवसी पालवणकर याहीं पुढील नवे गलीला दगडी फरस बांधिला तो मी पुण्याहून आल्यावर पाहिला ते समई आम्ही कलह करावा परंतु वतनाचा कलह आपले मागें कोण याकरितां आपण काहींच बोलिलो नाहीं ती गली आपण पूर्वींच दिल्ही आहे मिति **जेष्ट शुध्ध १० शके १७२४**

१३ [इ. १८०२ जुलै ३१] किस्त बामणसई सेत दंग्यामुळे सरकारांत गेले पुढे पेशवाईत माणकरानी केले त्याही जयराम त्र्यंबक सोमण यास दिले त्याजवळ आपण परशराम जोशी मागत होतो ते शेत राजश्री कृष्णाजी जयराम व गोविंदराव श्रीधर सोमण याही आपणास बक्षीसपत्र **श्रावण शुध्ध २ शके १७२४** चे करून दिले.

१४ [इ. १८०२ जुलै ३० ते ऑक्टोबर २६] **शके १७२४** हे शकी श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे राज्य करीत असतां जंजिरा किला शामलाचा घेण्याची मसलत करून राजश्री खंडेराव बापुजी रास्ते सरसुभेदार यास चार हजार फौज बरोबर देऊन श्रीमंताही तल्याचे मुकामी पाठविले ते **श्रावण शुध्धात** येथे आले ते **अश्विन वद्य पक्षीं** जंजीरकर शामल याजवल राजश्री आबाजी लक्ष्मण वलबे शामलाचे वकील याचे द्वारे तहाचे बोलणे करून श्रीमंतास लिहून पाठविले कीं पाभ्रे येथील पाण्यापरयंत मुलुख सोडविला त्यावरून श्रीमंताची खुशमजी होऊन वस्त्रें पाठविली आणि पुण्यास यावे म्हणोन लिहिलें त्यावरून निघोन पुण्यास गेले–

१५ ॥ श्री ॥ वेदशास्त्रसंपन्न राजश्री आबाशास्त्री टकले वा। नागावें यासी पुसिलें की परभू ग्रहस्थाकडे तुमचे गुरुत्वाची कलमे काय काय त्यावरून त्याही सांगितलीं ती कलमे–१ उपनयन १ पलाशपूजन १ समावर्तन १ श्रावणी १ अक्षरारंभ १ अग्रपूजा १ वरवस्त्र वरदक्षणा १ पिंडाची दक्षणा

१६ [इ. १८०३ जाने. २८] **शके १७२४** हे शकीं श्रीमत अमृतरावसाहेब व बाजीराव साहेब पेशवे हे उभयताही पडोन उभयतां राज्याचा बंदोबस्त करावयासी लागले ते समई आमृतराव साहेबाकडून बापुजी बलाळ धडफले कुळकरणी निज्यांपूरकर हे राजपुरी येथील मामलतीची सनद घेऊन निज्यांपुरास आले आणि तल्यावर येऊन येथील मामलेदार राजश्री कृष्णाजी जयराम व गोविंदराव श्रीधर सोमण यांजवळ [ल]ढई करणार हे ऐकून सर्व गांवातील लोक घरें साडून बाहेरगावीं गेले ते समई मौजे बेलधर येथे बालाजी मोरेश्वर जोसी खोत यांचे घरीं चारपांच कुटुंबे होतीं तें घर अकस्मात दोप्रहरी **माघ शु॥ ६** सर्व मनुष्यें नदीवर भोज्यनास गेली या संधीत वन्हीने दग्ध जाहले. सर्वस्वापाहार जाहले त्यांत आपले कागदपत्र प्राचीन बहुकाली वतनसंबंधे वगैरे होते ते सर्व दग्ध जाहले त्यांत आपले वडील वामन जोसी तलेकर यांचे नावे मौजे चेखली प्रो खरवली व किस्त बामणसई प्रो हवेली या

दोन गांवच्या इनाम सनदा दोन बासई सिक्याच्या होत्या त्या गेल्या काहीं कार्याकारण कागदांचे पुडकें निराळे स्थलांतरी होते तितके मात्र राहिले.

१७ [इ. १८०३ नोव्हें. १४] हकीकत जोसी मामले तले कसबे तळे उपाध्यपणाचे कार्यपणाचा वगैरे उपाध्यपणाचे सिवेचा फडशा पंचाईतमतें जाला त्यांत मेढ्याबाहेर बाळंभटाचे उपाध्यपण सोनार गौळी वाणी याजकडे नाही अैसा ठराव जाला असतां दक्षणेकडचे भेटाबाहेर पिंपळ आहे तेथे सोनारणी बायका सोमवती वहाण्याकरितां गेल्या होत्या तेथे आपले त्र्यंबक जोसी पूजा सांगत होते तेथे बाळंभट जाऊन बोलला कीं हा पिंपळ आम्हाकडे फडशांत असेल असे वाटतें पूजा मी सांगेन त्यावरून कजिया जाला उपेंद्र अमानत ठेऊं म्हणोन बोलू लागला तेव्हां आम्ही श्रीगणपतीचे देवळाजवळ पिंपळ आहे तेथे ब्राह्मण बायकानी साखर वाहिली होती ती दोन पुड्या व पिपळापुढचे पेढे तीन उचलून घेतले याचे कारण निभ्रांत ठराव जाला त्याचे यादीची नकलही प्रत्यक्ष आम्हाजवळ आहे असे असतां उगाच कज्या जाला होता असा दाखला होतो याकरितां आपला संबंध नसतां साखरेच्या पुड्या घेतल्या त्या उपेंद्रास आमचा वारसा नाही व त्याणीही मेटाखालचे पिंपळाजवळ जावयाचा सोनाराकडे संबंध नाही त्याणी दाखला केला म्हणोन आम्हीही ब्राम्हणाकडचे सोमवतीचे उपेंद्रासीं गावात दाखला केला मिति **कार्तिक वद्य ३० सोमवार शके १७२५ रुधिरोद्गारी** नाम **संवसरे** बीा परशराम अनंत जोशी मामले तले.

१८ [इ. १८०३ नोव्हें. २४] **शके १७२५ रुधिरोद्गारी संवछर मार्गसीर्ष शुध्ध १० गुरुवारी** शामलाचे जंजिरा किल्यातील घरे दग्ध जाली नवगजी तख्त व ईशानेकडील दाहापांच घरे मात्र राहिली.

[आंअ ६६७ वर उपोद्बलक पुरावा; पण तेथील कालोल्लेख मोघम आहे. जंजिरा संस्थानचा इतिहास '८ साबान गुरुवार' देतो. ऐलेसं भाग १४ ले. ६७६६ पृ. ७९२३ वर पुरावा.]

१९ [इ. १८०३ डिसें. २] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वाा ४ शुक्रवारी सायंकाळी** राा नारोबा आवटी सुभेदार किल्याचे तल्याचे पेठेंत आले

२० [इ. १८०३ डिसें. २] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वाा ४ शुक्रवारी** सिदी जमरुद शामल जंजीरकर हे मृत्य पावले

[आंअ. ६६७ वर मोघम माहिती. येथें मृत्युदिन स्पष्ट कळतो. ऐलेसं भाग १४ ले. ६७६६ पहा.]

२१ [इ. १८०३ डिसें. ४] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वाा ६ रविवारी** सिदी इभराईमखान सिदी सुरूलचे नातु सिदी हसनचे पुत्र हे जंजिरा तखतारूढ जाले हसनचे पुत्र सिधी इभराईम

[जंजिरा सं. चा इति० पृ. १२९; आंअ. ६७० पहा.]

२२ [इ. १८०३ डिसें. ५] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वा ७ सोमवारी** राघोजी वाळुंज हवालदार किले तलागड हे रा नाना आवटी सुभेदार याणी किल्याखाली उतरले.

२३ [इ. १८०४ मार्च १२] **शके १७२६ रक्ताक्षी** संवत्सरे **अधिक चैत्र शुा १ प्रतिपदा सोमवारी** रा विठलपंत आवटी सुभेदार किलेहाचे मामले तळे याही किले तलागड येथे माहांकाल बुरुजाजवळ चांफ्याचें झाड आहे त्याजवर भगवा झेंडा लाविला संवत्सर प्रतिपदा तीच जाली यापूर्वी भगवा झेंडा नव्हता.

२४ [इ. १८०४ जून १८] **शके १७२६ रक्ताक्षी** सवसरे **ज्येष्ट शुा ११ इंदुवारी** रा नारो गोविंद आवटी किल्याचे सुभेदार याजकडे माहलानिहायेची मामलत होऊन सनदा सदरेस दाखल जाल्या बळवंतराव अनंत धामणकर सुभेदार होते ते दूर जाले.

२५ [इ. १८०४ आगस्ट १८] हकीकत परभू लोकाचा व पेणकर ब्राह्मण यांचा परभूंचे कर्माचरणावषई कजिया वाढोन सर्व कर्मे बंद जाली होती ती मा[म]लेदार याहीं परवानग्या सांगून बहुत्येक पूर्ववतप्राा चालू जाली श्रावणी आज बारा चौदा वर्षे राहिलीं होती ती राजश्री विठलपंत नाना आवटी सुभेदार याणी आम्हा जोसी उपाध्यास बोलाऊन नेऊन सरकारचे सदरेंत सांगितले कीं परभू लोकाच्या श्रावण्या चालत नाही चौदा वर्षापूर्वी अविछिन चालत होत्या त्याप्राा तुम्ही सुखरूप चालवणे पेणकर ब्राह्मणानी सरकारचे पत्र आणिले आहे त्यामध्येंहीं श्रावण्या चालू नये असे कलम नाही त्यास तुम्ही दिकत करूं नये श्रावण्या चालवणे याप्राा **श्रावण शुा १२ द्वादसी सह त्रयोदसी शनवारी सायंकाळी** समक्ष सांगितले त्यावरून परभू लोकांच्या श्रावण्या श्रीहरिहरेश्वराचे देवालयांत पूर्ववत केल्या **शके १७२६ रक्ताक्षी** नाम संवसरे.

२६ [इ. १८०४ आगस्ट २५] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरी **मघा** नक्षत्रपरयंत परज्यन्च चांगला पडला जित्रबें चांगली आली होती. पुढें पूर्वा नक्षत्रापासून परज्यन्य आगदी गेला कोकण व देश येथील जित्रबें बुडाली कोकणांत जीनवट पटणीची सेतें होती ती मात्र आली वरकड सर्व जिंनस सुकले त्यामुळे महर्गता जाली. शके **१७२६ रक्ताक्षी** संवसरे **श्रावण** मासी धान्याचे व इतर जिनसांचे भाव जाले त्याचा दर येणेप्राा

दर रुपयाचे

००२	भात कैली	००१	काटाणे कैली
००३	तेल वजन कचे	००४	तुप वजन कचे
००८	गूल वजन कचे	००५	साखर वजन कचे
१०	नारळ सुमारी	००१	करनाटकी उकडे तांदूल कैली
८०४	मिरच्या वजन कचे	००१	काळी वाटोली मिरें कैली
००१	नागली कैली		

येणेप्रा जिंनस महर्ग जाले कर्नाटक मात्र चा...आले होते म्हणोन कोकण प्रांत येथील माणसें काही वांचली बहुत्येक धान्य कर्नाटक येथूनच आले याप्रा जिनसांचा पाड कसबे तळे येथे जाला होता पुण्यामध्ये तर सर्व धान्याचे जिनस एक सेर प्रा जाले होते मिति **शके १७२६ रक्ताक्षी** नाम संवसरे **श्रावण वा ५** पंचमीचे दिवसी हे वर्तमान लिहिलें माणसें बहुत अनावेगळ मृत्यु पावलीं.

[आंअ ६७५ वर दुष्काळाचें स्वरूप मोघम दिलें आहे. येथील नोंद विस्तृत.]

२७ [इ. १८०४ आक्टो. १४] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरें **आश्विन शुा विजया दशमीचे** दिवसी आवटे सुभेदार याही पूर्वी किल्यावरचे चांफ्यावर झेंडा लाविला होता तो पीराचे मागें खडकावर लाविला.

२८ [इ. १८०४ डिसें. १ सह २] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरे **कार्तिक वा ३० शनिवारी व रविवारी** शामल जंजीरकर याचे दिवाण लक्ष्मणजी हे काही हरामखोरीत होते याकरितां सिधी इभराइम खानसाहेब याही विष पाजून मारिलें व बलवतराव त्रिंबक कुलकरणी तपे नांदगाव मुरुड व अनाजी सबनीस जंजीरकर या दोघांचा शिरछेद केला.

२९ [इ. १८०५ फेब्र. ४] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरे **माघ शुा ५ इंदुवारी** जनार्दनपंत जोग पुणेकर याही नंद तल्याचे पूर्वेस जयरामपंत कोकणे याही पिंपळास काळे दगडांचा चिरेबंदी पार बांधिला आहे त्याचे पश्चिमेस संनिधच काळे दगडाचा चिरेबंदी वाटोळा पार बांधून कसबे तळे येथे अश्वत्थोद्यापन केले

३० [इ. १८०५ ऑक्टो. ३०] **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **कार्तिक शुा ८ अष्टमी बुधवारी रात्रौ** रा भालचंद्र अनंदराव साठये हे रा नारोबा आवटी सुभेदार याजकडून सुभ्याचे कारभारावर येऊन सदरेस बसले पूर्वी नारोबाचे चुलते त्र्यंबकपंत व विठलपंत आवटी होते त्याचे करणें बहुत अननवित याकरितां त्यांजवर रयत फिर्याद जाली म्हणोन त्या उभयतांस नारोबानी दूर केले.

३१ [इ. १८०५ नोव्हें. ४] **शके १७२७ क्रोधन** सवसरे **कार्तिक शुा १२ इंदुवारी** रा विश्वासराव गोपाळ देशमुख याणी जोगवाडीस होळीचे आग्नयेस घर बांधिले होते त्याची वास्तुशांति केली त्यासमई सातारकर टकले येऊन आम्ही त्यांचे गुरु ब्राह्मत्वाची सुपारी आम्हास द्यावी असे बोलिले त्यावरून राघोबा जोसी तळकर याही त्याची बहुत निर्भर्छना करून उठऊन लाविले हे वलस्ते ! कर देशमुख बाळंभटाचा पक्ष धरून आम्हा जोसियावर नाना प्रकारचीं कुफराणे करीत आहेत त्यांहीच टकल्यास सिकऊन पाटावर बसविले आणि हे बोलविले.

३२ [इ. १८०६ जाने. १३] **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **पौष वा ९ सोमवारी रात्रौ आवसीस** तल्यास सुभ्याचे सदरेस आंगण्यामध्ये दाहापांच

कोल्हीं घेऊन मोठा कोलाहल शब्द केले त्यासमईं श्रीमंत गोविंदपंत बाबा आवटी हे सदरेचे घरांत होते समागमे आपाजीपंत भोपले होते.

३३ [इ. १८०६ जाने. १५] श्री **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **पौष वा। ११ बुधवारी सायंकाळी दिनास्तसमई** धरणीकंप जाला आकाशी शब्द मोठा जाला. सर्व भूमि हालली.

३४ [इ. १८०६ जाने. २० ते फेब्रु. १८] हकीकत टकले गुरु परभू ग्रहस्तांचे सातान्यास राहतात त्याचा व सिधेश्वर नागावें येथे राहतात या उभयताचा गुरुत्वाविषई कजिया गुजरार्थेत बडोयाचे मुकामी जाला तेथे ठरले कीं जो तलेकर टकल्या असेल तो सर्व कायस्थाचा गुरु त्याजवरून सातारकर टकले येथे तल्यास येऊन सर्व कायस्थ मंडळीचे अर्जव करून आम्ही तलेकर असी साक्ष मागूं लागले मागील कागदपत्रांचे दाखलेहि दाखविले परंतु शेकडों वर्षें सिधेश्वरकर व नागावकर टकले याही परभू ग्रहस्तांकडे वहिवाट गुरुत्वाची केली होती तेव्हां हेच तलेकर कशावरून म्हणावे ही दिकत पडली याकरितां कोण्हीं त्यास न बदत सडीपत्र न होईं तेव्हां सातारकर याहीं द्रव्य देऊन सडपत्रावर नावे परभू लोकांची लिहून घेतली ग्रहस्थाही द्रव्यावर द्रष्टी देऊन आज दीडशें वर्षे सिधेश्वरकर व नागावकर टकले यांची गुरुत्वाची वहिवाट चालत आली याचे कारण काय वडिलाही त्यांस गुरुत्व कां दिले याचा शोध काहींच न करितां नावनिसी लिहून दिली सातारकर यांचे बिन्हाड रा। हरिपंत पालवणकर यांचे घरी होते त्यांचे मुखांतून आपण परशराम जोसी यानी ऐकिले कीं कायस्थास सातारकर टकले यानी पैका बहुत खर्चवेच केला व नाना प्रकारचे जिनस व वस्तभाव देऊन नावीनिसी लिहून घेतली त्यावरून हे लिहिले असे मिति **माघ मास शके १७२७ क्रोधन** नाम संवसरे

३५ [इ. १८०६ मार्च १८] श्रीचंडिका. **शके १७२७ क्रोधन** सवसरे **फालगुन वा। १३ त्रयोदसी सह चतुर्दशी भोमवार** ते दिवसी श्री चंडिकेची समाराधना राम जोसी बाबा तलकर यांचे घरी होती ती समाराधना ग्रामस्थाही अग्नीचा उपद्रव गावांत होत असे म्हणून सालाबाद शंभर ब्राह्मणाची समाराधना करावी म्हणोन मानसिक केले त्यास आजमासे सोळा सत्रा वर्षें जालीं मध्यें जोसी उपाध्ये याचा कजिया लागोन हुजूरपरियंत गेला होता अकरा वर्षें कसब्यांत वृत्ति चालवावयाकरितां सरकारातुन आगांतुक ब्राह्मण ठेविले होते तेच वृत्ति चालवीत होते तेव्हां श्रीचे समाराधनेचे दिवसीं श्रीची पूजा करीत होते कीं नाहीं हें आम्हा जोसीयांस ठाऊक नवतें पुढे **शके १७२२** हे शकीं [इ. १८००] आमचा कजिया तुटला त्यापासून पुढें बाळंभट याणी समाराधनेचे दिवसीं श्रीची पूजा व मुंजी याची मेटाचे पिंपळास करूं लागला आणि श्रीजवळ सप्तशतीचें आवर्तन करूं लागला हे आम्हास आम्ही बहुत म्हणून समजले नाही जोसी उपाध्ये उभयतां जाऊन कर्म मात्र चालतें असें असतां

गावकीची समाराधना आणि आम्ही नसतां चोरून श्रीची पूजा व जप करीत होता ते आम्हास समजल्यावरून आपण जोशी याही आडथळा केला तों पूजा बाळंभटाने केली म्हणोन चतुष्टाई केली तेव्हा सर्व ग्रामस्त होते त्याहीं सांगितलें कीं उभयतानी हें गावकींचें कर्म यामध्यें श्रीचें जें करणे असेल ते करावे जप जोसी याहीं करावा आणि पूजा बाळंभटानी करावी याप्रा सांगितले असतां बाळंभट न अैके म्हणोन सर्वाही सांगितलें कीं पुढील समाराधनेचे दिवसीं जोसी याही आथवा उपाध्यानी श्रीची पूजा व जप करूं नये याचा ठराव न होतां या उभयतानी पूजा जप केला तर जो करील तो सर्व ब्राह्मणांचा अन्यायी होईल याप्रा सर्व ग्रामस्तांही सांगितले त्यातील प्रमुख ग्रामस्थ समक्ष होते ते नावनिसी— १ भालचंद्रपंत सुभेदार साठये १ बापू देशमूख १ लक्ष्मणपंत वाड १ गणेशपंत देवल १ नाना पंडित १ सदासिवपंत शहाणे येणेप्रा सर्व ग्रामस्थ होते त्यांचे समक्ष ठरलें

३६ [इ. १८०६ सप्टें. ८] राजश्री माहादाजीपंत कानडे हे श्रीमंत नाना आवटी सुभेदार प्रां राजपुरी यांजकडून मामलतीचे कारभारावर आहेत याणी श्रीरामेश्वराचे पूर्वेस पुष्करण आहे तेथून देवळास जावयाच्या पाइऱ्या जुन्या ढांसळल्या होत्या त्या बांधल्या **शके १७२८ क्षय** संवसर **श्रावण वा १०**

३७ [इ. १८०६ डिसें. २०] **शके १७२८ क्षय** संवसरे **मार्गसीर्ष शुा १० शनवारी** राजश्री माहादाजीपंत सुभ्याचे कारभारी याहीं श्री रामेश्वराचे देवालय बांधावयाकरितां शिलाजपास आरंभ केला

३८ [इ. १८०६ डिसें. २३] **शके १७२८ क्षय** नाम सवसरे **मार्गसीर्ष शुा १३ भौमवारी** श्री चंडिकेची आर्चाशुध्धीस प्रारंभ करून वद्य प्रतिपदेस समाप्ती समाराधना उतम साखरपोळीची केली रा महादजीपंत कानडे यानी पुढाकार केला रा दाजिबा चिटणीस यांस कारभारी ठेविले होते त्याहीं प्रयोजन फार चांगले केले सिध जोसी तलकर ब्रह्मे जाले होते ग्रहयज्ञाचे मंडल व आयुत होमाचे मंडल आम्ही जोसी याहीं घेतलें आयुत होमाचे ग्रहमंडलावर दुसऱ्या देवता आधिक आहेत याकरितां बाळंभट बोलत होता कीं हे मंडल तुम्ही घेऊं नये त्यास आम्ही उतर केलें कीं आर्चेस सोळाच मातृका आहेत ते मातृकापूज्यन आम्ही घेऊं तेव्हां पुढें बोलिला नाहीं आम्हींच आणिले.

३९ [इ. १८०७ जाने. १७] **शके १७२८ क्षय** संवसरे **पौष शुा ८ आष्टमी शनिवार** ते दिवसी श्री चंडिकेची वार्षिक समाराधना जाली ते समई गुदस्ताचा करार होता कीं श्रीची पूजा व आवर्तन जे करणे ते जोसी उपाधे याही आपली समजूत करून उभयतानी करावें समजूत न होतां अेकानी जाऊन येकास न कळतां पूजा करील तो सर्व ब्राम्हणांचा अन्याई याप्रा ठरलें होते त्यास उभयतांची समजूत याच कलमाची जाली नवती म्हणून चौघाही वो रा अनंतभट भोळे तिन्हाईत

याजवरून पूजा व आवर्तन करविले ते ग्रहस्थ १ आबा सफरे १ भगवंतराव देशमुख १ नाना पंडित १ दादा वाड

४० [इ. १८०७ जुलै १३] **शके १७२९ प्रभव** नाम संवसरे **आषाढ शुा ९ नवमी इंदुवारी** रा। माहादाजीपंत कानडे श्रीत्र्यंबकेश्वरकर सुभ्याचे कारभारी रा. नारो गोविंद आवटी यांचे गुमस्ते याही श्री रामेश्वर याचे देवालय लांकडी काम भिंतीसहित बांधिले त्याची प्रासाद वास्तुशांति केली तेथे अनुष्टानास ब्राम्हण आचार्य बाळंभट ब्रम्हे राम जोसी भाऊ सापस्थ माहादेव जोसी तलकर होते त्या देवालयाचे पूर्वेस पुष्करण आहे त्यातील खडक पुरुषभरपरयंत फोडून उदकास सांठ केला आणि पुष्करणीचे पश्चिमेस प्राचीन धका होता तो कोसळला होता तोही कोरे दगडानी बांधिला इतके काम रा। माहादाजीपंतानी केले.

४१ [इ. १८०७ आगस्ट १३] **शके १७२९ प्रभव** सवसरे **श्रावण शुा १० गुरुवारी** जनार्दनपंत साबणे रा। नाना आवटी सुभेदार यांजकडून प्रांत राजपुरी येथील फडणिसीचे कामावर आहेत त्याही श्री रामेश्वर याचे देवालयास जावयाची वाट ओहोळांत उतरत्ये ती चिपांच्या दगडानी पाइऱ्या बांधल्या.

४२ [इ. १८०७ सप्टें. ११ [**शके १७२९ प्रभव** संवसरे **भाद्रपद शुा १० शुक्रवारी** आबा जोसी पालवणकर यानी केशव जोसी पालवणकर आपले चुलते ज्यांही श्री वैजनाथांचे देवालय व ब्रंम्हाळीचे तळे बांधिले त्यांचे खास आपला पुत्र वामन दत्तपुत्र [दे]ऊन दत्तपुत्रविधान केले तेथे माहादाजीपंत सुभेदार व जमेदार विश्वासराव देशमुख व मोरोबा कुलकर्णी व दुसरेहि होते.

४३ [इ. १८०७ ऑक्टो. ११] **शके १७२९ प्रभव** सवसरे **आश्विन शुा १०** रा। गणेश विनायक रानडे वा। कसबे तळे याहीं श्री चंडिकेचे दक्षणेस दरडीची वाट आहे ती चिपांचे दगडानी बांधिली पूर्वी ती वाट बहुत अवघड होती.

४४ [इ. १८०७ डिसें. १९] हकीकत **शके १७२९ प्रभव** संवसरे **मार्गसीर्ष वा। ५** ते दिवसी रा। बाला देशमुख मामले तळे याचा चाकर राम्या जाधव वा। मौजे पिटसई यासी सरकारातुन फांसीं देऊन ठार केला आणि कामथाचे वाटेस आंब्याचे झाडास टांगून ठेविला याचे कारण बाबा देशमुखांची कुळंबीण पळोन कवारगडास गेली होती तिचे शोधास बाबा देशमुख आपले चाकर राम्या जाधव व सुडक्या विचारा हे दोघे समागमे घेऊन कवरगडास गेले तेथे कुळंबिणीचा शोध होता परंतु हातास आली नाही म्हणून घाट उतरून जाभुलपाड्याकडून पालीस आले तेथे दोन प्रहरी भोजन करून सुकेली खिडीने घरी येणार म्हणोन निघोन आले सुकेली खिंड आवघी टाकून खिंडीचे दक्षणेकडेचे तोंडी आले ते समई राम्या जाधव याणी ओझे ठेऊन बाबावर टोणपा घातला बाबा सावध व्हाव आहे तों दुसरा घातला आणि बाबास ठार केला सुडक्या विचारा होता तो मागें चालत होता तो मसलतीत मात्र होता त्याणी हाला

केला नाही याप्रा कर्म करून दुसरे दिवसी बावाचीं वस्तभाव समागमीची होती ती कोलाडचे डोहांत बुडऊन **शनिवारी श्रावण वद्य एकादसीचे दिवसीं सायं-कालीं** [इ. १८०७ आगस्ट २९] तळ्यास येऊन घरीं सांगू लागले कीं बावा व आम्हीं सुकेली खिंड टाकून तोंडासी आलों तो सात असामी चोर येऊन बावास सोट्यानी ठार मारिलें आम्ही जीव घेऊन पळालों याप्रा सांगितल्यावरून माधवराव कुळकर्णि दाहा बारा असामी बरोबर घेऊन शाधास गेले तो रा रा लंबोदर जोसी टकले मौजे सिरवली येथील मोकासी याहीं मुर्दा ब्राम्हण असेल म्हणून सरकारची आज्ञा घेऊन वन्हिप्रवेश केला मग हे पावले याप्रा वर्तमान जाल्यावर तीन महिने गुजरले पुढें सुडक्या दुसरे चाकराजवळ सहज बोलिला कीं बावा चांगले होते परंतु रामचाने घात केला याप्रा बोलला तेव्हां त्यानी गळा पडून पुसिल्यावरून सुडक्याने सविस्तर सांगितले त्यावरून राम्यास व सुडक्यास सरकारांत नेऊ मार देऊन विच्यारिले कीं धन्यास ठार मारावयाचे कारण काय त्याही सांगितलें कीं कामाकाजावरून लय किरकीर करीत असे म्हणून ठार मारिले मग राम्यास फांसी दिला व सुडक्याचे हातपाय तोडिले याप्रा हकीकत जाली.

४५ [इ. १८०८ जाने. ६] **शके १७२९ प्रभव** नाम संवसरे **पौष शुा ८ बुधवारी** श्रीचंडिकेची वार्षिक समाराधना जाली तेव्हां श्रीची पूजा व जप करण्याविषई जोसी व उपाधे याची समजूत पडली नाही म्हणून वाो रा अनंतभट भोळे तिन्हाईत यापासून पूजा व जप श्रीचा करविला ते ग्रहस्त १ दादा वाड १ बापुजी देशमुख

४६ [इ. १८०८ फेब्रु. २२] **शके १७२९ प्रभव** सवसरे **माघ वाा अेकादसी इंदुवारी** श्रीमंत चिमणाजी रघुनाथ व आपासाहेब माहाडांस आले आणि आठ दाहा दिवस राहून फिरून पुण्यास गेले

४७ [इ. १८०८ मे १०] **शके १७३० विभव** नाम संवसरे **वैशाख शुा १५ भौमवारी** किस्त बामणसई सेतावर देवी बामणाई आहेत त्याचे संनिध परशराम जोसी तलेकर यानी विहीर कोणा दगडांची इमारत करून पाइऱ्यांची विहीर बांधिली.

४८ [इ. १८०८ मे २३] **शके १७३० विभव** सवसरे **वैशाख वद्य १३ इंदुवारी** मौजे खाबवली येथे गावाचे पश्चिमेस ओहोळांत धर्माचे ! जवळ पाण्याचा डोहोरा होता ते पाणी खणोन राजश्री बालकृष्ण बापुजी गांगल याणी कोरे दगडीची इमारत करून पायऱ्याची विहीर बाधिली त्याचे काम संपूर्ण जालें.

४९ [इ. १८०८ सप्टें. १२] **शके १७३० विभव** नाम सवसरे **भाद्रपद वाा ७ इदुवारी** परशराम केशव ओक यांस प्रांत राजपुरी येथील मामलत होऊन त्यांचे कारकून मोरोपंत जोग जप्तीस आले राा नारो गोविंद आवटी सुभेदार होते ते दूर जाले.

५० [इ. १८०८ ऑक्टो. ६] **शके १७३० विभव** नाम सवसरे **आश्विन**

वा २ गुरुवारी परशराम केशव ओक सुभेदार प्रांत राजपुरी याजकडून राजश्री बाबाजी केळकर आंबवलीकर हे मामलतीचे कामावर येऊन कसबे तले येथील सदरेंत बसले

५१ [इ. १८०८ डिसें. २५] **शके १७३० विभव** संवसरे **पौष शुा ८ रविवार** ते दिवसी श्री चंडिकेची वार्षिक समाराधना जाली श्रीची पूजा व सप्तशतीचे आवर्तन करावयास ब्राम्हण वो रा विनायक जोसी पालवणकर या सर्वांही सांगितलें त्याहीं संपादिलें मुंज्याची पूजाही त्याहींच केली जोसी उपाध्यांची समजूत जाली नाहीं.

५२ [इ. १८०९ जाने. ९] हकीकत **शके १७२९ प्रभव** सवसरे **श्रावण शुा १४ सायंकाळी** [इ. १८०७ ऑगस्ट १७] रा माहादाजीपंत कानडे सुभ्याचे कारभारी याही जोसी उपाध्ये यांस बोलाऊन नेऊन ताकीद केली कीं परभू ग्रहस्त यांच्या श्रावण्या व मुंजी एकंदर चालऊ नये आम्हास श्रीमंत नानाचे पत्र आले आहे त्यावरून मना जालो होतों हालीं रा परशराम केशव सुभेदार यांचे कारभारी बाबाजी केळकर सुभां कारभार करीत आहेत याहीं आम्हा जोसी उपाध्ये यास ताकीद करून परवानगी सांगितली कीं परभू ग्रहस्त याजकडे मुंजी व श्रावण्या पूर्ववतप्रा चालवणे त्यावरून आम्ही आज्ञेची चिठी मागितली त्याहीं उतर केलें कीं तुम्हास मुंजी व श्रावण्या चालवण्याविषई सुभाहून मनाई केली त्या मनाईची चिठी दिली नव्हती समक्ष्य परवानगी मात्र जाली होती तेव्हां आतांही चिठीचें कारण नाही आम्हासही पुण्याहून लिहिलें आले आहे त्यावरून समक्ष्य ताकीद करितों याप्रा सांगितले ते समई बाबाजी कारभारी सदरेचे घर आहे त्याचे ओसरींवर पूर्वांमुख बसले होते कचेरी बहुत होती त्यातील काही ग्रहस्तांची नावनिसी

१ बाळाजीपंत भाटे बोरवाडीकर
१ त्र्यंबकराव केतकर
१ बाजीपंत कुंटे रेवदंडकर
१ भाऊ आंगरे सरदार रेवदंडकर
१ काल सावंत देसाई सरदार रेवदंडा हेटकरी

इतरहि ग्रहस्त बहुत कचेरीस होते त्याचे समक्ष्य परशराम जोशी बालंभट या उभयतांस ताकीद केली **शके १७३० विभव** सवसरे **पौष वद्य ८ इंदुवारी**

५३ [इ. १८०९ मार्च २१] हकीकत सातारकर टकले यांस परभू ग्रहस्थानी आपले कुलगुरुत्वाची याद करून स्वदस्तुर नांवनिसी लिहून दिली हा मजकूर पेशजी जाला होता त्याजवरून वेदशास्त्रसंपन्न रा आबाशास्त्री बिन चिंतामण जोसी टकले हे गुजराथेंत बडोद्यास होते ते निघोन पुण्याकडून तल्यास आले त्याहीं आम्हा जोसी उपाध्ये यास रा चिटणिस राजमंडल याचे पत्र आणिलें की तुमचे गावी आमचे स्वज्ञातीचे ग्रहस्तांकडे कार्यें प्रयोजनें जाली असतां गुरुत्वाचा भोगवटा प्राचीन कोण्हाकडे चालत आहे ते लिहून पाठवावे असें पत्र आणिलें त्याचे उतर देणे प्राप्त

जाले ते समई साउजी कुमाजी देशमुख लोकांजवळ बोलिले कीं तान जोसी बावानी आपले हातचें पत्र सातारकर यास दिले आहे आतां जोसी सड दुसरी कसी देतील त्याज वरून आपण सर्व भाऊबंद मिळोन देशमुख यांचे घरीं जाऊन त्यांस पुसिले कीं तीर्थस्वरूप-कैलासवासी तान जोसी आबानी सातारकर टकल्यास पत्र काय म्हणून दिले आहे त्याची नकल तुम्हांजवळ असल्यास दाखवावी त्यावर त्याहीं उतर केले कीं काही दस्तऐवजी पत्र आहे आम्ही पाहिलें नकल आम्हाजवळ नाही याप्रा बोलिले त्यांचेच समक्ष्य आम्हीं भाऊबंद दाहा आसाभी होतो तितके यांस समक्ष पुसिले कीं तीाा तान जोसी आबा वयेकरून आम्हास वडील विद्वान होते परंतु वृत्तीचें दाखलापत्र देणे तें सर्वांस कळऊन सर्वांचे विचारें द्यावे तुम्हास कोण्हास बोललें होते कीं काय शपथपूर्वक सांगावे तेव्हां सर्वांहीं सांगितलें कीं पत्र सातारकर यास दिलें आसे आमच्या आईकण्यांतही नाही एकस्यानी दाखलापत्र द्यावयाचा अधिकारही नाहीं आपल्यास चिटणिसांचे पत्र आले आहे त्याचे उतर आपल्यास वडिलोपार्जित ऐकण्यांत पाहाण्यांत असेल तें सर्वांचें संमतें सुखरूप द्यावें तान जोसी आबाचें अेकस्याचें जरी कसेंही पत्र असिलें तरी तें मसदू ! नव्हे असे सर्वांचे विचारें ठरोन पत्रोत्तर वो रा आबाशास्त्री टकले याजजवळ दिले मिति **शके १७३१ चैत्र शुा ५**

५४ [इ. १८०९] परभू ग्रहस्थ याहीं पूर्वी सातारकर टकले यांस याद करून सर्वांची समत्तें घालून गुरुत्व दिलें होतें त्याजवर आबाशास्त्री आले तेव्हां सातारकर टकले लटके [ठ]रून आबाशास्त्री टकले यांस गुरुत्वाची याद करून सर्वांचीं समतें घालून याद दिली शास्त्री याणी हे वर्तमान सुभां विदित करून सुभांहून सरकारी पत्र करून घेतले **शके मजकूर**

५५ [इ. १८०९ मे १८] हकीकत **शके १७३१ शुक्ल** संवत्सरे **ज्येष्ठ शुा ४ गुरुवार** ते दिवसीं निज्यांपुरास काहीं ब्राम्हणानी मद्यमांस भक्षिलें होते ते बहिष्कृत होऊन त्याखेरीज राहिले ब्राम्हण होते त्यांस काही पतितांचा संसर्ग जाला होता म्हणून त्यांस तळे घोसाळे बोरवाडी व सिरवली या चहुगावचे ब्राह्मण निज्यांपुरास जाऊन पतितांखेरीज ब्राम्हण होते त्यांस मुंडणपूर्वक प्रायश्चित्त देऊन शुध्ध करून पंक्तिपावन केले.

५६ [इ. १८१० जाने. १३] **शके १७३१ पौष शुा ८ शनवारी** श्री चंडिकेची समाराधना जाली श्रींचे पूजेस व जपास ब्राम्हण वो रा विठलभट वलंबे सर्वांही सांगितले त्याहींच संपादिले जोसी उपाध्यांची समजूत जाली नाहीं.

५७ [इ. १८१० जून २१] **शके १७३२ ज्येष्ठ वाा ५ गुरुवार** ते दिवसी रा विसाजीपंत केलकर कारभारी निा परशराम केशव सुभेदार याही ताकीद केली कीं दुदांडी सिवराई खुर्दा कोण्ही घेऊं देऊ नये जुना सिवराई बारीक खुर्दा द्यावा घ्यावा याप्रा ताकीद करून जुना सिवराई चालविला पूर्वी जुनाच खुर्दा चालत

होता तो दुलभसेट कसबें पुणें यानी हुजूर विनंती करून दुदांडी खुर्दा चालविला होता तो आजपरयंत पुण्यांत व देशांत व कोकणांत वसईपासून दक्षणेस तल्यापरयंत आजपावेतो चालला आतां तो मोडून बारीक चालविला आष्टमीपासून उत्तरेस दुदांडी खुर्दा चालत आहे.

५८ [इ. १८१० जून २४] **शके १७३२ प्रमोद** सवसरे **ज्येष्ट वा ८ रविवार** ते दिवसी राजश्री रामचंद्रपंत दामले जमेनीस यानी पुसाटीस कसबे तळे येथे श्री विठोबाचे देवालय आहे तेथे देवाचे संमुख काळे दगडाची दीपमाला बांधिली मिति मजकुरीं काम समाप्तीस गेले.

५९ [इ. १८१० आगस्ट २२] **शके १७३२ प्रमोद** संवसरे **श्रावण वा ८ बुधवारी** राजश्री विसाजीपंत केळकर सुभ्याचे कारभारी याही कसबे तळे येथील कामथाची दरडीची वाट चिपांचे दगडानी पायऱ्या पाडून बांधिली त्या कामावर गणेशपंत रानडे ठेविले होते मिति मजकुरी काम संपलें.

६० [इ. १८१० आगस्ट २७] **शके १७३२ प्रमोद** नाम संवसरे **श्रावण वा १३ इंदुवारी** बाळंभट बिन रामभट कसबे तळे यानी रा रावजी बलाळ वलंबे कसबें मजकूर याचा कनिष्ट बंधु होता तो दत्तपुत्र घेतला सुभेदार व जमेदार व वतनदार व ग्रामस्थ मिळाले होते त्या अनुष्टानास ब्रम्हे पांडुरंग जोसी अन्या जोसी मामले तळे व सापस्थ परशराम जोसी अनंत जोसी मामले तळे व आचार्य अनंतभट भोळे श्रावणा सोमवार

६१ [इ. १८१० ऑक्टो. ७] **शके १७३२ आश्विन शुा १० रविवार** ते दिवसी श्रीचंडिकेचे देवळास सप्तशतीचे हवन केले तेथे पोथी वाचावयास श्रीधर जोसी तळेकर सापस्थ होते पूर्वी सप्तशतीचा जप मात्र होता घटस्थापना व पूर्णाहुति होम नवता तो रा विसाजीपंत बाबा केळकर सुभ्याचे कारभारी यांही पूर्णाहुतीचा होम चालता केला प्रतिपदेचे दिवसीं घटस्थापना करणार होते परंतु त्या दिवसीं काही दुर्योग होता म्हणोन चौघां सिष्टाचे विचारें ठरले कीं आज दुर्योग आहे याकरितां यंदा घटस्थापना करूं नये जप होतच आहे पूर्णाहुति नवमीचे दिवसीं करावी; पुढील वर्षापासून घटस्थापना करून जप पूर्णाहुति चालवावी त्यावरून सालमजकुरीं पूर्णाहुति मात्र केली पुढचे वर्षापासून घटस्थापना व पूर्णाहुति चालेल.

६२ [इ. १८१० ऑक्टो. २३] पुढे **अश्विन वा ११** चे दिवसी आपण परशराम जोसी निघोन पंढरपूरचे यात्रेस गेलो कार्तिक मासी मामलत रा गंगाधरपंत मराठे यांस जाली त्याजकडून गुमस्ते गंगाधरपंत भट कारभारास आले.

६३ [इ. १८११ सप्टें. १८-२६] **शके १७३३ प्रजापति** नाम सवसरे **आश्विन शुा प्रतिपदेस** श्री चंडिकेस घटस्थापना करून पुढें **नवमीचे उतर रात्रीं**

पूर्णाहुति केली कारकीर्द गंगाधरपंत मराठे सुभेदार यांचे कारकून रा। हरिपंत साठे माहा[ड]कर कारभारी होते आचार्य कृष्णंभट सापस्थ परशराम जोसी होते पूर्ववर्षी पूर्णाहुति होम मात्र जाला होता या वर्षापासून घटस्थापना चालली.

६४ [इ. १८११ डिसें. २३] **शके १७३३ पौष शुा ८** श्री चंडिकेची वार्षिकी समाराधना जाली ते समई पूज्या जप व मुंज्याची पूज्या यास तिन्हाईत ब्राम्हण बाळंभट काणे अग्निहोत्री होते.

६५ [इ. १८१३ जाने. १०] **शके १७३४ पौष शुा ८ रविवार** श्री चंडिकेची समाराधना वार्षिकी जाली ते समई श्रीची पूज्या जप व मुंज्याचे पूजेस तिन्हाईत ब्राम्हण तात्या भोळे होते

६६ [इ. १८१३ फेब्र. १३] **शके १७३४ अंगिरो** नाम सवसरे **माघ शुा १३ शनवारी** श्रीमंत बाजीराव सा। गुहागराकडून तळ्यास आले चतुर्दसीस रविवारीं वृषोत्सर्गांग ग्रहयज्ञ करून पौर्णिमेस इंदुवारीं काल्य वृषोत्सर्ग करून प्रतिपदेस मंगळवारी भोजन करून रोह्यास गेले बाबाजीपं...

[उपोद्वलक पुरावा–दुसरे बाजी पे० यांची रोजनिशी पृ० ३२२ पेशव्यांचा मुक्काम.]

ले. २ } चित्रे घराण्यांतील टिपणें {

[पोलादपूरच्या चित्रे घराण्यांतील कांहीं टिपणें शि. च. सा. खंड १० मध्यें दिलीं आहेत. येथें दुसऱ्या बाजीरावाचे कारकिर्दीपुरतीं दिलीं आहेत.]

१ [इ. १७९६ जून ५] **शके १७१८ नल** नाम संवत्सरे, **सबा तिसैन मया व आलफ, राज्याभिषेक शके १२३ वैशाख वा। ३० रविवार** ते दिवस बालाजी जनार्दन फडणीस याचा मु॥ पोलादपुरी जाला दुसरे दिवसी माहाडास गेले

[ऐलेसं भाग ९ वा पृष्ठ ४९७३ – पत्रें नं ३७९९, ३८००, ३८०४ पहा. जंत्रीप्रमाणें रा. भि. शक १२२ पाहिजे]

२ [इ. १७९७ जून ७–१७९८ मार्च १७] **शके १७१९ पिंगल** नाम संवत्सरे, **समान तिसैन मया व आलफ, राज्याभिषेक शके १२४** त्रिंबक जयेराम बापट सुभेदार किले प्रतापगड माहे **जिलकाद** गोविंदराव काले सुभेदार किले मा।र

३ [इ. १७९८ जून ५–१७९९ एप्रिल ५] **शके १७२० कालयुक्ताक्षी** नाम संवत्सरे **तिसा तिसैन मया व आलफ राज्याभिषेक शके १२५** गोविंदराव कृष्ण काले सुभेदार किले प्रतापगड

४ [इ. १७९९ जून १५ – १८०० मार्च २५] **शके १७२१ सिधार्थी** नाम संवत्सरे, **सन मयातैन व आलफ, राज्याभिषेक शके १२६** बालाजी रघुनाथ पटवर्धन सुभेदार किले प्रतापगड कारभारी आबाजी नारायण बर्वे

या सालात रघुनाथ रंगाजी व बाजीराव रंगाजी देशपांडे व गात्रकुलकर्णी पो कोंढवी व ता विन्हेरे याचा वाडा देवल्यास प्रतापगडाखाली होता तो जंजीरकर हबसी याणी कोढवीचे खडणीबाो दग्ध केला

५ [इ. १८०० मार्च १४] या साली **फाल्गुन वा [दोन] सुक्रवारी** पुणियात बालाजी जनार्दन फडनीस पेशजी कारभार करीत होते ते वारले

[ऐलेसं. भाग १२ वा पृ. ६२५८ व पृ. ६३०५, ले. ५३३६ पहा. पोलादपूरकरांस गुरुवार रात्र अडीच प्रहर ता० १३ मार्च १८०० ची बातमी शुक्रवारीं समजली असावी.]

६ [इ. १८०० मे २५] **शके १७२२ रौद्र** नाम संवत्सरे, **इहिदे मयातैन व आलफ, ज्येष्ठ शुा ४ रविवारी** पो कोंढवी तो प्रतापगड येथील ठाणे व पेट पोलादपूरची जंजिरकर शामल याणी कोढवीवर चौथाई बसऊन खडणी घ्यावया बाो दग्ध केली स्वारी माघारी जंजिरयास जात होती ती रायेगडकरी सरदार चांदजीराव दरेकर याणी बेवीस आसामी शामलाकडील धरून चामोटे १ थिटून रायेगडास नेली या साली रायेगडास हावालदार बालोजी दिवेकर व सुभेदार बालोजी कुंजेर पुण्यात राज्याचा कारभार करीत होते त्याजकडोन माहाडास कारभारी नारो नीलकट केलकर सुभ्याचे कामावर होते [जंत्रीप्रमाणें रविवारीं शुा २ पाहिजे.]

७ [इ. १८०१ जून ५ – १८०२ एप्रिल २] **शके १७२३ दुर्मती** नाम संवत्सरे, **सन इसने मयातैन व अलफ** या सालात किले प्रतापगड येथे बालाजी रघुनाथ पटवर्धन सुभेदार दुर्गोजी लाडगे हवालदार चिमणाजी खंडेराव ब्राम्हण जाधवाकडील दिवाण किले मारी बंदी होता त्याणी केलजा व पांडवगड व जंजिरकर शामल याजकडेस फितूर करून किला घ्यावयाचा विचार केला लोक जागा जागा किलानजिक जमविले त्यामध्यें कांगोरकरही कोणी मराठे सरदार होते व पारकर वतनदार म्हार किलास चाकरीस होते तेही सामीलात होऊन दिंडी व दरवाजा येथील लोक फितूर केले हे वर्तमान किलास नारो गोविंद बर्वे कारभारी होते त्यास समजल्यावर त्याणी च्यार पाच आसामी तोफेचे तोंडी दिल्या व दोहोचहूची डोकी मारली सरकारचे परवानगीसिवाये याजकरिता हुजरोन पुणियाचे मुकामीहून चौकसीस किलास नारो गोविंद आवटे सिंहगडचे सुभेदार आले त्याणी चौकसी करून चिमणाजी खंडेराव यासी मार दिल्हा किलेमारचे सुभेदार बालाजी पटवर्धन हुजरोन किले कुवारी येथील मसलतीस होते याणी पुढे **फालगुन** मासी **सुध्ध पक्षी** कुवारी घेऊन पुणियास

आले आणि सरकारात विनंति करून दोनसे लोक गोल्याकडील किले प्रतापगडास राहवयासी रवाना केले.

ले. ३ } हु { श. १७१७ भाद्र. शुा १ नंतर १
सफर २९ } पंचतन { इ. १७९५ सप्टें. २९

दिगर मोहबतनामा छ २९ माहे **सफर**चा फिरिस्ताद केला तो खुशवख्तीचे सात इचलाग होऊन कुभांडी लोका आलीबाग व हिराकोट धरोन राहिले होते त्याजवर मोर्चेबंदी तोफाचे मारागिरी करोन हिरेकोटावर निशाण चढविले त्या गुलीत बेड वर्तक व कानोजीराव देशमुख रात्रीचे पलोन गेले आहेत त्याचा बदोबस्त करोन दोस्तीचे जागा रवाना होऊन यावे म्हणोन निगारिष केले ते कुल आया होऊन आले ऐशास कुभाडी लोकाचा कर्कशा सुरू जाहाल्यापासोन आवलिया——साहेबाजवल रातदिन च्याहाणे की त्या लोकाची नामुरादी होऊन शौकतपन्हाकडील तरकीम ज्यादा व्हावी ल्याहाजा मकान महरुसा व कुलाबा ज्यातु······बिला जुदाईन असेत

ले. ४ } श्री { श. १७१७ आश्विन शुा १
सुा ११९६ रवल २९ } { इ. १७९५ ऑक्टो. १३

राजमान्य राजश्री वासुदेव गणेश कारकून निा सरसुभा गोसावी यांसि

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा **सीत तिसैन मया व अलफ** राघोजी आंगरे मृत्यु पावले यास्तव पुढें त्यांचे पुत्र राजश्री मानाजी आंगरे यांचे नावें ···किलेकोटसुध्धां वजारतमाब सरखेलीचा किताब पेशजीप्रमाणें करार व्हावा तो त्यांचे घरीं बखेडा जाहाला सबब त्यांचे प्रांताची जप्ती सरकारातुन सन **आर्बा तिसैनात** केली होती हालीं बंदोबस्त करून देऊन मुलकाची जप्ती सरसुभांतून मामलेदार यांस ताकीद करून मोकलीक करावी असें हुजुरून ठरलें याजकरितां तुम्हाकडे चेऊल प्रांताची जप्ती आहे ती मोकलीक केली असे तरी सुदामतप्रमाणें वहिवाट आंगरे करितील तुम्ही दखलगिरी न करणें जाणिजे [नि. अ.] छ **२९ रबिलौवल** [निं. अ.] पाा हुजूर [ब.*] श्री। लेखन सीमा

बार

[दुसरे बाजी. पेशवे रोजनिशी पृ. ७४ पहा जप्ती 'साबान २०' ला केली पत्र तदनंतर लिहिलें.]

ऐ. सं. सा. खं. १०-२

ले. ५
साबान २ } श्री { श. १७१९ माघ शुा ३
इ. १७९८ जाने. २०

राजश्री बुगाजी नाो जोरकर किले विश्रामगड गोसि

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य——— स्नों बाबूराव कृष्ण गोरे आसीर्वाद विनंति येथील कुशल लिहीत जावें विशेष तुम्ही पेसजी पत्र पाा ते पावले ....वाघोली येथील कौल जमिनीविसी लिा त्यास तुमचे घरीहून तुमचे चिरजीव येथे या कामाबदल यावयाचे ते येथे आल्यानंतर जमिनीचा याद करून द्यावयास येईल तुम्ही आपणांकडील सविस्तर वरचेवर लिहून पाठवावें कुलाब्याकडे सिंदेयाची फौज आली होती ती हाली कोठे आहे व तिकडील मजकूर काये तो मनास आणून सविस्तर ल्याहावे तुम्ही पेसजी येकदोन पत्रे पाठविली ती पावली व धर्मोजी सिंदा याचे सांगितल्यावरून सर्व कळले रा **छ २** माहे **साबान** बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंति

[आंअ. टिपणें ६४५, ६४६, ६४७ वरून शिंद्यांची फौज कुलाब्यास आल्याचें व तिच्या हालचालींचें वृत्त समजतें. ती हकीकत रखर २५ नंतरची आहे. तद्नुरोधानें पत्रास तारीख दिली. राखं ३ पृ. ५२० पहा.]

ले. ६
साबान ५ } हु { श. १७१९ माघ शुा ६
इ. १७९८ जाने. २३

पौ २५ जानेवारी १७९८

अजम हनरावयेल ज्योनाथन डंकण इस्कोयेर प्रेजिदेंत गोवर्नदोर जनराल मुाा दामोहु

छ रफाअत व आंवालीपन्हा खुलत व मवाकत दस्तगाहा येतिजाद दोस्तां——— अजी दिल येखलास मानाजी आंगरे वजारतमाब सरखेल सलाम बादज सलाम महवल अयाम आंके येथील खैरियत जाणून आपली शादमानी हमेशा कलमे करीत गेलें पाहिजे दिगर दरी विला वरघाटीं पुणियास स्वारी व्हावयाचा मुकादिमा ठरावात......से बिनाबरां लक्ष्मण गैमार सरमुकादम व कारकून व सिपाई हमराज(ह) यावयाचे आं येखलासमंदाकडे दगेयांचे सबबेंकरून राहिले आहेत त्यास सरकारची सनद व आदमी आणावयास रवाना केले आहेत तरी हरयेक बाबे हिला न पडितां येऊन पावत तें करावें व जंजिरे खांदेरी येथील माहागिऱ्यास आटकाव जाला आहे म्हणोन जाहीर जाले त्यास दोस्तीचे जागा मुनासिब नसे वरघाटी बनयाचे मालाबदल आटकाव जाला असल्यास साबिक तमाम घाट......बराये दंगेयाचे बदोबस्त जाल्यावरून घाटीं [जाव]याचा माल माहागिरीवरून जात होता त्याची तकरीर पुरसीस मनास आणितां मुंबईचे सावकाराचा माल नाहीं अजी मानी बाजिनस बेपारियाणी लेऊन दिल्हे आहे [म]रामत [सुदामत] चालत

आल्यामोर्जीब तफऊस करून सदरहू माहागरियास रजा होये तें येगानगीचे जागा करावें तर्फेने येकरंग घरोबा चालत असतां दरी मुकदमियात नौदिगर तसऊर करावें हे दानिशमदानजीक विसियार दूर असे बिनाबरां कलमे केलें असे तरी आमदरफ्तीस हरगीज मनाई नसावी रा छ ५ माहे **शाबान** ज्यादा काये लिहिणे मोहबत असों दिजे हे किताबती [ब] मोर्तब सुद

पैवस्ती— Manaji Angria Recd on 25 January 1798 Dated 23rd.

[मजकुराच्या डाव्या अंगास मानाजी आंगऱ्याचा वर्तुलाकृति शिक्का.]

ले. ७
सुा ११९९ सफर १२ } हु { श. १७२० अधिक श्रावण शुा १४
इ. १७९८ जुलै २६

अर्जदास्त [सोडलें] बंदेगान राघो बहिरव मुा पुणें बंदगीस [सोडलें] ताा छ १२ माहे **सफर** सुा **तिसा तिसैन मया व अलफ** तलग [सोडलें.] अर्ज ऐसा जे साहेबी परवाना छ २ मिनहूचा रवाना जहाला तो छ ११ मिनहूस रसीद खुसी बिस्यार हासील जाहाला पंडित प्रधान व अमृतराव यास खते पेशजी रा जाहाली ती पोहोचती होऊन जबाब घे[तले] असतील ते रवाना करणें त्यास पंडित प्रधान व [अमृतराव]ची खते पोहोचती केली जबाब याव.........ल तीमुले गाठ पडोन जबाब येत नाहीत .... अमृतराव वडगावास लस्करात आहेत जाब घेण्याचे पैरवीत आहे आले म्हणजे बंदगीस रवना करितो येथील वैवाटीची बातमी समजोन घेऊन हुजूर लिहिणे म्हणोन आज्ञा फर्माविली ऐशास अर्ज ... ...बाा पेशजी लढाई जाहाली येविसींचा मार लिहिलाच होता त्याजवरून रोशन जाहला हाली दौलतराव सिंदे याजकडील बोलणार रायाजी पाटील व रामजी पाा बोलत होते की आम्हाकडील च्यार कारभारी आलीकडे जाहाले आहेत याजमुले साहेबाचे पायासी अंतर पडले याजकरिता कारभारियास दूर करितो व मुजावरखान व नारायणराव बक्षी वगैरे आम्हाकडील आ[सामी] ...... बदोबस्त ...... व बाईस खर्चाचे बेगमीस सर[जाम] तो आणि दौलतीचा बदोबस्त राखावा त्याजवरून श्रीमंताचे म्हणे की तुमचे दौलतीत मनुष्य नाही व आमचेहि नाही याजकरिता मागील तुमचे कारभारी तुम्ही काईम करून कामकाज चालवावे व नाना फडणवीस हे आमचे स्वाधीन करावे म्हणजे आम्हाकडील बदोबस्त नाना करतील याप्राो ठरोन अजम नाना यास आणिले हाली नाना सिंदेयाचे लस्करात आहेत बालोबा पागनीस यास आणावयास गेले आहे आल्यानंतर काये ठरेल ते पाहावे रात्रदिवस दोही लस्करात हुशयारी ... ... आहे पुढे होईल त्याप्राो अर्ज लेहून पाठवि ......आबा हवलदार

यास साहेबाचे क …… यासी अर्ज करावयासी सागितले आहे हवालदार करतील त्याप्रमाणे बंदोबस्त होऊन चिठ्या द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे ज्यादा काय लिहिणे हे अर्ज रोशन अर्ज [तुटक तेथें कसरीमुळें नष्ट.]

ले. ८
सफर १२

इ

शा. १७२० अधिक श्रावण शुा १४
इ. १७९८ जुलै २६

बंदगीस भिकाजी नाईक काा मुा पुणे [सोडलें] ताा छ १२ सफर तलंग [सोडलें] दिगर पुणे या ⋯ लस्कर सिद्याचे कपूने सरजेराव घाटगे व यादो भास्कर व फकीरजी गाढवे व बाबजी शंकर याप्रमाणे च्यार आसामी सिद्याकडील पूर्न कईद करून ठेविले आहे मुखे कपूचे लक्ष श्रीमत बाजीरावसाहेब याजकडे आहे त्याच्या हातीन फितुर जाला रावसाहेब याजकडे फौज पंचवीसतीस हजार जमली आहे नाना फडणीस सिध्याच्या कपू ⋯ तच आहेत खुद सिदे आपले स्वार पा ⋯ फितुर बहुत ⋯ व परशरामभाऊ मिरजकर याजवल पांच हजार फौज जमून वाई देशात मुकाम मालगाव येथे आहे व मोरोबादादा जुनरास पाच हजार फौजनी आहेत याप्रमाणे बातमी आहे आठादाहा दिवसी झाडून फौज पुण्यात येणार आहेत पर्शराम [भाऊ पटवर्धन] व नारोबा फडणीस या उभुयेतास मामले ⋯ माणसे श्रीवर्धनास साहे … साहेबाचे पायाजवल आहे माझ राचाराहाटाचा व ⋯ सार बुटक [?] याचा पैका रामाजीपंत ठोसर यांजवलून साहेबी घ्यावा म्हणौन हुकूम फर्माविला तो माझे हाती पैका आला नाही साहेब देववितील हे कितावत ……

… … … …

ले. ९
सुा १२०० साबान १७, पौष

श्री

शा. १७२१ पौष वा २
इ. १८०० जानेवारी १३

यादी बाजीराव रंगाजी **सुा मयातैन व अलफ** पो कोंढवी येथील हवाला व लिहिण्याचें काम मजकडेस आहे सरदेचें ठाणें पोलादपूर चहूकडील रहदारी चाकरीचा न्हेट बहुत सन **सबा सबैनात** कोकणपटी तोतयानी घेतली किले प्रतापगडास शह बसविला ते समई जयेराम कृष्ण याचे विद्यमानें बातमीचें काम राखिलें सरकारच्या पागा आरब गाडदी याची बरदास्त केली नवे लोक ठेविले आणि बहुत मेहनतीनें किलाचा बच्याव केला मसलतीसंमधें खर्चाखाली आलों तोतयाचे लोकानी घर लुटोन चीजवस्त नेली खराबीत आणिलें त्याजवर तोतयाचे लोकाचें पारिपत्य केलें बाजी गोविंद व जयराम कृष्ण याजबरोबर कोकणपटीच्या बंदोबस्तास होतों नंतर रायेगड तालुकियाचे बंदोबस्तास पाठविलें बंदोबस्त केला सरकारचाकरीचे उपयोगी जाणौन आफ्तागीर व मशाल व दीडशें रुपये होतें जाजती चालविलें की कचा बेहेडा करून घेतेसमई

नेमणूक करून घेणार होते बेहेडा न जाला गडबडीचे दिवस पडिले हली चाकरीवर नजर देऊन रुपालु होऊन पोख्त तैनात करून देविली पाहिजे नेमणूक ——— रुपये

१७५ वेतन सालिना मोईन

१५० कदीम

२५ इजाफा

१७५

५७ शागिर्दपेशा माणसें १ यो

१२॥ आफ्तागिराचें सामान येक वर्षाकरिता रुो २५ येकसाली [मोईन]

५॥ मशालेचे तेल

२५०

[नि. अ.] बाजी रंगाजी याणी चाकरी चागली केली सा सरकारी नेमणुक नख्त दीडशे रुो व जाजती सालमारापासून माणसे व दिवटीस तेल व आत्पगीराचे सामानाबाा मिलोन शंभर रुो माहाली साधून देणे सरकारी हिसेची दीढशेचे कराराप्रो खर्च लिहिणे सरकारची सनंद जाल्यावर खर्ची ल्याहावयास येईल येणेंप्रो करार

छ १७ साबान मयातैन पौषमास

ले. १० सुा १२०१ रवल १ } श्री { श. १७२२ श्रावण शुा ३ इ. १८०० जुलै २४

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजश्री बालकृष्ण बापुजी गोसावी यांसि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुहुर सन **इहिदे मयातैन व अलफ** शामल जंजीरकर यांजकडील लोक सरकार तालुक्यांत येऊन रयतेस उपद्रव करीत होते ते तुम्ही धरून तालुके अजणवेल येथे अटकेस ठेविले आहेत ते हाली सोडावयाचा करार करून हे सनद सादर केली असे तरी हुजुरून रा बापुजी बलाल कारकून जंजिरकराकडील जाबसालास पाठविले आहेत त्याजकडे पोहचते करून कबज घेणे ते जंजिरकराचे हवाला करतील जाणिजे **छ १ रावल** आज्ञा प्रमाण

[याच दिवशींचें गोपाळराव पासलकर तालुके अवचितगड यांस लिहिलेलें कैदी सोडण्याचें पत्र आतां रद्द केलें.]

ले. ११ सुा १२०१ मोहरम १ अधिक ज्येष्ठ } श्री { श. १७२३ अधिक ज्येष्ठ शुा ३ इ. १८०१ मे १५

यादी आरमारसमंधे कामकाज होणे त्याची कलमे सुा **इहिदे मयातैन व अलफ**

आरमाराकडे मोबदल्यास ऐवज पाच हजार कार्तिकअखेरपर्यंत देऊ त्याची परत कोलावणपैकी होऊन बाकी ऐवज फिरेल तो रोख द्यावयाची आज्ञा कलम १

सदरहु आरमाराकडे ऐवज पावेल त्यात कौलावणीचा ऐवज वजा करून बाकी राहील ते लाऊन दिल्ही जाईल येणेप्रो करार खुद हातचा.

आरमारचे सरजामाचा जिनस परबदरीहून आणावा लागेल त्यास माहागेऱ्याची सरबारा सरकारातून होत असावी कलम १

निकडीने जिनस आणावा लागल्यास सरकारातुन माहागेऱ्या दिल्या जातील येणेप्रो करार खुद हातचा

आरमारचे खर्चाबदल जिनस हर-बंदरीहून आणू त्यास जकातीचा हसील अजी माफ असावे पैदास्ती जिनस सरकारातून आम्ही घेऊ तो परबंदरी रवाना करीत जाऊ त्यास जकात घेऊ नये दस्तके सरकारातून देत असावी कलम १

खर्चाचा जिनस परबंदरीहून आणाल त्यास जकात माफ केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा

आरमाराचे वहिवाटीसमंधे जिनस वगैरे सरकारात पावले व सरकारातून मोबदला होईल त्याचा हिसेब दरमाहाचे दरमाहा होऊन मखलाशा होत असाव्या कलम १

दरमाहाचे दरमाहा हिसेब होऊन

आरमारचे सरंजाम जिनस सरकारात बाजारनिरखप्रमाणे देत जाऊ व्याज सरकारातून येकोत्राप्रो द्यावयाची आज्ञा कलम १

जिनसापो ऐवज हिसेबी ठरेल त्यास साहा महिनेपलीकडे येकोत्रा संवस्थानासिरस्तेप्रो व्याज दिल्हे जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे

पैदास्ती जिनस सरकारांत येईल तो आमचा ऐवज हिशेबी फाजील असल्यास बाजारनिरखप्रो ऐवजात द्यावयाची आज्ञा कलम १

पैदास्ती जिनस येईल तो तुमचे फाजील असल्यास त्यात निरखाप्रो दिल्हा जाईल येणेप्रो करार खुद हातचा

कौली तरांडे दर्यातुन धरून आणिले तर दत्फरात कौलाची तेरीख पाहोन सोडून द्यावे लागेल कलम १

कौली तरांडे दस्त होऊन आणिल्यास सालाचे सालात कौलाची तेरीख पाहून सोडऊन दिल्हे जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे.

कौलाची सनद आमचे नावे व्हावी कौल काढावयास सावकार वगैरे येतील त्यास कौल व्हावयाची आज्ञा आमचे मारफतीने असावी कलम १

कौलाची संनद तुमचे नावे होईल कौल काढावयास सावकार वगैरे येतील त्यास तुमचे मारफतीने कौल दिल्हा जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे

सरकारात कराराप्रो ऐवजाचा सरबरा करून सदरहु ऐवज न पावल्यास

मखलासी केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा

इनामपटी नजराणा घेऊन गावचे भात वगैरे अैवज घेतला सबब कुटुबाचे बेगमीस द्यावयाची आज्ञा पेस्तर सालापासून गाव तुम्हांकडे ठराऊन दिल्हे जातील येणेप्रो सदरहु गाव तुम्हांकडे करार करून मोकलीक चिठ्या दिल्या आहेत त्याप्रो वहिवाट करणे येणेप्रो करार खुद हातचा

जाजती अैवजाची सोय होणार नाही त्याची इतराजी नसावी कलम १

करारापेक्षा जाजती ऐवजाची सोई न जाहाल्यास इतराजी होणार नाही करार खुद हातचा

इनामपटी घेतात त्यास आम्ही कुटुबादाखल सबब न घ्यावयाची आज्ञा दुसऱ्याची साहेब सरकारात घेतात त्याप्रो आम्हांस माफी असावी कलम १

तुम्ही सरकारचे पदरचे उपयोगी पडता सबब इनामाची माफी केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा.

कलमे ११

सदरहु अकरा कलमे करार केली असेत येणेप्रो करार खुद हातचा असे

छ १ **मोहरम** उर्फ **आधिक जेष्ठ** मास

ले. १२ } श्री {श. १७२३ अधिक ज्येष्ठ.
इ. १८०१ मे

राजश्री बच्याजी रंगाजी स्वारी नाते गोसावी यासि

विनंति उपरि आडीचे रानात शामला[कडील] तेरा आसामी आल्या आहेत म्हणून बातमी आली आहे त्यास स्वारीपैकी पंचवीस माणूस चोरबातमीने पाठऊन काढा काढवणे [नि. अ.] बहुत काय लिहिणे हे विनति

ले. १३
मोहरम २० } हु {श. १७२३ अधिक ज्येष्ठ वा। ७
इ. १८०१ जून ३

बंदगीस वामनराव जनार्दन मुा तलागड बंदगीस आदाब तसलिमात व कुर्निशात अर्ज मी रसानद ता। छ **२० मोहरम** तलग साहेबाचे नेकनजरे येनायेती करून कमीन खैर असे बाजद अर्ज दयाराम गुजराथी याणी असवारी घेऊन पोलादपूर येथे जाऊन गाव लुटोन गाव जालिला आणि वोझी घेऊन येत होते तो रायेगडची स्वारी येऊन धरून नेले नाव सरकारचे सागतात म्हणोन तेथून ता। गोरेगाव येथून कागद बजिनस आला त्याची तालिक पाठविली आहे चोरट्यानी तो जागाजागा

उपद्रव फार केला आहे रोज उठोन तंटा येथे किती सांगावा रायेगडास चोरटे नेले ते सरकारचे नसल्यास बेहतर असल्यानी रायेगडकरी मामलेदार उठाऊठ पुण्यास लेहून पाठवितील तेथे बापुजीपंत गेले तेव्हा त्याजकडे वेढेपण आणिनील कोणते रंगावर जाईल न कले लाहान बाते नी मोठ्यासी लागते याचा बंदोबस्त चांगला जाहाल्या-खेरीज निशा होत नाही गोज्या धोबियाची चीजबस्तसुधा मागाहून रवाना करितो बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[अप्रसिद्ध चित्रे शकावलींत याच मजकुराची नोंद इहिदे मयातैनमधील आहे. तिचे आधारें तारीख दिली.]

ले. १४
मोहरम २१ } इ { श. १७२३ अधिक ज्येष्ठ वा॥८
इ. १८०१ जून ४

बंदगीस वामनराव जनार्दन मु॥ तलागड ... [कांहीं सोडलें.] ... ता॥ छ २१ माहे **मोहरम** तलग साहेबाचे नेकनजेर [कांहीं सोडलें] अर्ज कसबे पोलादपूर येथे असवारी दयाराम गुजर वीस आदमी घेऊन तेथे जाऊन गाव जालिला व लुटला आण तेथून निघोन मौजे रेपोवली ता॥ गोरेगाव येथे निघोन आली ती रायेगडची स्वारी जाऊन धरून नेले नाव जजिरकर म्हणोन सागितले त्याचा मजकूर बंदगीस लिहिला आहे व माहाडी चौधरी गोवल्यास नांदवीहून कोकणे याजकडून वसतस आला होता तेथून नादवीस जात: होता तो मौजे अलसुदेयाचे गाणीवर पाच आसामी सरकारचे भेटले त्याणी त्यास पुसिले की नादवीचे माहालात माणूस किती आहे त्याणी सागितले की वाडा भरून निव्राला आहे कोकणे हवालदार कोठे आहे तर तल्यास आहे म्हणौन सांगितले त्यावरून चौधरी यास उताणा घालोन मारिला बेहाल जाहाला तेव्हा त्यास सोडला त्यास गावकरी याणी उचलोन नादवीस नेला नादवीहून कागद आले त्यावरून कमीनास भला माणूस पाठऊन कागदपत्र पाहावयासी पाठविले पाहून सांगोन पाठविले की तुमची आमची भेट होईल तेव्हा जाबसाल करू सरकारची असवारी मौजे लेप व सोनघर हरदू गाव मिळोन च्यालीसपनास लोक आहेत तेव्हां सुभाहून नांदवीस संभर माणूस माहालचे रखवालीस पाठवावयासी सागितले त्यावरून कमीनानी चिठी सुभेदार याजकडे पाठविली की लोकाचे काम नाही आमचे लोक आहेत ते आम्ही न्यावयास हुजूर अर्जदास्त रवाना करितों त्यावरून राहाविले असवाऱ्या सरकारच्या गेल्या नसतील आण नाव सरकारचे जागाजागा होते त्यामुले सुभेदार चापेकर व सोमण म्हणतात तह कशाचा करिता हे मजकूर पुणेयास समजत चालले तेव्हां आमचे पारिपत्य होईल तरी पुणेयास लिहितो तुम्हास बदोबस्त होत नाही तेव्हा तुम्ही उठोन जावे व ठाणी न्यावी वैसे कितेक रोज उठोन तंटे येतात कमीनानी काये बोलावे कमीन लाचार आहे हुकूम होईल तरी निघोन येतो बापुजीपंत पुणेयास गेले

तेथे त्याची अबरु राहाणार नाही कमीनानी किती लचाड बोलावे रोज उठोन तंटा तोंडीत असावे दुसरा आधिक होतो या बाबे हुकूम फर्मावणार साहेब आहेत बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[अप्रसिद्ध चित्रे शकावलीच्या आधारें तारीख दिली.]

लें. १५ } श्री { श. १७२३ ज्येष्ठ
सुा १२०२ } { इ. १८०१ जून

दाो बाो जबानी गंगाजी बिन त्रिंबकजी नरे खोत मो लोहारे ता बिरवाडी सुा **इसने मयातैन व आलफ** कारणे शेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसाजे ठाणे पोलादपूर येथील सदर व पेठ शामलाचे लोकानी मारून आग लाविली, ते दिवसी मी पोलादपुरी होतो. याचा मार काय कसा जाला, तो तपसीलवार लेहून देजे म्हणौन आज्ञा, त्यास, जमना गुजर याचे कर्ज देणे, त्याविसी त्याजकडील माणूस बसला. त्याचे मनाचिठीकरिता घराहून चार घटका दिवसा रविवारी निघोन दुकानी आलो. बोलणे जाले. चिठी दिवेलावणी[स] घेतली. आगोधर येतेक्षणी दरेकरीण इजकडे पाणी घेऊन तबाखु खादला. धोंडजी घोरपडे याचा रामराम जाला. नंतर चिठी घेऊन घरी जावयास लोहारचे खलाटीत घटका रात्रीस जात होतों. तों, इतकियांत शामलाचे लोक पनास आाा सदरी गावचे मार्गे येतां गाव चाभार पटी मजी[!] करितो तेथे मंडली मी विचारल्यावर सदरहुप्रा गडकरी म्हणौन बोलले बरोबर जानू गुरव महाबलेश्वर हाली वाा मौजे लोहारे हा होता. त्याही मजला कोण, कोठील, म्हणौन विचारले. मी लोहारकर गंगाजी नरे म्हणोन सागितले. कोठे गेला होता म्हणोन विचारले. तेव्हा मी सागितले, गुजराकडे चिठी निवारण आणावयास गेलो होतो. ती चिठी त्यास दाखविली. तेथे माझे पागोटे व सेला घेतला. मजला व गुरवास फिरविलें. हत्यारे भवती लाविली मानेवर तरवारा दोन ठेविल्या हाती ढेण पेटविली होती मी त्यास कोठे जातां असे विचारले नाही. त्याही मजला बरोबर घेऊन पोलादपूरचे मार्गे चाललें. तेव्हा मी बोलले[।], ही लूट काय. आम्ही कौली मुलकातील. असे म्हणतां दोनच्यार सरदार भोवते जाले. त्याणी सिव्यागाली लोकास देऊन माझे पागोटे सेला कोंडालकर सेत लावितो तेथें देविला आणि मजला व गुरवास बरोबर आणिले. चिखलीचे वोढ्यापलीकडे गुरव राहिला त्याची माझी मग गाठ पडली नाही. चिखली आलीकडे दोन वाटा फुटल्या आहेत तेथे सारे जमा जाले. तेथे निवडी केली. नदीकिनारा जावे तरी पाण्याची वाट. माणसांची गलबल. याजमुळें वरचे मार्गे जावें असा बेत करून वाटाड्या पुढें होणें. नाव घेऊन ते कोणी बोलले नाहीत, मीही ऐकिलें नाही. ते वाटेस लागोन जाऊ लागले. ते वेलेस मी त्यातुन उडालों, चुकवोन मावलतचे आंगास निघालों. तेथे मात्र निक्षूण मनांत समजले की पोलादपुरावर जातात. त्यांत माझे वोलखी

कोणी नव्हतें व कोणकोण सरदार लोक यांचे नाव येकंदर ठाऊक नाही येकाचे अंगावरी ताबडे, सकलादी टोपी होती. दोघास मसुरेचे चोलणे होते त्याचे हातुन सुटलो, ते पोलादपुरावरी खलाटीचे मार्गे चाललें. मी तसाच निघोन पाण्यावरी चिखलीचे गेलो, परसाकडे बसलो, पाणी घेतले. तेथ क्षेणभर तंबाखु खाण्यास बसलो. इतक्रियात दीन दीन म्हणोन हाक ऐकिली. आगीचा उजेड पाहिला. तसाच परतोन चामारवलीत येऊन माझेबरोबर चला म्हणोन चाभारास बोलले[।] तो कोणी येईनात. इकडून गाव मारून जाळून खलाटीचे वाटेनी निघोन गेले. जलले. चाभाराचे घरावरी जावे असे बोलले तेव्हा चाभार पळून गेले. मीही बिबावीकडे आलो. नंतर गावची माणसे सारी नदीत भरली होतीं, तिकडून मार्गानी भोसल्याचे घराजवल येऊन हक मारली तो कोणी जाब दिल्हा नाही. तेथून पिंपलाचे पाराजवल तिस्यावरी आलों. तेथे दोनच्चार गावकरी मंडलीची गाठ पडली. चिखलीवरून सुटल्यानंतर त्याचा आमची गाठ पडली नाहीं. गुरव परभारे घरी पावला. घरची माणसे बहुत हैरान जाली. भाऊचंद मिलाले होते. तेव्हा, तेव्हा कागोरकर वगैरे गुजराचे सिपाई होते, त्याणी चाप चढऊन बसले होते. परंतु कोणी आमचे गावकरी माझे शोधास आले नाहीत. या आगोधर महिन्याच वर्तमान, ऐनाडचा गौळी कागद घेऊन आमचे गावी आला. त्याणी निरोप सागितला, स्वारी हावशाची अली आहे. त्यास सवामण तादुल, येक बकरे वगैरे घेऊन येणे. तेव्हा मी बिरवाडीस होतो. बारा चौदा भाकरी त्याच गौल्याजवल दिल्या होत्या. त्या अलीकडे व पोलादपूर मारल्यावरी जेवणखाण दिल्हे नाही व त्यांची आपली गाठ पडली नाही. हबशाची लोक आम्हावर डाफरतात की रायेगडस वर्तमान कलऊन आमची स्वारी धरली. सा। तुम्हास जाळू. फायाफितुरात आम्ही लागु जाल्यास सरकारचे गुन्हेगार. सदरहु लेहून दिल्हे याप्रा पुरसिसीनिसी पुरवणी करून देऊ. हा कतबा लेहून दिल्हा [सही]

ले. १६
सावान ११ } हु { श. १७२३ मार्गशीर्ष वा १४
{ इ. १८०१ डिसेंबर १८

अर्जदास्त [सोडलें.] वामनराव जनार्दन मु॥ तलागड [सोडलें.] ता॥ छ ११ माहे **सावान** तलग [सोडलें.] अवचितगडचे सुभेदार याही कमीनास खत लिहिले आहे तेच बजिनस बंदर्गास रवाना केले आहे जाहीर होईल [सोडलें.] येवज तूर्त गोखले आल्यासिवाये देत नाही पुणेयाकडील बातमी आताच कागदी आले त्याणी सागितले की अमारतपन्हा आमृतराव आपली बाबस्तां व माधवराव याचा कबिला घेऊन नासकास गेले हाली पुणेयांत वैजनाथ भट व बालोजी कुंजीर [श्रीमंत पेशवे] याजवल कारभार करीत आहेत ...... लस्कर सात हजार फौज पायेदल आहे त्यास खर्चाची मोठी तारांबल आहे मामलेदार याजकडे बाकी नसतां वराता करून

चैवज घेतात शाहरांतील मोठे मोठे आदमी अजुर्दा आहेत अमृतराव गेले त्या दिवसापासून शहरांत गडबडच आहे म्हणौन बातमी आहे कमीनास थंडीनी हैराण केले आहे ताप येत आहे बंदगीस जाहीर व्हावें बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[ऐलेसं. भाग १३ वा लेख ६२०९, ६२१० पहा. तुटक तेथें वाळवीनें नष्ट केलें.]

ले. १७ सवाल ७ — श्री — { श. १७२३ माघ शुा ९ / इ. १८०२ फेब्रु ११ }

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापू स्वामीचे शेवेसी

पोष्य सदासिव मांणकेश्वर सां नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष राजश्री बाजीराव रंगाजी पाो कोढवी तालुके किले प्रागड याज[कडे] प्राो माारची वैवाट आहे त्यास गुदस्तां शामलाकडोन [लोक] येऊन मााऱनिलेचा वाडा दग्ध केला बहुत नाश केला व नित्य उपद्रव होतो त्यास येविसीचा बदोबस्त होऊन पुन्हा उपद्रव न लागे ते जाहाले पाहिजे पाट फरमासी तयार करावे... आयापी येऊन पोहोचले नाहीत स्मरणार्थ ...... विनं[ति] ... राा **छ ७ शवाल** बहुत काये लिहिणे लोभ आसों दीजे हे विनंति

ले. १८ पौ जिल्हेज ९ — श्री सांब — { श. १७२४ चैत्र शुा १० / इ. १८०२ एप्रिल १२ }

राजश्री हणमंतराव दाजी[1] हवालदार गोसावी यासि

ऀ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये —— श्रों मल्हार बाजी व भगवंत बाबूराव रामराम विनंति विशेष तुम्ही कालचे पत्रीं लिहिले की वारवार रागे भरून लिहिता त्यास आपलें लिहिण्यात येक व करण्यात येक सध्याच सूतवाले यासी आम्ही कौल देऊन आणले येसे असतां दिवीचे चौकीवर चार रोज अटकाऊन ठेऊन रात्री सेपनास माणूस पाठऊन झाडून बैलसुधा किल्याखाली नेले म्हणून कललें येसे आपले-कडून होते तेव्हा बदरी उदमी कसा येतों तुम्ही लिहिलें की जे करणे ते आज्ञनेच करितों त्यास आपल्यास कसी काये आज्ञा आली तिची नकल पाठवावी किंवा तेथे पाहावयासी तुमचे उतर आल्यावर येथोन कारकून पाठऊन देतो तुम्हास सरकारची आज्ञा असल्यास आमचे काही जात नाही दुसरे अडकणार ... डिचे भरवाडाचे बकरे आज धरून नेले पहिले येक नेले त्याचे तुम्हास लिहिले असतां काही आले नाही हाली दुसरे नेले असो जे करता ते बरेच करितां आम्ही वसाहत करितो तुम्ही त्यास उपद्रव करितां माहाल आमचा सानक [?] नाहीं आम्हास कामकाज सांगितले याजकरितां

जालेले वर्तमान लिहावे लागले मर्जीस आल्यास भरवाड पाठविला आहे याचे बकरे देवावे लोभ करावा हे विनंति

पौ छ ९ जिल्हेज

[१ हणमंतराव दळवी किल्ले पारनेरा. गायकवाडांचे ताब्यांतील प्रदेशांत जाणाऱ्या मालावर पेशवे आपल्या प्रांतांत नाक्यांवर जकात घेत व गायकवाडांच्या प्रांतांतून पेशव्यांच्या प्रांतांत जाणाऱ्या मालावर गायकवाड जकात घेत.– पहा The Gaikwads of Baroda, Vol. V p. 391 १९ मार्च १८०२ चें पत्र.]

ले. १९
जिल्हेज ११

श्रीसांभ

शा. १७२४ चैत्र शुा १२
इ. १८०२ एप्रिल १४

राजश्री हणमंतराव दळवी हवालदार गोसावी यांसि

र्दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्यें——श्नों मल्हार बाजी व भगवंत बाबूराव रामराम विनंति येथील कुशल ताा **छ ११ जिल्हेज** जाणून स्वकीये लिहीत असावे विशेष सुताचे बैल पेठेत नेऊन अटकाऊन ठेविलें आणि त्यास बोलता की तुम्ही हिमायेत केली त्यास त्याही हिमायेत काये म्हणून करावी व तुम्हावर जबरदस्ती काये केली असो तुमचेच सागितल्यावर त्याही मागे कची चिठी नेली की माल बदरी येऊ द्यावा जकातीचा यैवज सरकारची आज्ञा ज्यास येईल त्यास देऊ यैसी तुमचे सांगितल्यावर आणली असता तऱ्ही मालास रजा दिल्ही नाहीं सावकारानी जकातीचे फडशास यैवज घरीहून आणला नाही तुम्ही तो त्याजपासोन जकात घेतल्यासिवाये येऊ देत नाही याजकरितां माल साराच तुम्ही आपलेजवळ ठेऊन बैलास रजा द्यावी तुम्ही जे करणे ते दूरंदेशा करून सरकारआज्ञेने करिता याजप्रो तुमचे लेख आम्हाजवळ आहेत सरकारची जकातीची अमदानीचे दिवस हेच त्याची नुकसानी होते त्याचा जाबसाल धण्यानी विचारल्यास आपण करतील उत्तर पाठवावे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] **पौ छ ११ जिल्हेज**

ले. २०
मोहरम १२

हु

शा. १७२४ वैशाख शुा १३
इ. १८०२ मे १५

अर्जदास्त [सोडलें] बंदा वामनराव जनार्दन मुा पुणें [सोडलें] ताा **छ १२ माहे मोहरम** तलग [सोडलें]

बाजद अर्ज [सोडलें] आमारतपन्हा बाजीराव व चिमाजी आपा नासिकास पंधरावे तारखेस जाणार लस्कर नवे ठेवीत आहेत आगरे याजवर मसलत आहे यैसे बोल-

तात दारू व तोफा नव्या करावयाचा मोठा कारखाना लागला आहे येथे मुतसदी कुंजीर व मुनशी व वैज्यनाथ भट व देसमुख व सरसुभा यैसे आजारी पडिले आहेत कोण्हावर इतबार नाही मनास येईल ते श्रीमंत करीत आहेत कोण्हाचे काडीमात्र चालत नाही पुढे कसे होईल ते न कले हाली सरसुभाहून पत्रे सावरकर[!] व सरसुभाचा कारकून यास घेऊन पाठविली आहेत सरकारतर्फेस उपद्रव रेवदंडकर हाली करणार नाही आगोधर सरसुभाहून लोकास व आरमारकरी यास ताकीद गेली आहे हाली लोकास फिरोन पत्रे घेऊन रा। केली आहेत सारे लोक उठोन आणावयाचे पैरवीत आहे सरकारतर्फेहून कोठेहि तुर्त तसदी येकंदर होऊ नये सनद जाईतो लोकानी कोरळचे कोरळेस राहावे व रेवदडकर याणी रेवदंड्यास असावे सरकारचेतर्फेस येऊ नये यैसे जाले आहे मागाहून काये होईल ते पाहातो बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

ले. २१ सुा [१२०]२ मोहरम २०	हु	श. १७२४ वैशाख वा। ६ इ. १८०२ मे २३

पौ छ **२३ मोहरम** जाब छ **२६ मोहरम** सन इसने

बंदगीस वामनराव जनार्दन मुा पुणे [कांहीं सोडलें] ता छ **२० मोहरम** तलग [सोडलें] अर्ज–इकडील बातमी आमृतराव पडित जोरवे येथे आहेत फौज पाच हजार आहे होलकर पंढरपुरानजीक आला आहे सिंदे बराणपुरास आहेत फौज बहुतेक हिंदुस्तानात रा। केली तीन कंपु व पंधरा हजार फौज मात्र सडी आहे बाबूराव आगरे यास आजच सामोरा जाऊन घेऊन आले निजामआलीकडील आपले जागा आहे भोसले आपले जागा आहेत कर्नाटकात बाजीराव बर्वे याची रवानगी जाली दाहा हजार फौज दिल्ही आण इग्रजावर रा। केले येथे दिवसोदिवस तुळु आहे फौज जागाजागाची आणवीत आहेत मानकरी सारे व हुजुरपागा साऱ्या जमा केल्या आहेत स्वारी नासिकास जाणार आहे बाळुमियाकडील वकील येथे आहे मिया येका महिन्यानी येथे येणार आहे इग्रजानी कबूल केले आहे की जजिरकराची आम्ही कुमक काडीमात्र करीत नाही मुबईहून जिनस काडीमात्र नेऊ देऊ नये यैसी येथे टोपकर यास सागितले आहे त्याणी मुबईस लेहून पाठविले आहे उतर आले नाही त्या शोधात आहेत तल्या... किल्या... गोविंदराव सोमण... आज दोन दिवस... जाहाले पैका पटला नाहीं पटला म्हणजे खाली येणार ... किल्यासुधा जाहाली व अवचितगडची मामलत दादोपंत गोडबोले याचे बेख्यानी केली सिके जाहाले सुवर्णदुर्ग येथील यैवज सरकारचा दरसाल येणे त्यास काल ताकीद जाली की जंजिरकरास यैवज देऊ नये सरकारचा हुकूम होईल तेव्हा देणे तर द्यावा यैसी बालाजी कुंजीर यास सागितले आहे यामोजीब येथील हकीकत आहे कमीनानी काये करावे त्याचा खंबीर चागला होऊन हुकूम सादर फर्माविला पाहिजे त्याप्रो करीन येथे राहून सार्थक नाही

सरकारचे बोभाट मना होते म्हणजे बोलावयास येते येथे आमारतपन्हाची जवानीची उमद घनीपणा नवा तेव्हा च्यार नजीक आहेत ते गैर माहीतगार गुदस्ता होते ते हाली नाही नवेच कारभारी आहेत असा येथील विचार आहे याचा विचार करून हुकूम फर्मावणार साहेब धनी माबाप आहेत बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[ऐलेसं. भाग १३ वा पत्र नं. ६३८४ पहा; तेथील पत्र अपूर्ण आहे. इसन्ने मय्यातैन मध्यें छ २० मोहरम दोनदां येतो; अखेरसाल धरून तारीख.]

ले. २२
मोहरम २०

श्री

श. १७२४ वैशाख वा। ६
इ. १८०२ मे २३

श्रीमंत राजश्री———बाबासोहब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा प्रां सुरत आठाविसी दडवत विज्ञापना ता। छ २० माहे **मोहरम**पावेतो किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीचे आज्ञेप्रमाणे साहेबाचे चरणाजवल येकनिष्टेनी सेवाचाकरी केली सालमजकूरी किलेमजकुरची बेगमी नाही कोठीस तीन खडी भात सिलक राहिले तेव्हा तेही पावणेतीन खडी भात लोकास आडिसेरीपो। घालण्याविसी राजश्री आन्याबा आभयेकर याचे बधु रा। रावजी याची आती निकड पडली तेव्हा त्यास उतर सागितले की साहा महिन्याचे बेगमीस ठिकाण नाही आणि तीन खडी भात सिलक राहिले ते देविता पुढे च्यातुरमासचे बेगमीचा काये विचार तों उतरी केले की मागील [ग]ला झाडून खर्च करून मग बेगमी करणे तरी करू त्यास किला सरकारचा येका दिवसाची बेगमी नाही तेव्हा किलेकोटाचे काम यास्तव खर्च करणे मना केले त्याजवरून सेवकाचे निसबतीचे लोकसुध्या दिभतीवाद घालणे म्हणून याद्र झाली ते बजिनस यादीची नकल करून स्वामीचे चरणाजवल पाठविली आहे येविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत त्यास आम्ही पुसले की दरोबस्त सिलका झाडता आनी दारू गोली मात नसता जाया होईल त्यास ते बोलले की आमचे आम्ही सिलक झाडू आगर ठेऊ दारू बिघडली तरी आमची बिघडेल परतु आम्ही झाडा सिलकेचा करणार अैसे बोलले तेव्हा आम्ही बोललो की किलेकोटाचे काम येथे आसा विचार योजिलात त्यापेक्षी येथे रक्षेन कोणत्या आसरयावर करावे तेव्हा याचे बोलणे तुम्हास गरज काय आमचे मनास येईल त्याचे हावले करू आगर आमचे चितात येईल तैसे करू अैसे बोलणे पडले तेव्हा आम्ही काही याचे ठेवणूक नव्हे स्वामीचे सेवक आणि स्वामीनी जागा रक्षणाकरिता ठेविले आणि आमलदार हा विचार योजितात तेव्हा कोणयेक जाग्यास नुकसान आली आसता स्वाम चाकरास पुसती[ल] तेव्हा आम्ही उतर काये द्यावे आनी येवढीही करून जुने लोक आजपावेतो सेवाचाकरी येकलक्षाने

करीत आले तेही रजेस घातल्यानें आम्हास भरवसा याचा न पुरे यास्तव याप्रमाणे स्वामी आज्ञा आहे की हे मधेच करितात यास्तव सेवेसी विज्ञापना लिहिली आहे तरी याप्रमाणे मामलेद्राराची वर्तणुक आसल्यास आमच्याने जाग्याचे रक्षण कसे होते यास्तव पुढे स्वाम सब्द लावितील यास्तव वि विज्ञापना लिहिली आहे बदोबस्त करावयाचा तो पक्का करून द्यावा नाहीतेव्हा सेवकास येण्याची आज्ञा जाहाली पाहिजे सेवेसी किलेकराने फार विस्तार काय लिहू सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

[कागदास एक जोड.]

ले. २३ } श्री { श. १७२४ ज्येष्ठ शुा १२
सुा १२०३ सफर १२ } नकल { इ. १८०२ जून १३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो गोविंद गोसावी यांसि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुा **सलास मयातैन व आलफ** किले प्रतापगड येथील मामलत सरकारातोन रां खंडोजी जाधव याजकडे आहे त्यास किलेमारचे बेगमीचे कोढवी महालात शामलाकडील चोरट्यानी दंगा करून गाव जाळून माणसे तोडितात म्हणौन हुजुर विदित जाले त्याजवरून हे पत्र सादर केले असे तर तुंम्ही तों रायेगड येथील गावगना ताकीद करून चोरट्याचा पता लाऊन पारपत्य करणे गावकरी याणी चोरट्यास आसरा देऊन बातमी न सांगितली आणि तुंम्ही त्याचे पारपत्य न केले असे जाल्यास प्रतापगडकरी चोरट्याचा मुदा गावकरीयाचे आंगी लाऊन परभारे नेऊन पारपत्य करितील जाणिजे **छ १२ सफर** आज्ञा प्रमाण मोर्तब असे

[याच तारखेस चंद्रगडचे हवालदारासहि बाजीरावानें याच मजकुराचें पत्र लिहिलें.]

ले. २४ } हु { श. १७२४ आषाढ शुा १
सफर ३० } { इ. १८०२ जुलै १

अर्जदास्त अर्ज दरबंदगी ... वामनराव जनार्दन मुा पुणे [सोडलें] ता छ ३० माहे **सफर** तलग [सोडलें] बखैर असे

बाजद अर्ज-इकडील बातमी होलकर याची फौज दाहा हजार पठाण व दाहा हजार होलकर याचा साला यैसी वीस हजार फौज राहुरी वामोरीलग येऊन तमाम मुलुक उज्याड करीत चालले होलकर नदीआलीकडे आला नाही येणार आवाई आहे आमारतपन्हानी तोका व फौज दाहा हजार व गारद यैसी गारपरीवर डेरे दिल्हे आहेत दुसरी नवी फौज ठेवितात मानकरी हुजुर पागेयावर इतराजी करून झाडून खासी हुजुरातीस दूर केले असे लौकिकात आणोन त्यास आतोन

ताकीद केली की तुम्ही आमृतराव याजकडे जाऊन चाकर राहून त्यास धरावे असे सागोन आज दोन दिवस मानकरी निघोन गेले हाली छ २९ सफरी फडके याचे आदमी व मोरोचा फडणिस व त्याचे बटे व दुसरे ब्राह्मण कारभारी वाड्यात नेऊन अटकाऊन ठेविले वाड्यात कालपासोन कोण्ही जात नाही मनाई जाहाली आहे कोण्हास कैंदत घालतील याचे शास्वत नाही कमीनास रजा दिल्ही आहे परंतु खताचा जाब मागितला तो यावयास सागितला आहे तो जाहला म्हणजे निरोपास गेल्यावर दोन बाता रुबेरुब बोलतो इतक्यात इलाही नी आलनाचे दुवेनी बरेपणा दिलात आणिल्यास बेहतर आहे नाहीतर निघोन येईन सरकारतर्फेचे बोभाट हाली येत नाही जे बोभाट येतात की सोमण व गोडबोले याणी जंजिरकरास अजीज केले आहे दोन हजार गारद मात्र दोन सुभा रा। करावे म्हणजे पंधरा रोजात अवल मतगड घेऊन देतो बा। दुसरे लस्कर पाठवावे म्हणौन आजच पत्रे सोमणाची आली सोमणाचा इतबार काडी-मात्र नाही पाच आसाम्याविसी तेथे बोलणे लागले ते येथे लेहून पाठविले की जजिरकराचे माहालची लावी पाजुली[!] म्हणौन जंजिरकरानी भला माणूस पाठविला की आमची लावणी करू द्यावी व पाच आसाम्या धरिल्या आहेत त्या सोडाव्या म्हणजे प्रातात उपद्रव करीत नाही असे बोलतात त्यावरून जंजिरकरास सांगोन पाठविले की आगोधर ब्राम्हण नेले ते तल्यास पाठवावे वा। चोरटे धरिले ते सादावयास येतील म्हणौन व कितेक मजकूर आपले तारीकचे लिहिले व गोखले याणी लेहून पाठविले की जंजिर-कर या नजीक ताफेयाचे मारणीवर मरूड आहे तेथे आमचे लोक जाऊन येतात सा। आगराभोवते कुपण घातली आहे अमा तिची खबर लौकरच घेतो लोक लौकरच रवाना करावे असे लिहिले त्याची पैरवी गारद हजार पाठवणार आहेत अमां हनोज निघाली नाही व बोरली पेसजी हुजूर कोकणात कोण गेला होता त्यास सनद लेहून दिल्ही आहे की लोक ठेवणे व पागोटे येक दिल्हा त्याणी सनद बजिनस सरसुभा दाखविली आण सागत आहे की सरकारची वोळख माझी चागली आहे मजला आज्ञा करावी पाच हजार रु। मजला हाली द्यावे आपले लोक येऊन जंजिरकराकडे जाऊन त्याचा चाकर म्हणऊन तुर्त मतगड घेऊन देतो असे कबूल केले त्याची रवानगी काल नारायेण जोसी पेणकर याणी करून दिल्ही व जोसी याणीं पनास माणूस आपले रखवालीस घरी पेणेस आज रवाना केले आहे येथे तो ज्यास बोलता येत नाहीं त्याणी जंजिरची मसलतीत सिरावे असे जाहाले कोण्हाजवळ बोलावे काये करावे काये लाच्यारीस कमीन येऊन पडलो आहे याची शरम औलियां—— पाचपीरसाहेबास आहे येथील बातमी वरचेवर लेहून पाठवावी तरी वाटेची कसी निभावेल जासूद गेले ते आपले घरी बसले काये करावे उपाये नाही कमीनास आज तीन दिवस ताप येत आहे अमां तैसाच वाड्यांत जात आहे बापूजीपंत कवडीकर यास खत सरकारचे आले अमां ते सरकार तर्फेकडील काही बोलत नाही त्याजवर घुसा कारण जंजिरकराची तारीफ सांगतो म्हणौन

बोलत नाही सिंधेयाची चिठ्या दोन येक महिन्याच्या दिल्ह्या अमां कारखानदार हाती धरीत नाही तेव्हा कमीनानी आमारतपन्हाचे हवाली केल्या हा येथील धनीपणा आहे दोनसे रुो खर्चास द्यावयास सागितले त्यास ते म्हणतात तूर्त मजवल नाही बंद्गीस जाहीर व्हावे बंद्गीस रोशन होये हे अर्जदास्त

[कागदास एक जोड. ऐलेसं. भाग १४ वा पत्र नं. ६३९९ वर मोरोबा फडणीस इत्यादींच्या कैदेचा उल्लेख पहा. पत्र नं. ६३९६ वर गारपिरावरील डेऱ्याचा मजकूर]

ले. २५ } हु { श. १७२४ आषाढ वाा १४
खल २७ } { इ. १८०२ जुलै २८

बडे मुरंबी अजम सेखसाहेब मुाा म्हैसले दाममहबतहु

ई अजी दिल येखलास वामनराव जनार्दन मुाा पुणे सलाम बाजद सलाम महवल मक्सूद आंकी [सोडलें] आम्हांकडील बातमी आम्हास रजा आमारतपन्हाची जाहाली खत व दस्तक आल्यास आज चौदा रोज जाहाले तैसेच निघोन यावे तेव्हा अंदेश करून राहिलो बायेश होलकर याची उचल आहे दक्षणा होये तो वाट पाहा[वी] इतक्यात काये होते ते मालूम पडेल आण आपले कागदी जातील–येतील बारीक–मोठी बातमी समजेल हे दिली आणोन राहिलो आहे तलकरियास येथून खत आमारत-पन्हाचे गेले की जंजिरकर याचे लोक म्हसल्यास आहेत त्याजवर छेपा घालावा आण मतगडावर पाचसे माणूस येथून ...... ते गेले म्हणजे येकच हला करून .... हुशार राहावे कोण्हाचा इतबार करू ...... बी लोक बहूत बोलतात अमां त्यावर ... रेवदंड्यास बातमी घडीघडीची व ... ... आहे याची चौकसी बहुत बारकाईनी करावी...यात दाणा नाही पैसा नाही जिनस नाही लोक आहेत ते बेदिल आहेत वख्त हाच आहे पुढे असा येणार नाही अैशा बातम्या येथे डाकचौकींनी येतात ब्राम्हण आणावयाचा हंगाम हाच आहे आता दंगा कराल तितका होईल पेणेकडील ब्राम्हण सात आसाम्या मातबर या मसलतीत आहेत त्याची नावे

१ नारायेण जोसी पंडित	१ नारायण जोसी श्रीवर्धनकर
१ दादंभट भावे	१ घारंभट धारप
१ कृष्णभट आठवले	१ लक्ष्मण जोसी घागरेकर
१ चिमणाजीपंत दामले	१ बाबाजीपंत साठे मामलेदार रेवदंडा
४	४

सदरहु आसामीस नसीहत कचेबंचेयानसी होईल तरी जाग्याचा आब राहील सदरहू आसाम्यानी जाग्या सबिलपाण्याबराबर केले आहे दुसरे ब्राम्हण यात नाही मोठा नेट याचा आहे हे दिली खुद जाणोन याची पैरवी जसी समजेल तैसी आठा

ऐ. सं. शा. खं. १०–३

रोजात आम्ही येथे आहो तो जाली म्हणजे चागले येथे आम्ही जो उपाये करावयाचा त्याची पैरवी पाहात आहो काये इलाही करील ते खरे घरी आमचे लडके लाहान आहेत [घरगुती मजकूर वगळला] वाटेची मनाई नाही रा। छ २७ माहे **रबिलौवल** ज्यादा काये लिहिणे हे कितावती [तुटक तेथें फाटलें.]

ले. २६ }
रवल २९ }

हु

{ श. १७२४ श्रावण शुा १
{ इ. १८०२ जुलै ३०

अर्जदास्त [सोडलें] वामनराव जनार्दन मुा पुणें [सोडलें] छ २९ माहे **रबिलौवल** [सोडलें] इकडील मजकूर तरी खंडेराव रास्ते याचे बेटे आज मुहूर्तानी निघोन तल्यास यावयास आपला वाडा सोडून बाहेर पडिले त्यानजीक माहितगार गोविंदराव [सोमण] याचे बेटे व चिमाजी माणकर याचे बेटे व गोपालराव पासलकर व रेवदंडकर सिंदे व कानिटकर राजमाचीकर थैसे चौघास वाड्यात मेजवानी करून कदीम सिलकी चाकर जंजिरकरासी माहीत सबब नेमणूक करून रवानगी केली बराबर च्यार हजार गारद व मावळी माणूस व देसचे थैसी रवानगी जाली आहे रेवदंड्याहून बातमी आली की हाच वख्त आहे असा येणार नाही म्हणौन काल बातमीपत्रे येताच उठाऊठ रवानगी केली बंदगीस जाहीर व्हावें साहेबी दंगे करावयाचे दिवस असता अंदेशा का धरिला आहे न कले लावणी राहिली होती तेही जाहाली रेवदंडकर याचे आठ गावची लावणी होऊन आबाद आहेत हे जाणोन जसा उपाये चालल तैसा करावा आपले मुलुकास रजा यावी आस्ता कामाची नाही मकान सलामती रयेत मिलेल तूर्त ताकीद होऊन पुकार यास समजेल येथील मजकूर सर्व माहितगारी गुलाम ढोकेकर यास सागितली आहे [सोडलें] पेणचे सुभेदार हाली दातार नारोपंत आहेत ते येथे आले [सोडलें] काल रेवदंड्याहून कागद आला त्यात मजकूर की भागवताचे मूल दोन व गोखले याचे दोन थैसे बाटवावयास काढिले होते त्यावरून कमीनास बोलाऊन नेले आण विचारिले त्यास उतर केले की जंजिरकर याचा थैवज रुजुवातीचा दरसाल देऊ म्हणौन आपले बुजुर्गांचे दस्तथैवज–तहनामे असता तो थैवज आम्ही मागतो त्यावरून आपण मसलत करिता चागली गोष्ट नाही वरकड मकान मजबूद इलाही...तमा मागे बहुत बाटविले आलीकडे हे काम साहेबाही टाकिले होते त्याची याद आपण करितात याचे पातक जंजिरकराकडे नाही [सोडलें.] तहचे बोलणे बारकाईनी कमीनाचे आग न दिसता लाविले आहे [सोडले] हाली ब्राम्हण दक्षणास आले आहेत मार्गानी मावलातून जातील उपाये जो जसा होईल तैसा करावा धुलपाचे कागदी आज येथे आले तेथे ढमढेरे आहेत त्याचे आले त्यात लेहून आले की आरमार तयार केले नारल पडला म्हणजे कोठी तोडू [सोडलें] त्यावरून त्याचे खर्चास लाख रुा रोख देविले थैशा तयाऱ्या जागाजागा

होतात कमीनाजवल बोलणे गोड चागले बोलतात आण करणी चालली आहे याचा इतबार काडीचा नाही कमीनानी आमारतपन्हा आमृतराव यास जोरव्यास कागद लिहिला की नाजक कागद येणे म्हणौन जंजिरा पाठविला त्यावरून येथे आलो असता तहचे बोलणे बोलावे ते साडून बाजाराचे निमित्य करून आम्हावर मसलत करीत आहेत त्यावरून त्याणी बाजीराव यास खत पाठविले ते खत पाहून फाडून टाकिले कागदात मजकूर जंजिरकर पाच रुा मागतात त्याची तोड काढून घरोबा राखावा हा मजकूर लिहिला ते फाडून टाकिले होलकर याची समजी पडत आहे वरकड मजकूर मूजबानी ढोकेकर बंदगीस जाहीर करितील ब्राम्हणास तूर्त बाटऊ नये धाशत होईल तितकी बरी आहे बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

ले. २७ } श्री { श. १७२४ भाद्रपद वा ३
सुा १२०३ जवल १६ } { इ. १८०२ सप्टें. १४

राजश्री बाजीराव रंगाजी पो कोंढवी गोसावी यासि

दं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य —— स्नोा खंडेराव जाधव सुभेदार किले प्रतापगड रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष किले मजकूर येथील मामलत राजश्री बालाजी रघुनाथ याजकडे होती ती सरकारातोन दूर करोन आम्हाकडे सांगितली छ ८ **जमादिलावली** किलास दाखल जालो पो मजकूर येथील वहिवाट तुम्हाकडे आहे त्याजप्रो कामकाज महाली चालवावे विजयादसमीच्या मुहूर्ते किलास भेटीस यावे नंतर सर्व बदोबस्त करोन दिल्हा जाईल तुमच्या पतकाचे लोक माहाली चाकरीस आहेत त्यास हाजरीस पाठवावे हाजरी घेऊन माहाली चाकरीस येतील जाणिजे छ **१६ जमादिलावल** सुा **सलास मयातैन व अलफ** बहुत काये लिहिणे [ब*] मोर्तब । सुद

ले. २८ सुा १२०३ } श्री { श. १७२४ आश्विन वा १४
श.१७२४, दुंदुभि आश्विन वा १४ सोम } { इ. १८०२ ऑक्टो. २५

यादी **शके १७२४ दुंदुभि** नाम संवत्सरे सन **सलास मयातैन**

१ **आश्विन वा १४ सोमवारी** येशवंतराव होलकर याची व बाजीराव रघुनाथ प्रधान याजकडील दौलतराव सिंदे याच्या फौजेचे लढाई जाहली पुणियानजीक वानवडीवर जाली सियाकडील दाहा हजार फौज पडली तेच रोजी बाजीराव व बालोजी कुंजर कारभारी पलोन सिंहीगडाखाली डोणज्यास मुकामास आले आन्नपाणी नाही अैसी आवस्ता जाली दुसरे रोजी भोजन करून बीरवाडीस मुकामावर आले तेथे एकदोन मुकाम होऊन माहाडास गेले तेथेही च्यारपाच रोज राहून तेथून निघोन

पाईचे मार्गांनी [हरणई]स गेले चिमाजी आपाही बरोबर होते येशवदाबाई माधवराव नारायण याची बायेको यासी रायेगडास ठेविली बाजीराव व चिमाजी आपा याच्या बायेका ताो गोवा येथे किलावर राहिल्या पुढे बाजीराव रेवदंड्यास गेले–

[ऐलेसं. भाग १४ वा लेख ६४६५ ते ६४८२ पहा. ६४८६ मध्यें यशोदाबाईस रायगडावर ठेवल्याचा उल्लेख. हर्णईस गेल्याचा उल्लेख ले. ६५१० मध्यें व रेवदंड्यास गेल्याचा मजकूर ले. ६५२६ मध्यें आहे. The Gaikwads of Baroda Vol. V, p. 427 वरील जोनाथन डंकनचें २० नोव्हें. १८०२ चें पत्र पहा. फॉरेस्ट-मराठा सीरीज Vol I, पृ. ५५०–५१ वर २६ ऑक्टो. १८०२कर्नल क्लोजचें पत्र पहा. संध्याकाळीं पेशवा सिंहगडाखालीं आला. दुसऱ्या दिवशी कोंकणकडे निघाला. शिंद्याचा पूर्ण पराभव. १२ नोव्हें. १८०२ रोजीं बाजीराव बिरवाडीस.]

ले. २९ स्रुा १२०३ श. १७२४ दुंदुभि कार्तिक शुा ३	श्री	श. १७२४ कार्तिक शुा ३ इ. १८०२ ऑक्टो. २९

कृतानेक असीर्वाद विशेष **कार्तिक शुा ३ भृगुवासर** जाणून [येथाल] वर्तमान यथास्थित असे आपण सुभानजी पवार याजबरोबर पत्र पाठविले ते पावले वर्तमान लेहून पाठवावे म्हणौन लिा त्यास रविवारी येक वेलेपासून होलकराचे फौजेचा व सिंदे याची फौज दोन कपु व लोक दाहा हजारनिसी येऊन श्रीमंताचे वाड्याभवता गराडा दिल्हा होता याची लढाई जुकली ते सोमवारी दिपवाली त्रितीये प्रहरपर्यंत लढाई जाली सिंद्याचे कंपूवर होलकराकडील मान्ये व होलकराकडील सरदार दरेकर [!] होत या तोंडावर श्रीमंत उभयेता व बालोजीबावा कुंजर अैसे निघाले ते कंपूचा मोड होताच निघाल ते डोणज्यास येऊन राहिले होते काल गुरुवारी निघोन मढ्या घाटचे आनछेत्रास आले आले ते वेलेस बारा आसामीनिसी आले साहा राऊत व साहा पाईचे येसे आले पाठीमागोन काही पाईचे व काही राऊत अैसे आनछेत्रास येऊन मिलाले आज दोन प्रहरा बिरवाडीस येऊन दाखल जाले श्रीमत बाजीराव व चिमाजी आपा व बालोजी बावा कुंजर व बापु फडके व रामचंद्र गोसावी छेयामियाचे ? नातु अैसे आहेत आज संध्याकाली माहाडास जाण्याचा बेत आहे घोडी कुलपली आहेत जातील किंवा राहतील हे नकले याप्राो वर्तमान आहे कालपासून बिरवाडीचे लोकाचा मनसुबा होता घरोघर सडे राहिले होते स्वारी दाखल जाल्यावर ताकीद फिरली की कोणास भय नाही पळू नये तेव्हा मनुशास धीर पोहोचला पाठीमागे काही देशबंधन आल्यास चिंता नाही पेषबंद आल्यास घर सोडावे लागेल याप्राो वर्तमान आहे कलावे सदैव पत्री संतोषवीत असावे

पौ कार्तिक शुा ३ भृगुवासर शके १७२४ दुंदुभि नाम संवछरे सन सलास मयातैन व आलफ

[ऐलेसं. भाग १४ ले. ६४६५ ते ६४८२ मध्यें हीच हकीकत; बाजीरावा-बरोबर गेलेल्यांची यादी ६५११ वर पहा. फॉरेस्ट मराठा सीरीज Vol. I पृ. ५५१, ५५२ व ५५९ पहा.]

ले. ३० }
रजब २२ } श्री { श. १७२४ कार्तिक वा।१०
{ इ. १८०२ नोव्हें. १९

राजश्री हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोसि

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—श्नो गोविंदराव कृष्ण आसर्विाद येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष किले मा।रच्या सरकारच्या सनदा देऊन चिरंजीव राजश्री वामनराव याची रवानगी करून दिल्ही त्यांस पाऊण महिना होत आला परतु तेथें पोचोन सरकार आज्ञेप्रों बंदोबस्त होऊन काही वर्तमान कलत नाहि याजकरिता मुजरद सिपाई पाठविले आहेत तरी सविस्तर वृत लिहून पाठवावें वरकड मा।र चिरंजीव राजश्री मोरोपंत आपटे याजवळ सांगणे तो सांगितला आहे त्याप्रों बदोबस्त करून पत्राचे उतर लवकर पाठऊन द्यावे श्रीमंताची स्वारी काही कारणा-स्तव कोंकण प्रां जाहली बरोबर आम्ही आलो आहो लवकरच घरीं जाणार आहे वरकड मा।र पत्री लिहावासा नाही किल्याचा बदोबस्त हुशारीने राखोन हुशार राहावें अधिकउणे वर्तमान काही अडलल्यास वरचेवर लिहून पाठवावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[यापुढील मजकूर मोरोपंत आपटे व दामोदरपंत भाऊ यांस आहे. त्यांत सारांश वरीलप्रमाणें असल्यानें उधृत केला नाहीं. [नि. अ.] छ २२ रजब

[ऐलेसं. भाग १४ ले. ६५१२ मध्यें गोविंद कृष्ण 'काळे' महाडास बाजी-रावाबरोबर आल्याचा उल्लेख.]

ले. ३१ } श्री { श. १७२४ मार्गशीर्ष वा ६ सुमार
{ इ. १८०२ डिसें. १५

राजश्री विनायकपंत गोधलेकर स्वामींस

विनंति उपरि तुम्ही पत्र पाठविले ते पावलें लिा मजकूर समजला किल्यावर गलचल जुने लोक स्वारीस खाली होते त्याणी व हवलदार याणी फितुर करून प्रातःकाली दरवाजा उघडताच लोक परवानगी न पुसता आंत येऊन दंगा केला

तेव्हा नवें लोकांकडून बदोबस्त दरवाजेयाचा वगैर करून जुने लोकाची हातेरे घेऊन झाडून खाली घालविलें जुना लोक अगदीं किल्यावर ठेविला नाही हर्णईस जंजिरेया• बाहेर इंग्रजी तारवे अकरा नागरवाडेयास बसलीं आहेत तारवावरील लोक दोन पलटणे फुटके टेबपाजवल उतरलीं आहेत याप्रों आतांच केलसीहून तीा रा परशरामपंत मामाकडून लिहून आली विठोजी नाईक यास हरिपंत बाहेर निघत नाही व किले देत नाही इग्रज आला लोक तीन पलटणें खालीं उतरलें किले घेऊन देतों वेकापा यास पाठवण आरबापैकी सेखाची तोड पाडिली दुसरेयाची पाडितो हे विनंति

[तारीख पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स खंड ७ वा पत्र नं. ३१ पृ. ३६ चे आधारें दिली. तेथें हर्णई व सुवर्णदुर्ग येथील गडबड व किल्ल्याजवळील भाग अमृतरावाचे हातीं गेल्याचें आहे.]

ले. ३२
साबान १९

श्री

शः १७२४ मार्ग. वा।६
इ. १८०२ डिसें. १५

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोस

र्द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य —— श्री गोविंदराव कृष्ण [काळे] आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावें विशेष तुम्ही पत्र छ **२४ रजबचें** पाठविलें तें पावलें लिा मजकूर सविस्तर कलला आम्ही स्वारीबरोबर म्हाडास होतों नंतर श्रीमंताची स्वारी जलमार्गेकरून वसईस गेलीं आ ··· ··· किले अंजणवेल येथे···तेव्हां पत्री मजकूर लिहिला तो सवि [स्तर] ··· ··· र मोरोपंत पुण्यास पाठविले आहेत रा गोविंदपंत निा अभयंकर याणी बलसड माहाली दंगा करून पाटणकर याचे ठाणे उठऊन आपलें बसाविले म्हणून पत्री लिहिलें परतु त्याजकडून ठाणें उठऊन पंत मार याणें आपलें बसविले याचे कारण काय आणि पारनेरा यांजविसी वलगना बहुत करितों म्हणून लिा त्यांस तुम्ही व चिरजीव राजश्री तात्या बहुत सावधगिरीने राहावे येकादा शहाणा माणूस त्याजकडे पाठऊन बोलणें करावे की आम्ही सरकारआज्ञेप्रों चाकरीचे लक्ष राखले वर्तणुक केली त्यास तुम्ही भलतीच भाषणें करिता यांत फलादेश काय त्यास सोडचिठी व सनद त्याचे हातीं गेली नाही याजकरितां कांही लबाडी करून दबाव घालून सनद मागावी असल्यास त्यांतील अभिप्राय काढून सोईवार द्रष्टोत्पत्तीस येईल तसें करावें केवल कटकट करून फलादेश कांही नसल्यास कलह माजऊ नये पारनेरासमंधे सावकारी कर्ज काढून दरबारखर्च केला त्याचा वाइदा भरोन गेला अद्याप त्यांतील परत काहीच होत नाही तरी सर्व कामें येकीकडे ठेऊन दरबारखर्चाची याद दिल्ही आहे त्यांप्रों कसेंही करून त्याची तरतुद [करून] लवकर पाठवा ...... [प्रताप]राव व भवानराव दलवी आले आहेत हे सविस्तर मुखजबानी सांगतां कलो येईल

तुम्ही त्यें प्रांतीचे माहीतगार बहुत सावधगिरीने सरकारचा शब्द न येतां बदोबस्त करावा. [नि. अ.] रा छ **१९ साबान** बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनति

[नि. अ.] पौ छ **१ सवाल**

[सदर पत्रांत जागा सोडून पुढील पत्र आहे.]

चिरजीव राजश्री मोरोपंत आपटे यांसी अनेक आसीर्वाद तुम्ही गेल्यावर ज्वर येऊन दुखणे घेतलें यास काय म्हणावें येवढें प्रकरण केले हे तुमचे भरवशावर आणि अद्याप कशास काहीच ठिकाणा नाहीं यास काय म्हणावें तरी सर्व कामें येकीकडे ठेऊन सावकाराचा उलगडा अगोदर करावा रा मोरोपंत आजच निघोन पुण्यास गेले हुडी हिकडे येई ना तर त्याजकडे पाठवावी हे आसीर्वाद

[ऐलेसं. ले. भाग १४ ले. ६५२६, ६५२८, ६५२९ वर बाजीराव वसईस गेल्याची बातमी आहे.]

ले. ३३ साबान २३ | श्री[1] शंकरप्रा | श. १७२४ मार्ग. वा १० इ. १८०२ डिसें. १९

राजश्री हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—— श्री खंडेराव नीलकंठ आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष प्रां गुजराथ येथील सरसुभा व माहालानिहायेची मामलत अनंदराव रामचंद्र याजकडे होती ते दूर करून सालमजकुरी आम्हाकडे सरकारांतून सांगितली सनदा देऊन कारकून रवाना केले आहेत सरकारआज्ञेप्रमाणे बदोबस्त करितील तुम्ही महिमाजीराव सुर्वे याजकडे पत्र मुजरद सिपाई याजबरोबर पाठविंले त्याजवरून त्याणी विदित केले की किले मारचे हवालदार लक्ष राखोन किल्याचा बदोबस्त करून हुशार आहेत किल्याचे भरतीस काही लोक पाहिजेत जुने लोक किल्यांतुन जाऊन गोविंदराव जोसी यास मिलाले याकरिता भरतीस लोक देवावे म्हणौन विनंति केली त्याजवरून गाडदी दिा रुकमुदीन निा लक्ष्मण येशवंत पाऊणसे लोकांनिसी पाठविले आहेत त्याची साबान रमजान दुमाही खर्चाची बेगमी करून दिल्ही आहे याखेरीज बापुजीराव सुर्वे यास पाठविले आहेत हे पनास लोक चागले आपले खातरजमेचे आणितील त्यास किल्यापैकी लोक गेले त्याचे येवजी करार करून किल्याची चाकरी घ्यावी गोविंदराव जोसी तेथे आले असतील त्याचे पारिपत्य करावें सरकारलक्ष राखोन येकनिष्ठपणे वर्तणुक करणे रा छ **२३ शाबान** [नि. अ.] बहुत काये लिहिणे हे विनंति

[2]पौ छ **६ रमजान**

[१, २ निराळीं अक्षरें. या पत्राची तारीख पुढील ले. २० च्या पत्राचे आधारें ठरविली.]

ले. ३४
सुा १२०३ साबान २४ } श्रीशंकरप्रां[1] { श. १७२४ मार्ग. वा ११
इ. १८०२ डिसें. २०

राजश्री हवालदार व कारकून किले पारनेर प्रां गुजराथ गोसि

ई अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——— श्रो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद व नमस्कार सुा **सलास मयातैन व अलफ** प्रां मजकूर येथील सरसुभा आनंदराव रामचंद्र याजकडे होता तो दूर करून सालमजकुरी सरकारातून आम्हाकडे सागितला त्यास आम्ही आपले तर्फेने सरसुभाचे कामावर रा। भास्कर सदासिव व चितो रघुनाथ यास पाठविले असेत मशारनिलेचे इतल्याने चालोन किले मजकूर येथील अलंगनौबत चौकी पाहाऱ्याचा बदोबस्त येथास्थित करून हुशार राहणे जाणिजे छ **२४ साबान** मोर्तब सुद [ब.] मोर्तब सुद

बार[2]

[१, २ नि. अक्षर. लेखाचे शेवटीं डावीकडे पुढील शिक्का : श्रीमार्तंड। पंतप्रधान च। रणी तत्पर खडे। राव नीलकंठ। नीरतर]

ले. ३५
मार्ग. वा १४ } [श्रीकार फाटला.] { श. १७२४ मार्ग. वा १४
इ. १८०२ डिसें. २३

चिरजीव राजश्री लक्षुमणराव सुर्वे मुा किले पारणेरा यासी

प्रति महिमाजीराव सुर्वे मुा दादर ... आनेक आसीरवाद येथील क्षम ता **मार्गसीष वा १४** पावेतो यथास्तति असे विशेष तुम्ही पत्र रा। भिवजी विचारे याजबरोबर पाठविले ते पावले व मुखजबानी सागितले ते अैकोन घेतले आण श्रीमत —खडेराव तात्या सरसुभेदार यासी समजाविले त्याणी श्रीमत—पंतप्रधानसाहेब यास सरसुभेदार याणी साहीबास समजाविले त्या ... आज्ञा जाहाली की किल्याचा बदोबस्त ...व त्याजवरून हवलदार यास सनद [सरसु]भा खडेराव तात्या रास्ते यासी सागितला त्याची सनद आभ्याकर यासी आहे ... ... हवलदारासही आहे ती आपणास समजेल चिरजीव बापुजीराव सुरवे याचे पनास माणूस ठेवावे म्हणून हवलदार यासी सनद आहे त्याप्रमाणे लोक ठेवावे शेरा किलेकरी आहेत त्याचा त्याप्रा करावा खाशाची तैनात श्रीमंत बाबासाहेब याच्या हातोन होईल मराठे व परवारी चागले पाहून ठेवावे चिरजीव रा। जइसिगराव याचा ... आसामी पतकात करून घ्यावा

[पुढील मजकूर नष्ट, तुटक तेथें फाटलें.]

ले. ३६
साबान २९

श्री शंकर[1]प्रा[1]

श. १७२४ पौष शुा १
इ. १८०२ डिसें. २५

राजश्री हवालदार व कारकून किले पारनेरा गोसावी यांसि

र्द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——— श्नो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद व नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष राजश्री चिमणाजी नारायेण ठोसर यांस किले मजकूरचे कामकाजास पाठविले आहेत तरी मारनिले व तुम्ही सरकारलक्ष राखोन येकविचारे वर्तणुक करावी रा छ **२९ साबान** [नि. अ] बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद

[2]पौ छ **१८ रमजान**

[१ व २ निराळीं अक्षरें.]

ले. ३७
रमजान ६

श्री

श. १७२४ पौष शुा ८
इ. १८०३ जाने. १ नंतर

विशेष स्वामीचे आज्ञापत्र छ **२३ तेविसावे साबाण**चे आले ते छ **६ साहावे रमजानी** पावले पाऊन सनतोष जाहला सवकाकडील हाकीकत सर्व राजश्री महिमाजीराव सुर्वे यानी सेवेसी निवेदन केली त्याजप्रमाने स्वामीनी किल्याचे कुमकेस लोक पाऊनसे माणूस रुकमुदीन निा लक्षुमण येसवत पाऊनसे माणसानसी रवणा केले आहेत दुमाही बेगमी करून म्हणून आज्ञा त्यास उदईक येऊन दाखल होतील रा आनदराव रामचद्र यांजकडील सरसुभा दूर होऊन स्वामीकडेस सरकारातून सागितला त्यास [सरसु]भाची सनद सादर जाहली व सरसुभाच्या कामावर राजश्री भास्कर सदासीव व चितो रघुनाथ पाठविले आहेत त्याचे रजतलबेत वर्तने म्हणून आज्ञा त्यास ते येऊन दाखल जाहल्यावर सरकारलक्ष राखोन व आपले चरणासी लक्ष धरून रजतलबेत वर्तनुक करून बदोबस्ता राखोन हुशार राहो येथील हाकीकत पूर्वी माहाडचे मुकामी पत्र श्रीमत साहेबाकडेस पाठविली ती पावली न पावली ते कलले नाही आनी जाबही आला नाही परतु स्वामीचे शेवकाने सरकारलक्ष धरून तेथून गडनीस सनंदा घेऊन आले त्यास वर घेण्याचा मणसबा रा गोविंदराव जोसी याचा नव्हता त्याने आपले तरफेन सीवबदी ठेऊत किला बलकाऊन बसला होता परंतु स्वामीचे सेवकाने सरकार सनदेआनवये साहेबाचे चरणाचे ठाई लक्ष ठेऊन तजविजीने गडनीस यास वर घेऊन किल्याची बदोबस्त सरकारआज्ञेप्रमाने कीला आनि गडनीस आम्ही येकविचारे राहोन सरकारआज्ञेप्रमाणे सावधगिरी राखोन आधिक आगली सीवबदी ठेऊन जाग्याचे रक्षन केल जोसीयाने प्रयेत्न फार केला परतु आजप्रयेत स्वामीचे चरणाची लक्ष धरून हुशार आहो जोसीयाणे बलसाड येथे दोन हाजार सीवबंद

करून आहे नि ते येण्याचा बेत होता परंतु स्वामी[चे] पुनप्रतापेकरून जाग्याची [बेगमी] सविबदीची वगैर करून हुशार आहो येवड्यात स्वामींनीही पुस्तपना केला जे पू ••• चे सीवबदीकरिता ज्यादा दोनसे माणूस बदोबस्ताकरिता ठेविले आहे स्वामींचे पुणेकरून जागा राखोन उभयेता हुशार आहो ज्याप्रमाने स्वाम आज्ञा होईल त्याप्रमाने जोसी याचे वेछनुरुच पारप्रंत करण्यास सेवकाकडोन आतर घडनार नाही मी तो आपले चरणाची व साहेबाचे चरणाची लक्षे राखोन सेवा चाकरी करीत आहे सर्व प्रकारे लेकराचे उर्जित करनार धनी आपण आहेत वसईस स्वारी आल्याचे वर्तमान कलते तेव्हाही पत्र व यादी बदोबस्ताची पाठविली आहे ती पावलीच आसतील

[येथें एक कागद संपला; पुढील नष्ट. मूळ कागद जीर्ण; फाटलें तेथें तुटक रेघ टाकली. कंसांत-संदर्भानें आमचें. ऐलेसं. भाग १४ वा. ले नं. ६५४४, ६५५२, ६५६९, ६५७४ पहा. बाजीराव वसईस.]

ले. ३८ } श्री { श. १७२४ पौष-माघ
इ. १८०३ जानेवारी

यादी हवालदार किले पारनेरा प्रात गुजराथ येथील कामकाजे करून घ्यावयाची

१ अडशरींचे भात चौमासा बेगमी अखेरीस असावी ही चाल असता मामलेदार करीत नाही याचा बदोबस्त कलम

१ किल्याचे काम जुने जाहाले सदरचे व काठीचे व पारबदीचे काम जाहाले पाहिजे जिनस खराब होतो कलम

१ किल्याकडे कारसाई सालाबाद नेमणुक आहे याप्रो भरती होत नाही व मुतसर प्रगण्याहून कारसाई किल्याचे बेगमीस आजपावेतो येत होती हाली येत नाही याचा बदोबस्त कलम

१ किल्याकडे दारूगोला बगमीस पाहिजे याची सो करावयाची आज्ञा कलम

१ किल्याचे रोजमरे व अडशरी वगैरे खर्च होतो याची चिठी होते यास परवानगी किलेदार याची असावी

५

ले. ३९
रमजान ८ सोमवार } श्री { श. १७२४ पौष शुा १०
इ. १८०३ जाने ३.

राजश्री बापुजीराव सुर्वे सुा किले पारनेरा गोस

दं अखडित लक्षुमी आलंकृत राजमान्य—— श्नो चिमणाजी नारायण ठोसर रामराम विनंति विशेष आम्हीं काल रविवारी सायकाली किले अर्जुन येथे आलो रा

हणमतराव हवालदार यांसी पत्र लिा आहे त्या[जवरून] सविस्तर समजेल किल्या[ची] फौ[ज]…… लोक व तुम्हीं उदईक दि……चे सुमारें पार[1] नदीवर येऊन रा…… इतक्यांत आम्हीं येऊ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ ८ **रमजान**

[तुटक तेथें फाटलें. १ पार्वती नदी.]

ले. ४०
रमजान १० } श्री { श. १७२४ पौष शुा १३
इ. १८०३ जाने. ५

पौ छ १२ माहे **रमजान**

शेवेसी भास्कर दादाजी मुा ठाणे बिरवाडी सा नमस्कार विज्ञापना ताा छ **१० रमजान**पर्यंत क्षेम असो विशेष मौजे वालण बुा येथे स्वारी माहाडकरी याची येऊन बसली आहे व दुसरी स्वारी आज आली तीही तेथेच आली व तिसरी स्वारी मौजे वालण खुर्द येथे आली किले रायगड स्वारी आणखी उतरली आहे त्याचे लोकाचे आपलेकडील लोकाचे बोलणे जाहले त्यात त्याचे उतर की आम्ही धन्याचे हुकमा[वरून] आलो तेव्हा आज्ञा येईल तेव्हा आम्ही माघारे जाऊ याप्रो बोलतात आणि लोक तोही जमतात त्यास आज्ञा येईल त्याप्रो पुढे करावयासी येईल सुभेकरी यास ताकीद करून रवाना करावे की काय लिहिले येईल त्यासारिखे रवाना करू साराष जबरीसी दिसते व पानेवकर याचे पत्र आले तेही आपणाकडे पाठविले आहे त्यावरून सर्व मजकूर ध्यानात येईल नारायणराव देशमुख व ……णें यासही वालणास रवानगी केली आहे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

[ऐलेसं. भाग १४ ले. ६५४५ पहा. मराठी रियासत उ. विभाग ३ पृ. २१८ पहा. त्याचे आधारें तारीख दिली. फॉरेस्ट मराठा सीरीज भाग १ ला. पृ. ५६१– ९ नोव्हें. चें पत्र पहा. पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स Vol. ७ वा पृष्ठ ४३, पत्र नं. ३६ पहा. त्यांत रायगडखालीं तीन सैन्यांचा उल्लेख.]

ले. ४१
रमजान २० } श्रीशंकर [1]प्रा { श. १७२४ पौष वा ७
इ. १८०३ जाने. १५

राजश्री हणमतराव दळवी हवालदार गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी आलरुत राजमान्य —— स्नेो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष तुम्ही पत्र छ **१४ रमजानचे** पाठविले ते पावले राजश्री चिमणाजीपंत ठोसर याणी लिहिले आहे त्याज-

१ [नि. अक्षर.]

वरून निवेदन होईल म्हणून लिहिले त्यास त्याचे पत्राचे उतर अलाहिदा मारनिलेचे नावे पाठविले आहे सविस्तर कलेल किल्याचा बदोबस्त यथास्थित राखोन हुशार राहावे रा बापुजीराव सुर्वे यास पनास आसामी नवे ठेवावयास सागितले आहेत ते किल्यापैकीं लोक निघोन गेले त्यांचे ऐवजी त्या सरंजा[मा]त ठेवावे मसलती लोक तुम्ही ठेविले असतील ते रा बापु मजमदार तिकडे आले म्हणजे त्याजबराबर द्यावे गल्याची वगैरे बेगमी बापु करून देतील रा छ **२० रमजान** बहुत काये लिहिणे लोभ करावा [नि. अ.] हे विनाति

[नि. अ.] पौ छ **२५ रमजान**

ले. ४२
पौ रमजान २३ } श्री {श. १७२४ पौ वा १०
इ. १८०३ जाने. १८

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार गोसावी यांसि

ई अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य——श्रो बापुजी नारायण रामराम विनंति विशेष पत्र पाठविले ते पावले लोकाचे हिसाबाविसी लिहिले त्यास राजश्री गोविंदरावजी येथे आहेत कसे हिसेब पटवायाचे असतील तैसे कोणी पाठऊन द्यावे वरकड आम्ही त्यास सागितल परतु त्याचे उतर की जो वेव्हार जाहाला तो फिरावयाचा नाही जिनसांची याद पाठविली त्यास रावजीची गाठ पडली नाही पडली म्हणजे सागू दिल्यास पाठऊ आपलेकडील काणी आला असता सारेच उलगडे होतील जिनसाविसी विचारले त्याचे म्हणणे किल्याकडे फाजील येणे आहे त्याचे फडशे व्हावयाचे त समई तसमांत रुजुवातीने असल्यास त्याचेही होईल बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ **२३ रमजान**

ले. ४३
पौ सुा १२०३ सवाल १२ } श्री {श. १७२४ माघ शुा १४
इ. १८०३ फेब्रु. ५

राजश्री हणमतरावजी हवालदार किले पारनेरा गोसावी यासि

ई अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——श्रो आनाजी नथो मुा किले पारडी रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये निजानंदलेखन करीत आसीले पा विशेष आपणाकडील माणसाने येथे तोफन केले त्याजविशई नूरममद याजसमागमे पत्र पा होते परंतु पत्राचे उतर न पा हे श्नेहास उचित नसे येथून आपणासी दुसरा विच्यार ठेवीत नाही व ते जागा व हे जागा दोन मोजीत नाही आपले आमचे श्नेहाचा रुणानबंध बहुत दिवस चालत आला आहे तेथे आसे नसावे सिपायास ताकीद असावी की कामकाजास आलियास बखेडा न करीत तथापि तसे

काही आसल्यास आम्हाकडे यावे आम्ही आंतर करणार नाही आसे श्नेह ... चालत आल्याप्रमाणे चालवावे हेच उतम नाहक सिपाई बसून राहिले आहेत हे श्रेयास उतम दिसत नाही यास्तव नूरभाईस पा आहे हे सर्व सागता श्रुत होईल येथून आपणासी कोणेपरि दुसरा भाव नाही त्याप्रमाणेच आपणाकडूनही आसावे सुज्ञास विस्तारे लिहावेस नाही सर्वदा रुपेची वृधि आसावी बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

राजश्री वामनराव तात्या स्वामिस सा नमस्कार विनंति नूरभाई सांगता येथील सर्व श्रुत होईल रुणानबधे श्नेहाची जोडी जाली आहे तेथे आसे नसावे रुपेची वृधि आसावी सुज्ञास फार काय लिहू हे विनंति

[नि. अ.] पौ छ **१२ सवाल सुा सलास मयातेन अलफ**

ले. ४४ माघ वा ५	श्री	श. १७२४ माघ वा ५ इ. १८०३ फेब्रु. ११

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोास

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य —— श्नो मोरो चिमणाजी वझे रामराम विनंति उपरि येथील कुशल तागायेत **माघ वा** ५ जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पों विशेष आम्ही कांहीं कामकाजाकरितां श्रीमताकडे वसईस आलों तों तुम्हाकडून रा दामोधरपंत आलें ते भेटोन सर्व मार सांगितला तेणेकरून संतोष जाहला येथील किल्याप्रकर्णी सरकारातुन कामकाजें व्हावयाची त्याची याद समजाऊन घेऊन मारनिल्हे माघारें रवाना केले आहेत हे मुखजबानी सांगितील त्याजवरून सर्व कलेल रा प्रतापराव व भवानराव दलवी गेलें ते पोचलेच असतील हाली रा येशवंतराव दलवी याणी पत्र तुम्हास दिल्हे ते पाठविले आहे व तीा राजश्री —रावजी उभयतां यांची पत्रे पाठविली आहेत त्याजवरून सर्व कलेल तुम्ही व राजश्री —— तात्या येकविच्यारे चालून बंदोबस्त राखिलात तेणेकरून बहुत समाधान रावजीस जाहले आहे दरबारखर्च कर्णे तो कर्ज काढून केला त्या सावकाराची निकड बहुत लागली आहे त्याची तरतुद करून पाठऊन देतो म्हणून तुम्ही पेशजी रावजीचे पत्री लिहिलेच आहे त्याप्रा ऐवज लवकर यावा येथील कामकाजे करून घेऊन लवकरच तिकडे येऊ असें आहे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ **२५ सवाल**

[याच पत्रांत जागा सोडून दुसऱ्यांनीं दळव्यांस खुशालीचा मजकूर लिहिला आहे तो उधृत केला नाहीं.]

ले. ४५
पौ सुा १२०३ मोहरम १५ } श्रीसांभ { श. १७२५ वैशाख वा १
इ. १८०३ मे ७

विनंति विशेष राजश्री रावबाबा याजकडून दोन हती व काही सामान श्रीमंत साहेबाकडे जात आहे त्याजबराबर पनाससाठ गाड्दी इग्रेजाचे व येक टोपकर आहे त्याचा आज येथे मुकाम आहे कलावे दुसरा इंग्रेज व तोफा होत्या त्या व्यापाऱ्याकडे गेले सोनगडचे रोखे जाणार येसे ऐकितों बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ १५ **मोहरम सुा सलास मयातैन व अलफ**

[The Gaikwads of Baroda vol. V, पृ. ४४० वरील १२ एप्रिल १८०३ चें पत्र पहा.]

ले. ४६
वैशाख वा ११ } श्री { श. १७२५ वैशाख वा ११
इ. १८०३ मे १७

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरोपंतदादा स्वामीचे शाो

पो भिकाजी गणेश चिपलोणकर सां नमस्कार विनंति ता **वैशाख वा ११** क्षेम आसो विशेष आपण पत्र पाा ते पावले श्नेहाचा मजकूर तपसिलें लिा त्यास इतकें विस्मरण मजला व्हावयाचें नाही किल्यावर आपल्ये भेटीस यावें खरे परंतु किल्यावर आपण सांप्रत आहा नाही याचाच संशय व किल्याचें भयहि ऐकिल्यांत होतें याजकरितां परभारे आलो राा बाबा पुण्यांत आहेत नाही याचा शोध लागावयाचा समय नव्हता ज्याचा त्यास वाडा पारका आम्ही ज्या सोंगानें होतो तो मार बालोजी नाईक यांस सागिनला आहे चिमाजीपंत नानाचाही मार सांगितला आहे हलाखी नानाची पत्रीं लिहितां येत नाही आम्ही विरमगांवी जरूर म्हणौन जाणे गेलो न गेलो व्यर्थ अशा भावने जातो यांत समजावे सरसुभा आमंदाबादचा बलवंतराव नागनाथ यांस जाला आहे परंतु दखल होईल त्या कालीं खरी हे विनंति

[ऐलेसं. भाग १४ ले. ६६६५ मध्यें बळवंतराव नागनाथास अहमदाबादचा सुभा व मामलत मिळाल्याचा व सनदांचा मजकूर]

ले. ४७
मोहरम ७(२७) } ॥ { श. १७२५ वैशाख वा १३
इ. १८०३ मे १९

अर्जदास्त [सोडलें] वामन जनार्दन मुा पुणें [सोडलें] ताा छ ७ **मोहरम** [सोडलें] कमीन साहेबाचा हुकूम घेऊन येथे आलो ते तिसरे दिवसी पंडित प्रधान याची भेट जाहाली ती उतावलीची बोलणे न जाले सरकारचे खत रुजु केले व जी……चा दिल्हा त्यानंतर बोलणे बोलण्यास सांगितले की खडेराव रास्ते याजवल

चोलणे सागितले आहे ते बोलतील त्याचे उतर करावे त्यावरून कमीनानी सागितले की काये बोलणे असेल ते रुबेरुब बोलन त्यास रास्ते याणी विचारिले की तुम्ही येथून पंचवीस हजार रुो व दोनसे खडी भात घेऊन गेले त्याप्राो चैवज तुम्हास पावला असता ब्राम्हण मात्र सोडले प्रातात उपद्रव नाना प्रकारचे ब्राम्हणाच्या बायेका माहार मुसलमान याणी धराव्या गावगना रुो द्यावे मनमाने तैसे प्रांतात दंगे केले त्याचे मुदे ... चिठ्या वजिनस आहेत तुम्ही खंडणी माहालानिहाये येथे घेता त्यास तुम्हाजवल काये दस्तवैवज सरकारचे आहेत ते दाखवणे आण आजलग चैवज घेतला तो भरून देणे हाली तुम्हाकडून प्रांतात दंगा आहे त्यास येविसी तुम्ही किती दंगा करिता तो करणे कोकणपटी उज्याड पडिल्यास चिंता नाहीं श्रीमंताचा प्रताप थोर आहे तुम्ही हुशार राहावे तुम्हावर मोहीम आहे थैसा मजकूर रास्ते याणी सागितला त्याचे उतर कमीनास जाहाले ते केले कारण श्रीमंताची आमची भेट येकांती जाहाल्यावर याचे उतर करू दरम्यान बोलत नाही जे बोलणे ते रुबरुब्र बोलो त्याजवरून मुलाकात घ्यावी तो आमारतपन्हास ज्वर येत आहे आजच हुशार आहेत इंग्रज यांची कुमक करणार व सुर्तेहून बालूमिया साहेबजादे याजकडे कागदी गोपालराव मुनसी याणी पारसी लेहून पाठविले त्याचा मजकूर साहेबजादे याणी पुणेयास यावे इतका मात्र मजकूर लेहून पाठविला आहे अमारतपन्हाची मर्जी दग्यामुळे चागली नाही साफ बोलणे आहे की जातीचे ब्राम्हण असतां ब्राम्हणास उपद्रव देऊन चैवज मागणार ... मजकूर ... हाली बंदगीस अर्जदास्त लिहिली आहे साहेबी हनोज तरी असवारिया गेल्या असतील त्या आणऊन फिरोन न जात अैसे फर्मावेले पाहिजे कमीन येथे बोलणे काये बोलावे लाच्यार करून ठेवितात बोलण्यास जागा नाही अगर खंडणीचा दस्तवैवज कागदपत्र कमीनानजीक नाही काही जे असतील ते तरी कमीनाकडे रा। फर्मावेल्यास बोलण्यास बल पडेल पडित आमृतराव जोरवे गंगथडीनजीक आहे तेथे आहेत कबिला सावताचे वाडीस माहेरास गेला आहे सिंदे होलकर याची समजी जाली नाही वरकड काही गलबल राज्यात नाही वकील सान्याचे आणोन खंडण्या मागतात नाहीतर मोइना करितो असे म्हणतात बोलणी लागली आहेत बाबूराव आगरे पाशाणे यापलीकडे आहेत त्यास तेथे राहावे मागे जाऊ नये पुढे येऊ नये आज्ञा होईल तेव्हा यावे असे करून त्यास तेथेच ठेविला आहे त्याचे बोलणे लागले आहे सरकारचा जाबस्वाल जो ठरल तो वरचेवर बंदगीस अर्ज करीन बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[या पत्रांत ७ मोहरम ही तारीख दिली आहे; पण ऐलेसं. १४ ले. ६६३३, ६६३४ व ६६३८ या पत्रांतील मजकूर प्रस्तुत पत्राशीं जुळता असल्यामुळें त्या पत्रांच्या अनुरोधानें या पत्राची तारीख ठरविली पाहिजे. ऐलेसं. १४ ले. ६६३३ व फॉमसी पृ. ५९६ वरून बाजीराव १८ मोहरमच्या सुमारास किंवा अधिक बरोबर म्हणजे ७ मे १८०३ पर्यंत पुण्यास येऊन पोहोंचला नव्हता हें स्पष्ट होतें. या पत्रांत

तर लेखक पुण्यास बाजीरावास भेटल्याचें सांगतो; म्हणून पत्राची तारीख २७ मोहरम असली पाहिजे. पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स पृष्ठ ७४ पत्र नं. ६६ पहा. बाजीराव चिंचवडास ता. ९ रोजीं येत आहे.]

ले. ४८
सुा १२०३ सफर ६

हु

शं. १७२५ ज्येष्ठ शुा ८
इ. १८०३ मे २८

अर्जदास्त [सोडलें.] वामनराव जनार्दन मुा पुणें [सोडलें] ताा छ ६ सफर सुा **सलास मयातैन अलफ** [सोडलें] आमारतपन्हा बाजीराव व चिमाजी आपा सासवडास मेजवानीस वैद्याचे घरी गेले तेथें तापानी पडले त्यास आमारतपन्हा आमृतराव याचा कबिला तवलुद व्हावयास आपले मायबाप याचे घरी सावताचे वाडी येथे घर होते तेथे गेला होता तो फौत जाला व बेटा जाला होता तोही फौत जाला ते सुतक आले आहे सासवडाहून पुणेयास आले नाही येणार आहेत [सोडलें.] मांडल तपेयाची लावणीची हकीकत काये जाली ते मालुम होत नाही हाली रेवदडकर याचा उपद्रव आहे की नाही ते समजत नाही कज्या तुर्त मोडावा असे साहेबाचे दिली असल्यास येथे तोड काढून तुर्त मतलब करून घेतो नाहीतर मग उगाच हिसके घ्यावयाचे काम नाही त्याजकडे खेपा घालाव्या तो फुगोन मुतसदी जातात कमीन त्याचे घरी जात नाही सरकारचे वाड्यात जाऊन तेथे जाबस्वाल होणे तो होतो साहेबाचा हुकूम जलद यावा म्हणोन कागदी राा करितो ते तेथे जाऊन धरी बसतात [सोडलें.] कर्मीन तल्यास असतां अजम बाबाजीपंत गोखले सुभेदार यांचे बोलणे पडिले की आमचे मुतासिलात तुमचा जकातीचा अमल आहे त्याचे कदीम सिरस्ते दरसेकडा दुतर्फा रुा पाच जकात घ्यावयाची चाल असता श्रीवर्धन येथील सुपारीचा इजारा पारसी यास दिल्हा तो तीन रुा सेकडा सागतो त्याजवरून कमीनानी हुजूर अर्ज केला त्यावरून परवाना पारसी यास दिल्हा की कदीम जकातीची चाल सेकडा पाच रुा प्रो आहे त्या मोजीब देत जाणे [सोडलें.] हे अर्जदास्त

[ऐलेसं. भाग १४ पत्र नं. ६३९० मध्यें बाजीराव सासवडास गेल्याचा व मेजवानीचा उल्लेख. ६६३८ मध्यें अमृतरावाच्या भार्येच्या निधनाचा उल्लेख. सफर ६ अव्वल व अखेर सालींहि आली असल्यामुळें तारीख ठरवितांना खरेशास्त्र्यांचा गोंधळ झाला आहे.]

ले. ४९

श्री

शं. १७२५ वैशाख.
इ. १८०३ मे पूर्वी

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री देवराव रावजी स्वामी गोसावी यांसि

पो दामोदर विठल मुा बोरगाव ... [सामान्य मजकूर] इकडे पेढारियाचा [उपद्रव] फार लिहिता पुरवत नाही नेरल्याची वाडी माहालची झाबडली घोडी च्यार

नेली बायेका लुटल्या वाटसरू ठार केले आनेक प्रकारचे उपद्रव भोवारे गावास केले ते लिहिता न येत आपण सावध असून कामकाज करावे तिकड दगा पेढारियाचा नसल्यास लेहून पाठवावा म्हणजे मंगळा घोडा आपल्याकड पाठऊन देऊ घोड्याचा बच्चाव जाला पाहिजे ... हे विनंति

[पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स Vol. 7 पत्रें ७२, ७३, ७४ पहा.]

ले. ५०
रखर २७ — श्री — { श. / इ.

राजश्री हणमतराव दलवी किले पालगड गोसावी यांसि

श्रो विसाजी लक्ष्मण आसविाद् विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले तेथे फाजेचा मार लिहिला तो कलला मेढा घालून चौकीपाहरेचा बदोबस्त करणे चौकीपाहारा करून हुशार राहणे रा छ **२७ रबिलाखर** हे विनति

[नि. अ.] पौ छ **२८ राखर**

ले. ५१
सफर १० — श्री — { श. १७२५ ज्येष्ठ शुा ११ / इ. १८०३ जून १

राजश्री हनमंतराव हवालदार किले पारनेरा गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य—श्रो नारायेणराव नीलकठ मुा बिलिमोरें रामराम विनंति येथील कुशल ताा **१० सफर** जाणून स्वकीयें कुशल लिहीत गेले पाा विशेष आपली आज्ञा घेऊन निघालो ते येकादसी मगलवारी च्यार घटका रात्रीस पावलों येथे वर्तमान समजे की इग्रेजाचा सरजाम सुरतेहून हजारबारासे माणूस व सा तोफा पारनेऱ्या जाण्यास बाहेर निघाल्या आहेत आज मुक्काम घणदेवीचा होईल ऐसें आहे आपणास सूचना असा[वी] म्हणोन सिपाई राा केले आहेत तरी आपण सावध असावें आमची घरची कालजी आपणांस आहे घरी नाना आहेत जे सागतील ते रुपा करून देऊन वस्तवानी घरातुन बाहेर निघे ते केले पाा या समई हैगईवर नऊ नचे बहुत काये लिा लोभ करावा हे विनंति

[पत्राची तारीख जून १३ च्या पत्रावरून ठरविली. The Gaikwads of Baroda vol. V पृ. ३६३ पहा. सुरतचें इंग्लिश सैन्य व्यान्यास किंवा सोनगडास पावसाळ्यांत मुक्काम करण्यास निघत आहे. याच संदर्भात पृ. ३६५, ४ जून १८०३ चें पत्र पहा.]

ले. ५२ श. १७२५ }
सुा १२०४ सफर २२ } हु { श. १७२५ ज्येष्ठ वा ९
{ इ. १८०३ जून १३

अजम हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा दाम मोहबतहु

दं अजी दिल येखलास कपितान हारटण सलाम बाजद सलाम अंकी येथील खर जाणोन तुम्ही आपली खैरआफियेत कलमे करीत असावे दिगर सरकारआज्ञा ऐसी कीं किले पारनेऱ्याचा दखल जखिऱ्यासुध्धां हवाले घेऊन त्याचे कबज पाहिजे यैसे असल्यास द्यावे ते अमलांत आणावयाबद्दल आम्ही आज तेथे येत असों येविसीं आम्हाजवल आज्ञापत्रें आहेत तीं म्हणाल त्यास दाखऊं जादा काये लिहिणे प्यार मोहोबत असों देणे रा छ २२ सफर हे किताबत

[नि. अ.] पौ छ २२ सफर
सुा आर्बा मयातैन व
अलफ शके १७२५

[नि. अ.] R. H. Horton
Capt. Command
the...

ले. ५३ }
सफर २२ } हु { श. १७२५ ज्येष्ठ वा ९
{ इ. १८०३ जून १३

अजम कपितान हरटण दाम मोहबतहु

दं अजी दिल येखलास हणमतराव हवालदार सलाम बा[द]ज सलाम अकीं येथील खैर जाणोन तुम्ही आपली खैरअफायत कलमे करित असावे दिगर सरकार-आज्ञा ऐसी की किले पारनेराची दखल जखिऱ्यासुधा हवाले घेऊन त्याचे कबज पाहिजे असल्यास द्यावे ते अमलात आणण्याबा आम्ही आज तेथे येतो असो आज्ञा आम्हाजवल पकी आहे म्हणोन लिा त्यास आज्ञा आहे ती आम्हास न दाखविता आमचे परगण्यात यावयाचे कारण काय वेव्हार सरकारी असे असता सरकारआज्ञा न दाखविता तुम्ही आला उतम गोष्ट आहे सरकारआज्ञा आहे म्हणोन आता तुम्ही लिहिता त्यास आम्ही पाचचार वेळे लिा की सरकारआज्ञा आहे ती पाहावयासी पाठऊन द्यावी तीं पाठविली नाही हली लिा त्यास सरकारआज्ञा आहे किवा नाही हे कशावरून खरे मानावे तुम्ही फौजसुधा किल्याखाली उतरला जबरदस्तीने आता सरकारचे आज्ञेचे प्रमाण राहिले नाही आज्ञा होती तर पूर्वीच लिा होते तेव्हाच पाठवावयाची होती ज्यादा काय लिहिणे प्यारमोह[ब]त असो देणे रा छ २२ सफर हे किताबत

[The Gaikwads of Baroda vol. V पृ. ४४७, २३ जुलै १८०३ चें पत्र पहा.]

ले. ५४
पौ रवल १७
श्रीसांभ
श. १७२५ आषाढ वा ३
इ. १८०३ जुलै ७

राजश्री वामनराव रावजी स्वामींचे सेवेसी मल्हार बाजी व भगवंत बाबूराव सां दंडवत विनंति विशेष डोगरीचे चौकीदारास चिठी पाठविली ती पावली सोनगडचे मार्गे फतेसिंग गायेकवाड पंधरा हजार फौजनसी येऊन व्याऱ्याचे ठाणे घेतलें तेथे बालाजीपंत नवसरीस सुभाचे कामावर होते ते मागे पलसाऱ्यास आले व इग्रेज बारडोलीस आला चिखली झाडोन पलोन मोटा सुरजी देसाई बलसास आला यैसे यैकिले ते लिहिले आहे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ **१७ रौवल**

[The Gaikwads of Baroda Vol. V पृ. ३७९ ले. २, ३, ४ पहा बाळाजीपंत = बाळाजी लक्ष्मण. होळकराच्या मदतीनें फत्तेसिंग लढत आहे.]

ले. ५५
सुा १२०४ रजब १८
+
श्रीगजानन
श.१७२५ कार्तिक वा ५
इ. १८०३ नोव्हें. ४

[बदामी आकाराचा शिक्का]

आज्ञापत्र अजस्वारी राजश्री बलवंतराव अनंत सुभेदार प्रांत राजपुरी ताा खोत गावगना ताा गोवेले सुा **आर्बा मयातैन व आलफ** तुम्ही पत्र पाठविले ते पावले पाहाणदार सालिम सुकव्याची पाहाणी करीत नाही व पाहाणदार याजबराबर जंमीदार असावे व जंजिरकर वसुलाचा तगादा करितात म्हणोन लिहिले ते विदित जाले ऐशास जंजिरकर याचा व सरकारचे बोलणे होऊन कोण्हीयेक ठराव जाला जंजिरकराकडील माहाथे परवाने व त्याजकडील स्वाऱ्या मुलकात आहेत त्यास उटवून नेले याकरिता जंजिरकरास येक पैसा नख्त अथवा ऐनाजिनस येक शेर वसूल न देणे वरकड पाहाणदार यास आलाहिदा पत्र पाठविले आहे ते सालिम सुकव्याची पाहाणी करितील पाहाणदाराबराबर जमीदार जावयाचे त्यास कुलकर्णाचें वतन सरकारात जप्त आहे त्यापेक्षां ते यावयाचे नाही देशमुख यासी ताकीद जाली आहे त्याजकडील कारकून येतील +जाणिजे छ **१८ रजेब** +मोर्तब सुद [ब.*] मोर्तब सुद

+पो छ **२१ रजबू**

[+ निराळीं अक्षरें]

ले. ५६
सुा १२०४ साबान १२
श्री
श. १७२५ मार्ग शुा १४
इ. १८०३ नोव्हें. २७

अज स्वारी राजश्री नारो आबाजी सुभेदार ताा माहिपतगड ताा कमाविसदार कां विन्हेरे ताा मार सुा **आर्बा मयातैन व अलफ** चोरटे मुलखामध्यें जाहाले होतें

ते येकीकडेसच धरून छपाऊन ठेविले सा मसाला येकूण रुा येणे–प्रो ५ भीवराव मोरे
३ म्हार
८

येकूण आठ रुो मसाला देऊन देखत चिठी निघोन येणें जाणिजे छ १२ माहे **साबान** मोर्तब सुद [ब*] श्री मोर्तब सुद

ले. ५७
पौष शुा १३ } श्री { श. १७२५ पौष शुा १३
इ. १८०३ डिसें. २६

राजश्री गणपतराव नाना देशमूख ताा बीरवाडी गोसावी यांसी—

र्द अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये——श्नो आमृतराव देशमूख व सदासिव केशव व मोरो गोविद देशपाडे कुलकर्णी व समस्त रयेत गावगना ताा मजकूर रामराम विनंति विशेष दोन हसे सरकारचें लाविले तिसरे हसेयाचे रोखे जाहाले हुजूर सुटीविसी दोन आर्ज्या गले यास माहिना जाहाला आद्यापी हुकूम आला नाही देशात तीन हिसे सूट सरकारातोन येऊन किर्दआबादी जाहाली कोंकण प्राती…… सुटी आल्याचे वर्तमान आहे आजपावेतों नऊदाहा रुपचावर खंडीस दर नाही वीट कीड खाद व पर्ज्यन्यानी दर्यागर्क आवणे तरवें व लावलेली सेते वाहून नुकसानी जाहाली व चांगली सेते आली त्यास पीक दरोबस्त बुडाले कोठें बिघ्यास दाहामण यंधरा मण असीं उत्पन्नें मलण्या काढल्या त्याचे उतारे जाहाले याजमुळे हाहाकार फार जाहाला आहे आम्ही सर्व मिलोन हुजूर जावयास नाते येथे गेलो राजश्री मोरोबा आबा यास तुम्हीं सरकारची चिठी येण्याकरिता पाठविली ते तुम्हाकडे यावयास निघालें त्यास आम्हीं राहून घेतले आणि तुम्हास लिहिले आहे तरी श्रीची शफत तुम्हास आहे तरी पत्रदर्शनी निघोन यावें बहुत काय लिहावे लोभ करावा हे विनंति करपत्र रां **पौष शुा १३** तुम्हीं यण्यास आनमान दिरग लावाल तरी श्री कुलस्वामीची व वडिलाची शफत असे हे विनंति

ले. ५८
फाल्गुन वाा १२ } [श्रीकार फाटलें त्यांत गेला] { श. १७२५ फाल्गुन वाा १२
इ. १८०४ मार्च ९

अपत्ये दाजीबाने व सदोबाने चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा **फालगुण वद्य द्वादसी** मुा बडोदे येथ सुखरूप असो विशेष वडिली दोन पत्रे पाठविली लिहिला मजकूर सविस्तर कलला व चिरंजीव अले त्यानी सर्व कचे वृत निवेदन केले त्याजवरून सर्व ध्यानास अले इकडील मजकूर तरी श्रीमंत राजश्री फतेसिंगराव याचे लस्कर मालवा किला … वी नजीक आहे तेथ मोर्चे लागले आहेत श्रीमंत मात्र लग्नाकरिता बडोदिया अले तो निंबालकर देसीहून येणार होते ते

न अले याजमुळे ते लग्न राहिले श्रीमत सयाजीबावा यांचे मात्र कन्येचे लग्न फालगुण वद्य शष्टीस जाले राजश्री खलोजी सिंदे यांस मूल दिल्ही लग्नसमयास चिरंजीव घेऊन पोहचले हाली श्रीमत फतेसिंगरावबावा वर्शप्रतिपदा जाली म्हणजे सैन्यात जाणार अहेत लग्नाची तरतूद मंडप वगैरे चाली जाली याजमुळे श्रीमत सतोश अहेत अपल्या ... ममता पहिल्यापेक्ष्या विशेष अहे बाबा लस्करात खुशाल अहेत घराऊ मजकूर तरी काही ... [दिव]स अखेरीचे अहेत अम्हाकडून काही स ... त नाही येथही लोकाचे देणे बाराचवदा हजार ... याचीही गलचीपच अहे सर्व गोष्टी ईश्वर वडिलाचे पुण्यकरून पार पाडील आपण कोणा गोष्टीची चिंता न करावी गावचा मजकूर लिहिला त्यास कसेतरी करावे परतु सरकारातून सोंडऊन घ्यावा आपण पुण्यास जावयाचे असले तरी जलद्दीने सडे जाऊन गावचा बदोबस्त करून लवकर माघारे यावे वैशाख मासी इकडे यावे लागेल इकडे आलियावर श्रीधारकानाथ घडून पुढेही श्रीइछेने सर्व येथास्थित घडल आपले येणे इकडे जाले म्हणजे गावचे काम तसच राहील पुन्हा देशी जाणे श्रीसतेन घडल तोपर्यंत वतन जो तुम्ही बहुता दिवसाचा गाव गेलेला मिलविलात तो पुन्हा अपलेच हाते गेला मणजे उचित नाही प्रेत्न करून साडू नये सपदियाचे हावली करून यावें चिरजीव याची मर्जी काय ते काही कलत नाही अस्तु आपण पाहातील तसे करती[ल] देशी जाऊन कोण्हाचे पेचात न यावें कर्ज तो जन्मास लागलें मागील फिटल म्हणून म्हणून पुढें प्रेत्न करावा तरी आणिक कर्ज होतच आहे अता कालजी काये लि[हावी] सरजामाची बेगमी करून दोन दिवस ... [पुढील मजकूर नष्ट]

ले. ५९ } [पत्राच्या आरंभींचा भाग नष्ट] { श.१७२६ कार्तिक शुा १५ नंतर
इ. १८०४ नोव्हें. १७ नंतर

सर्वास ...घड ही जाल्या तेथून पुढे मार्गाचा बंदोबस्त करून बाबा... रानगी करून देतील वडिली पुन्हां भावनगरापावेतो काठेवाडची स्वारी परत करण्याचा मनसुबा योजून तालुके चुकवीत हाली मोरवीवर आहेत तेथील उलगडा जालियावर पुढें जीर्णगड फुल-बंदरपावेतों जाऊन काठेवाड प्रांतीचा सालमारसुध्या मुलुकगिरीचा फडशा करणार भावनगर चुकोन आलीकडे आलियावर भेटीचा संकेत घडून चरणेदर्शन घडावे ऐसे मोजीत होतो परंतु मुलुकगिरीचा हंगाम या हंगामी फडशे लौकर चुकतात सराईचे दिवस यामुळे भूमे जरब खाऊन चुकवितात तो हंगाम चुकल्यावर मोठा प्रेत्न मसलतीसी गांठ आसे विचार जाणोन वडिलीही लिहिले प्रस्तुत जंसी बडोयात दौलतीची वोढ तसीच लस्करात मला जाली याकरितां भूम्यांचे फडशे होतील तितके आपल्यास हिनावह भेटी आज नाही उ[द्यां] श्रीसते होतील दूर नाही त्यावरून विचार पाहता[भे]टीच्या योगे कितेक गुंते च्यार दिवस लागोन लांबणीवर पडते संपूर्ण मुलुकगिरी बुडते तेंव्हा जाण्याचा बेत

उतम त्याप्रों गेले श्रीसांबप्रतापे व स्वावंदाचे नेकसलेकडून भूमे पादाक्रांत होऊन सालमजकूरचे खंडणीचा फैसला करून वडील लौकरीच येतील चिंता नाही दुसरे तीर्थस्वरूप राजश्री—काकासाहेब हाली लस्करसुध्धा कोस्यावर मुकाम करून आहेत रामपुऱ्यापावेतो आजम करनेल मरीचे सोबतीने गेले ते मोठें प्राणसंकटे दिवस काढिले बाबा करनेल मरीने काकास बहुतां प्रकारें छळिले बहुत उन्मत्त होऊन लुटोन घेईन म्हणोन कितेक दुर्भाषणे केली व रोजमऱ्यास ठिकाण नाही यावरून आजम मेजर साहेबासी जालीतसी बोलणीं पडत गेली व काकानी माघारे फिरोन फौजसुा यावे म्हणोन पत्रे गेली हे मेजरसाहेबास कळलियावर त्यांणी जाल्या हकी[कती] मरीच्या मुंबईस लिहिल्यावरून आजम जनराल जूनसाहेब आले ते येथे भेट जाली बोलण्या-चालण्यांत बहुत तारीफदाना मनुष्ये दिसण्यात आला परंतु समागमाचे आंती गुणआवगुण ध्यानात येतील त्याविना काये समजते आस्तु आम्ही चितात आणिले जे तेथे जाऊन आपल्यास परिचये येईल तो खरा मारानिले निघोन गेले मरी रामपुऱ्याहून पुढे कोस्याकडे निघाला काका माघारे मंजुसरपावेतो आले तो इकडून जूनसाहेब यांचे लस्करात जाऊन पोहचले परस्परे मुलाकात होऊन ते दिवसी आगतस्वागत जाले याउपरांत जनरालसाहेबी तुम्ही माघारें का आला आतां मी नेतो तुम्ही चलावे त्यावरून मरीचे दुर्भाषणाचे भाव जे बोलण्यात आणिले होते ते मुस्तकीम जाहीर केल्यावरून त्यासही परम आश्चीर्ये वाटोन खूब आहे म्हणोन बोलले नंतर आतां त्यासी संमध नाही तुम्ही माझे भिस्तीवर चलावे सरदार व लोक यास समजोन सांगावे मी रोजगारीचा अैवज चालता व राहिला तो येथे देतो सध्या...[ऐव]ज नाही लस्करपावेतो लोकानी अैकिल्यास चांगले आहे न ऐकिल्यास बडोयास हुंड्या देतो आणि पुढे दरमहा तिलभाये वेध न पडता देईन करनेल मरीची गरज तुम्हास नाही व तोहि आता जाईल किंवा कारभार न करिता स्वस्त लस्करात राहाणार यावरून काकानीं सर्वांस सांगितले परंतु करनेल मरीच्या गुणाआवगुणाचे दोश चिती स्मरोन लोक सरदार कबूल न करीत आडोन बसले त्यावरून जनरालसाहेब व काका दर सरदाराचे राहुटीस जावोन गळ्यात हात घालोन लोकासही बहुत तऱ्हेने समजोन सांगोन हामराहा केलें आणि रोजमऱ्याचा अैवज कांहीं तेथेही दिल्हा व येथे आजम मेजरसाहेबावर हुंड्या दिल्हा नंतर सर्वत्र त्याचे दोस्तीवर खुसी होऊन माघारे फिरोन कंपनीचे लस्कराबरोबर जाण्यास हामराह जाले अैवजही कराराप्रो जिकडिला तिकडे येथे मेजरसाहेबानी पार पाडिला यावरून ... हा मोठा संतोष जाहला मोठी काळजी पडली होती नंतर ... सर्व प्रकारे त्यांचे कश्यपी लागोन चुकलो तेव्हा करनेल मरी लाहान माणूस करून जाईल ते आपणास जनराल मुंबईपावेतो वाईट वाटोन वाकडेपणा पदरी यावयाची पाळी श्रीने आणिली होती काका मागेच मंजुसराहून पुढे जाण्यास केवल कंठी प्राण आसावेत परंतु येथून लिहिली गेली यामुळे रामपुरा प्रयासे पाहिला शेवटी लोकानी तर रोजमऱ्यासाठीं वगैरे जिवासी गाठ घालोन धरणी करू लागले म्हणोन निरोपाये जाणोन फिरले ते जनराल

जूनसाहेब जाऊन पोहचताच सर्वप्रकारे सुगम जाले मोठी चिंता जिवाची वारली याउपरि जनराल व काका कोस्यावर मिळोन जाऊन काकाचीही पत्रे जूनसाहेब बहुत थोर त्याची चाल व करणे पाहून संतोष वाटला याच चालीने चालल्यास आटकेपावेतो मुलुक पाहावयास चिंता नाही यावरून उत[रे] त्वरित जाऊन पोहचावी व इकडोनही वरचेवर पत्री स[र्व] मजकूर लिहिण्यांत येऊन सांप्रात आपणास कलावे परंतु येक येक घोर निर्माण आहेत त्याचा निर्वाह करिता निसीदिवस या खाली गुजरोन तेही सोईसोईने विल्हेस लावावे कारण चहूकडून दौलतीत वोढा येऊन पडला यास्तव सर्वांची मनोधारणा रक्षोन करणे ह्याच मोठ्या बिडत्या पडून वागणें लागे आस्तु तेही सर्वप्रकारें कैलासवासीचे पुण्यंकरू[न पा]र पडत आहे चिंता नाही आपण दोन्ही पत्रे कलमबंदीवार लिहिली त्याची उतरें पों व्यारे यथील जमाबंदी ठराऊन दिल्ही त्याची याद व बारा हजार रुपयाच्या हुंड्या चिठ्या च्यार पा आहेत आणिखी ऐवज मागाहून पाठवितो म्हणोन लिा ते कलले अैशास आपण व्यारे येथील जमाबंदी व धारा टाकाने ठराविली व यादी पाठविल्या त्यात जकातीचे कलम मोघम ठेविले व दंडफुरोईचे यादीत लेहून चौकसीनें होईल बेरीज ती··· [ध]रावी म्हणोन त्या यादीवरून सर्व मजकूर ध्यानात आले परंतु बाबा हा माहाल गुदस्ता बतीस हजाराचा आकडा आहे त्याजवर चड बसवोन चालीस हजार ठराविले होते हे आपणासही किंचित समजण्यात आलेच आसल वाटते तेव्हां आपण ठराविले यांत तोटा [ये]ऊन सरकारात कसे पार पडल वरकड आपण तेथील चौकशी करण्यात कमी केले नसल ही मजला खातरजमा आहे व नजर पोहचल्यास आपण चौकसीत आलस करणार नाही याकरिता आपण तेथील बंदोबस्त चांगला ठेवावा कोण्हीकडून सरकारतोटा न व्हावा हे धोरण ठेवावे राजश्री नाना मोहनकर सुर्तेस बरे व्हावयास गेले आहेत यामुले तीा राजश्री बालबा काकान पुरुषोंतमपंतास महाली रांना केले परंतु उपयोगी नाहीत म्हणोन आपले लेखात आले त्यास तेथील भिस्त कारकुनावर आपण ठेऊ नये आपण पाहणे ते वरचेवर पाहत जावे नाना बरे होऊन लौकर महाली गेल्यास मग ते बदोबस्त राखितील तोंपावेतो पुरुषोतमपंताच्यांनी सांभाळिल्यास आपण वहिवटून घ्यावें बहुतच बखेडा बंदोबस्त राहत नाही आसे आपले नजरेस आलियास कारकून आपले खातरजमेचा पाठऊन बंदोबस्त राखावा तीा राजश्री बालबा काका येथे नाहीत व तीा बापूही लस्करांत तेव्हा तेथील जुजरुसी आपल्यास नंतर राखणें याकरितां लिहिलेआो तेथील बंदोबस्त राखावा पाो बेलसर येथील मामलतीचा मांार लिा त्याचा मजकूर पेसजी लिहिल्यावरून ध्यानात आलाच आसल बाबा मजलाही मोठे संकोच वाटोन लिहिण्यास हात चालत नाही आजपावेतो हो ह्या शब्दात ठेऊन शेवटी ना जाले हे मला कोठे प्रशस्त वाटले परंतु निरोपाये वैगुण्यआर्थ लाच्यारीमुले शेटजीची मर्जी उलंघिता आडचणी बहुत पडतात माहालावरूनच खेपा करावे तरी त्याचे हाते लाखाचे रुपयाचे पेंच उलगडून घेणे न घेता परिणाम··· कार्ये न जाले आस्तु चिंता करू नये भगवत्संतेनरूप होईल आगाध नाही जमीदार

यांजवर आदावत राजश्री नथोपंत करितील त्याची उस्तवारी करण्याचे लिहिले त्यास त्यांकडून जलालजाजती होऊ लागल्यास कलवावें लेहून बंदोबस्त करऊ बहुधा च्यातुर्मास आगोटपावेतो गुजरता घालमेलीचे घडल तसे पाहतों माझे मनात सहस्त्रगुणे आहे व लौकिकात येऊन न जाले हेही चिती प्रशस्थ वाटत नाही आसो याचा इतिहास लिहिल्यानी फल कोणते पो गावेसमंधे जमाबंदी आज्ञेप्रो कांही गांवची जाली राहिले गांव तेही मापणी करोन ठरवितो नथोपंत आजून बखेडे करितात पाटलाचे नावे पत्रे लेहून तेथे बोभाट लिहीत आसतील त्यास करणे ते वाजवी करीत आहू म्हणोन लिा त्यास बाबा आपण चौकसीने वाजवी कोण्हाचा पक्षापक्ष जलाल न करितां करितां त्यापेक्षा येथे शंभरानी गिला लिहिल्यास चिंता नाही व आप[ले लिहि]ण्यास माझी खातरजमा आहे सालमारीं दूरोबस्त माहालांवर वधारे टाकिले गावे व भाटे आपले खाजगी तेथेही सर्वांप्रो व धारा जसा साधल तसा साधावा हे धोरण आपले ध्यानात आहे त्यापेक्षा विशेष काये लिहावे लावणी आबादीचा वगैरे बंदोबस्त येथास्थित ठेवावा राजश्री दादाजी आपले आज्ञेखेरीज पाऊल टाकणार नाहीत त्याचे चिरंजीवाचा वृ(त)बंध माघमासी करण्याचे योजिले आहे कांही खर्चाची बेगमी जाली पो म्हणोन लिहिले त्यास आपलेकडून वेतनासिवाये आडीचसेंपावेतो रुपये द्यावे त्यांचे पत्री लेहून पाठविले आहे बाबास लिहिले आहे त्याप्रो घेऊन वृतबंधाची कार्येसिध्धी करावी राजश्री कोन्हेरपंत तात्या यास पो टेजों (१) येथील जमाबंदीचा ठराव सुकडीसुत करून दिल्हा सरकारखेरीज चढवावी तर मांडवीकरासही सांगित... [चढवा]वी लागल म्हणोन [लिहिले] ते कलले अैशास टेंजरे येथील जाबसाल आपण ठराऊन दिल्हा परंतु येथे कोण्ही दहा हजार रुपये चड देतो म्हणोन बोलत आहेत सावकारी निशा पत्रीही खातरजमेनी देतात तेव्हा आपण ठराविले या बेरजस पाहता आंतर फार पडते याचा विचार कसा हे लेहून पाठवावे वरकड तात्याचे ठाई आमचा आती लोभ चालवावे कुटुंबवत्छळ त्याचे भलेपणावर येथे आम्ही कोणी बोलतात त्यांसी उतर करीत नाही परंतु तात्यानीही प्रतारणा न करिता वागावे म्हणजे पार पडल व चांगले आहे त्यास तेथील वैहिवाट तात्याची समजून घेऊन त्याणीही येथा आसल ते न प्रतारणा ठेविता आपणास समजवावे नंतर बंदोबस्त करून द्यावा येथेही बोलणा-रानी तथा ठेविली नाही आज सावकारी निशा देत आहेत हा मजकूर आपणास कलावा म्हणोन लिा आहे [पेशजी]चे पेशकसीचे ठराऊन दिल्हे कडीसुध्धा बेरीज लिहिली ती कलली उतम केले पो व्यारे येथील बारा हजार रुपयांच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या राजश्री परभूदासशेठ याजकडे दिल्ह्या आणखी नजराणेखुा सात हजारांच्या अैवजाकरिता निकड केली आहे त्याही हुंड्या पाठवणार उतम आहे अैशास आजपावेतों बारा हजार रुा रसदेपो आले तेव्हा वरकड भरणा कधी होणार इतर माहालचे फडशे होऊन चुकले आसतां या माहालचे अैवजास ठिकाण नाही याउपरि हांगाम तो कोणता याकरिता आपण तेथील वसुलाचा वगैरे किल्याखुा

बंदोबस्ताचे संधान बहुत प्रकारे ठेऊन अैवज वसुलात आणोन रसदेचा व खेरीज रसदी भरणा करावा पो घणदिवी येथील पेशकसीचा मजकूर लिहिला येथे ठरावितो म्हणोन बापुसाहेबाचे पत्र आलें यास्तव याद पाठविली आहे तरी तेथे ठरऊन काये ते समजावे म्हणोन लिहिले त्यास आजम सिनोर मिंगलसाहेब यांचे बोलणें पडले आमचे-कडे नारायेण वासियाचे वतनाची जफ्ती आहे त्यापेक्षां हकदस्तुर सरकारात सालमारी घ्यावयाचे ते येथेच ठराऊन द्यावे त्याप्रों फडशा करितों म्हणोन बोलो लागले तेव्हा तीर्थरूप राजश्री—बाबासाहेबी कबूल करून आपणास पत्र लिहून दिल्हे नंतर येथे ठरवावे हे ठीक नाही जाणोन सिनोर यास समजून सांगितले जे पेशकसीचा ठराव करणे तो बाबाकडे करून फडशा करावा हे उतम येथे निरानिराले करूं लागल्यास त्याणीं तरी काये करावे तुम्ही म्हणता आसेच सारे माहालकरी बोलो लागतील व म्हणत आहेत त्यासही निक्षूण सांगोन बाबाकडेच सोपिले तसेच तुम्ही करावे गुमस्त्यास लेहून पाठवावे ते बाबाकडे नवसरीस जाऊन ठराऊन घेऊन फडशा करून देतील बाबाही वरकडा माहालाप्रो या माहालचे ठरावतील त्यावरून त्यांणीही पत्र तीर्थरूपाचे घेऊन परभारे गुमस्त्याकडे पाठविले आहे व सिनोरानी आपले मेहत्यास लिहिले आहे ते आपणाकडे येतील त्याप्रो ठराऊन देऊन फडशा करून घ्यावा पो [वसरा]ई येथे साडेच्यार हजार रुपयाची वरात सिवराव कडुचे पागेची गुदस्ताचे अैवजावर आहे त्यास गोविंदराव-भाईजी श्रमी होऊन कबूल करितात परंतु सालमार येकसष्टीचे सालात मजुरा द्यावे म्हणोन त्याचे बोलण्यावरून लिहिलें ते कलले त्यास बाबा सरकाररीतीने निक्षूण चौकसी करितां येईल परंतु मामलेदार यास प्रशस्त वाटणार नाही जमीदार खुा येक मास नवसरीस येऊन बसले रुजुवात पाहातां कश्यास ठिकाण न लागे हे चालीवर न्यावयाचें तोवरच विचार निक्षूण चौकसी करिता त्यास फार वाईट वाटल याकरिता त्याणी विचार पाहून समजून करावे वरात जाली आहे ती गुदस्ताचे अैवजात पार पाडून फडशा करून घ्यावा [मजु]रा पडणार नाही सालमार रसद भरणा व खेरीज रसदी [ने]मिल्याप्रो जिकडील तिकडे भरावा येथे भाईजी आले तरी निक्षूण हाच जाबसाल सांगावयाचा पो वसराई व मरोली येथील जमीदारास हकदस्तुर नाही आठांवनचे सालात माहालात साधोन दिल्हे म्हणतात त्यास तेथेच कादार बोलणार त्यापेक्षा ठरऊन पा म्हणोन त्यांस पेशकसीसमंधे बाबा सदर जाबसाल येकच मामलेदार यांस सागितला येथे कोण्हाची रदबदल अैकत नाही बाबाकडे जाऊन त्याचे विा तेथेच फडशा करून घ्यावा म्हणोन पस्ट सांगत आलो येथे रदबदली भीड कोण्हाचेच अैकावयाचे नाही आपण तेथेच ठराऊन फडशा करून घ्यावा तसेच काम करन !... ठरावावे तेथे उपन जमीदाराची काय होते आथवा माहालावर साधून घेणेच्या...यास येथील आत्र धरू नये आपण... सिनोर मिंगल साहेब यांसही हेच सांगितले आहे पा वास[दा] येथील पेशकसीचा मजकूर त्यांस माहालचे उपन कचे पाहून त्यात येक हजार रुपये आपलेकडून माफ करावे कारण परभुदास शेठ याजकडे मामलत

दुलभजी देसाई याजकडे शेठजीचा कर्जाऊ ऐवज येणे हक्कदस्तुर झाडोन घेतला आसतां त्याचा अैवज उगवत नाही म्हणोन येथ शेठजीकडील बोलणे काही आमचे कर्ज उगवे आसे करा व त्यास यक हजार रुपयाची सवड ठेविल्याउंपर त्याचे ते पाहिजे तसे समजून करितील पो तेलाडी येथील पेशकसीचा मार संकरजी देसाई याजकडे लग्न आहे पांचसे रुा कमी घेतल्यानी त्यास सवड पडून लग्नकार्ये होईल म्हणोन लिहिले त्यास संकरजी मजकूर याची वर्तणुक सरकारलक्षांनी चालत आहे किंवा नाही आजपावेतो त्याही आपले हाताखाली निखालसपणें वहिवट केली ... [मजकु]रास ल्याहावे त्यास पांचसे रुपयाची सवड करू[न पेश]कसीचा फडशा करून घ्यावा पो कोस आनावल येथी[ल] नवसरीखुां लिा त्यास रुस्तुमजी देसाई यास निक्षूण सांगितले आहे पेशकसी फर्मासेसुध्धा फडशा करून देतील मारानिलेचाही उलगडा जाला आहे इत:पर निघोन येतील ते आलियावर गुंता ठेवणार नाही पो कडोद येथील देसायाचे वतनाचा मजकूर लिहिला माहादजी पाटील आपण बोलाविल्यास येऊन हकीकत निवेदन करील वतनाची जफ्ती सरकारातोन करून नंतर मनास आणोन फडशा करावा म्हणौन लिहिले उतम आहे बेवारसी वतन दुसरा खातो त्यापेक्षा जफ्ती सरकारात करावयाची परंतु माहादजी पाटील यास येथे पाठऊन द्यावा म्हणजे समजोन घेऊन जफ्तीची पत्रे पाठऊन देतो हरिभाई व्यारेकर याच्या आसाम्या चालत्या करण्याविसी लिा तो भिलाचे वगैरे उपयोगी आ[ला] म्हणोन त्याचे व्यारे येथील आसामीचे वतन द्या[वयाचा] मजकूर तीर्थरूपास पुसोन मागाहून लिहितो त्यानी बापु कासी यांस आसीच भिलाची बातमी सांगोन शेव्य करविले होतें गुजराथी लोक याचा भरवसा धरिल्यानी प्राणास नाश करणार आसो आपण सावध आहेत तेथे विशेष लिहिण्याचे कारण नाही पो आतापूर येथील देसायाचे बाकीचा व सालमारचा अैवज देसाई याणी घेतला आहे त्याचा फडशा करीत नाही जमीदार यांणी यादी लेहून दिल्या त्या पाा आहेत जमीदार येत नाहीत त्यास तथे काये ते ठराऊन लिहिले पाहिजे म्हणोन लिहिले त्यास बाबा येथे रुस्तुमजी देसाई यास ताकीद केली त्याचे म्हणणें वाजवी बाकी जमीदार याचे हातची खते पत्रे आहेत रुजुवात पाहवी त्यास आपण तेथे जमीदार वछ्याईत यांस कौल पाठऊन घेऊन जावें आणि नवे व जुने मामलेदार समक्ष बलाऊन उभयेताचे व जमीदार याचे बोलणें मनास आणौन फडशात आणावे रुस्तुमजीही येणार लौकरीच येतील पो मोहे वलवाडे वगैरे हरी वसियाई याजकडील पेशकसीचा ठराव तेथे श्रीधरपंत सुभेदार याचे पुतणे बलवंतराव ठराऊन येणार म्हणोन लिा त्यास येथे ठरावीत नाही आंगाऊ वागा १ गोविंदराव भाईनी व बलवंतराव यांणी जिमा घेतली म्हणोन पेशजी जफ्ती उठविण्याविसी आपणास पत्र लिहिले होते त्यांवर मांहाली बलवतराव गेले आहेत येथून आपणास पत्रही नेले आहे तरी हरी वासियाचे पेशकसीचे बलवंतराव आपणाजवल बोलोन फडशा करून देतील पौ चौऱ्यासी येथील मामलत आठवनचे साली मनचरजी देसाई याजकडे

होती त्या साली बाकीचे खत साडेसाहासे रुपयाचे भाव्याचे पाटलाचे आहे अैवजाचा फडशा केला आसतां खत देत नाही म्हणोन लिा त्यास रुस्तुमजी देसाई यास रागें भरून सांगितले पैक्याचा फडशा केला आसता खते ठेऊन गरिबांची घरे बुडवणार ही फार... व ते तेथे आणोन द्यावे आगर...बोभाट आलियास कार्यास येणार नाही त्यास ख[त आ]पणाजवळ आणोन देतील ठेवणार नाहीत नवसरी येथील स[खाराम]...न चे नेमणुकेच्या आजमासाच्या यादी पाठविल्या आहेत याप्रो नेमणुक करून घ्यावी व आपले नांव लिा तेथे आकडा भरिला नाही त्या यादी पाहाता सर्व ध्यानात आलें त्यास बाबा आपण यादी लेहून पाठविल्या त्या ठीक आहेत व त्याप्रो वास्तविक खर्च उघाड आहे परंतु सरकारची नेमणुक करून घ्यावयाची आहे आजपावेतो नेमणुक जाली नाही आसेंच वाढोन वहिवटून नेले नेमणुक आसावी हा मार्ग चांगला आस्तु वडिलाचे विचारास येऊन होईल त्याप्रो करितों आपलही नावे वेतनाचा आकडा भरावयाचा तोहि ठरल चिंता नाही तेथील खर्चाबाा ते कडी...खेरीज रसदी ऐवज लाऊन घ्यावयाचा... तिकडील कालजीचे निवार [ण करणार] श्रीसांब आहे तरी चिंता नाही महद्संकट निवारण करील त्यास या विचाराचे आगाध ते काय आहे होलकर फरकाबाजेकडे येमुनातीराकडे गेला तिकडे कंपनीचा सरंजाम जनराल लेकसाहेब कलकत्याहून फौज-सुाा आला तो मुकाबल्यास आहे त्याणी मोठेच कारस्तान करून येश संपादिले फरका-बादेचा राज्यापासीं सधान लावोन तुम्ही होलकरासी सला करून किल्यात नेऊन मेजवानी करावी आणि भोळे पाडून धरावा आगर त्या संधीत आम्ही पलटणेसुाा येऊन पोहचतो बेफामीने घाला घालोन मारून काढू सापडल्यास धरू म्हणोन त्यास शाही देऊ करून त्याप्रो राज्यानी सळुक करून किल्यात होलकरास मेजवानी केली आंत नेला इकडे च्यालीस कोसाची मजल जनराल लेक याणी करून मेजवानीचे संधीत लस्करावर येऊन पडले खासा होलकर फरकाबादेत बराबर···सर[दार] होता गलबल होताच सावध होऊन बाहेर निघाला राज्याचा इलाज चालू पावला नाही परंतु इंग्रज लस्करावर पडताच बेफानीने सर्व लुटले गेले खासा पळून गेला तोफखानासुाा इंग्रजांनी लुटून आणिला होलकराचे पाटीलागास पलटणें पाठीवर गेली आहेत याप्रों वर्तमान लस्करातूनही काकानी लिा परंतु मुदाम कासीद जाऊन पंकें समजत नाही तिकडे दंगा फार वाटा चालत नाहीत सडे माणूस निभत नाही तेव्हां पकी बातमी थेटची येत नाही आपली फौज कोट्याचे सुमारें गेली आलीकडे पत्रेंही आली नाहीत पुढे कोठपर्यंत जाणें घडेल ते पाहावे आहे कोट्यापुढें जाऊं नये जात नाही हे बोलत आहो परंतु त्याची मर्जी राखणे ते[व्हा] ठरल ते खरें सविस्तर होईल ते मागाहून लिा पाठऊ येथील सिबंदी फौज पागा आदिकरून च्यार वर्षेपर्येत शेवा नाही कोणास काही पावले नाही आज उद्या करता आजपावेतो वोढीत आणिलें आपले वोढीचे आर्थाचा गल्हाटा झाली सारेच निकडीस आलें खर्चावाचून साऱ्याची खराबी फार परंतु काय करावे कोठेच हात घालावयास जागा नाही लोकानी तरी कोठपर्यंत दम धरावा कोठे करून पुढील

ऐवज भरीस घालोन तोड काढावी म्हणोन मेजर साहेबासी बोलत आसतां त्यांणी आपले मतलब येकटक काढोन पुढे लाविले हे करून द्यावे म्हणज कोश्यात मन घालतो तेंही त्याचे मर्जीप्रों बोलोन नमोदात आणोन कोठे केले बाबा पुढील दौलतीतील दोनतीन सालाचा अैवज भरीस घालणें प्राप्त जाला कारण लोकांची दशा पाहवेना म्हणोन केलें सावकार राजीनामा करून मेजरसाहेबाची बाबदारी करून दिल्ही याउपरी प्रथमता सिंदी मंडल धरण्यांस बसले होते त्याचे हिशेब करून तोडजोडी केल्या हिशेबाचे वांधे होते तेही समजुतीखाली आणिले सिंदीचे उलगडियावर सिलेदार व पागानिहाये हिशेब पाहून तोडी पडणे आहेत याचाही घोल आहे तोही श्रीरुपे फडश्यात येईल चिंता नाही दुसरे तहनामा खंबाईतचे मुकामी कैलासवासी तीर्थरूप बाबासाहेबी करून दिल्हा आहे तो आहेच परंतु दुसरा नवा तहनामा करून द्यावा म्हणतात कलमबंदीची याद लेहून मेजरसाहेबी आम्हाकडे पाठविली याप्रो ठराव बंगाल्याहून तह ठरतो हा मुस्तकीम विलाईतसुा मान्य कोण्ही जरी आमचा आला तरी याप्रो चालेल म्हणोन आलीकडे बोलणे चालू केले आहे बाबा त्यात मिळोन आपले स्वहिताची व सरसी दाखऊन कलमे लिहितात याप्रों आम्ही कबूल करीत नाही तुम्हीआम्ही कलमे तपासोन करणें ते करावे व म्हणतां त्याची मर्जी खपा होते व आपले मतलबासाठी कितेक कलमे सध्य:प्रद वेध करून दाखवणार याची भवति न भवति होत आहे परंतु लाच्यार पक्ष आपला मिळोन त्याची मर्जी रक्षून करणे वागणे हा गोणपक्ष प्राप्त जाला काये होईल तें पाहवे आम्हीही बोलणें घातले आहे तुमच्या व आमच्या बोलण्यास तहनाम्याकरिता बीत बसत नाही त्यापेक्षां मुंबईस आजम जनरालसाहेबाकडे जाणे प्राप्त आहे मीच जातों आणि समक्ष बोलतो ते सर्व या दौलतीस व आमचे हवालास वाकफगार बुजरुख आम्हास कैलासवासीचे ठाई आहेत त्याजवलच ठरण ते ठराऊन तहनामा करून देऊ याप्रों होत आहे जाण्यास मुंबईचे रुकार देणार नाहीत बहुधा वाटते आथापि ठरल्यास माझे जाण्याचा निश्चये होईल तेव्हा पायेमार्गे जाणें घडल काये ते त्वरितच समजण्यात होईल त्याप्रमाणे आ... बाबा मुंबईस जाणें जालियास चिंता नाही याचीही चाचणी वारंवार हे काये मुंबईस लिहितात येथे काय बोलोन तेथे समजावितात कलत नाही याकरितां तेथपावेतोही जाणे जाल्यानीं जनरालाचे मर्जीचे भाव समजतील व तेथें इतका पर्याये पडणार नाही प्रस्तुत तेथील आपले मोठे विलग पडिले तीा गोपालराव बाबा वारले हे त्या दरबारचे ढांसण मोठेच कमी जाले आस्तु त्यास इलाज कोण्हाचा नाही आपला वाली श्रीसांब तो सर्वानुकूल आहेतो चिंता नाही कोठेच संकट पडू देणार नाही मागे महदसंकटे आरबासुा येऊन पडली तेही निवारण केली पुढेही समर्थ तोच आहे प्रांतात भिलाचा उपद्रव फार जाला आहे त्यास संक्रांत जालियावर सरंजामसुा स्वारीस च्यार दिवस बाहेर जातों भगवानभाईसही बोलाविलें आहे त्याचे विचारे होईल तसे करू परंतु येविसीचे उत्तर पाठवावे

